स्वानंद

डॉ. रा.अं. पाठक



स्वानंद

डॉ. रा. अं. पाठक
एम. एस.

स्वानंद
(चिंतनपर स्फुट लेखांचा संग्रह)

प्रथमावृत्ती : १५ ऑगस्ट २०१४

© सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन

लेखक
डॉ. रा. अं. पाठक
एम. एस.
माजी जिल्हाशल्यचिकित्सक, कोल्हापूर.
४/१, पी. डब्लू. डी. हौसिंग सोसायटी,
माळी कॉलनी, टाकाळा, कोल्हापूर - ४१६ ००८
फोन : (०२३१) २५२६१६६
E-mail : dr.rapathak@gmail.com

प्रकाशक : **सौ. उषा रा. पाठक**

मुद्रक : **अंकिता प्रिंटींग प्रेस, कोल्हापूर.**

अक्षरजुळणी : **श्री. दीपक घंटे**

मुखपृष्ठ : **राजू देशपांडे (पुणे)**

कर्णबधिर शिशु विद्यालय, कोल्हापूर.
या संस्थेच्या मदतीसाठी
देणगी मुल्य १५०/-

(फक्त खाजगी वितरणासाठी)

अर्पण पत्रिका

माझ्यावर

उपचार करणाऱ्या

हृद्य डॉक्टर मित्रांना

हे पुस्तक

अर्पण.

डॉ. राघवेंद्र पाठक

- अनुक्रमणिका -

अ.क्र.	नाव		पृष्ठ क्रमांक
१	मूर्तिपूजा-तत्त्व आणि बोध	...	१३
२	अहंकार	...	३९
३	चारित्र्य व चरित्र	...	६१
४	अन्न हे पूर्ण ब्रह्म	...	८३
५	अध्यात्म व विज्ञान	...	१०१
६	सहनशक्ती व सहिष्णुता	...	१२१
७	संस्कृतीमुळे अवनती ?	...	१३७
८	आधुनिक आणि आधुनिकता	...	१६९
९	नाथसंप्रदाय व भक्तिमार्ग	...	१८९
१०	समर्थांचा महाराष्ट्र धर्म	...	२०९
११	आत्मीयता अथवा ममत्व	...	२३१
१२	विद्या आणि अविद्या	...	२५३
१३	अणुरणीयां थोकडा	...	२६९
१४	अधिक देखणे तरी	...	२८०

ऋण निर्देश -

विचारवंत मित्रांबरोबर चर्चा करताना किंवा ऐकताना काही प्रश्न समोर येतात. त्या प्रश्नांवर अगदी टोकाची मते ऐकायला मिळतात. त्यामुळे खरे काय असू शकते किंवा त्या प्रश्नावर इतर तज्ज्ञ अथवा मान्यवरांची काय मते असू शकतात आणि त्यातून मला काय बोध होतो व वाटते याचे संकलन करण्याचा एक प्रयत्न. या स्फुट लेखनात आत्मिक समाधानाचाच भाग अधिक आहे.

अशा स्फुट लेखांची पुस्तकरूपात बांधणी करावी अशी आग्रही इच्छा श्री. वि. गो. देसाई आणि डॉ. मा. ना. गोगटे यांनी व्यक्त केली. त्यानुसार मी हा एक प्रयत्न केला आहे. काही श्लोक / संदर्भाची पुनरावृत्ती वाटण्याची शक्यता आहे. लेखाच्या औचित्यानुसार तो वापरला आहे. पुस्तकातील चुकांस मीच जबाबदार आहे.

डॉ. गोगटे यांनी श्री वि. गो. देसाई यांच्या संस्कृत व वेदान्ताच्या सखोल ज्ञानाची व अभ्यासाची मला कल्पना दिली होती. त्यांच्याबरोबर झालेल्या पहिल्याच भेटीत, त्यांच्या सात्विक, निरभिमानी, निगर्वी व ऋषितुल्य व्यक्तिमत्वाची जाणीव झाली आणि काही शंकांबाबत चर्चा करताना त्यांच्या ज्ञानाची प्रचीती आली. त्याचबरोबर त्यांच्या नि:स्पृह, धार्मिक, (सदाचारी), शुद्ध अंत:करणाबरोबर सकारात्मक वृत्तीचा अनन्य साधारण अनुभव आला. त्यांनी मला या पुस्तकासाठी आपुलकीने मार्गदर्शन केले, सविस्तर वाचून मौलिक सुधारणा सुचवल्या. इतकेच नव्हे तर व्याकरणादी बाबींवर बारीक लक्ष ठेवून चुका सुधारून दिल्या. त्यांच्या या आपुलकी व मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचे औपचारिक आभार मानण्यापेक्षा, त्यांच्या ऋणात राहणेच पसंत करतो.

डॉ. मा. ना. गोगटे यांच्या सौजन्याचा मी वाद-संवादांतून भरपूर फायदा घेतला. त्यांनी देखील हे लिखाण वाचून योग्य ते मार्गदर्शन केले. त्यांचे आभार मानले तर त्यांच्यापासून दूर गेल्यासारखे होईल, म्हणून त्यांच्याही ऋणात राहणेच माझ्यासाठी योग्य आहे.

डॉ. ल. रा. नसिराबादकर संत साहित्याचे गाढे अभ्यासक यांच्याशी झालेल्या चर्चेतून मला खूप मोलाचे मार्गदर्शन मिळाले तसेच त्यांनी पुस्तकाच्या तांत्रिक बाबी बाबत जे मार्गदर्शन केले याबद्दल त्यांचे औपचारिक आभार न मानता त्यांच्याही ऋणात राहणेच मला आवडेल.

श्री. दीपक घंटे यांनी अक्षरजुळणी करून व श्री. राजेंद्र गवळी यांनी सुबक छपाई करून दिल्याबद्दल त्यांचा मी आभारी आहे.

स्वानंदाचे अंतरंग

सेवानिवृत्तीनंतर रिकामा वेळ कसा घालवावा, या विवंचनेत असणाऱ्या किंवा समवयस्क लोकांच्या टोळक्यांत बसून पंतप्रधानांनी काय करायला हवे होते, येथपासून ते आपल्या समाजात शिस्तच उरली नाही, इत्यादी वायफळ विषयांवर चर्चा करत बसणाऱ्या सेवानिवृत्तांहून पूर्णपणे वेगळे असणारे माझे प्रिय सुहृद डॉ. रा. अं. पाठक यांचे स्वानंदासाठी लिहिलेले पण परांनाही आनंद देणारे असे हे ग्रंथरत्न.

'आधी प्रपंच करावा नेटका । मग लागावे परमार्था ।' असा उपदेश करणारे, अन्य संतांहून वेगळे श्रीसमर्थ रामदास हे डॉ. पाठकांचे विशेष आवडते संत. त्यांचाच

'दिसामाजि काहीतरी ते लिहावे। प्रसंगी अखंडीत वाचीत जावे।'

हा उपदेश डॉक्टरांनी तंतोतंत पाळून आपले सेवानिवृत्त जीवन सार्थकी लावले. व्यवहारात 'काहीतरी' याचा अर्थ निरर्थक असा आहे. पण समर्थांनी 'थोडेतरी' या अर्थाने तो योजला आहे. डॉक्टरांनी मात्र 'थोडेतरी' एवढाच अर्थ न घेता उपयुक्त असे विपुल लेखन केले.

व्यवहारात अनेक विषयांविषयी अनेकांच्या मनात शंका उत्पन्न होतात, पण त्या निरसन करणारा कोणी न भेटल्याने विरूनही जातात. डॉक्टरांनी असे काही विषय

निवडले व त्यांचे सांगोपांग तर्कशुद्ध विवेचन या ग्रंथातील प्रबंधांतून केले आहे. उदा. ‘मूर्तिपूजा’. ती करावी किंवा न करावी, असा विचार मनात येऊ शकतो किंवा ‘सहनशक्ती व सहिष्णुता’ हे वरवर समानार्थी वाटणारे शब्द. पण यांचा नेमका अर्थ काय, ते माहीत नसते. काहीवेळा तथाकथित विद्वान ‘संस्कृतीमुळे अवनती’ झाली म्हणून ती मोडीत काढण्याच्या दृष्टीने काही खरडत असतात. त्यांचे हे मत कितपत बरोबर आहे, असा विचार डॉक्टरांच्या मनात येताच त्यावर साधक-बाधक मते पाहून, योग्य काय ते ठरवून, ते या ग्रंथात ते प्रबंधरूपाने मांडतात.

जसे हे व्यवहारातील विषय, तसेच आपल्या वेदोपनिषदादी ग्रंथातील बुचकळ्यात टाकणारे, ‘विद्या व अविद्या’ (ईशोपनिषद) ‘अन्न हे पूर्ण ब्रह्म’ (तैत्तिरीय उपनिषद) ‘महाराष्ट्र धर्म’ (श्रीसमर्थ) हे विषय आहेत. याविषयी कोणी काही, तर कोणी काही कोठेतरी संक्षेपात लिहिलेले असते. त्या सर्वांचे संकलन करून डॉक्टरांनी मुद्देसूद असे विवेचन या प्रबंधातून केलेले वाचून साक्षेपी वाचकाला आगळेच समाधान लाभते.

डॉक्टरांचा व्यवसाय शस्त्रक्रियेचा. त्यात ते विशारद असल्याने विषयाची चिरफाड करून त्यातले गुणदोष दाखवण्याची त्यांची शैली त्या व्यवसायानुरूप आहे. विषयविवेचन करताना सर्व मुद्द्यांचा साक्षेपाने

त्यांनी विचार केला आहे. शिवाय यासाठी स्वामी विवेकानंदांपासून श्री. बेलसरेंपर्यंत भारतीय विचारवंतांच्या बरोबरच अनेक पाश्चात्य विचारवंतांचे ही योग्यायोग्य विचार त्यांनी आपल्या प्रबंधातून मांडले आहेत. त्यामुळे वाचकाला एकाच जागी अनेकांची मते वाचायला मिळतात व त्यांची योग्यायोग्यता ठरवता येते.

हे केवळ संकलन नसून त्यांनी स्वत:ची ठाम मते प्रौढ भाषेत येथे मांडलेली आढळतात. 'मूर्तिपूजा-तत्त्व व बोध' हा प्रबंध वाचल्यानंतर मूर्तिपूजेचे खरे प्रयोजन काय व ते बाजूला ठेवून समाज मूर्तिपूजेच्या नावाने व्यापार कसा करतो, हे वाचकाच्या लक्षात येते व लेखकाप्रमाणे वाचकालाही सात्विक संताप आल्यावाचून राहात नाही.

आत्मीयता म्हणजे आपलेपणा. हा तसा अत्यंत सामान्य विषय. पण डॉक्टरांनी आपल्या लेखणीने त्याला परिसस्पर्श प्राप्त करून दिला आहे. त्यांचे लेख वाचताना ते पीएच्.डी. डॉक्टर असावेत, असे वाटू लागते. यासाठी त्यांचे नाथसंप्रदाय व भक्तिमार्ग किंवा समर्थांचा महाराष्ट्र धर्म किंवा कोणताही प्रबंध मन लावून वाचून पाहावा.

या प्रबंधांचे आणखी एक वैशिष्ट्य असे की, ते वर्तमानपत्रासारखे वरवर वाचण्याचे प्रबंध नव्हेत. मी ते तीनदा वाचले आणि तिसऱ्यांदा वाचताना त्यांचे खरे मर्म माझ्या लक्षात आले. खरा आनंद तेव्हा मिळाला.

खरेतर या प्रबंधांचे मला भावलेले खास वैशिष्ट्य वेगळेच आहे. विषय कोणताही असो, पण त्याचे तात्पर्य 'भारतीय संस्कृती कशी श्रेष्ठ आहे' हे दाखवण्यात असतो. कित्येक विद्वान संस्कृतीला नावे ठेवण्यात आपली विद्वत्ता खर्ची घालतात पण डॉक्टर पाठकांनी अंधश्रद्धेने नव्हे, तर डोळसपणे आपल्या संस्कृतीचा गौरव या ग्रंथातून केलेला आहे.

माझी सुज्ञ वाचकांना विनंती आहे की, त्यांनी यांतील त्यांना आवडणारा विषय निवडून तो मन लावून वाचावा. माझी खात्री आहे की, ते सर्व पुस्तक वाचल्याविना राहाणार नाहीत. डॉक्टरसाहेब ! आपण स्वानंदासाठी लिहिलेले हे ग्रंथरत्न वाचकांना आनंदाबरोबर बोधही देणार आहे. याबद्दल आपल्याला धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच.

श्री. वि. गो. देसाई
संपादक - गीता मंदिर पत्रिका

मुखपृष्ठासंबंधी थोडे

मानवी मनाची प्रसन्नता आणि जीवनाची सफलता साध्य करण्यासाठी ज्ञान-विज्ञानाची सांगड घालावी हा मूलमंत्र योगी वसिष्ठापासून ते आधुनिक ऋषी पू. विनोबा भावे यांनी ठामपणे प्रतिपादला आहे. श्री. राजू देशपांडे यांनी रंगाच्या प्रतीकातून त्याच तत्त्वाची व मानवी ऊर्जेची उत्कृष्ट चित्र निर्मिती करून प्रसन्नतेचे दर्शन घडवल्याचे जाणवते. याबद्दल त्यांना धन्यवाद.

चित्रातील कमळ हे ज्ञानाचे प्रतीक असून ते भारतीय संस्कृतीचे चिन्ह समजले जाते. हा लाल रंग मानवाच्या ऊर्जा निर्मितीचा आहे त्या उर्जेच्या स्पंदनांचा संबंध पृथ्वीशी असून ते शारीरिक ऊर्जेचे व जीवन शक्तीचे केंद्र समजले जाते. याच रंगातून आपण सगळे एक आहोत ही भावना व सकारात्मक समाज निर्माण करण्याची जबाबदारी आपली आहे हे दर्शविते.

ऊर्जेच्या निळ्या रंगातून 'तुझे (परमेश्वराचे) ते माझे होऊ दे' ही भावना होऊन आध्यात्मिक प्रगती दर्शविते. याच ऊर्जेमुळे आपण आपल्या कर्माधिष्ठिततेची योग्यता ठरवतो.

पिवळ्या रंगातून निघालेली स्पंदने आपल्यातील क्रियाशीलतेचे व इतरांशी असणाऱ्या जिव्हाळ्याच्या संबंधाचे दर्शन घडवतात. तसेच हा रंग ज्ञान, शहाणपणा व चातुर्य याचा द्योतक समजला जातो.

या चित्रातील अणू-रेणूचे रेखाटन हे विज्ञानाचे प्रतीक असून त्यांतील शुभ्रधवल पांढरेपणा शाश्वत तत्त्वाच्या प्रकाशाशी तुलना करतो हीच शुभ्रता मनाची शुद्धता दर्शविते.

थोडक्यात जीवनाच्या या रंगछटातून प्रतीत होणारे चित्र हे अहंकारी जीवनाच्या पलीकडे जाऊन मोठ्या मनाने विश्वाची उदात्तता जाणून संपूर्ण मानवेताचा सकारात्मक विचार करायला लावते, ज्यातून मन:शांती व स्वानंदाच्या लहरींचे दर्शन घडते.

१

मूर्तिपूजा - तत्त्व आणि बोध

प्रास्ताविक :

गेल्या २०-२५ वर्षांत विविध देवदेवतांच्या मूर्तिपूजेस वाढणारी भाविकांची गर्दी व त्या अनुषंगाने देवळांची संख्यात्मक वाढ आणि त्यातून जाहीर होणारे उत्पन्न हे कुणाच्याही मनात कुतूहल निर्माण केल्याशिवाय राहात नाही. मूर्तिपूजेचा उद्‌देश, त्यामागील अध्यात्म आणि त्यातून होणारा आत्मविकास आणि व्यवहारांत दिसून येणारे वास्तव याचे संकलनात्मक अवलोकन करण्याचा एक प्रयत्न.

पूजा ही वंदन, आराधना किंवा कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी केलेली कृती आहे. ती प्रतीकात्मक, मूर्तीच्या रूपांत किंवा मानस या तऱ्हेने केली जाते.

तसेच पूजा ही त्या ईशतत्त्वाशी अनुसंधान साधण्याची अगदी प्राथमिक अवस्था आहे. अनुसंधान म्हणजे जोडणे. या कृतीमध्ये आपल्या मनाला त्या ईशतत्त्वाशी जोडण्याचा प्रयत्न करणे. वास्तवात चराचरातील प्रत्येक वस्तू एकमेकांशी जोडली गेली आहे. कोठे ती दृश्य स्वरूपात तर कोठे अदृश्य स्वरूपात आहे. म्हणजेच ती व्यक्त आणि अव्यक्त रूपांत आहे.

अलीकडील शास्त्रज्ञांनी हे सिद्ध केले आहे की, जमिनीवरची जी विविध झाडे दिसतात, त्यांची जमिनीखाली मुळे एकमेकांत गुंतलेली नसतात तर जोडलेली असतात. ऑस्ट्रियन शास्त्रज्ञ Fritjof Capra

याने त्याच्या 'The Hidden Connections' या पुस्तकात असे प्रतिपादले आहे की, ''एखाद्या जंगलात झाड कोणत्या प्रकारचे आहे, ते नेमके कुठे रुजले आहे, त्याने काहीच फरक पडत नाही. जमिनीखाली सर्व झाडांची मुळे जोडली जातात आणि असे झाल्याने जमिनीवर ती झाडे सुटी सुटी, वेगळी दिसत असली तरी त्यांची मुळे जोडलेली असल्याने खरे तर तो एकच महाकाय वृक्ष असतो.'' याला तो निसर्गाचा चमत्कार म्हणतो. भारतीय विचारवंत त्याला ईश्वरी लीला असे म्हणतात, इतकाच काय तो फरक. बाकी तत्त्व एकच.

अशा या ईशतत्त्वाशी अनुसंधान साधण्याची ऋषि-मुनींनी एक जीवनपद्धती सांगितली. त्यात मूर्तिपूजा ही अविभाज्य घटक बनून गेली. प्रथम ती सांकेतिक, प्रतीकात्मक स्वरूपात अस्तित्वात होती. जसे, मंत्रोच्चार, यज्ञ आणि नामजप. याच पद्धतीने निसर्गातील देव-देवतांचे पूजन केले जावयाचे. प्रथम सूर्यदेवतेची प्रतीकात्मक पूजा केली जायची. त्या तेजाचे प्रतीक म्हणून अग्नीची आणि त्यानंतर अवतारी पुरुषांची मानवी रूपात पूजा करण्यात येऊ लागली, असे पू. विनोबा मानतात.

मूर्तिपूजा :

मूर्तिपूजा ही हिंदु धर्माची स्वतंत्र कल्पना आहे. ही नक्की आचरणात कधी आली, याबद्दल जाणकारांच्या मतांत बरीच विभिन्नता आढळते.

श्री. रसिक बिहारी मंजूळ यांच्या "Idol worship in Veda" या ग्रंथात, मूर्तिपूजेचे मूळ ऋग्वेदात सापडते. त्यावेळी (ऋग्वेद : ४.३२.२३) अशीच पद्धत पुराणांतही आढळून आल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

पं. पांडुरंग शास्त्री आठवले यांच्या ''मूर्तिपूजा'' या पुस्तकात खालील स्पष्ट उल्लेख आला आहे.

"ईश्वराची मूर्ती प्राचीन आहे. विष्णू, शिव, कृष्ण इ. आदिमूर्ती आहेत. चित्त एकाग्र केल्यानंतर ऋषींना ज्या रूपांत भगवान दिसले, ते परिपूर्ण रूप आहे. त्या रूपाचेच त्यांनी वर्णन केले. त्या वर्णनानुसार शिल्पकाराने मूर्ती बनवली. ती भगवंताची आदिमूर्ती. ते पुढे म्हणतात, काही लोकांना संदेह आहे की, वेदांमध्ये मूर्तिविषयक कल्पना नाही. तो संदेह चुकीचा आहे. वेदामध्ये अनेक ठिकाणी मूर्तीचा स्पष्ट उल्लेख सापडतो. रुद्राविषयी कृष्णयजुर्वेदात उल्लेख आहे.

या ते रुद्र शिवा तनूरघोरापापकाशिनी ।
तया नस्तनवा शन्तमया गिरिशन्ताभिचाकशीहि ॥

(कृ. य. वे. ४ काण्ड, पाठक ५)

अर्थ : हे गिरिशन्त, पर्वताच्या किल्ल्यात राहणाऱ्या रक्षक रुद्रा, शत्रूला रडवणाऱ्या वीरा, जे तुझे शान्त, मंगलरूप, निष्पाप - त्यामुळे सौम्य अनिष्ट दूर करणारे शरीर आहे, त्या सुखपूर्ण शरीराने आम्हांला अवलोकन कर. म्हणजेच अशा प्रकारच्या मूर्तीच्या रूपात प्रगट होऊन तू आम्हांला सुखी कर."

येथे भगवान रुद्राच्या भावनामय व करुणामय मूर्तीचा स्पष्ट उल्लेख केलेला दिसतो.

दुसऱ्या टोकाचे मत असेही आहे की, वेदकाळात ब्रह्म, ईश्वर हे जर निर्गुण निराकार आहेत, तर त्यांना साकार करण्याची गरजच काय ? म्हणून त्या निर्गुणाची पूजा, मंत्रोच्चाराच्या अर्घ्यांनी, यज्ञ व नामजपांनी करण्याची पद्धत होती, असे म्हटले जाते.

१८९६ साली स्वामी विवेकानंदांनी अमेरिकेत एका प्रवचनात मूर्तिपूजेचा थोडा ऊहापोह करून त्याचा उगम कसा झाला, हे विशद केले आहे. ते म्हणाले, "आत्मा किंवा ब्रह्म याचे कुणालाही ज्ञान होऊ शकत नाही. पण प्रत्येक जण आत्माच आहे. त्या आत्म्याला ज्ञानाचा विषय बनविण्यासाठी त्याला प्रतिबिंबित स्वरूपातच पहावे

लागते. त्या अदृश्य तत्त्वाला दृश्य रूपात पाहण्याच्या प्रयत्नातूनच तथाकथित मूर्तिपूजेची सुरुवात झाली आहे. लाकडी व दगडी मूर्तीपासून ते येशू ख्रिस्त किंवा बुद्धदेव यांच्यासारख्या महापुरुषांपर्यंत सर्व मूर्तीच आहेत. सगुण ईश्वराविरुद्ध बुद्धांनी जो सतत उपदेश केला, त्याचा परिणाम म्हणूनच भारतात मूर्तिपूजेचा प्रारंभ झाला. वेदामध्ये मूर्तिपूजेचा उल्लेख नाही. पण सृष्टीकर्ता अशा ईश्वराची कल्पना मागे पडल्यामुळे थोर आचार्यांच्या मूर्तींची पूजा करण्यात येऊ लागली. आणि स्वत: बुद्धदेवच एक मूर्ती बनले. जबरदस्तीने सुधारण्याचा प्रयत्न केल्यामुळे परिणामी स्वत: बुद्धदेवच एक मूर्ती बनले. जबरदस्तीने सुधारण्याचा प्रयत्न केल्यामुळे परिणामी स्वत: सुधारण्याची पिछेहाट होते. अर्चना-उपासना करणे हे मानवी स्वभावातच आहे. म्हणून माणूस ईश्वराला नेहमीच सगुण रूप देऊन त्याची पूजा करतो. ते त्याच्या पाठीशी असलेल्या ईश्वराचे प्रतीक आहे, असे समजून. ते प्रतीकच सारे काही आहे असे समजून नव्हे. त्याची पूजा केल्यास अर्थातच ती फार चांगली आहे.''

पण पूज्य विनोबांनी त्यांच्या 'धर्मामृत' ग्रंथात अगदी ठामपणे असे प्रतिपादिले आहे, ''मूर्ती बनविणे भगवान बुद्धाच्या नंतर सुरू झाले. त्याआधी प्रत्यक्ष मूर्ती नव्हत्या. बुद्धानंतर त्याच्या मूर्ती बनविल्या जाऊ लागल्या. फारसी भाषेत मूर्तिपूजेला 'बुतपरस्ती' म्हणतात. बुत म्हणजे बुद्ध, बुतपरस्ती म्हणजे बुद्धाची पूजा. ती प्रचलित झाली. मग हिंदूंनी विचार केला की, आपणही मूर्ती तयार करून त्यांची पूजा का करू नये ? त्यानंतर चंद्र, सूर्य, वरुण वगैरेंच्या मूर्ती बनल्या जाऊ लागल्या.''

पूजेचे प्रकार : मूर्तीच्या अनुषंगाने विचार करता पूजा दोन तऱ्हेने केली जाते. १) निर्गुण उपासनेने २) सगुण उपासनेने.

निर्गुण उपासना : यात अदृश्य परमात्म्याची उपासना आहे.

कारण तोच सर्वशक्तिमान, सर्व ब्रह्मांडांचा कर्ता, धर्ता, संहर्ता आहे. एकापेक्षा एक वरचढ अश्या शक्ती, इंद्र, आदित्य, गणेश, विष्णू, शिव, शक्ती (देवी) वगैरे नाना रूपांनी आपापल्या अधिकाराने कार्य करीत असल्या तरी त्या शक्तिमान देव ंचे सामर्थ्य निरंकुश नाही, तर समर्याद आहे. त्या स्वयंप्रकाशी नाहीत. त्यांना वागविणारा कोणी निराळा आहे आणि तो अज्ञात आहे. अशांची पूजा कशी करावी, यासाठी एकदा भगवान वसिष्ठांनी स्वत:च कैलासावर जाऊन भगवान कैलासनाथांना विचारले, प्रभो, देवपूजेचे विधान कसे असते, ते मला सांगा. कैलासनाथांनी सांगितले,

शमबोधादिभि: पुष्पै: देव आत्मा यदर्च्यते ।
तत्तु देवार्चनं विद्धि नाकारार्चनमर्चनम् ।।

(नीळकंठ पृ. २९-२९)

अर्थ : शम, बोध वगैरे पुष्पांनी (अनेक उपचारांनी) आत्मदेवाची केलेली पूजा हीच खरी पूजा. मूर्तिपूजा ही खरी पूजा नव्हे.

तसेच खऱ्या पूजेमध्ये

एकेनैवामृतेनैष बोधेन स्वेन पूज्यते ।
एतदेव परं ध्यानं पूजैषैव परा स्मृता ।।

(नी. पृ. ३८-२५)

अर्थ : एका ज्ञानरूप अमृतानेच परब्रह्माचे पूजन होते, हेच सर्वश्रेष्ठ ध्यान, हीच परा पूजा.

त्याच पूजेबरोबर असाही एक विचार सांगितला.

देशकालक्रियायोगात् यदुपैति शुभाशुभम् ।
अविकारगृहीतेन तेनैवात्मानमर्चयेत् ।।

(नी. पृ. ३९)

अर्थ : देश, काल, क्रिया यांच्या संयोगाने जे जे शुभ वा अशुभ प्राप्त होईल, ते निर्विकारपणे स्वीकारणे हीच त्या आत्मदेवाची पूजा

आहे.

निराकार आत्मतत्त्वाचे चिंतन हीच खरी पूजा आणि सहज प्राप्त होणारी शुभाशुभ स्थिती हीच पूजा सामग्री.

अशा तऱ्हेची पूजा अत्युच्च प्रज्ञावान लोकांसाठी असून योग मार्गाने मनाची एकाग्रता साधून कैवल्यप्राप्ती साधली जाते.

सगुण उपासनेतील पूजा -

उपासना म्हणजे (उप + आस्) = जवळ बसणे. हे लक्षात घेतले पाहिजे की, उपासनेमध्ये केवळ शरीराने जवळ बसणे नव्हे. तेथे मनाने सान्निध्य साधावयाचे असते. अर्थात उपासना ही मुख्यत: मानसी क्रिया आहे. शरीरसाध्य नव्हे. यामध्ये मनाची एकाग्रता सगुण भक्तीने साधावयाची असते. निर्गुणोपासना किती जरी श्रेष्ठ असली तरी ती सामान्य माणसाला जमणार नाही. म्हणून सगुणाची पूजा म्हणजे मूर्तीच्या रूपातील देवतांची पूजा, असा सोपा मार्ग ऋषिमुनींनी समाजोद्धाराच्या तळमळीने व प्रत्येक व्यक्तीच्या उद्धारासाठी दाखवून दिला. निराक़ाराचे सान्निध्य प्रत्येकाला झेपेल असे नाही, म्हणून निराकारच साकार करण्यात आला.

सगुण उपासनेतील मूर्ती कशी विश्वव्यापकतेचे प्रतीक आहे. यासाठी सृष्टी-उत्पत्ती व ईश्वरशक्ती यांचा विचार करणे उचित ठरेल.

सृष्टीची उत्पत्ती व ईश्वर : परमात्मा हे तत्त्व मान्य करूनच सृष्टिनिर्मितीचा आणि मानवी जीवनाचा क्रम लक्षात येण्यासारखा आहे. हे परमतत्त्व म्हणजेच परब्रह्म. ते निर्गुण, निराकार आहे. ते अति सूक्ष्म आहे, तसेच ते अनंत आहे. ते त्रिकालाबाधित आहे. उत्पत्ती व लय ही त्याची लीला चालूच असते. हे तत्त्व सर्व ब्रह्मांड व्यापून आणखी वर १० बोटे उरलेलेच असते.

याच ब्रह्माच्या लीलेतून अनेक जगे उत्पन्न झाली आहेत. त्यांपैकी आपले हे जग व त्यातील आपली पृथ्वी व त्यावरील सृष्टी हे

होय. या सृष्टीच्या उत्पत्तीचा क्रम व साखळी ऐतरेय उपनिषदात वर्णिली आहे. ती आजच्या ''Big Bang Theory'' शी सुसंगत अशी वाटते.

एका आत्म्याने अंभ △ द्युलोक व त्यावरचे लोक मरीची (म्हणजे अंतरिक्ष), मर (पृथ्वी), व आप पाताळादी लोक तयार केले. 'आप' पासून एक पुरुष बनविला. येथे पुरुष म्हणजे एक चैतन्य किंवा शक्ती अभिप्रेत आहे. तसेच या आपपासून जीव उत्पन्न झाले, हे आजच्या विज्ञानानेही मान्य केले आहे. या पंचतत्त्वांतूनच सबंध सृष्टी निर्माण झाली. तीच ही 'माया' किंवा 'जग' होय. यातील पंचतत्त्वांच्या संयोगाने सृष्टीतील सर्व (सजीव व निर्जीव) पदार्थांत जे गुण तयार झाले, त्यांचे वर्गीकरण सत्त्व, रज व तम या तीन गुणांत केले आहे. त्याच सगुण झालेल्या निर्गुण तत्त्वाला ईश्वर म्हटले जाते. यात निर्गुण ब्रह्माची शुद्धता असतेच; पण लीला म्हणून अनेक होण्याची शक्तीपण असते. यावरून या जगास त्या परब्रह्माचे व्यक्त स्वरूप समजले जाते आणि त्या सोबतच त्याचे ते अव्यक्त तत्त्व देखील असते. तेच ब्रह्मतत्त्व. म्हणून या जगातील अणुरेणूंमध्ये अदृश्य असलेले जे ब्रह्मतत्त्व आहे तेच आत्मतत्त्व होय. पंचमहाभूतांपासून बनलेली मायाशक्ती सगुण रूपांत त्यात वसत असते. तेच हे ब्रह्म आणि माया किंवा पुरुष आणि प्रकृती व या जगातील ईश्वर होय. याच ईश्वराची उपासना व भक्ती करून आपल्यांत असलेल्या आत्मतत्त्वाची ओळख करून मोक्ष प्राप्त करण्याचा उद्देश असतो. इथे लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे या जगात शिव व शक्ती दोन्ही एकत्र असतात.

तात्त्विकदृष्ट्या विचार करता विश्वातील लहान मोठ्या सर्व वस्तू म्हणजे विश्वाचे संक्षेपच आहेत. विश्वातील विविध शक्तींचे वर्गीकरण करून जितकी मूलतत्त्वे निघतील, तितकी सर्व विश्वातील वस्तुमात्रात भरलेली आहेत, असे दिसून येईल. त्याचप्रमाणे दुनियेतील प्रत्येक वस्तू आकाराने भिन्न असली तरी तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने परिपूर्ण

तत्त्वांची बनली आहे.

मूर्तिपूजेत हाच मुद्दा आहे. शालिग्रामात विश्वरूप विष्णूची भावना करायची असते अशी लौकिक कल्पना आहे. पण शालिग्रामाच्या दृष्टीने भावना करायचा प्रश्नच नाही. शालिग्राम स्वत:सिद्ध विश्वरूप आहे. मूर्तिपूजा म्हणजे खोटीच पण भावना उपयुक्त असा अर्थ नाही. 'भावना' हा शब्द भक्ताच्या बाजूचा आहे. शालिग्रामाच्या बाजूचा नाही. शालिग्रामात विष्णूची वैदिक मंत्राने प्राण-प्रतिष्ठा करायची, हा अर्थ नाही. वैदिक मंत्रांनी सचेतनच असलेल्या पण अचेतन भासलेल्या शालिग्रामातील चैतन्यमय विष्णूची स्वत:च्या हृदयात प्राण-प्रतिष्ठा करायची असा अर्थ आहे. शालिग्रामावरून निखिल भूतग्रामाची कल्पना होऊ शकते. शालिग्राम किंवा कोणताही पदार्थ म्हणजे ब्रह्म 'सूत्र' आहे आणि ही सृष्टी ह्या ब्रह्म-सूत्राचे भाष्य आहे. भगवंतांनी मूर्तिपूजेचे म्हणजे सगुण साकार मूर्तीचे महत्त्व गीतेच्या १२ व्या अध्यायात असे सांगितले आहे.

मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते ।
श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मता: ।।

(१२ - २)

अर्थ : जे कोणी माझ्या स्वरूपामध्येच मन एकाग्र करून निरंतर माझ्या भजनात व ध्यानात राहून, नित्ययुक्त होऊन अनन्य श्रद्धेने माझीच (सगुणरूप भगवंताची) उपासना करतात, तेच माझ्या दृष्टीने सर्वांत श्रेष्ठ योगी आहेत.

निराकारामध्ये चित्त एकाग्र होणे कठीण असते. माझ्या घरातील टेबल म्हटले की, एक आकार व तिचा गुण नजरेसमोर येतो. माझ्या घरातील आकाश म्हटले तर काहीच अर्थबोध होत नाही. म्हणून मयि मन: आवेश्य मध्ये 'मयि' (माझ्यामध्ये) हा शब्द सगुण साकाराच्या संदर्भातीलच आहे. म्हणून लौकिक भक्तीमध्ये सरळपणे चित्त एकाग्र

करण्याचा भगवंतांनी मार्ग दाखविला. त्यालाच आपण मूर्तिपूजा म्हणतो.

मूर्तीची प्राण-प्रतिष्ठा :

वरील तात्त्विक विचार व व्यवहारात होत असणारी प्राण-प्रतिष्ठेनंतर केली जाणारी पूजा यांमध्ये थोडा विरोधाभास वाटण्याची शक्यता आहे, पण अंतिमत: ते तत्त्व सत्यच वाटेल.

व्यवहारांत कोणत्याही प्रकारची मूर्ती असली तरी ती जड पदार्थाचीच समजली जाते. प्राण-प्रतिष्ठा म्हणजे मूर्तीत प्राण ओतायचा. म्हणजे आपली श्रद्धाच ओतायची. ही क्रिया वेदमंत्रांनी करायची रूढी आहे. वेदानंतरही वेदमान्य परंपरेतल्या ज्या भावना रूढ झाल्या, त्या वेदमान्य भावनाच आहेत. म्हणून त्या भावनांचे मंत्रदेखील प्राण-प्रतिष्ठेस योग्य समजले जातात. प्राण-प्रतिष्ठा म्हणजे विधियुक्त पूजा सुरू करण्यापूर्वी मूर्तीत प्राण ओतून म्हणजे चैतन्य निर्माण झाल्याची भावना करणे. मूर्ती हालचाल करू शकत नाही. म्हणून भावनेनेच तीत चैतन्य ओतणे. आपल्या जश्या भावना, तसे त्यातील देवत्व भासते. थोडक्यात आपला देव - परमेश्वर आपण स्वत:च बनवून घ्यायचा. देव जसा भक्ताचा कर्ता मानला जातो, तसा भक्त देखील देवाचा कर्ता आहे. आम्ही एकमेकांचे कर्ते आहोत किंवा आम्ही एकच आहोत, हेच यातून प्रतीत होते.

हिंदुधर्मात मूर्तिपूजेबरोबरच मूर्तीच्या गौणतेचा विचार सांगितला आहे. पूजेबरोबर आवाहन - विसर्जनाची क्रिया जोडली आहे. हिंदुधर्माने गणपती बनविणे व विसर्जन करणे दोन्ही शिकवले, म्हणजे बनविणारे आणि बुडविणारे तुम्ही दाखविले. आवाहन व विसर्जन ही पूजेची लक्षणे आहेत. माती, चंदन इ. ची गणपतीची मूर्ती तुम्ही बनवली. ''गणानाम् त्वा गणपतिं'' म्हणून त्याची स्थापना केली. प्राण ओतला आणि आता प्राण काढल्यावर केवळ मूर्ती विसर्जनाचा कार्यक्रम करून त्याद्वारे खरा परमेश्वर तुमच्या हृदयात आहे, हे सांगण्याकरिता

तुमच्याकडून ते काम करवून घेतले. मूर्तिभंजन करायचे नाही. ती आदरपूर्वक विसर्जन करायची. या क्रियेतून आणखी एक बोध होतो, म्हणजे ज्याचे सर्जन केले, त्याचेच विसर्जन करायचे. त्यासाठी लागणारी सक्ती-अनासक्ती आपल्यापाशी असली पाहिजे.

हिंदुधर्मात मूर्तिभंजन मान्य नाही. पूजेकरिता मूर्ति निवडण्याचे स्वातंत्र्य आहे. पण मूर्ती तोडण्याचे नाही. ती एक प्रकारची हिंसाच आहे, असे मानले जाते.

मूर्तिपूजा गैर आहे, तिला घालवणे योग्य असे म्हणणाऱ्यांनी यापेक्षा दुसरा चांगला, उदात्त व मानवी मनावर नियंत्रण ठेवणारा मार्ग समाजासमोर ठेवला, तरच ते शक्य होईल. मूर्तिपूजेच्या रूपाने हा धर्म टिकेल, तो फेकून देता येणार नाही.

मूर्तिपूजेने काय साधता येते ?

(१) मनाची एकाग्रता व शुद्धता :

मानवी जीवनात मनाला फार महत्त्व आहे.

मन हे अतिसूक्ष्मही आहे व अतिविशालही आहे, तसेच ते फार चंचल आहे. भृगुऋषींनी तर मन म्हणजे ब्रह्मच आहे, असे सांगितले आहे. मन हेच भावनेचे मानवी शरीरातील, मेंदूतील किंवा हृदयातील एक स्थान आहे. जीवनाच्या प्रत्येक क्रियेत मन असणे आवश्यक आहे. म्हणजे भोगासाठीही मन पाहिजे तसेच मुक्तीसाठीही मनाची गरज आहे. मनाचे दोन भाग आहेत. एक 'ज्ञ' मन म्हणजे (Experienced State of Mind) आणि दुसरे 'अज्ञ' मन म्हणजे (Inexperienced State of Mind). फ्राईड सारखा मानसोपचार तज्ज्ञ असे सांगतो की, मनाचा ३/४ भाग अज्ञात आहे. फक्त १/४ भाग मानवाला समजला आहे व तसा उत्क्रांत झाला आहे. अतिशय विवेकपूर्ण बुद्धीने, अंतर्मुख होऊन मन संयमित करू शकलो तर फक्त मनाचा १/४ भागच संयमित होऊ शकेल. मग उरलेला भाग (जो

अज्ञात) आहे तो शुद्ध कसा करणार? याच्या शुद्धीकरणासाठी शास्त्रकारांनी चित्तएकाग्रतेचा सल्ला दिला आहे.

मनाच्या शुद्धीकरणासाठी चित्त एकाग्रता आणि त्यासाठी मूर्तिपूजा हा जीवन विकासासाठी ऋषींनी मार्ग सांगितला आहे. मूर्तिपूजेमध्ये भगवंताची खुशामत करावयाची नाही किंवा त्याच्याकडे एकटक पाहण्याची नाही. तर मनाद्वारे भगवंताची मूर्ती निर्माण करावयाची व त्याच्या गुणसंवर्धनाचे प्रयत्न करायचे.

मन जेव्हा मूर्तीचा आकार घेते, तेव्हा त्या स्थितीला एकाग्रता म्हणतात. ही एकाग्रता टिकली पाहिजे. जेव्हा मूर्तीचा आकार मन घेते, तेव्हा भगवंताचे गुण त्याच्यात संक्रान्त होतात आणि त्या गुण-ग्रहणाने मन शुद्ध होते व मानवाच्या विकासास मदत होते.

ही एकाग्रता साधण्यासाठी ध्यानाची गरज आहे. ध्यानासाठी मानवाकार मूर्तीचा स्वीकार केला की, प्रथम तनपूजा नंतर गुणपूजा व तत्त्वपूजा अशा चढत्या पायऱ्या तयार होतात. ह्या पायऱ्यांनी गेल्यास मन भगवंतासारखे बनेल.

असे झाले की, मन शक्तिशाली, प्रगमनशील, संवेदनशील, संस्कारी व निर्भय बनते आणि फलस्वरूप सर्वांगीण विकास होतो आणि यामुळेच त्याला वस्तुनिष्ठ व आत्मनिष्ठ सुख प्राप्त होऊ शकते.

(२) निरहंकारितेचा अभ्यास :

मूर्तिपूजेमध्ये मानवातील अहंकार कसा कमी करता येईल, याचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने बघावे लागेल. मानवसेवा हे मानवाचे सर्वप्रथम कर्तव्य आहे, यात कोणतीच शंका नाही. पण मानवात बरेच विकार असतात. जो सेवा करतो व ज्याची सेवा केली जाते, या दोघांतही विकार असतात. अशावेळी सेवा करताना तो ईश्वराचा अंश नाही, अशी भावना तयार होऊ शकते. ज्याची सेवा केली जाते, त्याच्या विकाराची प्रतिक्रिया सेवा करणाऱ्याच्या मनावर होऊ शकते.

हे टाळण्यासाठी मूर्तिपूजा एक साधन होऊ शकते.

मानवाने त्यावर एक तोडगा काढला. निर्विकार दगडाला प्रतीक मानले व त्यात स्वतःची आकांक्षा भरली आणि त्यात ईश्वराचे आरोपण करून त्याची तो पूजा करू लागला. पूजेद्वारे आपल्या अहंकाराला व विकारांना शून्य बनवण्याचा तो प्रयत्न करू लागला. योगसूत्रात ईश्वराची व्याख्या ''रागद्वेषरहितः पुरुषविशेषः'' अशी केली आहे. पूजेने हे गुण आपल्यात उतरावेत, हे मनात बिंबवण्याचा प्रयत्न आपण करतो. अभ्यासाची दृष्टी असली की, साधन उपयोगी पडते असे म्हटले जाते. त्यात दोष साधनाचा नसतो, तर दृष्टीच्या अभावाचा असतो. हेच मूर्तिपूजेवरून जाणवते.

(३) मन:शांती :

मन हे फार चंचल आहे. त्याला स्थिर करणे अत्यंत आवश्यक असल्याने त्यासाठी काय करता येते की, जेणेकरून त्याने विषयवासनांचा ।कंवा इतर दुष्टप्रवृत्तींचा विचार करू नये. म्हणून त्यास प्रथम शांत करून त्यातील संकल्प-विकल्पाचे दोष दूर करावे लागतील.

उपनिषद म्हणते, ''मनो वा संकल्पः'' म्हणजे मन म्हणजे संकल्प. संकल्पामध्ये दृढता असते. ती चुकीचीही असू शकते. उदा. मला पैसा पाहिजे असा मनुष्याचा संकल्प होऊ शकतो. पैशाने माणूस सुखी होईल, ही धारणा चुकीची असू शकते. मनाचा दुसरा गुण विकल्प. विकल्प म्हणजे हे करू की नको, स्वीकारू की नको, ह्याचा निर्णय न लागणे. यातून त्या व्यक्तीची असमर्थताच प्रगट होत असते. संकल्पात जडता तर विकल्पात असमर्थता. दोघांनाही दूर ठेवावयाचे असेल आणि विवेक जागृत ठेवायचा असेल, तर मन:श।ती आवश्यक आहे. जोपर्यंत अहंकार, वासना, यांनी युक्त मन मनुष्याला वाटेल तिकडे नेत असते, तोपर्यंत शक्यनो सन्मार्गावरच राहायला - होडीच्या

नांगराप्रमाणे जागच्या जागी स्थिर ठेवायला - मूर्तिपूजा, तळमळीची भगवद्भक्ती - हाच खरा उपाय आहे. नीळकंठपुराणात म्हटले आहे,

यावदप्रतिबुद्धस्त्वम् अनात्मज्ञतया स्थित :।
तावच्चतुर्भुजाकारदेवपूजापरो भव ॥

(नी.पु.५३.९८)

तत्कर्मात्संप्रबुद्धस्त्वं ततो ज्ञास्यसि तत्पदम् ।

(नी.पु.५३.९९)

अर्थ : जो पर्यंत तुला ज्ञान झाले नाही, आत्मज्ञता आली नाही, तोपर्यंत सगुण मूर्तीच्या उपासनेनेच तुला तो अधिकार प्राप्त होईल.

मूर्तिपूजेने शांत व स्थिर झालेल्या मनाला दिवसभरात त्याच अवस्थेत किंवा त्याच्या जवळपास ठेवण्यासाठी खालील काही गोष्टी अंमलात आणता येतील.

१) ''मनातील अपराधी वृत्तीपासून (Guilty Consious) स्वत:ला दूर ठेवावे लागेल. अपराधी मनोवृत्ती सारखी बोचत असते. माणसाकडून काही ना काही उलटे सुलटे होत असते. अशावेळी आपल्या मनातील भावना ओकून टाकली पाहिजे. शास्त्रकार सांगतात, तू भगवंताला सगळे काही सांगून टाकलेस, तर तुला प्रसाद मिळणार नाही, म्हणून ते सर्व गुरूला सांग. तुझ्या वाईट गोष्टी देखील गुरूला सांग. एकदा सांगून टाकल्यावर त्याचे पुन्हा दिवसभरात स्मरण होणार नाही. गुरू नसेल तर आपल्या जवळच्या मित्राला किंवा ज्या व्यक्तीविषयी ती अपराधाची भावना वाटते, त्या व्यक्तीलाच सांगितले तर अधिक उत्तम आणि हे काम मन स्थिर व शांत झाल्याशिवाय होऊ शकत नाही.

२) मनाला रिकामे न ठेवता ते सतत कामात गुंतवून ठेवावे. रिकाम्या मनात काय विचार येतील व कशी कृती होईल हे सांगणे कठीण आहे. (Empty mind is Devil's workshop) सातत्याने तेच

काम करताना यात यांत्रिकता येते व शरीर तर काम करते पण मन इतरत्र भटकत असते. तेव्हा कामांत बदल करता आला पाहिजे. मग मन पण बदलत जाते.

३) कामास परब्रह्म समजले पाहिजे. "**कर्मदेवो भव**" काम करणे असे मानले पाहिजे की, ही देवाची पूजा आहे. "**स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः**" (श्री. गीता १८.४६) प्रिय व्यक्तीसाठी काम करतो, तेव्हा मन त्या कामाबरोबर असते. त्याने रोजच्या कामांत नावीन्य येते, दिव्यता येते व मन त्याला जोडून जाते. एखादी स्त्री स्वयंपाक घरात आमटी बनवीत असेल, पण ती आमटी कोणासाठी बनवीत असते? पतीसाठी, किंवा मुलासाठी. मग त्यांत तिला त्यांचे प्रतिबिंब दिसते व ती कामाशी अधिक समरस होते.

४) चुकीच्या महत्त्वाकांक्षा ठेवल्याने देखील मन मरते. महत्त्वाकांक्षा ही रबरासारखी असते. तिला परब्रह्मापर्यंत माणूस खेचू शकतो. पण माणसाला मर्यादा असतात. त्यांची शक्ती मर्यादित असते. चुकीची महत्त्वाकांक्षा सफल झाली नाही की, तो भाग्याच्या नावे ओरड करतो. दैव आपल्या हातात नाही. ते भगवंताच्या हातात आहे, असे त्याला वाटते व तो भगवंताच्या पूजेला लागतो. पण भगवंत दैवालाही स्पर्श न करणारे असतात. त्यामुळे त्याला काही लाभ होत नाही. पूजेचा भगवंतावर काही परिणाम होत नाही हे कळताच माणसांत नास्तिकता वाढते. म्हणून मनास ताजेतवाने ठेवण्यासाठी अवाजवी अपेक्षा ठेवू नयेत.

५) चित्ताच्या एकाग्रतेसाठी व स्थिरतेसाठी मनाचा अभ्यास आवश्यक आहे. अभ्यासी मन कृतिशील राहते. सर्व भावनांना सोबत घेऊन ईश्वराशी नाते जोडते. म्हणून ईश्वर हा देहधारी असावा. त्याचा देह मानवी असावा. मग मन त्या आकारात रमते. असे विचारवंतांचे सांगणे आहे.

याच मूर्तिपूजेच्या माध्यमातून भक्तिरस आळवला जातो व निर्गुणाकडे जाण्याची वाटचाल केली जाते. वरवर दिसायला ही भक्ती सोपी वाटते खरी, पण वास्तवात ती कठीण आहे. खुद्द संत तुकाराम त्यास "सुळावरील पोळी" म्हणतात. एका अभंगात ते म्हणतात -

भक्ती तो कठीण शूळावरील पोळी । निवडे तो बळी विरळा शूर ।
जेथे पाहे तेथे देखीचा पर्वत । पायाविण भिंत तातडीची ।
कामावले तरी पाका ओज चढे । रुची आणि जोडे श्लाघ्यता हे ।
तुका म्हणजे मना पाहिजे अंकुश । नित्य नवा दिस जागृतीचा ॥

तु. गाथा ५४१

अर्थ : पुरणपोळी खाण्यासारखी भक्ती ही गोड व सोपी असली तरी सुळावर बसून ती पोळी खावी लागत असल्यामुळे ती कठीणही आहे. बहुतेक सगळीकडे पायावाचून भिंत बांधावी तसा भक्तांचा देखावाच असतो. स्वयंपाकाला किंवा कोणत्याही पाकाला रुची आणि ओज येण्याकरिता जो परिपाक व्हावा लागतो, तो करण्याची कृती पायाशुद्ध असावी लागते. त्याप्रमाणे भक्तीला नित्य टोचणी पाहिजे व त्याकरिता सदैव जागृत व सावध राहिले पाहिजे. मनावर अंकुश ठेवून भक्ती जो करतो, तोच खरा बलवान आणि विरळा आढळणारा पुरुष होय.

व्यक्त व अव्यक्त पूजा :

सगुण पूजेमध्ये इष्ट देवतांना आपल्याला भावलेला आकार देऊन मानवी रूपांत त्यांच्या मूर्ती बनविल्या व त्यातून निर्गुणाकडे जाण्यासाठी एक मार्ग स्वीकारण्यात आला. याला तज्ज्ञ निर्गुण उपासनेची पहिली पायरी जमतात. पण पू. विनोबांच्या मते, हिंदु धर्माने मूर्तिपूजेस एक नमुन्याची वस्तू म्हणून स्थान दिले आहे. ते मूर्तिपूजा अत्यंत आवश्यक व महत्त्वाची वस्तू मानत नाहीत. त्यांनी त्यास खेळण्याची उपमा दिली

आहे. जसे लहान मूल खेळण्यांत ज्या तन्मयतेने भाग घेते व पुढील ज्ञानाचा पाया तयार करते तसेच हिंदुधर्म पूजेमध्ये रस घेतो. त्याला माहिती आहे की, यापेक्षा उच्च आणखीन काहीतरी आहे. कारण या धर्माची अशी धारणा आहे की, जो परमात्मा अव्यक्त रूपाने सर्व चराचरात भरला आहे, तोच व्यक्त रूपाने म्हणजे जगद्रूपाने प्रकट झालेला आहे. म्हणून प्रत्येक वस्तूत परमात्मा अव्यक्त रूपात अस्तित्वात असतो. म्हणजे प्रत्येक वस्तूची पूजा अथवा जगत्पूजा हिला मूर्तिपूजा म्हणण्यापेक्षा व्यक्त पूजा म्हणणे अधिक सयुक्तिक होईल. त्यांच्या मते पूजा व्यक्त व अव्यक्त या दोन प्रकारे होऊ शकते.

व्यक्त पूजेचे तीन प्रकार विनोबा मानतात. १) मूर्तिपूजा (अर्थात स्थलपूजा) २) अवतारपूजा (कालपूजा) आणि ३) आत्मपूजा (सर्वजीवपूजा)

१) स्थलपूजा :

निरनिराळ्या व्यक्त वस्तू ज्या जीवनविकासास कारणीभूत आहेत त्यांची पूजा करण्याची प्राचीन परंपरा भारतात आहे. त्या त्या वस्तूमध्ये परमात्मा समजून त्याची उपासना केली जायची. उदा. पाण्याच्या ठिकाणी जलदेवता समजून, शेतात - क्षेत्र देवता, घरात - वास्तु देवता, वनांत - वनदेवता अशा देवतांची पूजा करताना काही नियम घालून देण्यात आले. ज्यामुळे पूजेचे पावित्र्य टिकून राहण्यास मदत मिळते व आत्मिक समाधान व ईश्वरापर्यंत पोचल्याची भावना स्थिर होते. पूजेचा आचार केवळ आधिभौतिक केला तर अधिभौतिक फायदा होईल. पण आध्यात्मिक भाव त्यात असेल तर आध्यात्मिक व अधिभौतिक दोन्ही लाभ मिळू शकतील. जर आध्यात्मिक भावना कमी झाली तर अधिभौतिक दृष्टीने फायदा होईल. कोणत्याही प्रकारे पूजा केली तरी ती विकासक वस्तूची पूजा व ज्ञानपूर्वक केलेली पूजा

असेल. त्या त्या वस्तूची योग्य पूजा ही स्थलपूजा. कारण कोणत्याही वस्तूने स्थलाचाच बोध होतो. म्हणून मूर्तिपूजेला येथे स्थलपूजा म्हटले आहे.

२) कालपूजा (अवतारपूजा) :

अवतारपूजा म्हणजे भूतकाळातील उत्तमोत्तम गोष्टींचे, उत्तमोत्तम मनुष्यांच्या गुणांचे स्मरण, पूजन. याबरोबरच त्यांचे अनुकरण करणे यालाच कालपूजा म्हटले आहे. भविष्यकालाबद्दल कोणीच सांगू शकत नाही. वर्तमानात तर आपण जगतच असतो. पण भूतकाळातील घटना व हितकारक गोष्टींनी जी संस्कृती निर्माण होते, तिचे स्मरण व संवर्धन करणे, तिचा विकास करणे ही कालोपासना - कालपूजा अथवा अवतार पूजा होय. श्राद्धाची कल्पना पण अशीच आहे. श्रद्धेने पूर्वजांचे स्मरण व त्यांच्या संस्कृतीचे अनुकरण ही श्राद्धातील मुख्य वस्तू आहे.

अवतारपूजेमध्ये आणखी एक गोष्ट अभिप्रेत आहे. ज्यामध्ये पूर्वजांच्या गतकाळातील चुका किंवा पूर्वी योग्य वाटत असलेल्या व आता निरुपयोगी झालेल्या अर्थात आता अयोग्य वाटत असलेल्या वस्तू, रूढी परंपरा यांचे विसर्जन करणे. तेही श्रद्धापूर्वक करणे हे कालोपासनेत गृहीत धरले आहे.

३) सर्वजीवपूजा (आत्मपूजा) :

आपल्याला जसा देह आहे व त्याला सुखदु:खादी भावना आहेत, त्यामुळे इतरांच्या देहाच्या गरजा त्यांच्या सुखदु:खाच्या कल्पना आपल्याला कळू शकतात. त्यांचीही सुखदु:खाची आपण काळजी करावी व शक्यतो मदत करावी हा भारतीय संस्कृतीचा आपणास वारसा आहे. ''पिंडी ते ब्रह्मांडी'' ही ती विचारधारा आहे. आपला देह फक्त आपल्यासाठीच नसून त्याचा इतरांना उपयोग होत असल्यास करावा व फक्त आपला देहच एकटा नसून सर्वांच्या देहातील जीव सारखाच व भावना तश्याच समजून सगळ्याच देहांना आपले मानून सर्व जीवांची

काळजी करणे ही ती सर्वपूजा व हाच मानवधर्माचा गाभा आहे.

अव्यक्त पूजा : ब्रह्मचिंतन, ध्यान, धारणा, समाधी इ. गोष्टी अव्यक्त पूजेत येतात. वरील तीन तऱ्हेनी होणारी पूजा जर आपण तन्मयतेने करू तर ब्रह्मचिंतन काय, हे आपणास कळेल, असे विनोबा मानतात.

येथे पू. विनोबांनी परंपरेनुसार चालत आलेल्या पूजापद्धतीचा म्हणजे १) मूर्तिपूजा २) मानस पूजा ३) परा पूजा किंवा सकाम व निष्काम पूजा यांच्या संकल्पनेच्या जीवा-शिवाच्या तत्त्वावर आधुनिक विचारानुसार सांगितलेल्या पद्धती समाजोन्मुख अशाच आहेत असे वाटते.

पूजेने व्यक्तिविकास साधला जातो का ?

एकेकाळी भारतीय समाजाचा आचार व विचाराचा लंबक चेतनेला अग्रस्थान देऊन व जडाला गौण मानून एका टोकाला स्थिरावला होता. तोच लंबक आज अगदी दुसऱ्या टोकाला ऐहिक सुखाच्या लालसेत चेतनेला जबरदस्तीने ओढत आहे. अशा स्थितीत पूजेचे मूल्यमापन बरेच गुणसापेक्ष ठरते. ज्या व्यक्तीचे आचरण जड व चेतन या जीवनातील अंगांना समपातळीवर ठेवून स्वधर्माचे व स्वकर्माचे पालन करीत असते, ती व्यक्ती आपल्या विकासाच्या मार्गावर आहे, असे समजावे लागेल. यासाठी खालील गोष्टी विचारांत घ्याव्या लागतील.

१) आज श्रद्धेच्या संदर्भात समाजमन कसे आहे ?

२) समाज सांस्कृतिकदृष्ट्या कोणत्या संक्रमणावस्थेत आहे ?

१) श्रद्धेच्या संदर्भात विचार करता समाज विविध रूपात विभागला गेला आहे. त्या श्रद्धा परिवर्तनीय असू शकतात.

१) अपार श्रद्धा व पूजेतील एकाग्रता - हा वर्ग समाधानी असतो.

२) श्रद्धा आहे पण एकाग्रता जमत नाही - व्यवहारी

३) श्रद्धा नाही पण कर्मकांड मात्र आहे - ढोंगी व स्वार्थी
४) अर्धवट श्रद्धा आणि अर्धवट कर्मकांड- निर्णय न घेण्याची क्षमता
५) श्रद्धा ही नाही व कर्मकांडही नाही - बुद्धिप्रामाण्यवादी, विद्वान किंवा पाखंडी
६) अश्रद्ध पण चारित्र्यवान - नास्तिक असून आध्यात्मिक

३) सांस्कृतिक संक्रमणावस्था - याचे फारच यथार्थ वर्णन प्रा. के. वि. बेलसरे यांनी करून ठेवले आहे. ते म्हणतात "तरुण वयाच्या १५-४५ या वर्षात मनुष्याचे कर्तृत्व प्रखरपणे कार्यरत असते. सुरुवातीस स्वत:चा देह टिकवण्यासाठी व बुद्धिवाढीसाठी कर्तेपणाची धडपड असते. पुढे कुटुंबाच्या भरभराटीसाठी, पैसाप्राप्तीसाठी खटपट असते. व्यवसायाच्या कारकीर्दीत तीव्र संघर्षास तोंड देत त्याने जे मिळवले, त्याला मान्यता (Recognition) मिळवण्यासाठी, स्वत:च्या अर्थपूर्ण अस्तित्वासाठी (Significant Existance) आणि अहंकारपूर्तीसाठी (Self actualization) त्याची सर्व काही करण्याची तयारी असते. आजच्या सामाजिक परिस्थितीत आपली होणारी घडण आणि अंतर्मनात दडलेल्या वासना यांमुळे माणूस असा वागतो. ऐहिक सुखासाठी पैसा मिळवण्यासाठी व त्यासाठी लागणाऱ्या पदव्या, पदे मिळवण्यासाठी चढाओढ आणि तुलना सुरू असते. इच्छित यश प्राप्त झाले नाही तर समाधानी न राहता त्याच्या मनात खंत व चित्तवृत्तीत अशांती असते. आजच्या युगात कर्तव्य हे कर्माच्या आवश्यकतेच्या प्रमाणात होत नाही, तर कर्माच्या फळाची हाव ठेवून होते. याला कर्तृत्वाचा कार्यगंड (Workaholic Cult) असे म्हणतात. फलहेतूच्या सतत चिंतनामुळे आजचा तरुण सारखा आपल्याच विचारात हरवलेला, चिडचिडा आणि त्रस्त दिसतो. तो एक जिवंत यंत्रमानव बनला आहे. उद्याच्या काल्पनिक यशप्राप्तीच्या काळजीने त्याला आज वर्तमानातील

भाकरी गोड लागत नसते. या सर्वांचे मुख्य कारण म्हणजे आपल्या जीवनात पाश्चिमात्य संस्कृती घुसली आहे. आताची संस्कृती Result driven work culture झालेली आहे. निकाल आणण्याच्या (Result Orientation) प्रयत्नात सर्वसाधारण माणूस आपले नीतिधर्म, सद्भाव, सदाचार विसरत चालला आहे. (The society is becoming corrupt and culturelly Bankrupt.) समाज एवढ्या झपाट्याने भ्रष्ट होत आहे की, आपण ना तो बदलू शकत, ना त्याच्या बरोबर चालू शकत. म्हणून सामान्य माणूस दुःखात आणि मनाच्या ताणतणावात जीवन जगतो. हा तणाव कमी करण्यासाठी पाश्चात्यांसारखे उपचार, जसे दारूचे सेवन, पार्ट्या इ. करण्यास उद्युक्त होतो.'' असे हे पाश्चात्य भोगवादी संस्कृतीचे प्रक्षेपण भारतीय समाज-मनावर होत आहे व एक वेगळीच संस्कृती तयार होताना दिसत आहे. पण त्याबरोबर १५-४५ वयोगटाच्या भूमिकेतून आजच्या स्पर्धात्मक युगात बघितले तर ही मंडळी अनिच्छेने व अपरिहार्यपणे या चंगळवादी जीवनाचा अंगीकार करीत असल्यासारखी दिसते. कारण आजच्या जागतिकीकरणाच्या काळांत व तीव्र स्पर्धेच्या युगात (Fittest to survive) या तत्त्वानुसार, माणसाची ''पळा पळा कोण पुढे पळे तो'' अशी अवस्था झाली आहे. त्यांना हे आत्मघातकी जीवन आहे याची जाणीव मधून मधून होत असते. म्हणून मनात अपराधी भावना घेऊनच ईश्वर / देव दर्शनाची क्रिया त्यांच्याकडून घडते. पण ते खरे नाही. तो एक सोपस्कार होतो. यावर एकच उपाय म्हणजे गोंदवलेकर महाराज म्हणतात ''त्याप्रमाणे नुसते कर्म हे जड असते, ते कर्मठपणा तयार करते पण ईश्वराच्या अनुसंधानात तेच कर्म 'कर्मयोग' बनून जीवनसाफल्य देते.''

ईश्वराशी अनुसंधान साधण्यासाठी मूर्तिपूजा हे एक साधन आहे. या साधनाचा उपयोग ती व्यक्ती कसा करून घेते यावर त्याचे साध्य अवलंबून असते. साधनात दोष नाही.

ज्या व्यक्ती खऱ्या अर्थाने या साधनाचा योग्य वापर करून घेतात त्यांच्या जीवनात नक्कीच सकारात्मक बदल घडून आल्याचे जाणवते. पण त्वरित फळ मिळण्याच्या आशेने या साधनाकडे जे बघतात. ते तुकारामांनी म्हटल्याप्रमाणे "पायाविण भिंत तातडीचे" म्हणजे पाया विना भिंत बांधण्याचा प्रयत्न करतात. अपेक्षित फळ न आल्याने त्यावर टीका करण्यास प्रवृत्त होतात.

मूर्तिपूजेसारख्या साधनाने खालील ठळक गोष्टी व्यवहारी जीवनांत दिसून आल्याचे जाणवते.

१) व्यक्तिगत नैतिक पाठबळ आल्याची भावना. याची त्याच्या विकासात खूप मदत देते.
२) समाधानाची भावना
३) व्यक्तिमत्त्वात सकारात्मक विचारसरणीचा प्रभाव जाणवतो.
४) कौटुंबिक वातावरण शुद्ध व सुदृढ ठेवण्यात यश.
५) भावनेच्या आहारी न जाता येणाऱ्या कठीण प्रसंगाचा व दैनंदिन ताणतणावाचा यशस्वी सामना करण्याची दृढता निर्माण झाल्याचे दिसून येते.

मूर्तिपूजा किंवा सगुणात्मक भक्तिमार्गाची उपासना ही भारतीय समाजाच्या अपकर्षास जबाबदार असू शकते का ?

नाईलाजाने याचे उत्तर 'होय' असेच द्यावे लागेल. कारण मूर्तिपूजेच्या किंवा सगुणाकडून निर्गुणाकडे जाण्याच्या मार्गाचे स्वार्थासाठी गीतेचे किंवा भक्तीचे अर्थ लावण्यात आले व भारतीय समाजमनांत एक आत्मसंतुष्टपणाची आत्मघातकी वृत्ती निर्माण झाली, असे परखड विचार बऱ्याच तज्ज्ञ मंडळींनी व्यक्त केले आहेत. गेल्या दोन अडीच हजार वर्षांच्या भारतीय समाज मनाचा तज्ज्ञ मंडळींनी जो धांडोळा घेतला व जे विश्लेषण केले त्यावरून हे जाणवते. अशामुळे झालेल्या अपकर्षास भारतीय समाजमन कसे तयार झाले, ते श्री. शं.

दा. पेंडसे यांनी त्यांच्या "पौराणिक भागवत धर्म (उत्कर्षापकर्षाचा इतिहास)" या ग्रंथात अत्यंत वस्तुनिष्ठ समर्पकरितीने मांडले आहे. ते वाचणे बरेच उद्‌बोधक होईल. पौराणिक भाग व त्याचा काळ इ. पू. २०० वर्षे ते इ. स. नं. ५०० वर्षे असा सहाशे ते सातशे वर्षांचा समजला जातो. याच काळात मूर्तिपूजा व सगुण भक्तिमार्गाचा बराच बोलबाला होता. त्या ग्रंथात श्री. पेंडसे लिहितात, "भगवद्‌गीता ही "ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे" ब्रह्मविद्यांतर्गत कर्मयोगशास्त्र सांगते. ज्ञान, कर्म आणि भक्ती यांचा त्यात समन्वय होता. भागवतात त्या कर्माच्या जागी कर्मत्याग आला. परिणाम असा झाला की, भक्तीचे संन्यासात आणि नैष्कर्म्याचे निष्क्रियतेत पर्यवसान झाले आणि भागवत पुराण "परमहंससंन्याशांची संहिता" होऊन कर्मयोग दुर्लक्षित झाला.

वर्णप्राप्त सामाजिक कर्तव्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संन्यास, वैराग्य, भक्तीचे नंतर तांत्रिक भक्तीत आणि मूर्तिपूजेत पर्यवसान झाले. मूर्ती म्हणजेच ईश्वर असे समजून त्याच्या पूजेचे अवडंबर इतके वाढले की, यज्ञाच्या अवडंबरालाही त्याने मागे टाकले. अकराव्या स्कंधाच्या २७ व्या अध्यायात श्रीकृष्ण म्हणतात, **"न ह्यन्तोऽनन्तपारस्य कर्मक""डस्य चोद्धव"** पूजेच्या या कर्मकांडाला अंतपार नाही. यज्ञांतील कर्मकांडाला हसता हसता भक्तियोगातही मूर्तिपूजेचे मोठे कर्मकांड सिद्ध झाले. विश्वव्यापक परमेश्वर मंदिरात येऊन शिलामूर्ती इतका संकुचित झाला. भूतमात्रांत असणाऱ्या निराकार अव्यक्त भगवंताची कर्तव्यकर्मांनी होणारी गीतेतील भक्ती मागे पडली आणि सामाजिक कर्तव्यकर्माकडे दुर्लक्ष करणारी, जडमूर्तीची, तिलाच परमेश्वर समजून पूजा चालू झाली. प्रचंड मंदिरे आणि त्यांतील मूर्तींची, नानाविध भोग चढवून, ऐश्वर्ययुक्त उपचारांनी केली जाणारी अहर्निश पूजा यांना महत्त्व आले. जिवंत दरिद्रनारायण बाजूला पडले आणि घरादारांत तांत्रिक मूर्तिपूजा लोक करू लागले. मूर्तिपूजा ही केवळ

ध्यानाकरिता केलेल्या ईश्वराच्या प्रतीकांची आहे, हे जेव्हा विसरले जाते आणि मूर्ती म्हणजेच परमेश्वर बनतो, तेव्हा खरा सर्वव्यापक परमेश्वर गुप्त होऊन मूर्तिपूजेचा विपर्यास होतो.

ईश्वराचा मनुष्य देहधारी अवतार असणाऱ्या श्रीकृष्णाच्या भक्तीचे व सत्संगाचे महत्त्व सांगत असता श्रीकृष्णाच्या गोकुळातील बाललीलांचे, अद्भुत रसात्मक वर्णन कवी करू लागले. त्यांतील रूपकात्मक काव्य लोक खरेच समजू लागले. बाळकृष्णाने तरुणाचे रूप घेऊन व जितक्या गोपी तितकी रूपे धारण करून गोपींबरोबर रासक्रीडा केली आणि गोपी त्याच्याशी जारभावाने रमल्या याची मोठी रसाळ वर्णने भागवतादी पुराणे करू लागली. त्यामुळे भागवत धर्माचे शृंगाररसात पर्यवसान झाले. राधाकृष्ण संप्रदाय कित्येक प्रदेशात भरभराटीला आला. पांचरात्रागमाच्या ज्ञानामृतसार, गर्गसंहितेसारख्या संहितेतून राधाकृष्णांच्या कामलीलांची वर्णने येऊ लागली. शृंगारप्रिय लोकांना भक्तिमार्गात आणण्यासाठी जरी ही शृंगारिक वर्णने केली गेली, तरी त्यांचा परिणाम मात्र उलटा झाला. राधाकृष्णांच्या नावाखाली शृंगाराची हौस राजरोस भागवण्याची सोय या कथांनी करून दिली आणि व्यभिचाराचे अप्रत्यक्ष समर्थन करता येऊ लागले. जारभावाने पर-पुरुषांशी चाललेली गोपिकांची रासक्रीडा, यामुळे भक्तीपेक्षा शृंगारभावनाच उत्कट होणे स्वाभाविक आहे. विष्णुपुराणात "जारभाव" हा शब्द आलेला नाही. तो भागवतात आला आहे आणि दोन्ही पुराणात नसलेली राधा नंतर आली आहे. कृष्ण हा बालवयात इतका सुंदर होता की, त्याच्याबद्दल गोपींनाच काय पण गोप, धेनू, वासरे आणि निसर्ग या सर्वांना विलक्षण आकर्षण वाटे, एवढाच त्यातील मूळ भाग आहे."

हीच तऱ्हा तीर्थयात्रा, तीर्थक्षेत्री जाऊन श्राद्ध करणे व ब्राह्मणांची सहस्त्रभोजने घातल्याने पितरांना शांती मिळते, अशा कल्पना दृढ झाल्या

व स्वकर्म व स्वधर्म विसरून यालाच धर्म असे लोक समजू लागले. राज्य करणारे मंत्रीगणदेखील याला अपवाद ठरेनात. यादवकाळी हेमाद्री सारख्या मंत्र्याने "व्रतखंडा" सारखा ग्रंथ लिहून व्रतांचे व श्राद्धाचे समर्थन केल्याचे दिसते. अशा वृत्तीवर श्री. म. म. पां. वा. काणे यांच्यासारख्या शांतवृत्तीच्या विद्वानानेदेखील उघड खंत प्रकट केल्याचे त्यांच्या "पुराणधर्म" या ग्रंथात दिसून येते. ते या ग्रंथात लिहितात,

"The Puranas speak highly of व्रताज. Thousands of verses in Puranas deal with व्रताज. They were put above यज्ञाज. Hemadri himself a great minister of Yadava King of Devagiri wrote the "व्रतखंड" and acted accordingly. It makes one very sad to think how even responsible ministers of State, instead of devoting deep and constructive through to the question of driving out of ruthless Forein invaders, spent energy and time in such व्रताज, श्राद्ध इ."

अर्वाचीन काळातील पेशवाईतील कर्मकांडाचे महत्त्व व त्यामुळे राज्याचे अध:पतन हे तर सर्वश्रुत आहे.

काही निष्कर्ष :

पाणिनीसारख्या तत्त्ववेत्त्याने व कुशल राजकारण्याने फार वर्षांपूर्वी असे लिहून ठेवले आहे की, "जर देवळांची संख्या फार वाढत गेली व कर्मकांडाचे स्तोम अधिक माजले तर त्या समाजाची किंवा धर्माची ऱ्हासाकडे वाटचाल चालू झाली असे खुशाल समजावे." हे त्यांचे भाकित काळच काय ते सांगू शकेल.

मूर्तिपूजेच्या किंवा सगुण उपासनेच्यावरील तांत्रिक विवेचनावरून व तत्त्व बाजूला सारून समाजात त्याचे जे स्वार्थी, दांभिक दर्शन घडते त्याच्या तज्ज्ञानी केलेल्या विश्लेषणावरून खालील दोन निष्कर्ष निघू

शकतात.

१) तत्त्वांच्या योग्य आचरणाने, श्रद्धेने व एकाग्रचित्ताने सातत्य ठेवून केलेली उपासना खचितच फलदायी होऊ शकते. याचे आदर्श उदाहरण म्हणून श्री. महात्मा गांधी किंवा श्री. माधवराव स. गोळवलकर गुरुजी यांच्याकडे बघता येईल. किंबहुना अशी उदाहरणे प्रत्येक समाजात व पंथात असतात व नेहमीच राहतील आणि तेच त्या समाज समूहाचे श्रद्धास्थान व स्फूर्तिस्थान असतात.

श्री. गोळवलकर गुरुजींबद्दल त्यांचे निकटवर्ती त्यांची दिनचर्या विशद करताना सांगतात की, ते रोज सातत्याने अर्धा ते पाऊणतास मृगासनावर बसून एकाग्रचित्ताने पूजा व ध्यान करीत असत, जेणेकरून त्यांना त्या ईशतत्त्वाची ऊर्जा प्राप्त होत असे. त्यामुळे जीवनभर समाज व राष्ट्रोध्दाराच्या संघर्षमय जीवनात अगदी शांत व धीरोदात्तचित्ताने ते सामोरे जाऊ शकले. त्याचप्रमाणे ते वैयक्तिक शारीरिक व्याधीला तितक्याच शांतचित्ताने सामोरे गेले.

म. गांधी यांची प्रार्थना व त्यातून त्यांना मिळणारे आत्मिक बळ तर सर्वश्रुत आहे.

२) तज्ज्ञांच्या कर्मकांडाच्या विश्लेषणावरून भारतीय समाज मन किती दुर्बल असू शकते व ते स्वार्थाच्या प्रलोभनाला कसे बळी पडू शकते, हे जाणवते. त्यामुळे समाज आत्मसंतुष्ट व आत्मघातकीपणाचा कसा बळी पडत गेला याची जाणीव होते. याचा परिणाम समाजास पूर्ण अध्यात्म साधता आले नाही किंवा वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकारता आला नाही. प्रखर बुद्धिमत्तेचा वारसा गमावून बसण्याची पाळी आली. परिणामी चेतन व जड यांचा तोल सांभाळता आला नाही. यामुळे जगाच्या तुलनेत क्षमता असूनदेखील एक प्रकारे पिछेहाट सहन करावी लागली.

सारांशाने असे म्हणता येईल की, व्यक्तिविकास व राष्ट्रोद्धाराच्या

दृष्टीने ऋषितुल्य पू. विनोबांनी सांगितल्याप्रमाणे अध्यात्म व विज्ञान यांची सांगड घालून स्वधर्म व स्वकर्माचे पालन केल्यास जीवन फलदायी ठरू शकेल. हाच बोध वरील विवेचनावरून घेता येईल.

संदर्भ ग्रंथ -

१) अध्यात्म दर्शन - ले. प्रा. के. वि. बेलसरे

२) धर्मामृत - ले. विनोबा भावे

३) मूर्तिपूजा - प. पू. पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या प्रवचनांवरून संकलित

४) गीता - ले. डॉ. प. वि. वर्तक

५) सुबोध योगवासिष्ठ सार - ले. पुरुषोत्तम शास्त्री फडके

६) साक्षात्कारी संत तुकाराम - ले. डॉ. शं. दा. पेंडसे

७) स्वामी विवेकानंद ग्रंथावली - रामकृष्ण मठ, नागपूर

८) पौराणिक भागवत धर्म (उत्कर्षापकर्षाचा इतिहास) - ले. शं. दा. पेंडसे

९) The Hidden Connection - by Fritjof Capra

१०) उपनिषदांचे विज्ञाननिष्ठ निरूपण - ले. डॉ. प. वि. वर्तक

२

अहंकार (विश्लेषणाचा एक प्रयत्न)

व्याख्या : देहादिकांच्या द्वारा घडणाऱ्या कर्मांचा आणि भोगांचा कर्ता व भोक्ता "मीच" आहे अशी भावना, जेव्हा अंत:करणात उदित होते, तेव्हा त्या वृत्तीला अहंकार म्हणतात.

(पातंजल योगदर्शन पान १३८)

अहंकाराची उत्पत्ती :

वरील पतंजलीच्या व्याख्येचा विचार करता यात अहंकार ही 'वृत्ती' असून ती भावना म्हणजे मनाशी निगडित असून ती अंत:करणातून उत्पन्न होते असा निष्कर्ष निघतो. यासाठी ही वृत्ती कशी तयार होते व मन व अंत:करण यांची रचना व कार्य याचा विचार करणे गरजेचे भासते. त्याचा थोडक्यात विचार खालीलप्रमाणे करता येईल.

ही प्रकृती (विश्व) त्रिगुणात्मक (सत्त्व, रज आणि तमोगुण) असून ती पंचमहाभूते (आकाश, वायू, तेज, आप व पृथ्वी) यांच्या तामसी अंशापासून निर्माण झाली. प्रथम परब्रह्म हे एकटे होते. त्याला पुष्कळ व्हावे अशी इच्छा झाली. हे स्फुरण ज्ञानमय तसेच शक्तिमय असते. त्या स्फुरणापासून त्रिगुण, पंचमहाभूते, अहंकार व अशा क्रमाने हे दृश्य विश्व निर्माण झाले. त्याच्या उलट क्रमाने संहार घडून येतो, असे वेदांताचे प्रतिपादन आहे. याचा अर्थ वृत्तीचा प्रभाव प्रत्येक सजीव किंव निर्जीवांत असतो. म्हणजेच सर्वांमध्ये अहंकाराचा अंश असतो व तो हजारो रूपांनी विस्तारलेला आहे. याचे वर्णन नी.पुराणात असे केले आहे.

जीवो बुद्धिर्मनश्चित्तं माया प्रकृतिरित्यपि।
संकल्प: कलनाकाल: कला चेत्यपि विश्रुतै -
रेवमाद्यैस्तथा यैश्च नामभिर्बहुतां गतै:
सहस्त्ररूपोऽहङ्कार: कल्पितार्थैर्विजृम्भते ॥

।नी. पु. ११५.११-१२।

अर्थ - अहंकारच जीव, बुद्धी, मन, चित्त, माया, प्रकृति, संकल्प, कलना, काल, कला इत्यादी प्रसिद्ध असलेल्या या व इतरही अनेक रूपांनी कल्पिलेल्या हजारो रूपांनी अहंकारच विस्तारलेला असतो.

म्हणजेच अहंकारी वृत्ती सर्वत्र अंशात्मकरित्या अस्तित्वात असते. हीच अहंकाराची वृत्ती अंत:करणातून उगम पावते.

हे अंत:करण पांच मूलतत्त्वांच्या एकत्रित सात्त्विकांशापासून बनले आहे, असे वेदान्त मानतो. यांत १) मन, २) बुद्धी, ३) चित्त व ४) अहंकार, हे चार घटक समाविष्ट असतात व यांना अंत:करणचतुष्टय व रूढार्थाने मन म्हटले जाते. प्रत्येक घटकाचे कार्य वेगळे असते, असे मानले जाते.

अंत:करण म्हणजे मन ज्ञानेंद्रियांच्याद्वारे होणाऱ्या जाणिवेतूनच मनाला कार्यप्रवण होण्यास संदेश पोचवते आणि मन प्राणमय कोशात कार्यवाही करण्याचा आदेश देते. पाच मूलतत्त्वांच्या एकत्रित केलेल्या सात्त्विक अंशापासून मनाची उत्पत्ती झाली असे मानले जाते. मन हे विचारांचे बनलेले आहे. या विचारांचे चार प्रकार आहेत. ते त्यांच्या स्वरूपानुसार किंवा कार्यावरून ठरविले जातात. जेव्हा एकच अंत:करण, ते करीत असलेल्या कार्यानुसार, चार वेगळ्या संज्ञांनी संबोधित केले जाते. ते चार प्रकार म्हणजे १) मन, २) बुद्धी, ३) अहंकार व ४) चित्त.

१) **मन :** मनाचा स्थायीभाव अनिश्चितता किंवा संशय. संकल्प-विकल्पाचे हे स्थान. यावरून मनाचा स्वभाव ‘हे’ का ‘ते’ किंवा संशय हा आहे. भावनेचे स्थान देखील मनातच् असते.

२) **बुद्धी :** बुद्धीचा स्थायीभाव निर्णयशक्ती आहे. येथे निश्चित विचार करण्याची, जाणण्याची किंवा आकलन करण्याची शक्ती असते. कोणत्याही परिस्थितीचा उलगडा करणे किंवा एखाद्या प्रश्नाची व अडचण वगैरेची माहिती करून घेणे हे बुद्धीचे कार्य आहे.

३) **चित्त :** विचार करण्याची किंवा स्मरण ठेवण्याची शक्ती. भूतकालांतील अनुभव किंवा घटना यांची स्मृती ठेवण्याच्या शक्तीस 'चित्त' ही संज्ञा आहे. चित्त हे बुद्धीवर झालेल्या संस्कारांचे आणि स्मृतींचे भांडारच होय.

४) **अहंकार :** मी कर्ता आहे ही जाणीव हा 'अहम्' म्हणजे अहंकार होय. नेहमीचा गर्व किंवा व्यवहारांतील अहंकार असा अर्थ येथे नाही. या अहं चा संबंध परम तत्त्वाशी आहे.

ज्यावेळी या तीन विचारवृत्ती, मन, बुद्धी आणि चित्त परिस्थितीनुसार एकमेकांचे स्थान घेतात, त्यावेळी अहंकार 'वृत्ती' किंवा 'मी पणाची जाणीव' किंवा कर्तृत्वभाव ह्या गोष्टी सदैव असतात.

मन हे विकार होण्याचे स्थान आहे. हे विकार मनाला क्षुब्ध बनवितात. त्यामुळे विचारशक्ती बधिर होते व भ्रम तयार होतो. हा सर्व अहंकाराचा प्रभाव आहे. 'अहम्' या जाणीवेनेच प्रथम एकतेचा भंग करून द्वैत निर्माण केले जाते व हाच अहंकार जीवाला दुष्कर्मी पापी, अविचारी बनवीत असतो व खोटी 'मीपणाची' जाणीव करून देतो. म्हणून हे शरीरच मी आत्मा आहे किंवा मन म्हणजेच सर्व काही आहे, ही भावना तयार होते. देहच सत्य आहे, असे माणूस समजतो.

खरा 'मी' कोठे असतो ?

वर आपण पाहिले की, 'मीपणाची' जाणीव ही विचाराच्या भ्रमातून किंवा गोंधळातून निर्माण झाली. मग खरा मी कोठे असतो ? याचे सार्थ वर्णन स्वामी विवेकानंदांनी लंडन येथे मानवाच्या सत्यत्वाबद्दल भाषण देताना केले होते. ते म्हणाले, ''आपण अद्यापि व्यक्ती व 'मी' नाहीच.

आपण 'मीपणाच्या' लाभासाठी प्रयत्न करीत आहोत इतकेच. ते अनंतच आपले खरे व्यक्तिमत्त्व, आपले खरे 'मीपण' आहे. तेच मानवाचे सत्य स्वरूप आहे. ज्याचे जीवन साऱ्या विश्वास व्यापून आहे, तोच खरे जगत असतो आणि आपण जितके जितके आमचे जीवन लहान लहान, मर्यादित गोष्टीवर केंद्रित करीत असतो, तितक्या झपाट्याने आप ा मृत्यूकडे जात असतो. जेवढा वेळ आपली जीवने विश्वात व्यापून असतात, इतरांमध्ये व्यापून असतात तेवढाच वेळ खऱ्या अर्थाने आपण जिवंत असतो. ही आपली लहान लहान जगणे म्हणजे तर खरोखर मरणेच होय. म्हणूनच आपल्याला मृत्यूचे भय पछाडते. मृत्यूचे भय तेव्हाच जिंकता येईल की, जेव्हा माणसाला साक्षात्कार होईल की, जोपर्यंत या विश्वात एक तरी जीवन विद्यमान आहे, तोपर्यंत मी जिवंत आहे. 'मी सर्व वस्तूत आहे, मी सर्व देहांमध्ये आहे. सर्व जीवने माझीच आहेत. मीच हे विश्व आहे.' असे ज्यावेळी माणूस म्हणू शकेल, तेव्हा अभय पावेल. 'अभी:' होऊन जाईल. सदा बदलत्या वस्तू अविनाशी असणे कसे शक्य आहे ? एक प्राचीन संस्कृत तत्त्वज्ञ म्हणतात की, ज्याचे तुकडे पडत नाहीत व जे बदलत नाही, असे व्यक्तित्व वा 'मीपण' केवळ आत्माच शक्य आहे. कारण तो आहे, अविभाज्य आहे, अखंड आहे. अनंत आत्मा नेहमी तसाच असतो. तीच अखंड, एकरस, एकमेवाद्वितीय सत्ता होय. तेच 'मानवाचे सत्य स्वरूप होय' तेच खरेखुरे व्यक्तिमत्त्व वा 'मीपणा' होय. तोच 'खरा मानव होय.'

वरवरचा माणूस, हा व्यावहारिक जीव म्हणजे ते अतींद्रिय, सर्वातीत व्यक्तिमत्त्व व्यक्त करण्याची, प्रगट करण्याची धडपड होय, इतकेच.''

अहंकाराचे प्रकार :

१) **तुच्छ अहंकार :** आध्यात्मिक विचार व आचार प्रणालीनुसार, माणसातील मीपणाच्या जाणीवेनुसार त्याचे व्यवहारी जीवनातील

व्यक्तिमत्त्व साकारले जाते व त्यानुसार त्याच्यातील अहंकाराच्या छटा अनुभवावयास येतात. जसे स्वभावातील मीपणाची उत्कटता किंवा तीव्रता जितकी अधिक व देहकेंद्रित यामुळे त्याच्यातील अविद्या किंवा अज्ञान अधिक स्वरूपात असून अंत:करणातील 'अहं' या तत्त्वावर त्याची अधिक गडद छाया पडलेली दिसून येते व माणूस अधिक आसक्त, दुरभिमानी, वासनायुक्त व फलाची अपेक्षा करणारा. बहिर्मुख इंद्रिये असल्यामुळे चित्त संकल्पविकल्पाने मलीन झालेले असते व यातूनच षड्रिपूंची उत्पत्ती जोमाने होण्यास मदत मिळते. अशा अहंकारी वृत्तीला वसिष्ठ "तुच्छ" अहंकार म्हणून संबोधतात, ते म्हणतात.

पाणिपादादिमान्देह अहमित्येष निश्चय: । ४.३३/५३
अहंकारस्तृतीयोऽसौ लौकिकस्तुच्छ एव स: ।
वर्ज्य एव दुरात्माऽसौ शत्रुरेव पर:स्मृत: ।। ४.३३/५४

अर्थ - हात पाय वगैरे अवयवांनी युक्त असलेला देह एवढाच 'अहं' असा निश्चय हा सर्व सामान्य लोकांच्या ठिकाणी असलेला 'तुच्छ' अहंकार सर्वथा टाकला पाहिजे. कारण हाच मोक्षमार्गातला मोठा शत्रू होय.

२) **शुभ अहंकार :** जेव्हा 'मीपणाची' तीव्रता कमी होऊन नीचतम पातळीवर येते व देहाभिमान कमी होऊन अंत:करणातील 'अहं' हा परमतत्त्वाचा अंश आहे या जाणीवेने, कर्मफलप्राप्ती त्या परमतत्त्वालाच अर्पण करण्याची वृत्ती निर्माण होते, तेव्हा वसिष्ठ त्याला शुभअहंकार म्हणतात. अशा व्यक्ती भावनात्मक सुखांत राहून समाजासाठी शुद्धबुद्धीने व सद्भावनेने, निरिच्छ वृत्तीने, कर्तेपणा स्वत:कडे न घेता स्वत: निमित्तमात्र होऊन कर्म करीत राहतात. वसिष्ठ म्हण्तात -

सर्वस्माद्व्यतिरिक्तोऽहं वालाग्रशतकल्पित: ।
इति या संविदेषाऽसौ द्वितीयाऽहंकृति: शुभा ।
मोक्षायैषा न बंधाय जीवन्मुक्तस्य विद्यते ।। ४.३३-५१

अर्थ - सर्व स्थूल, जड वस्तूहून पूर्ण वेगळा, केसाच्या अग्राच्या शंभराव्या भागाइतका अतिसूक्ष्म असा ज्ञानरूप - चिन्मात्र असा जीव म्हणजे मी. हा दुसऱ्या प्रकारचा 'शुभ अहंकार जीवन्मुक्त अवस्था' मिळवून देण्यामुळे क्रममुक्तीलाच साधक ठरतो - बाधक नव्हे.

या अहंकारामध्ये 'स्व' जरा बाजूला काढून चिदानंदस्वरूपाची ओळख अधिक झाल्याची स्थिती असते. परंतु द्वैत अजून कायम असते. हे अशुद्ध चैतन्यच समजले जाते.

३) **परमअहंकार :** 'मीपणाची' जाणीव पूर्णपणे गळून मीच आत्मा आहे अशी भावना होऊन जाते. 'अहं ब्रम्हास्मि' हीच भावना स्थिर होते. प्रत्येक वस्तुमात्राच्या ठिकाणी ''अहं'' चा अनुभव येतो. द्वैताचा निरास होऊन ''अद्वैत'' तयार होते. अशा अहंकारास वसिष्ठांनी ''परमअहंकार'' म्हटले आहे. म्हणून ते म्हणतात.

अहं सर्वमिदं विश्वं परमात्माऽहमच्युतः।
नान्यदस्तीति विज्ञेया परमा सा ह्यहङ्कृति :॥ ४/३३/५०

अर्थ - सर्व चराचर विश्व मी आहे. शाश्वत असलेला परमात्मा हाही माझ्यापेक्षा निराळा नाही. मीच परमात्मस्वरूप आहे. अर्थात जग आणि जगदीश दोन्ही मद्रूपच असल्याने 'अहं' खेरीज काहीच नाही, असा अनुभवलेला 'अहंकार' हाच सर्वश्रेष्ठ होय.

व्यवहारी जगतात अशी व्यक्ती आत्मिक समाधानात राहून, पारमार्थिक असते. पूर्णपणे वैराग्य येऊन वासनांचा पूर्ण क्षय होतो. सत्कर्म व अकर्मच हातून घडते. अंत:करणाचा आत्म्यामध्ये लोप होतो. मोक्ष प्राप्ती झाल्याची स्थिती उत्पन्न होते.

वरील तीनही अहंकारांच्या प्रकारांतून वसिष्ठांनी असे दाखवून दिले आहे की, ज्या अहंकाराच्या अज्ञानामुळे द्वैत निर्माण झाले व आनंदमयाला दु:खरूपता आली, त्याच अहंकाराचा विस्तार झाला, तर तोच अहंकार 'ज्ञान' ठरू शकतो आणि यांत 'अहं' चा पूर्ण विसर पडून

"सर्वं खल्विदं ब्रह्म" किंवा सर्वब्रह्मभाव - पूर्णाहंता हीच सिद्धावस्था प्राप्त होऊ शकते.

शेवटी "सर्वं खल्विदं ब्रह्म" आणि "अहं ब्रह्मास्मि" या दोन्ही महावाक्यांचे ध्येय एकच आहे. ऐक्यदर्शन ते ब्रह्मरूपाने की अहंरूपाने हा वाद होण्याची गरज नाही. कारण 'अहं' आणि 'ब्रह्म' या दोन्ही शब्दांनी मूळ शक्तीचा बोध होणार आहे. याच जाणीवेच्या पातळ्यांवरून कर्म व कर्तव्याचा व्यवहारातील वागणुकीवर दिसून येणारा परिणाम व त्यामुळे तयार होणारे व्यक्तिमत्त्व याचे तुलनात्मक वर्णन प्रा. बेलसरे यांनी त्यांच्या ज्ञानेश्वरी या ग्रंथात उत्तम केले आहे. त्याचे परिशिष्ट शेवटी जोडले आहे.

अहंकार - मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून : "मीपणाची जाणीव" किंवा अहंकार याला इंग्रजीत Ego हा प्रतिशब्द आहे. व्यवहारांत व शास्त्रीय भाषेत अहंकार म्हणजे Ego हे स्वभाववैशिष्ट्य समजले जाते व त्याचे विश्लेषण केले जाते.

अध्यात्मशास्त्रानुसार केलेले विवेचन ज्ञानेंद्रियाधिष्ठित व इंद्रियातीत अनुभवावर आधारलेले तर शास्त्रीय विवेचन मानसशास्त्रीय तर्कावर आधारलेले. तसा दोघांचा मेळ बसणे कठीणच. पण दोन्ही विश्लेषणे मनाशीच निगडित असल्याने तसा एक प्रयत्न.

पाश्चात्य तज्ज्ञांनी 'मी' कसा तयार होतो याचे विवेचन करताना त्यात चार भाग असतात, असे सांगितले आहे.

१) आनुवंशिकता, आई-वडील, भाऊ-बहीण इ.

२) शाळेतील शिक्षक व शिकवण

३) सामाजिक परिस्थिती

४) आणि राजकीय परिस्थिती, आर्थिक परिस्थिती धार्मिक परिस्थिती, या चारी भागांनी मिळून आपल्यातील 'मी' ची प्रतिमा तयार होते.

या उलट भारतीय अध्यात्मवादी यांचे म्हणणे आम्ही त्या शक्तीची लेकरे आहोत व तिचा आमच्यातील अंश म्हणजेच आमच्यातील 'मी'. या विचारामध्ये, पुनर्जन्म, पूर्वसंचित, कर्मफल सिद्धांत गृहीत धरल्याने आमच्यातील 'मी' ने काय करावे हे अगोदरच ठरलेले आहे ट. तेच बंधनकारक आहे.

येथे एक गोष्ट ध्यानात घेण्यासारखी आहे आणि ती ही की, दोन्ही विचारामध्ये 'मी' हा जन्मताच असल्याचे मान्य आहे.

१९११ साली प्रथम फ्राईड याने म्हटले आहे की, Ego हे एक जाणीवेचे इंद्रिय असून ते आतील व बाहेरील प्रेरणांना प्रतिसाद देते. किंबहुना ती जाणीवच आहे व दडपून टाकण्याच्या वृत्तीच्या विरुद्ध आहे. यावेळी प्रथम त्याने Ego ही सहजप्रवृत्ती असून ती कामेच्छेच्या विरुद्ध आहे. ही सत्य परिस्थितीवरील घटनेची प्रवृत्ती (Reality State) आहे आणि कामेच्छा आनंदाच्या (Pleasure State) तत्त्वावर आधारित आहे, असे त्याने १९११ साली 'Foramulations on the two principales of Functioning' या निबंधात प्रतिपादन केले. त्याचबरोबर हा Ego ध्यान, अवधान व स्मृती यांचेदेखील कार्य करतो असे सांगितले.

१९२३ साली त्याच्या Ego and ID या निबंधात त्याने Ego चा रचनात्मक सिद्धांत मांडला आणि त्यांतील तीन भाग म्हणजे Id-Ego-super Ego-Structural Theory. आतापर्यंत यातील Ego-ID ला विरोध न करणारा किंवा निष्क्रिय होता. पण १९२६ साली त्याने असे प्रतिपादले की, Ego हा ID साठी निष्क्रिय नसून त्याला प्रतिसाद देणारा आहे व त्यावर नियंत्रण ठेवणारा आहे. हे त्याने त्याच्या Inhibition, symptoms and anxiety या निबंधात नमूद केले.

फ्राईडची मुलगी Anna Freied हिने १९३६ साली Ego हा Id मधील भावना-संवेदनांवर लक्ष ठेवणारा व नियंत्रण ठेवणारा आणि प्रतिकार करणारा असे प्रतिपादले.

अशाप्रकारे Ego ची रचनात्मक पद्धती ही तीन स्तरांवर असून म्हणजे ID हा अबोध (unconscious mind) मनामध्ये, तर Ego हा त्याच्या वरच्या पातळीवर (अर्धा unconscious आणि अर्धा conscious या पातळीवर) असून त्याच्या वरचा स्तर हा जाणीवेच्या (Conscious state of mind Super Ego) रूपात कार्यरत असतो.

१९५८ साली Hartman या मनोवैज्ञानिकाने असे प्रतिपादन केले की, Ego ची क्षमता बोध घेण्याची, आकलन करण्याची (perception) स्मृती, सावधानतेची (Co ordination) एकाग्रतेची व समन्वय साधण्याची असून (Memory concentration) ही Ego ची कार्यशैली कामेच्छेपासून स्वतंत्र असून, नैराश्य व संघर्ष यांच्यातून आलेली नाही जो की, Freied चा समज होता.

Ego हा तीन भागात रचनाबद्ध पद्धतीने काम करतो, असे मानले जाते.

१) The ID (or It) या भागात आनुवंशिकतेने येणारे व्यक्तिमत्व कामभावना व आक्रमक सहज प्रवृत्ती ही ID अबोध अशा मनातील सहजप्रवृत्ती असून ती उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देते. जसे लहान बालकातील भावना. यांना त्वरित सुखदायी प्रतिसाद असावा असे वाटते. हा ID तर्क किंवा वास्तवतेच्या आधीन नसतो. त्याऐवजी सुखाच्या कल्प`त्रर आधारित असतो.

२) Ego किंवा 'मी' हा 'मी' पणाचा भाव हा तर्काधिष्ठित असून तो ID च्या भावनात्मक प्रवृत्तीच्या आणि बाह्य वास्तवतेमध्ये मध्यस्थीचे काम करतो. येथे तो तर्काने ID च्या गोंधळलेल्या अवस्थेला वास्तवतेच्या तत्त्वाने समाधान करतो. ID प्रमाणेच सुखप्रद प्रवृत्तीची जोपासना करतो पण मनामध्ये द्वैत निर्माण करत नाही. याला चूक किंवा बरोबर याचे फारसे ज्ञान नसते. ID मधील भावनांना दुःखमय प्रतिसाद होऊ देत नाही. येथे माणसाची

स्वाभाविक विचार करून वागण्याची वृत्ती दिसते.

३) Super Ego (मीपणाच्या वर) above I.

हा Ego चा सर्वात वरच्या पातळीवरचा भाग असून मूल्य व नैतिकता यांच्या सहाय्याने ID मधील सहजप्रवृत्तीवर नियंत्रण ठेवतो. याचे काम ID च्या आक्रमकतेवर नियंत्रण ठेवण्याचे आहे. हा आमच्यातील आदर्श मीपणाचे दर्शन घडवू शकतो व Ego च्या पूर्णत्वाला नेण्यात पोषक ठरतो. या पातळीवर माणूस ध्येयवादी असतो. या अवस्थेत तो अत्यंत तर्कशुद्ध पद्धतीने वागतो. चूक काय, बरोबर काय, यांचा निवाडा करू शकतो. या अहंकाराच्या सर्वोच्च पातळीवर (Conscious mind) तो आपल्या जागेपणाचा आधार घेतो. या पातळीवर तो अध्यात्माचा विचार करतो.

Ego चे काय कार्य असते ?

१) सत्यासत्याची पारख करून बाह्य जगतातील घटनांचा मागोवा घेणे. हे सर्वांत महत्त्वाचे काम मानले जाते. कधी कधी सत्यासत्यतेचा निवाडा करताना तणावपूर्ण परिस्थितीमध्ये गोंधळ निर्माण होऊन भ्रमाची स्थिती निर्माण होऊ शकते.

२) उमाळ्याने येणाऱ्या भावनांवर संयम ठेवणे.

३) भावनांवर नियंत्रण ठेवणे.

४) जबाबदारीने जाणीवपूर्वक निर्णय घेणे.

५) समाधानकारक संबंध ठेवण्यात मदत करणे.

६) तणावपूर्ण स्थितीमध्ये योग्य तर्काधिष्ठित निर्णय घेणे.

७) निर्णयशक्ती ही विचारांच्या संयोगीकरणाची (Synthesis) क्षमता असते. ज्यामुळे विचार व भावनांचे योग्य प्रदर्शन होऊ शकते.

वरील Ego चे कार्य हे साधारण आध्यात्मिक विचारधारेतील बुद्धीच्या कार्यशैलीशी मिळते जुळते आहे, असे जाणवते.

फ्रॉइडच्या रचनात्मक (Structural theory) सिद्धांतानुसार

व्यक्तीच्या कामेच्छू आणि आक्रमक प्रवृत्तींशी संघर्ष त्याच्या जाणीवेशी (Conscious) व बाह्य वास्तवतेशी असतो. हा संघर्षच अहंकारास जन्म देतो. काही वेळा हा संघर्ष मानसिक आजार निर्माण करू शकतो. Ego मनोवैज्ञानिकाच्यामते अशा संघर्षासाठी मानसिकतेचा उपयोग चांगला होऊ शकतो. कारण मनाचा आणि जाणीव, अबोध मन व सत्य यांचा फार जवळचा संबंध आहे.

अहंकाराचे बनावट केंद्र - ओशोच्या मते

वैद्यक शास्त्रानुसार मानवाचा मेंदू ३ वर्षापर्यंत पूर्ण वाढलेला असतो व त्याला जाणीवेची कल्पना येऊ शकते. या वेळी प्रथम त्या बाळास आईच्या सहवासाची जाणीव होते. कारण तीच प्रथम त्याच्याजवळ असते. नंतर त्याला त्याच्या शरीराची जाणीव व्हायला लागते. जेव्हा मूल मोठे होते, तेव्हा त्याला प्रथम तुमची जाणीव होते. त्याला स्वत:ची अशी जाणीव नसते. मग तुम्ही त्याला जशी जाणीव करून द्याल तसा तो घडत असतो आणि त्याची 'मीपणाची' जाणीव ही तुमच्याकडून परावर्तित झालेली असते. तुमच्या प्रेमाच्या वागणुकीमुळे त्याला आनंद होतो. तुमच्या विचारांनुसार तो घडत जातो आणि येथे त्याला लोक काय म्हणतात यावरून स्वत:ची जाणीव होते. आणि ही 'मीपणाची' जाणीव हा त्याच्या ज्ञानेंद्रियांद्वारे दृग्गोचर झालेली व इतरांच्या सहवासातून झालेले दुय्यम उत्पादन (By product) असते.

ओशो विचारवंतांच्या मते असा Ego किंवा 'मीपणाची' जाणीव ही समाजाची गरज आहे व समाजच तुमच्यातील हा 'मी' घडवत असतो. त्याला तुमच्या खऱ्या 'मीपणाची' ओळख होऊ द्यायची नसते. कारण खरा 'मी' यावर ते नियंत्रण ठेवू शकत नाहीत. समाजाने तुमच्यातील निर्माण केलेला 'मी' ह्या त्याच्या तालानुसार वागू शकतो. तुम्हीपण आनंदात असता. पण कधीकाळी तुमची ही 'मीपणाची' भावना दुखावली गेली की तुमचा बनावट 'मी' खिळखिळा होतो व तुमचा आत्मभाव जागृत

होतो व कळायला लागते की, तुमच्यातील 'मी' हा तुमचा 'मी' आहे. ज्यावर तुमचे, फक्त तुमचेच नियंत्रण आहे.

तुमच्यातला हा बनावट 'मी' नेहमी संघर्षमय असतो आणि त्यामुळेच माणसाला दु:ख प्राप्त होत असते. कारण हा बनावट 'मी' विश्वसनीय नसतो.

इथे ओशोनी इंद्रियांच्या आधाराने व इतरांच्या मताप्रमाणे झालेली 'मीपणाची' जाणीव व खरा 'मी' याची कशी संगती लागते, हे दाखवून दिले आहे.

वैदिक तत्त्वज्ञानानुसार हा बनावट 'मीपणा' हा व्यक्तिगत मोहजालात अडकलेला असतो व इतरांच्या मदतीने स्वत:च तयार केलेले एक कुंपण आपल्याभोवती करून घेतो व खऱ्या 'मी' पासून वंचित राहतो.

Monoideism : येथे या मानसशास्त्रीय संज्ञेचा विचार करणे सोईचे होईल. कारण आध्यात्मिक साधकाच्या यौगिक साधनेतील अहंकाराच्या उच्च पातळीवर (Super Ego) एकच 'अहं' चा विचार त्याच्या मनात असतो आणि तो अखंडपणे चालू असतो. अशा अखंड, अविरत एकाच विचाराच्या जपामुळे, साधकास मानसशास्त्रीय Monoideism ची बाधा झाल्याची शक्यता असते. कारण अशा एकसारख्या त्याच विचाराचा जप करणे हा एक मानसिक आजार समजला जातो.

जरा खोलात जाऊन या संज्ञेचा अर्थ समजावून घेतल्यास असे जाणवते की, ते तितके खरे नाही. कारण Monoideism ची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, 'The incessant repetition of disturbing monoideistic thoughts which can not be eliminated from the patient's mind is a symptom variety of psychatric conditions." म्हणजे कोणत्याही मनाची शांतता भंग करणाऱ्या विचारांची एकसारखी पुनरावृत्ती ही मानसिक आजाराचे लक्षण होऊ शकते. येथे

जपामध्ये किंवा समाधी अवस्थेमध्ये मनाची शांतता भंग होण्याचा प्रश्नच येत नाही. यात उलट मानसिक शांतता लाभत असल्याची जाणीव होते. त्याचप्रमाणे भक्तिमार्गातील साधनेमध्ये सर्व त्या परमात्म्यालाच अर्पण केल्याने मनामध्ये कोणता Monodiestic विचार येत नाही. म्हणून संतांनी भक्तिमार्गाला प्राधान्य दिल्याचे जाणवते.

अहंकार व स्वाभिमान :

ढोबळमानाने व्यवहारात अहंकार व स्वाभिमान समान अर्थी किंवा स्वाभिमानाची गडद छटा म्हणजे अहंकार अशा अर्थाने वापरला जातो. त्यामुळे त्या व्यक्तीचे योग्य स्वभावचित्र समजून येत नाही. खोलात जाऊन विचार केल्यास दोन्हीमध्ये बराच फरक दिसून येतो.

१) अहंकाराची निर्मिती ही मनाच्या संभ्रमातून झालेली असते. ज्यामुळे बनावट 'मीपणाचा' सारा मक्ता स्वत:कडेच आहे ही भावना दृढ होते. याउलट स्वाभिमानाची भावना बुद्धीच्या निश्चयी व विवेकीपणामुळे स्वकर्तव्यातून व स्वधर्मातून निर्माण झालेली असते.

२) 'मीपणाच्या' भावनेतून मी कर्म करतो तर फळ मला मिळालेच पाहिजे व त्याच्या आसक्तीने मन ग्रासलेले असते व या आसक्तीलाच 'फलाशा', 'संग', 'अहंकारबुद्धी' अशी नावे आहेत आणि संसारातील दु:खपरंपरेला येथूनच सुरुवात होते. इतके की, यामुळे येणारी विषयासंग वृत्ती व त्यापासून काम, कामापासून क्रोध, क्रोधापासून मोह व अखेर मनुष्याचा नाशही होतो, असे म्हटले आहे.

ध्यायतो विषयान्पुंस: संगस्तेषु उपजायते ।
संगात् संजायते काम: कामात् क्रोधोऽभिजायते ।।

(गीता अ.२-६२)

विषयांचे चिंतन करणाऱ्या पुरुषाला त्या विषयामध्ये जवळीक उत्पन्न

होते. या जवळिकीमुळे उत्पन्न होतो काम आणि कामामुळे क्रोध उत्पन्न होतो.

क्रोधाद् भवति संमोह: संमोहात् स्मृतिविभ्रम: ।
स्मृतिभ्रंशात् बुद्धिनाशो बुद्धिनाशात् प्रणश्यति ॥

(गीता अ.२-६३)

क्रोधामुळे बुद्धीला पूर्ण भुरळ पडते. या संमोहामुळे स्मरणशक्ती भ्रष्ट होते. स्मृती भ्रष्ट झाल्याने बुद्धीचा नाश होतो. बुद्धिनाशामुळे सर्वस्वाचा नाश होतो.

स्वाभिमानामध्ये स्वकर्तृत्वाची जाणीव होऊन आत्मविश्वास वाढण्यास मदत होऊन व्यक्तिविकास होतो.

३) अहंकार जपण्यासाठी इतरांची गरज भासते म्हणजे स्तुतिपाठक जवळ करणे भाग पडते. नसता तुमची कोणी दखल घेत नाही. उलट स्वाभिमान जपण्यासाठी कोणत्याही कोंडाळ्याची गरज नाही. आपल्या कर्तृत्वामुळे आदर निर्माण झालेला असतो.

४) अहंकार जोपासला तर आनंदाची भावना तयार होते व स्वत:भोवती एक वेगळे वलय असल्याचा भास होतो व इतरांना तुच्छ किंवा कमी लेखण्याची वृत्ती निर्माण होते. स्वाभिमान हा आदर वा अनादर यांच्या पलीकडे असून कर्म करण्यास उद्युक्त करतो व इतरांचा आदर करतो.

५) अहंकारामुळे आपल्या वागणुकीतून आपले व्यक्तिमत्त्व इतरांवर लादण्याचा प्रयत्न होतो. याउलट स्वाभिमानी व्यक्ती स्वत:च्या कर्तृत्वाने इतरांना आपल्याकडे आकर्षित करते.

६) अहंकाराची वाढ 'अहं' गंड तयार होण्यास मदत करते व त्याची परिणती मानसिक आजारात होऊ शकते किंवा नैराश्य येऊ शकते. स्वाभिमानाची वाढ, कार्यक्षमता व उत्पादकता यात वाढ करते, त्यामुळे समाधानाची भावना तयार होते.

७) अहंकार गळून पडला तर मोक्ष प्राप्त झाल्यासारखेच आहे, असे समजले जाते. पण व्यवहारांत अहंकारी वृत्ती कमी-कमी होत गेली तर अश्या व्यक्तींची गणना सज्जनांत होते, असे वसिष्ठ म्हणतात.

लोभमोहरुषां यस्य तनुताऽनुदिनं भवेत् ।

यथाशास्त्रं विहरति स्व-स्वकर्मसु सज्जन : ॥

अर्थ : ज्याचे लोभ, मोह, क्रोध वगैरे मनोविकार दिवसेंदिवस क्षीण होत आहेत व जो शास्त्रविहित स्वकर्मात दंग असतो, तो सज्जन समजावा.

याउलट ज्याचा स्वाभिमान कमी झाला किंवा नाहीसा झाला, तो लाचार होऊन जातो व गुलामगिरीचे जिणे जगतो.

अहंकारापासून सुटका होऊ शकते का ?

आपणा सर्वांमध्ये अहंकार असतो. कारण मूळ प्रकृतीच तमोगुणाच्या अंशातून निर्माण झाल्याचे वेदांत सांगते. सबब आपला असलेला अहंकार अनपेक्षित नाही.

मुळात अहंकार इतका वाईट नसावा; पण त्यातून निर्माण होणाऱ्या गुणांच्या आव्हानाला आपण कसे सामोरे जातो, यावर त्या अहंकाराची तीव्रता अवलंबून असते. एक नक्की की, अहंकार आपणात असणार, त्यातून सुटका नाही. फक्त त्याला वळण कसे द्यावयाचे, एवढेच ठरवणे व आचरणे आपल्याजवळ असते.

अहंकाराच्या सुटकेचा विचार दोन स्तरांवर करता येण्यासारखा आहे.

अ) प्रतिबंधात्मक (Preventive) अहंकाररहित मूलच जन्माला न घालणे हा एक विचार असू शकतो. पण ही कविकल्पनाच अधिक वाटण्यासारखी आहे किंवा खुळ्यासारखी आहे. पण

अल्विन टॉफलर या लेखकाने असे लि्न ठेवले आहे की, येत्या २०-२५ वर्षांत गर्भातील वाईट गुणसूत्रे काढून टाकून हव्या त्या गुणसूत्रांचा गर्भ गर्भबँकेमध्ये उपलब्ध होऊ शकेल. स्त्रीने तो गर्भ विकत घेऊन आपल्या स्त्रीरोगतज्ज्ञांकडून आपल्या गर्भाशयात रोपण करावयाचा व त्याची वाढ करून हवे तसे मूल जन्माला घालायचे. हे कितपत प्रत्यक्षात उतरेल, हे काळच ठरवेल. पण आज तरी निसर्गाच्या विरुद्ध जाणारा उपाय उपलब्ध नाही.

ब) गुणकारी औषधोपचाराने (Curative) :

या उपचार पद्धतीमध्ये अहंकारामुळे होणाऱ्या विकृतीवर व त्याच्या लक्षणांवर उपाययोजना होऊ शकते. पण त्याने आजाराच्या मुळावर घाव बसत नाही. त्यासाठी स्वभावपरिवर्तन हाच एकमेव उपाय होऊ शकतो. तो वास्तव व सकारात्मक विचारांमुळे होऊ शकतो. त्यासाठी आध्यात्मिक विचार व आचाराची कास धरणे अधिक योग्य होईल.

वरील विवेचनात असे दिसून आले की, अहंकाराची निर्मिती अंत:करणातील म्हणजे मनातील गुंता व गोंधळ यांमुळेच होते. तेच अंत:करण जर शुद्ध, निर्मळ व निर्मोही ठेवले, तर वाईट विचार न येता मन निर्विकार होऊ शकते. म्हणून तर संत तुकोबांनी सांगितले की, साधक जनहो, तुम्ही आपले मन प्रसन्न करा म्हणजे ते आपल्याला अनुकूल असे करा. जेवढ्या म्हणून सिद्धी आहेत, त्या सर्वांचे कारण मनच आहे. मोक्ष मिळणे अगर सुख होणे अगर बंधन होणे किंवा समाधान मिळणे या सर्वांस हे इच्छारूपी मन मूळ आहे.

मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धींचे कारण ।
मोक्ष अथवा बंधन, सुख, समाधान, इच्छा ते ॥

(तुकाराम गाथा १५२)

१) **योगमार्ग** - चित्त-वृत्ति-निरोध. यामध्ये सर्व वासनांचे दमन करण्यात येऊन मनावर नियंत्रण ठेवले जाते. या मार्गात वासनांशी झटापट करावी लागते व नंतर ताबा ठेवण्यात यश येते.

२) **भक्तिमार्ग** - यामध्ये वासना त्या भगवंताच्या कानावर घालायच्या, त्याच्यावर सोपवायच्या, जितक्या तृप्त होतील तेवढ्या होतील, त्या तृप्त न झाल्या तरी सुख-दुःख नाही अशी वृत्ती तयार होते. मनात काही राहात नाही. म्हणून शंकराचार्यांनी म्हटले आहे.

अहं ममेत्ययं बन्धो नाहं ममेति मुक्तता।
बंधमोक्षौ गुणौ भात: गुणा: प्रकृतिसंभवा:।।

"मी व माझेपण" ही भावनाच्च बंधन आहे. "मी आणि माझे काही नाही" ही जाणीव मुक्ती आहे. बंधन व मोक्ष गुणांमुळे भासतात. गुण प्रकृतीपासून उत्पन्न होतात.

या मार्गात प्रामुख्याने खालील साधनांनी मनाची निर्मळता ठेवण्याचा प्रयत्न केला जातो.

१) जप,

२) प्रार्थना,

३) सद्गुरु व सत्संग

संत संगतीबद्दल तर समर्थ म्हणतात.

अहंकार विस्तारला या देह्याचा
स्त्रिया पुत्रमैत्रादिकें मोह त्यांचा
बळें भ्रांति हे जन्मचिंता हरावी
सदा संगती सज्जनाची धरावी

किंवा

मना सर्व संग सोडोनि द्यावा

अती आदरें सज्जनाचा धरावा
जयाचेनि संगे महादु:ख भंगे
जनीं साधनेवीण सन्मार्ग लागे

३) बौद्धमत प्रणालीनुसार प्रत्येक घटना झाली की, त्याचे विश्लेषण करावयाचे व त्यातील झालेली चूक किंवा अपराधी भावना टाळून पुढच्या वेळी निर्मळ मनाने दुसऱ्या घटनेला सामोरे जावयाचे. जेणेकरून मनाची निर्मळता कायम राहील व अहंकारापासून सुटका होईल.

वरील दोन्ही आध्यात्मिक व मानसशास्त्रीय मनाच्या सूक्ष्म रचनेवरून असे वाटते की, मानवातील आत्मतत्त्वाची ओळख ही नेणीव म्हणजेच अविद्या किंवा अज्ञान (Unconscious-ID) आणि जाणीव म्हणजेच ज्ञान किंवा विद्या (Consciousness-Ego-Super Ego) यावरून केली जाते.

याचा व्यवहारी जीवनात जाणवणारा अर्थ असा की, जेव्हा नेणीव किंवा अज्ञानामुळे आपल्यातील (ID) आत्मतत्त्व पूर्णपणे झाकोळलेले असते, तेव्हा देहालाच व त्याच्या इंद्रियांपासून होणाऱ्या ज्ञानालाच आपण 'मीपणाची' म्हणजे खोट्या अहंकाराची संज्ञा देतो. हाच तो 'तुच्छ' अहंकार व अनेक दु:खांचे मूळ.

पण जसे जसे अज्ञानाचे कवच बाजूला सरते किंवा केले जाते व जेव्हा आत्मतत्त्वाची जाणीव होण्याचा प्रारंभ होतो व या देहात ते आहे याची थोडी खात्री होते (म्हणजे Ego मुळे ते कळायला लागते) व त्याप्रमाणे व्यवहारात सर्व कर्मे आत्मतत्त्वामुळे होतात व त्यालाच ते परत देऊन टाकतो, याला 'शुद्ध अहंकार' म्हटले जाते. येथे सुख व दु:ख दोन्हींची प्रचीती येते.

जेव्हा माणूस जाणीवेच्या उच्चतम पातळीवर जातो (म्हणजे

Super Ego) तेव्हा त्या आत्मतत्त्वावरील अज्ञान किंवा अविद्या याचे आवरण पूर्णपणे बाजूला होऊन शुद्ध आत्मतत्त्व जाणवते. याचवेळी जीव व शिव यांचे एकरूप सत्‌चित्‌आनंदात जाणवते. हाच तो 'परम अहंकार'. खऱ्या 'मीपणाची' ओळख होते व 'अहं ब्रह्मास्मि' किंवा 'सर्व खल्विदं ब्रह्म'.

येथे दोन्ही शास्त्रांची तुलना करता असे जाणवते, इ. स. पूर्वी ३००० वर्षे ऋषींनी मांडलेली अहंकाराची कल्पना व मनाची रचना आणि आधुनिक शास्त्रीय दृष्टिकोनाच्या अनुषंगाने केलेली (फ्रॉईड पद्धती १९११) यांत मूलभूत फरक आहे, असे जाणवत नाही.

सारांश : मी हे करतो किंवा मला हे करता येत नाही, या दोनच भावनांमुळे मनुष्याच्या जीवनात अशांती उत्पन्न होते. त्यावर ईशावास्योपनिषद यातील खालील मंत्र हा एक उतारा आहे. तो माणसाला सांगतो की, तू भलते श्रेय आपल्याकडे घेऊ नकोस. कर्ता करविता सर्व तो आहे. तुला करता येते हेही खोटे आहे आणि करता येत नाही हेही खोटे आहे. कारण 'त्याने' ते सर्व करून ठेवले आहे. तेव्हा तू विनाकारण दुःख करून घेऊ नकोस. पूर्णाचा हा विश्वव्यापी खेळ ईश्वराने चालविलेला आहे. तो तू नुसता शांत मनाने बघत रहा. गडबड करू नकोस. ही दृष्टी माणसाला आली म्हणजेच जीवनात चिरंतन 'शांती' निर्माण होते. तो मंत्र असा-

ओम् पूर्णमदः पूर्णमिदं
पूर्णात् पूर्णमुदच्यते ।
पूर्णस्य पूर्णमादाय
पूर्णमेवावशिष्यते ।
ओम् शांतिः शांतिः शांतिः ।

परिशिष्ट ५१-अ

जाणिवेच्या पातळ्या - कर्म - कर्मयोग

	जाणीव	मी स्थूल देह आहे	मी अंत:करणात राहणारा त्याचा अंश आहे.	मी आत्मा आहे
१	साध्य Aim	शारीरिक आराम Physical Comfort	भावनात्मकसुख Emotional Happiness	आत्मिक समाधान Spiritual Contentment
२	गुणवत्ता Index	Intelligent Quotient (IQ)	Emotional Quotient (EQ)	Spiritual Quotient (SQ)
३	ज्ञान/जाणणे Knowledge	अनुमान तर्क विचार Logical reasoning Knowledge by Knowing	प्रचितीचे ज्ञान बुद्धी/सद्भाव Intellect / Empathy Knowledge by Feeling	आत्मज्ञान/प्रज्ञा Intuition Knowledge by Being
४	बुद्धी	देहबुद्धी / धृति Ego Centric	शुद्धबुद्धी / मेधा Geo Centric	आत्मबुद्धी Theo Centric
५	साधन	शक्ती	युक्ती	भक्ती
६	कार्याचा विचार Approach to work	चिकित्सा/ मीमांसा Analysis	संयोगीकरण/ एकीकरण Synthesis	समग्र विचार 360^0 Holistic
७	कर्मवृत्ती	माझ्यासाठी	समाजासाठी	ईश्वर/गुरुसाठी
८	मनाची भूमिका Attitude	कर्म करण्याची उत्कटता/ सफलतेची महत्त्वाकांक्षा Passion/ Ambition	कर्तव्यपूर्ती विशाल ध्येय Mission	अनुकंपा / कारुण्य Compassion
९	कार्यकारण	स्वार्थ	परोपकार	परमार्थ
१०	मनाचा भाव	द्वैतभाव	अंश भाव	अद्वैत भाव

	जाणीव	मी स्थूल देह आहे	मी अंत:करणात राहणारा त्याचा अंश आहे.	मी आत्मा आहे
११	कर्माचा प्रकार	कर्मबंध	निष्काम कर्म	सत्कर्म/अकर्म
१२	फळाची दृष्टी	फळाची आशा	फलाचा त्याग	उदासीनता/वैराग्य
१३	कर्तेपणा	मी कर्ता	मी निमित्त/ तो कर्ता	तोच कर्ता / मी नाहीच
१४	अंत:करणाची ठेवण	बहिर्मुख इंद्रिय. कल्पविकल्पकारी मन मलीन चित्त	अंतर्मुख इंद्रिये, मनाचा बुद्धिमध्ये लोप. शुद्ध चित्त	अंत:करणाचा आत्म्यामध्ये लोप.
१५	वासना	वासनेसाठीच जन्म	नवीन वासना बनणे नाही	पूर्ण वासना क्षय
१६	कर्महेतू	अहंकारपूर्ती वासनापूर्ती	ईश्वराचे माध्यम जे घडेल ती त्याची - इच्छा	ऋत कार्य, काय घडले तिकडे लक्ष नाही. कृती हे ध्यानच
१७	भव Being	मानवत्व Humanization Struggle/ Stressful actions.	सत्पुरुषत्व Super humanization Saintliness Ease in Actins. Line of lest resistance	देवत्व Divinization Harmoney in action. Nil resistance
१८	परिणाम	पुनर्जन्म	कर्मक्षय-पुण्यसंवर्धन	मोक्ष

संदर्भ ग्रंथ -

१) भारतीय मानसशास्त्र अथवा पातंजल योगदर्शन - ले. योगाचार्य कृष्णाजी केशव कोल्हटकर

२) सुबोध योग वासिष्ठसार - ले. पं. पुरुषोत्तमशास्त्री फडके

३) श्रीमद् आद्यशंकराचार्य विरचित तत्त्वबोध (मराठी अनुवाद - श्री. द. स. सहस्त्रबुद्धे) - सेन्ट्रल चिन्मय मिशन ट्रस्ट

४) ज्ञानेश्वरी (प्रा. के. वि. बेलसरे यांची निवडक प्रवचने) खंड - ४ - संकलक श्री. श्री. के. बेलसरे

५) ज्ञानयोग - स्वामी विवेकानंद

६) आद्य शंकराचार्य विरचित सदाचार (मराठी अनुवाद) - ले. स्वामी पुरुषोत्तमानंद सरस्वती

३

चारित्र्य व चरित्र

रोज वाचनात येणाऱ्या बलात्कार, अत्याचार व भ्रष्टाचारांच्या बातम्या वाचून एक ज्येष्ठ नागरिक पोटतिडकीने बोलत होते. कोठे गेले या देशातील चारित्र्य, ज्याचा आम्ही अभिमानाने उल्लेख करीत होतो. आज आमची मान लाजेने खाली जात आहे. काय आम्ही आदर्श देत आहोत. येणाऱ्या पिढीसाठी खरेच त्या ज्येष्ठाची पोटतिडीक समाजातील प्रत्येक घटकाला आत्मपरीक्षण करायला लावणारी आहे. कारण ज्या मर्यादापुरुषोत्तम श्री. प्रभू रामचंद्रासारख्या परिपूर्ण मानवाचा आदर्श पुढे ठेवून जी संस्कृती तयार झाली आणि पुढे जिला श्री शंकराचार्य, महावीर व महात्मा गौतम बुद्धांच्या तत्त्वज्ञानाचा वारसा लाभला व जिला ज्ञानेश्वरांपासून तुकारामपर्यंत संतांचे मार्गदर्शन लाभले व परवापर्यंत ज्या महात्मा गांधीजींच्या चारित्र्याचा आम्ही अभिमानाने अनुकरण व आचरण करण्याचा दावा करीत होतो, त्या समाजाला आज असे काय झाले की, ज्यामुळे या समाजात चारित्र्याची वानवा भासावी ? याचे अवलोकन करण्याचा एक प्रयत्न.

चारित्र्य व चरित्र हे दोन्ही शब्द संस्कृत आहेत व चर् या धातूपासून बनले आहेत. त्यांचा शब्दकोशीय अर्थ

चारित्र्य - सच्छील वृत्ती, कीर्ती, पातिव्रत्य

चरित्र - वागणूक, आचरण, कर्तव्य

व्यवहारात चारित्र्य - Character - शील, वृत्ती

चरित्र - व्यक्तीचा आयुष्यक्रम

माणसाची ओळख :

या विश्वातील उत्क्रांतिवाद आज सर्वमान्य असल्यासारखा आहे. ग्रीक तत्त्वज्ञ ॲरिस्टॉटल याने सजीव सृष्टीचा विचार करताना वनस्पती, प्राणी व माणूस अशा पायऱ्या दाखवल्या आणि मग माणूस व प्राणी यांतील फरक बुद्धीमुळे असून बुद्धी वापरून व विचार करून ज्ञान मिळवण्याची शक्ती हा माणसाचा विशेष सांगितला व त्याने माणूस हा बुद्धिमान प्राणी आहे अशी व्याख्या केली. ऋग्वेदातील .... आरण्यकामध्ये माणसाचे लक्षण सांगताना ऋषींनी सांगितले की, वनस्पती त्यांच्या रसावर अवलंबून असतात, प्राण्यांना जाणीव आहे व माणसामध्ये विज्ञान म्हणजे बुद्धी काम करीत असून तो त्याचा व्यवहारात उपयोग करत असतो. बुद्धिमान प्राणी म्हटल्याने त्यांच्यात माणसाप्रमाणेच प्राण्याचे देखील गुण दिसून येतात. कारण प्राणीपणा व बुद्धी या दोहोंचे मिश्रण असल्याचे जाणवते.

माणूस बुद्धिमान प्राणी असला तरी तो समूहात म्हणजेच, समाजात राहणारा प्राणी आहे, असेही ॲरिस्टॉटलने सांगून टाकले आहे. Man is a social animal असे त्याचे वर्णन केले आहे. माणसाला माणसाचा सहवास नसला तर त्याचे जीवन नीरस होते. व्यक्तिविकास खुंटतो. असे म्हटले जाते की, माणूस समाजात जन्माला येतो, समाजात जगतो व समाजातच मरतो. व्यक्ती व समाज या मानवी जीवनाच्या दोन बाजू आहेत. हे मिळालेले जीवन चांगले संपन्न व्हावे, यासाठी संस्कृती मदत करते.

म्हणून मानवाचा विचार करताना ज्याप्रमाणे समाजाचा विचार अपरिहार्य आहे, त्याचप्रमाणे मानवसमाजाचा विचार करताना संस्कृतीचा विचार केल्यावाचून गत्यंतर नाही. जगामध्ये वावरताना व्यक्ती, समाज व संस्कृती यांचा निकटचा संबंध असून ती एकमेकांस पूरक अंगे आहेत.

यातील व्यक्ती हा मुख्य घटक असून त्याची ओळख त्याच्या चारित्र्यावरूनच होते. मजेची गोष्ट अशी की, माणूस जसा प्राण्यापासून बुद्धीमुळे वेगळा समजला जातो, तसाच प्रत्येक माणूस देखील एकमेकांपासून आचार-विचारात वेगळा दिसून येतो. कारण व्यक्ती तितक्या प्रकृती हा निसर्गनियमच आहे. म्हणून माणसाला ओळखण्याचे एकमेव साधन त्याचे चारित्र्यच ठरते.

व्यक्तिगत चारित्र्य देखील तीन प्रकारे दिसून येते. त्याचे अंतरंग उपजत गुणांनुसार असून त्याचे बाह्यांग हे त्याची शरीरसंपदा, देहबोली अथवा रंगरूप, पेहराव इ. नी संपन्न होत असते. याचबरोबर त्याचे तिसरे अंग हे त्याच्या दोन्ही तऱ्हेच्या वर्तणुकीला समाज कसा प्रतिसाद देतो, यावरून त्याची ओळख जनमानसाला प्रतीत होते, तेच त्याचे चारित्र्य समजावे लागते.

म्हणून चारित्र्याचे वर्णन, 'माणसाच्या माणूसपणातील त्रिगुणात्मक स्वभावाचे, तसेच त्याच्या सगुण-साकार दिसण्यातून, देहबोलीतून, आवाजातून व कृत्यातून, स्वानुभवावरून जे प्रकटीकरण होते आणि त्याला मिळणारा सामाजिक प्रतिसाद यावरून त्याचे जे व्यक्तिमत्व समोर येते, ते त्याचे चारित्र्य असे करावे लागेल.'

जसे व्यक्तिगत चारित्र्य तसेच समाजाचे एक चारित्र्य असते व राष्ट्राचे पण राष्ट्रीय चारित्र्य असते, ज्यावरून त्या समाजाची किंवा राष्ट्राची ओळख जगासमोर येते.

इथे एक गोष्ट नमूद करावीशी वाटते की, केवळ बाह्यांगावरून माणसाच्या खऱ्या स्वभावाची ओळख करता येण्यासारखी नाही. त्यासाठी काही काळ त्याचा सहवास व सान्निध्य आवश्यक असते. म्हणूनच म्हटले आहे की, जे दुरून चकाकते ते सोने असतेच, याची खात्री नाही.

येथे स्वामी विवेकानंदांबाबतची एक घटना चारित्र्याबाबत बरेच

सांगून जाते. १८९३ साली स्वामी शिकागोमध्ये होते. त्यांच्या भगव्या वस्त्राबद्दल तेथील लोकांना फारशी कल्पना नव्हती व ते रस्त्यांनी जात असता, आजूबाजूंची मुले त्यांची कपड्यांवरून टिंगलटवाळी करीत होती. पण स्वामीजी शांतपणे चालले होते. वाटेत काही गृहस्थ भेटले. ते देखील त्यांच्या पोषाखावरून तो पहा, हा माणूस कसा पोषाख करून चालला आहे. हा काही सभ्य गृहस्थ वाटत नाही. हे वाक्य कानी पडताच स्वामीजी थांबले व त्या गृहस्थाकडे जाऊन म्हणाले, मला वाटते की, येथे शिंपी माणसाला सभ्य गृहस्थ बनवतो. म्हणजे कपडे काय, कसे आहेत, त्यावर त्यांची सभ्यता ठरते. पण मी अशा देशातून आलो आहे की, जेथे चारित्र्यावरून माणसाची सभ्यता ठरते व ओळख होते. यावरून माणसाच्या चारित्र्याचे महत्त्व समजून येते. असाच आशावाद मार्टिन लुथरकिंग यांचा होता. म्हणूनच Martin Luther King said, "I have a dream my children will live in a nation where they will be not judged by the colour of their skin, but by the content of their character."

नीतिशास्त्राच्या दृष्टिकोनातून चारित्र्य :

मानवाचे खरे कल्याण कोणते अथवा अंतिम हित कशात आहे हा प्रश्न फार प्राचीन काळापासून नीतिशास्त्रात चर्चिला गेला आहे. जीवनात अनुस्यूत असलेल्या परम प्राप्तव्यासंबंधीचे शास्त्र ते नीतिशास्त्र अशी एक व्याख्या केली जाते. Ethics is the Science of highest good involved in life.

ॲरिस्टॉटलने म्हटले आहे की, नीतिशास्त्रात ज्या हिताची आपण चर्चा करतो ते कृतिसाध्य असते. कृतिसाध्य करण्यासाठी संकल्प अवश्य असतो किंवा असेही म्हणता येईल की, संकल्पाचे प्रकटीकरण म्हणजे कृती. खरे महत्त्व आहे ते माणसाच्या स्वभावाला, चारित्र्याला अथवा शीलाला. माणसाचा माणूस म्हणून असलेला चांगुलपणा त्याच्या स्वभावात

किंवा चारित्र्यात असतो. नैतिक महत्त्व त्यालाच आहे. स्वभावाचा चांगुलपणा प्राप्त करून घेण्यास आपण स्वतंत्र आहोत. ती गोष्ट आपल्या हातातील आहे. नैतिकता आणि मानवी स्वातंत्र्य यांचा अतूट संबंध आहे.

माणसाचे स्वातंत्र्य म्हणजे संकल्पस्वातंत्र्य होय. ज्याला व्यक्तीचा स्वभाव, चारित्र्य अथवा शील म्हणायचे ते तिच्या संकल्पातून येते. संकल्पांच्या दृढ झालेल्या सवयी म्हणजे चारित्र्य असे म्हणता येते. या वृत्ती संकल्पातूनच स्फुरतात. कृतीवाटे संकल्प प्रकट होतो. म्हणून चारित्र्य अथवा चारित्र्याचा चांगुलपणा याला आणि केवळ यालाच नैतिक मूल्य आहे.

व्यवहारात ज्याला 'मी' म्हटले जाते तो म्हणजे माझा स्वभावच होय. 'स्व' च्या असण्याचा भाव अथवा रीत म्हणजे स्वभाव.

आदर्श जीवनाला सदगुणी जीवन असे म्हणता येईल अथवा शुभ जीवन असेही म्हणता येईल. या रीतीने विचार करून 'शुभ जीवनाविषयी उपपत्ती म्हणजे नीतिशास्त्र (Ethics is a theory of good life)' अशी व्याख्या केली गेली आहे. शुभ जीवन कसे असावे ही समस्या मूलभूत मानून काही तत्त्वचिंतकांनी उदा. ॲरिस्टॉटल यांनी नीतिशास्त्राची रचना केली. त्यांच्या नीतिशास्त्राला आत्मलाभवादी (Self-Realization Theory) अथवा पूर्णतावादी (Perfectionist Theory) असे नाव आहे. या उपपत्तीतून असे मानले जाते की, अखेर मला काही तरी व्हायचे आहे. मी काय होऊ शकतो ? या उपपत्तीमध्ये स्वत:ची पूर्णावस्था हे प्राप्तव्य असते. आपल्याकडील उपनिषदात नीतिशास्त्र या प्रकारचे आहे असे म्हणंता येईल. 'आत्मानं लभस्व' हा उपनिषदांचा सार्वभौम उपदेश आहे. नीतिशास्त्रानुसार चारित्र्याचा संबंध कर्तव्य व प्राप्तव्य याच्याशी पण जोडला जातो. म्हणून मी काय करावे (किं कर्तव्यम्) असा प्रश्न कर्तव्यवादी नीतिशास्त्रात विचारला जातो. याचा deontological ethics म्हटले जाते.

मी काय मिळवावे असा प्रश्न प्राप्तव्यवादी नीतिशास्त्रात मध्यवर्ती असतो. यांना Teleological ethics म्हटले जाते. आणि मी काय व्हावे (केन भाव्यम्) असा प्रश्न पूर्णतावादी नीतिशास्त्रात विचारला जातो. याला Perfectconist ethics संबोधले जाते.

वरील तीन मूलभूत संकल्पनातूनच माणसाच्या चारित्र्याची घडण होते असे नीतिशास्त्रावरून दिसून येते.

येथे हेही लक्षात घेतले पाहिजे की, माणूस जन्मास येताना त्याच्याबरोबर त्याच्या चारित्र्याचे बीज घेऊनच येतो. त्याच बीजाचे अंकुरात रूपांतर झाल्यावर त्याला कशाप्रकारे वाढवले जाते, यावरच त्याचे चारित्र्य चांगले किंवा वाईट ठरवण्यात येते आणि माणसाला त्याचे चारित्र्य हे सर्वांसाठी व स्वत:साठी हितकारकच व उन्नतिकारक असावे, असेच वाटत राहिले आहे. त्यासाठीच धर्म व नीतीच्या कल्पना पुढे आल्या. ज्यामुळे उपजत चारित्र्यातील काही दोष असतील त्यांना बाजूला करून शुद्ध चारित्र्याची किंवा सच्चारित्र्याची जीवनशैली भारतीय समाजाने अंगीकारली. ज्यामध्ये शुद्ध अंत:करणाने सदाचारी, सद्विचारी, सदसद्विवेकाने व सत्प्रवृत्तीने वागून आपल्या व इतरांच्या आयुष्याची सफलता प्राप्त करावी हाच भारतीय विचारवंतांचा उद्देश आहे.

चारित्र्याला एवढं महत्त्व का ?

१) मानवी जीवन हे एक नैतिक होकायंत्रासारखे आहे आणि चारित्र्याशिवाय ते चालू शकत नाही. चारित्र्यच जर नसेल तर एखाद्या घन्या जंगलात होकायंत्राशिवाय प्रवास केल्यासारखे होईल. चारित्र्यच जीवनाला दिशा दाखवते.

२) चारित्र्य हा माणसातील अंतस्त्रोत असून जो दिशा दाखवतो व विश्वासाची वृद्धी करतो.

३) चारित्र्यामुळे एकमेकांचे संबंध जोडले जातात व त्याच्या भावना समजल्या जाऊ शकतात. या चारित्र्याच्या विचाराला आध्यात्मिक व

आधुनिक भौतिकशास्त्राची पुष्टी असल्याने त्याचा थोडा विस्तारित ऊहापोह. या सजीव विश्वातील प्रत्येक घटक कसा एकमेकांशी बांधील आहे, हे उपनिषदकारांनी सांगून ठेवले आहे. ईशावास्योपनिषदातला 'पूर्णमद: पूर्णमिदं' हा मंत्र हेच सांगतो की, या पूर्णाचे सर्व घटक एकमेकांशी संबंधित आहेत, ते पूर्ण आहेत. अदृश्य तत्त्वांनी गुंफले आहेत. हेच तत्त्व आजच्या मॉडर्न क्वांट्यम थेअरीने व थेअरी ऑफ रिलेटिव्हीटीने, आधुनिक भौतिक शास्त्रज्ञांनी दाखवून दिले आहे व वरील उपनिषदाचे तत्त्व मान्य केल्यासारखे आहे. प्रख्यात भौतिकशास्त्रज्ञ फ्रिटझाप कॅप्रे त्याच्या 'भौतिकशास्त्र व अध्यात्म' या पुस्तकात तो म्हणतो.

नवीन शास्त्रीय विचारसरणीनुसार घटक व पूर्णातील संबंध परस्परावलंबी असतात. घटकाच्या गुणधर्मावरून पूर्णाची कल्पना जरूर करता येऊ शकते. परंतु त्याचबरोबर घटकांचे गुणधर्म पूर्णपणे समजण्यासाठी पूर्णाचे गुणधर्म माहीत असणे आवश्यक असते. पूर्ण हे प्रमुख आहे. एकदा त्याचे गुणधर्म समजले की, आपण त्याच्या घटकांचे गुणधर्म व त्यांच्या आपापसातील क्रिया, प्रतिक्रियांविषयी जाणून घेऊ शकतो.

भौतिक शास्त्रांच्या हे लक्षात आले की, अणुजगताच्या पातळीवर ही सृष्टी मूलभूत घटकांनी बनलेले एक यंत्र नसून आपापसातील संबंधांचे जाळे आहे. आणि खरे तर संबंधांच्या या जाळ्यात, घटक अस्तित्वात नाहीत. ज्याला आपण घटक समजतो तो केवळ तात्पुरता अस्तित्वात असलेला आकृतिबंध असतो, जो आपले लक्ष वेधून घेतो.

सर्व गोष्टींची एकता व आपापसातील संबंधाविषयीची जाणीव होणे आणि सर्व घटनांची अनुभूती मूलभूत एकतेच्या वेगवेगळ्या रूपात घेणे हे भारतीय आध्यात्मिकतेचे वैशिष्ट्य आहे. ह्यात सर्व गोष्टी अविभक्त, परस्परावलंबी व त्या अंतिम सत्याची क्षणिक रूपे आहेत, असे मानले जाते.

हेच तत्त्व व्यवहारात परस्परसंबंधात अनुस्यूत आहे. त्यामुळे एकाच्या चारित्र्याचा परिणाम दुसऱ्यावर दिसून येतो. म्हणून सच्चारित्र्य किती आवश्यक आहे हे जाणवते. सच्चारित्र्याने आपल्याला तमोगुणावर विजय मिळवता येतो.

मानवी स्वभाव तिन्ही गुणांनी युक्त असल्याने त्यात तमोगुण अपेक्षित आहे. Coliridge सारखा विद्वान म्हणतो. As there is best and some evil in man, so is there some angel and some God in man. The beast and devil may be conquered but in this life never destroyed.' शुद्ध चारित्र्याने आपल्यातील षड्रिपूंवर व तमोगुणावर विजय मिळवता येतो. त्यांना काबूत ठेवता येते, असे भारतीय तत्त्वज्ञान सांगते. पण त्यासाठी एक विशिष्ट जीवनशैली आवश्यक असते. या षड्रिपूंशी झगड्यानंतर व त्यावर विजय मिळवल्यावर एक परिपक्व व्यक्तिमत्त्व तयार होते. म्हणूनच Dexter सारखा विद्वान म्हणतो - The best characters are made by vigorous and persistence to evil tendencies आणि हे सर्व करण्यासाठी माणसास संयम आवश्यक आहे.

४) संघनेतृत्व किंवा नायक होण्यास चारित्र्याची गरज -

अमेरिकेमध्ये एका निरीक्षणात असे दिसून आले की, आपल्या व्यक्तिमत्वावर बाहेरील लोक कशा तऱ्हेने बघतात, त्यानुसार आपल्यातच एक आपल्याबद्दलची प्रतिमा तयार होते व त्याचा प्रभाव आपल्या चारित्र्यावर पडतो. जसे लोक आपल्याला सज्जन म्हणत असतील तर आपण तसे असू. पण हे तितके खरे नाही, तर त्यासाठी आपल्यातील नैतिकतेचे बलस्थान प्रभावी असणे आवश्यक आहे. वास्तविक आपले चारित्र्य, आपल्यावर कोणाचीही नजर नसताना किंवा आपण एकांतात असतो, तेव्हाच आपल्या खऱ्या वागणुकीची कल्पना येते. म्हणून तिकडील तज्ज्ञ Kevin Cashman चारित्र्यही आपली बाहेर दिसणारी छबी,

असे करतो. म्हणूनच 'दिसते तसे नसते' असे म्हटले जाते.

बाह्य छबी ही दररोजच्या जीवनासाठी तर नायक किंवा नेता त्याच्यातील चारित्र्याच्या अधिकारवाणीने मार्गदर्शन करतो.

याच संघनायकाच्या संदर्भात चारित्र्यातील एक गुण जो वचनबद्धतेचा आहे, तो महत्त्वाचा मानला जातो. The leadership challenge या पुस्तकाचे लेखक James Kouzes and Bary Posner हे म्हणतात की, तुम्ही एक आदर्श मार्ग दाखवा, जो अंमलबजावणीसाठी वचनबद्धतेतून साकार होतो. ते वचन किती लहान आहे, याला महत्त्व नसून त्याच्या पूर्ततेला आहे.

येथे गुणवत्तेचा प्रश्न देखील महत्त्वाचा समजला जातो. Henry Ford म्हणतो की, 'Quality means doing it right when no one is looking' ही गोष्ट आणीबाणीच्या वेळी महत्त्वाची समजली जाते. म्हणून गुणवत्तेची काटकसर न करता ती योग्य रितीने जपली पाहिजे. ज्यामुळे विश्वासास तडा बसणार नाही.

चारित्र्य आणि प्रसिद्धी

चारित्र्यवानासाठी प्रसिद्धी आवश्यक आहे का ? किंवा प्रसिद्ध माणूस चारित्र्यवान असतो का ? हा समाजातील नेहमीच चर्चेचा विषय असतो. याचे उत्तर नकारात्मकच आहे. पण याचा निर्णय स्थलकालानुसार व सोईनुसार घेतला जात असतो. समाजात कोणाला महत्त्व आहे, म्हणजे पैशाला, विद्वत्तेला का चारित्र्याला यावरून त्या समाजाची सांस्कृतिक पातळी (Cultural Level) लक्षात येते.

तसे पाहता चारित्र्यामध्ये वस्तुनिष्ठता व यक्तिनिष्ठता दोन्ही अंतर्भूत आहेत आणि दोन्ही भिन्न आहेत. वस्तुनिष्ठतेनुसार विचार करता ती एक त्याच्या मनाच्या स्वभावाची कल्पना देते. तर व्यक्तिनिष्ठता लोकांच्या मनातील त्या व्यक्तीतील गुणांची सरासरीची कल्पना देते. प्रसिद्धी हा गुण आपल्याला दुसऱ्याकडून चिकटवलेला असतो. आधुनिक

जगात Face Book किंवा Linkden द्वारा प्रमाणित केला जातो. या उलट चारित्र्यास कोणत्याही प्रसिद्धीची गरज नाही. याविषयी अब्राहम लिंकनने असे म्हटले आहे. 'Character is like a tree and reputation like its shadow. the shadow in what we think of it the tree is the real thing.

चारित्र्य आणि कामांधता

भारतीय विचारवंतांनी माणसाच्या उत्कर्षाच्या आड येणाऱ्या ज्या सहा शत्रूंचे वर्णन केले आहे, त्यात काम हा अग्रगण्य मानला गेला आहे. काम जीवनासाठी जितका आवश्यक तितकाच त्याचा अतिरेक हानिकारक. त्याचा प्रजननासाठीचा उपयोग व एकंदरीत जीवनातील गरज बघून त्याला चार पुरुषार्थात स्थान आहे. पाश्चात्य मानसशास्त्रज्ञ फ्राईड याने तर काम याभोवतीच माणसाचे जीवन फिरते व तोच जीवनाचा केंद्रबिंदू मानला आहे. यावरून त्याची गरज व महती समजून येते. पण त्याच्या अतिरेकाने नाशच संभवतो. गीतेमध्ये त्याचा तसा स्पष्ट उल्लेख असून त्यापासून बुद्धिनाशापर्यंत अवस्था जाते असे प्रतिपादिले आहे.

ध्यायतो विषयान्पुंस: संगस्तेषु उपजायते ।
संगात् संजायते काम: कामात् क्रोधोऽभिजायते ।। (गी. २.६२)
क्रोधाद् भवति संमोह: संमोहात् स्मृतिविभ्रम: ।
स्मृतिभंशात् बुद्धिनाशो बुद्धिनाशात् प्रणश्यति ।। (गी. २.६३)

चारित्र्याच्या घडणीमध्ये नैतिकतेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. किंबहुना त्यावरच नैतिकतेचा डोलारा उभा असतो. म. गांधी नैतिकतेला अति महत्त्व देत असत व नैतिकतेस थेट अध्यात्माशी जोडत असत. इतके की, हिंदूंची राष्ट्रे नष्ट झाली त्याला नैतिकताच जबाबदार आहे असे ते म्हणत. हा टोकाचा विचार वाटण्याची शक्यता आहे. समाजामध्ये बुद्धीने म्हणा, प्रेरणेने म्हणा किंवा अंधश्रद्धेने म्हणा, मनुष्य दैवी शक्तीशी आपला काही ना काही संबंध जोडतो. अगदी कट्टर अज्ञेयवादी असला तरी

नीतितत्त्वाची गरज मान्य करतो आणि ते तत्त्व पाळले असता काहीतरी भले होते, न पाळले असता वाईट होते, असा त्या तत्त्वाविषयी तो भल्याबुऱ्यांचा संबंध जोडतो. अशा या कामांधतेला भारतीय समाज मान्यता देत नाही. अशा व्यक्तीला 'कामातुराणां न भयं न लज्जा' अशा उपाधीने संबोधिले जाते. जेथे लाजच सुटते, तेथे चारित्र्य शुद्ध कसे म्हणता येईल ?

वास्तविक कामांधता किंवा व्यभिचार हा जगामध्ये गौणच मानला जातो. अगदी पाश्चात्य प्रगत अमेरिकेसारख्या देशात जेथे लैंगिकता फार सैल अर्थाने घेतली जाते व स्त्री-पुरुष संबंधाबद्दल फारसा विधिनिषेध मानला जात नाही, त्या राष्ट्रात देखील वैषयिक नैतिकतेला महत्त्वाचे स्थान आहे. या संदर्भात तेथील राष्ट्रपती बिल क्लिंटन यांना परस्त्री संबंधाबद्दल साऱ्या राष्ट्राची क्षमा मागावी लागली. कारण त्यांच्यावर व्यभिचाराचा आरोप होता व ते 'स्टार कमिशनने' त्यांना विषयांधता व न्यायप्रक्रियेत व्यत्यय आणण्यासाठी दोषी ठरवले होते. तेथील सेनेटने क्लिंटन यांना क्षमा केली. पण मुद्दा नैतिकतेचा होता, हे मान्यच करावे लागेल. दुसरे ही एक उदाहरण. श्री. मुंडेन यांना त्यांच्या कामांधतेच्या पूर्वचारित्र्यामुळे अमेरिकेच्या उपाध्यक्षाच्या निवडणुकीपासून परावृत्त करण्यात आले होते. कारण त्या देशात ही सर्वोच्चपदावर असणारी व्यक्ती निष्कलंक व शुद्ध चारित्र्याची असावी अशीच सामान्यांची श्रद्धा आहे. म्हणूनच खालील म्हणीला साऱ्या जगात महत्त्वाचे मानले जाते. ती म्हण म्हणजे

When Wealth is lost, Nothing is lost
When health is lost something is lost
When character is lost everything is lost.

म्हणूनच भारतीय संस्कृतीने प्रभू रामचंद्रास सदाचाराचा आदर्श पुरुष मानून त्याला मर्यादापुरुषोत्तम म्हटले आहे. श्री वाल्मीकींनी श्री

हनुमानाच्या मुखाने देवी सीतेजवळ याचे सुंदर वर्णन केले आहे.

रक्षिता जीवलोकस्य स्वजनस्य च रक्षिता ।
रक्षिता स्वस्य वृत्तस्य धर्मस्य च परंतप ॥ १० ॥
रामो भामिनि लोकस्य चातुर्वर्ण्यस्य रक्षिता
मर्यादानां च लोकस्य कर्ता कारयिता च सः ॥ ११ ॥

अर्थ - श्रीराम संपूर्ण जीवलोकांचा आणि स्वजनांचा रक्षणकर्ता आहे. तो शत्रुतापन राम आपल्या सदाचाराचे व धर्माचेही रक्षण करतो. हे भामिनी सीते, श्रीराम जगातील चारही वर्णांचे रक्षण करणारा आहे. जगाला धर्माच्या मर्यादा घालून देणारा, त्याचे पालन करणारा आणि त्या मर्यादांचे लोकांकडून पालन करविणाराही आहे.

वास्तविक या दोन्ही पाश्चात्य व पौर्वात्य राज्यकर्त्यांचे आदर्श आपल्यासमोर आहेत व त्यांच्या शुद्ध चारित्र्याचे अनुकरण करावे, अशी अपेक्षा आहे. पण तसे घडताना दिसत नाही. कारण Vactair याने म्हटल्याप्रमाणे प्रत्येकाचे चारित्र्य तो ज्या काळात राहतो, ती त्या काळाचीच निर्मिती असते. तो म्हणतो, Every man, as to character, is the creature of the age in which he lives' म्हणजेच 'यथा राजा तथा प्रजा' या उक्तीनुसार समाज जगत असतो.

एवढे असूनही आधुनिक मानसशास्त्रज्ञ चारित्र्यासंबंधी शास्त्रीय दृष्टिकोनातून त्याचा अभ्यास करीत आहेत व समाजाच्या अभ्युदयासाठी त्यांचा कसा चांगला उपयोग होतो याचे मार्गदर्शन करीत आहेत. असाच एक Positive Psychology या मानसशास्त्राच्या एका विषयासंबंधी माणसाच्या सद्‌गुणांचा विचार, Christophr Peterson and Marten Seligman यांनी त्यांच्या 'Character Shrengths and Virtues' या पुस्तकात नमूद केले आहे. त्यांनी यासाठी माणसातील सद्‌गुणांचा व बलस्थानांचा विचार केला व त्यात काही उपगुणांचा विचार केला. त्यांचा फक्त येथे नामनिर्देश करणे सोईचे होईल.

१) Wisdom and Knowledge म्हणजे चातुर्य जाणीव ज्ञान
   १) निर्मिती, २) उत्सुकता, ३) न्याय, ४) खुले मन, ५) प्रेम

२) Courage - धैर्य
   १) बहादुरी, २) दीर्घोद्योग व चिकाटी, ३) प्रामाणिकपणा व उत्साह

३) Humanity - माणुसकी
   १) प्रेम करण्याची व करून घेण्याची क्षमता, २) करुणा ३) सामाजिक शहाणपण.

४) Justice - न्यायिक भूमिका
   १) सांघिक काम, २) सरलता, ३) नेतृत्व

५) Temperance - संयम
   १) सहिष्णुता, २) लीनता, ४) आत्मसंयम, ४) सारासार विचार म्हणजे विवेक,

६) Trascendence - पारलौकिकता
   १) श्रेष्ठत्वाचा रसास्वाद, २) कृतज्ञता, ३) आशावाद, ४) विवेक बुद्धी, ५) धार्मिकता आणि आध्यात्मिकता

येथे विचार करण्यासारखी गोष्ट म्हणजे या आधुनिक मानसशास्त्रीय सद्गुणांच्या निकषात कोठेही कामांधतेला स्थान नाही. म्हणजे कामांधता हा सद्गुण नसून तो शुद्ध चारित्र्यात बसत नाही.

लेखकाने असेही नमूद केले आहे की, वरील सद्गुणांचे वर्गीकरण करताना जगातील मुख्य धर्माच्या ग्रंथांचा उपयोग केला आहे. ज्यात बायबल, कुराण आणि भगवद्गीता यांचे तत्त्वज्ञान विचारात घेतले आहे.

वरील सर्व विवेचनावरुन कामांधता हा शुद्ध चारित्र्यात अंतर्भूत होऊ शकत नाही. पण व्यवहारात व समाजात वावरताना सामान्य माणसाची मोठी पंचाईत होऊन बसते. उच्च शिक्षित, विद्वान व समाजमान्यता प्राप्त

असलेली व्यक्ती जेव्हा कामांध वागणूक करते, तेव्हा तो गोंधळून जातो व विद्वानासंबंधी खालील गृहीत धरलेले वचन कसे मान्य करायचे हा त्याला प्रश्न पडतो. हे वचन असे,

विद्वत्त्वं च नृपत्वं च नैव तुल्ये कदाचन।
स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते ।।

अशा व्यक्तीसंबंधी एकच अपेक्षा असते, ती म्हणजे त्याच्या विद्वत्तेला कोणी आव्हान देऊ नये. पण त्याच्या चारित्र्याला शुद्ध चारित्र्य म्हणू नये एवढेच. अशा व्यक्तींच्या उपदेशाला नैतिक वजन नसल्याने समाज फारसे त्यांना महत्त्व देत नाही. ही गोष्ट विद्वानाबरोबरच धर्मगुरू व समाजसुधारक व पुढारीपण करणाऱ्या मंडळींना लागू होते. ते समाजाचे आदर्श होऊ शकत नाहीत. सबब शुद्ध चारित्र्य व विद्वत्ता किंवा विषयातील पारंगतता हे दोन गुण अगदी वेगळे समजणे गरजेचे आहे. विद्वान जसा चारित्र्यसंपन्न नसू शकतो तसा अशिक्षित पण सुसंस्कृत हा चारित्र्यवान असू शकतो व समाजमान्य होऊ शकतो.

चारित्र्य ठरवले जाते का घडवले जाते ?

प्रथम हे बघितले पाहिजे की, चारित्र्य ठरवून असते का घडवून होते ? याचा विचार करताना अध्यात्माच्या व शास्त्रीय दृष्टिकोनातून चारित्र्य पूर्वसंकल्पित असून त्याला हवे तसे वळण देता येते, हे व्यवहारात व प्रयोगशाळेत केलेल्या प्रयोगावरून दिसून येते. याचा त्रोटक विचार अध्यात्मिक विचारप्रणाली असे मानते की, ही प्रकृती अष्टधा असून तीत ब्रह्माने जीवरूपाने प्रवेश केला आणि प्रकृतीतील सर्व घटक त्यांच्या गुणधर्मानुसार आपले प्रदर्शन करीत असतात. तेच तत्त्व सजीवास व मानवास लागू आहे. अष्टधा म्हणजे पंचमहाभूते, ज्यात पृथ्वी, आप, वायू, तेज व आकाश यांचा समावेश असून अहंकार, मन व बुद्धी त्याला सत्व, रज व तमोगुणांची जोड आहे. या तिन्ही गुणांचे वेगवेगळे वैशिष्ट्य मानले गेले आहे. त्यांच्या वैशिष्ट्यानुसार माणसांची ओळख होते व

त्याचे व्यक्तिमत्व तयार होते. यासाठी आनुवंशिकता व पुनर्जन्म यांचा विचार करण्यात आला आहे. या विचारप्रणालीमध्ये जो आत्मा ज्या वासना अथवा इच्छा घेऊन जीवात्म्याच्या रूपाने जन्म घेतो, त्यानुसार देखील त्याचे चारित्र्य बनत असते. तसेच संस्कार, शिक्षण, सत्संग इ. मुळे त्याला वेगळे वळण देता येऊ शकते.

आधुनिक विज्ञानाच्या प्रगतीमुळे व जनुकीय शास्त्रातील क्रांतीमुळे आज शास्त्रज्ञ माणसाच्या संपूर्ण व्यक्तिमत्वाचे, आजाराचे चित्रण जनुकीय आराखड्यानुसार आपल्यासमोर ठेवत आहे. येथे देखील हे निदर्शनास येते की, चारित्र्य बरेच ठरल्यासारखे असते व त्याला वेगळे वळण पण देता येऊ शकते. यासाठी थोडा सविस्तर विचार.

आज शास्त्रज्ञ असे दाखवून देत आहेत की, प्राण्यांच्या वर्तणुकीला जनुके जबाबदार आहेत. वनस्पती किंवा प्राथमिक प्राण्यांचे वर्तन म्हणजे जनुकांनी वातावरणाला दिलेला प्रतिसाद देत कार्यान्वित केलेल्या रासायनिक क्रियांची मालिका. माणसाचा मेंदू जसा विकसित होत गेला, तशी जनुके प्रेरणेच्या सहाय्याने माणसाचे वर्तन नियंत्रित करू लागली.

मानवी अस्तित्वाची शरीर, मन, बुद्धी ही अनिवार्य अंगे जनुकातील आज्ञावलीनुसारच अस्तित्वात येतात. माणसाचे रंग, रूप, बांधा, शरीरयष्टी त्यात दिसून येणारा लवचिकपणा इ. अनेक शारीरिक गुणधर्म आणि त्यांच्यातील वैविध्य जनुकातील वैविध्यामुळेच निर्माण होते. मेंदूचे आकारमान, मज्जापेशींची संख्या, संदेशवहन करणारी प्रथिने (Neurotransmitters) हे सर्व जनुकामुळेच होते. मानवातील सद्‌गुण व षड्रिपू हे देखील जनुकामुळेच अस्तित्वात असतात. जनुकांच्या आज्ञावलीतील एका अक्षराने माणसाचे व्यक्तिमत्व बदलू शकते. शरीर रचनेतील तसेच स्वभावातील बहुधा सर्व गुणवैशिष्ट्ये ही अनेक जनुकांच्या एकत्रित परिणामांचे फलित असतात. जनुकीय तज्ज्ञांच्या मते माणसाच्या मेंदूचे वेगळेपण प्राण्यापेक्षा अधिक उठून दिसते. कारण प्राण्यांच्या मेंदूकडे

शिकण्याची क्षमता नसते. त्याउलट माणसाचा मेंदू लवचिक असतो. शिकण्याची क्षमता असते आणि त्याच्या मेंदूमध्ये लक्षावधी जोडण्या असतात. त्या जैविक घड्याळानुसार कार्यरत होतात व निकामीही होतात. त्यातील बदल हे जनुकेच नियंत्रित करतात. माणसाच्या मेंदूत मज्जातंतूच्या जोडण्यांची खूप वेगवेगळी चक्रे बनलेली असतात आणि प्रत्येकाचे विशिष्ट कार्य असते. तसेच ही चक्रे एकमेकांशी जोडली जातात. तसेच त्यांच्यात ज्ञानेंद्रियाकडून येणाऱ्या संदर्भाचे आदान प्रदान होत असते. वेळोवेळी येणाऱ्या संदेशवहनांमधून एकाच व्यक्तीमध्ये विविध प्रकारचे विचार-भावना-वर्तन उद्‌भवते. यामुळेच मानवी व्यक्तिमत्त्व घडत व बदलत जाते. संस्कारांनी किंवा वातावरणातील बाह्य गोष्टींनी व्यक्तिमत्त्व घडवता येते किंवा बदलता येते. यावरून असे जाणवते की, जनुके व बाह्यसंस्कार परस्परावलंबी असतात आणि यामुळेच व्यक्तिचारित्र्यावर किंवा व्यक्तिमत्वावर जनुकांचा प्रभाव दिसून येतो.

हे मानवी स्वभावाच्या उत्पत्तीचे शास्त्रीय विवेचन योग्य असले तरी एक प्रश्न नेहमी विचारला जातो की, या जनुकांना तसे वागण्यास कोण प्रवृत्त करते किंवा त्यांना कोणाकडून प्रेरणा मिळते ?

जनुकविषयाच्या अभ्यासकांशी चर्चा करताना, त्यांच्या मतानुसार काही जनुकातील रासायनिक बदलामुळेच इतर जनुकांना चांगली वा वाईट प्रेरणा मिळते आणि त्याचे प्रत्यंतर व्यक्तीच्या वर्तणुकीत दिसून येते. पुन्हा प्रश्न तोच येतो की, हा रासायनिक बदल जनुकांत देखील कोण करते ? तर भारतीय विचारसरणी असे मानते की, जीवात्म्यामधील आत्मतत्त्व जे वासनांनी वेढलेले आहे, तेच त्या जनुकाला प्रेरणा देते व कार्यरत करते आणि ही वासना पूर्वजन्मानुसार चांगली वा वाईट कशीही असू शकते. या जन्मी तीच तुमचे व्यक्तिमत्त्व व चारित्र्य घडवते.

वरील विवेचनावरून चारित्र्याच्या प्रकटीकरणाकडे चार तऱ्हेने

बघता येऊ शकते.

१) **अटळ दैववाद** - Fatalism यामध्ये जगाचे, व्यक्तीचे सर्व काही ठरलेले आहे. सर्वांची उत्पत्ती, स्थिती व लय ठरलेला आहे. यात बदल असंभव, ज्याक्रमाने अष्टधा प्रकृतीची उत्पत्ती झाली त्याच्या उलट क्रमाने या प्रकृतीचा लय होणार ही अटळ घटना आहे.

२) **नियतिवाद :** Determinisim

यामध्ये कोणतीही घटना सहजगत्या घडून येत नसते. मानवी इच्छा अथवा संकल्प एक घटना आहे. पण ती करण्यास मी स्वतंत्र आहे का ? कोणत्याही घटनेस कारण हे असणारच आणि ती घटना कोठे, नेमकी कशी घडावयाची हे सर्वस्वी तिच्या कारणावरून किंवा कारणसमुच्चयावरून ठरते. म्हणजे ती घटना तिच्या कारणाने नियत होते व ते कारणच तिचे नियंत्रण करते व ही आयत्यावेळी घडू शकणारी घटना नसून पूर्वनियोजित आहे.

संकल्प नियत असतो या निष्कर्षाकडे असेही बघता येईल. मनुष्य आचरण करणारा प्राणी आहे. आचरणाची निवड करताना स्वतःच्या प्रेरणा अथवा हेतू विचारात घेईल. सर्वात बलवान प्रेरणेला अनुसरुनच तो कृती करेल. त्या माणसाचा जो काही स्वभाव असेल त्याप्रमाणे तो कृतिविषयाचा निर्णय (म्हणजे संकल्प) ठरवेल. याचा अर्थ असा होतो की, भविष्यातील कोणत्याही क्षणी प्रत्येक व्यक्तीचा संकल्प नियत असतो.

येथे संकल्प नियत असल्यावर त्याचे स्वातंत्र्य उरतेच कोठे ? तसेच चारित्र्य जर नियत असेल तर त्याला स्वतंत्रपणे व मर्जीप्रमाणे त्याचे चारित्र्य घडविता येणार नाही. हाच तो नियतिवाद. सर्व काही ठरलेले आहे. आपण कठपुतळीच्या खेळातील बाहुल्यांसारखे आहोत.

येथे Stoic स्टॉईक या तत्त्वज्ञानी माणसाचे विचार लक्षात घेण्यासारखे आहेत. तो म्हणतो, जे घडते आहे ते विनातक्रार स्वीकारल्यानेच

स्वातंत्र्याचा अनुभव येतो.

३) **जनुकीय नियतिवाद :** (Biological DetermInesim)

दैववाद व नैतिक मीमांसेच्या नियततत्त्ववादानुसार माणसाच्या चारित्र्याच्या असण्याच्या कल्पना या तार्किकतेवर,आधारित आहेत. आता आधुनिक विज्ञान व जनुकीय शास्त्राच्या शास्त्रीय आधारानुसार नवीन जैविक नियतिवाद अस्तित्वात आला आहे आणि हे शास्त्र असे मानते की, माणूस चांगला वाईट ही जनुकाचीच निर्मिती आहे आणि जनुकांच्या आज्ञेबरहुकूम त्याची जीवनयात्रा चालते.

प्राण्यांचे वर्तन प्रेरणेनुसारच घडते. ते जनुकीय प्रेरणेविरुद्ध वागताना दिसत नाही. माणसाच्या आयुष्यात प्रेरणा महत्त्वाची भूमिका बजावतात. आहार-निद्रा-भय-मैथुन अशा जीवनावश्यक कृती अजूनही प्रेरणांमार्फत केल्या जातात. क्षणोक्षणी होणाऱ्या प्रेरणा, भावना व त्यानुसार होणाऱ्या कृती या जनुकांमुळेच घडतात, पण त्या आपल्याला जाणवत नाहीत इतकेच.

पुढे जनुकांचा अधिक सविस्तर अभ्यास झाला तर कोणते जनुक घेऊन आपण जन्माला आलो व चारित्र्य कसे असणार हे जनुकांच्या आराखड्यावरून आपल्याला समजू शकेल. किंबहुना वाईट जनुकांची निर्मिती कशी टाळता येईल किंवा जनुके आराखड्यातून काढून टाकता येतील व विशिष्ट परिस्थितीत आपण कसे वागू हे सांगता येईल. एकंदर वेगळे वागण्याचे आपल्याला स्वातंत्र्यच राहणार नाही. शेवटी माझ्यातला 'मी' कोण विचारायची पाळी येईल. कायद्याच्या काटेकोर भाषेत बोलायचे झाल्यास मी गुन्हा केलाच नाही व तो गुन्हा जनुकानेच केला, तेव्हा मी त्याला जबाबदार कसा, असा युक्तिवाद करण्यापर्यंत जाईल. या शास्त्रानुसार या शरीरात मी असे कोणतेही केंद्र नाही किंवा आत्मा विज्ञानाला सापडला नाही. 'मी' चे अस्तित्व आधी भरणपोषण जनुकांनी बनवलेल्या आणि चालवलेल्या शरीरामुळे होत असले तरी जनुके आणि शरीर म्हणजे

मी नव्हे. माझ्या भावना, इच्छा, क्षमता, हेतू, विचार, माझ्या धारणा या साऱ्यांची जाणीव आणि या जाणीवेकडे बघणारा साक्षीभाव हे सारे मेंदूतील ज्या जोड्यांमुळे निर्माण होते, त्या जोडण्यांना व परस्परांना गती देणारे, गुंतागुंतीचे 'जागते चक्र' म्हणजे 'मी' असावे असे हे शास्त्र मानते आणि त्यानुसार व्यक्तिमत्व तयार होते.

मानवी जनुकीय आराखड्याच्या पूर्वकल्पनेनुसार माणसाचे आयुष्य, चारित्र्य व त्याची वागणूक विधायक ठरते का विघातक ठरते हे येणारा काळच सांगू शकेल. कारण आज वैद्यकीय क्षेत्रातील जनुकांच्या आराखड्यानुसार माणसांच्या आजाराबाबतच्या कल्पना बदलतच चालल्या आहेत. ज्यामुळे त्यांच्या आयुष्यावर विपरीत परिणाम होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

वरील तिन्ही विचारातून एक गोष्ट स्पष्ट होते की, माणूस आपले चारित्र्य घडवण्यास स्वतंत्र नाही. त्याला इतर गोष्टींचा आधार घेणे क्रमप्राप्त आहे.

४) सामाजिक वास्तवता व मानसिकता

वरील शास्त्रीय, तत्त्वविषयक व नीतिमीमांसेतून होणारी चारित्र्याची उकल ही जरी खरी असली तरी बव्हंश समाज चारित्र्य ठरविले जाते आणि घडवले जाऊ शकते, या दोन्हीच्या एकत्रित होणाऱ्या क्रियेवर विश्वास ठेवतो. गीतेमधील कर्माचा सिद्धांत हा पूर्वकर्मानुसार होणारी प्रकृती याकडे आकर्षित करतो व स्वकर्तृत्वाची व स्वधर्माची जाण जागृत झाल्यास चारित्र्याला शुद्ध चारित्र्यावर नेण्यावर त्याचा विश्वास असतो.

सर्वसामान्यपणे माणूस झालेल्या घटनेची (चारित्र्याची सुद्धा) उकल घटना झाल्यावर व अंतिम फळ मिळाल्यावर करतो. सफलता मिळाली तर ती स्वकर्तृत्वाने घडवली यावर विश्वास ठेवतो. अपेक्षित यश मिळाले नाही तर कर्माकडे बोट दाखवतो. येथे प्रश्न प्रामाणिक प्रयत्न व बाह्य

गोष्टींचा असतो, ज्यावर चारित्र्याची घडण होते.

शुद्ध चारित्र्याच्या संवर्धनासाठी आवश्यक घटक

यासंबंधी विचार करताना लक्षात येते की, शुद्ध चारित्र्यासाठी एकच घटक जबाबदार नसून अनेक घटकांचा समुच्चय निर्णायक ठरतो. त्यासाठी एकच असा राजमार्ग नाही. म्हणून Frank Cody सारखा विद्वान म्हणतो. 'There is no single road to character, a variety of routine will always need to be used.' But one thing is certain. It is our action that much depends. दुसरा एक पाश्चात्य विद्वान Fond म्हणतो "You can not dream yourself into a character, you must hammer and forge one for your self and Talents are best nurtured in solitude, character is best formed in the story bilows of the world" म्हणजे कौशल्याचे एकांतात संगोपन होते आणि चारित्र्याचे जगाच्या समवेत घुसळण्यातून संवर्धन होते.

येथे आवश्यक १० घटकांचा नामनिर्देश केला आहे. प्रत्येकाचे वेगळे वैशिष्ट्य आहे.

१) त्रिगुणात्मक प्रकृती
२) जनुकीय नियती व आनुवंशिकता
३) अंत:करणाची शुचिता - चित्त शुद्धी
४) संस्कार - (गर्भसंस्कारापासून - मृत्यूपर्यंत)
५) शिक्षण - शिक्षक - गुरु व सत्संग
६) स्वधर्म व स्वकर्तृत्वाची जाण
७) प्रामाणिकपणा व विश्वास
८) संयम व त्याची अंमलबजावणी
९) धर्म आणि नैतिकता
१०) सांस्कृतिक, सामाजिक व राजकीय परिस्थिती

आजची चारित्र्याबाबतची स्थिती

वरील तात्त्विक विवेचन व चारित्र्यास आवश्यक असणाऱ्या घटकांचा विचार करता, या घटकांच्या यादीतील शेवटच्या आठ घटकांमध्ये विकृती निर्माण झाल्याने, आज चारित्र्याबाबतची गोंधळाची व संभ्रमावस्थेची स्थिती दिसून येते. आसक्ती, स्वार्थ व अविश्वास यात वृद्धी झाल्याने माणूस चारित्र्यहीनतेकडे झुकला आहे.

ही परिस्थिती फक्त आपल्याकडेच नसून सर्व जगात असल्याचे काही मानसिक रोगतज्ज्ञांचे मत आहे. आणि या गोंधळ व गुंतागुंतीच्या स्थितीस (Chaos and Complexity) काय कारण असावे, याचा विचार पाश्चात्य देशात चालू आहे. Santa Fe Institute i New Mexico येथील संशोधन केंद्र व इतर केंद्रात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञ बरीच चर्चा करून काही अनेक सिद्धांत मांडण्याचा प्रयत्न करीत आहेत आणि या संशोधन केंद्राचा मध्यबिंदू, नैसर्गिक संरचनेतील बदल यात माणसाच्या व्यक्तिगत जीवनातील व परस्पर संबंधातील बदल हा आहे. यातीलच एका तज्ज्ञाने आजच्या या मानसिक गोंधळ व गुंतागुंतीचे वर्णन असे केले आहे.

"It is easy to see that there is some there, that the substance has some specific form and it appears solid. When tries to actually pick some up, however, it quickly becomes a challenge to manage and is transformed into a very different substance than it appeared while sitting on the plate." (Chamber as qwoted in McClure - 1998)

उपाय

चारित्र्य घडवणाऱ्या वरील घटकातील शेवटच्या आठ घटकातील विकृती मानवी प्रयत्नाने दूर केल्यास माणूस चारित्र्यसंपन्न बनू शकतो. वरील तज्ज्ञ मंडळीच्या निष्कर्षावरून व दिसत असलेल्या सद्यस्थितीवरुन हे बरेच कठीण वाटते. गाडी उताराला लागली आहे व ब्रेक निकामी झाले

आहेत अशी आजची सामाजिक स्थिती आहे. भारतीय माणूस आशावादी आहे. कोणीतरी अवतारी महात्मा येईल व ही स्थिती बदलेल या आशेवर व गीतेतील 'यदा यदा हि धर्मस्य ......' या भगवंताच्या वचनावर विश्वास ठेवून आहे.

४

अन्न हे पूर्ण ब्रह्म

आज देशात अन्नसुरक्षा विधेयकाची जोरात चर्चा चालू आहे. तेव्हा अन्नाबाबत ज्येष्ठ मंडळीमध्ये चर्चा होणे अपरिहार्य आहे. यांच्यातील भारतीय संस्कृतीचा अभिमानी व शासनाच्या सांप्रत कारभारावर संतप्त आवेशाने म्हणाला, हे काय अन्नाची सुरक्षा करणार ? अरे, अन्न हे तर ब्रह्म आहे. ते ही पूर्ण ब्रह्म. शासन काय त्या ब्रह्माची सुरक्षा करणार ? ज्या ब्रह्माने या विश्वाचे निर्माण केले, त्याने यातील सजीवांच्या अन्नाची सोय करून ठेवलेली असते. फक्त सरकारने त्याचे नियोजन व्यवस्थित करावे एवढीच अपेक्षा.

यावरून अन्न खरेच ब्रह्म व पूर्ण ब्रह्म आहे का ? तसे बघितले तर अन्नाचा व ब्रह्माचा संबंध भोजन करताना संस्काराप्रमाणे, जेवायच्या अगोदर

वदनि कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे
सहज हवन होते नाम घेता फुकाचे ।
जीवन करी जीवित्वा अन्न हे पूर्णब्रह्म
उदर भरण नोहे जाणिजे यज्ञ कर्म ।।

हा श्लोक उच्चारला जात असतो. पण ब्रह्माचा व अन्नाच्या संबंधात फारसा विचार कधी येत नसे व तसे कारण पण नसायचे. पण त्या ज्येष्ठाच्या संतप्त प्रतिक्रियेने खरेच ब्रह्म काय आहे व अन्न देखील ब्रह्म आहे का ? याचा विचार करावासा वाटला. म्हणून काही जे रोज या

श्लोकाच्या आधारे जेवणास प्रारंभ करतात, ध्यान धारणेत रस घेतात, त्यांना विचारले असता अन्नाला 'पूर्ण ब्रह्म' केवळ त्याची महती पटवण्यासाठी श्लोकात म्हटले आहे, असे उत्तर मिळाले. यावर समाधान झाले नाही, म्हणून खोलात जाऊन ब्रह्म काय आहे व अन्नाचा काही संबंध आहे का ? याचा विचार करावासा वाटला.

'सर्वं खल्विदं ब्रह्म' व 'अहं ब्रह्मास्मि' एवढीच काय ती आम्हांला ब्रह्माबद्दल माहिती. भारतीय दर्शनकारांनी अन्नाला एवढे महत्त्व का दिले, हे जाणून घेण्याचा एक प्रयत्न.

येथे ब्रह्म व आत्मा यांचे संक्षिप्त वर्णन हे अन्न कसे ब्रह्म आहे, हे जाणून घेण्यासाठी केले आहे.

ब्रह्म म्हणजे काय ?

मुळात आहे ते फक्त एकच परमतत्त्व. परब्रह्मातील एकमेव मूलतत्त्वापासून असंख्य पदार्थ तयार होतात व शेवटी त्यांचे विघटन होऊन त्या मूलतत्त्वात जाऊन मिळतात. शास्त्रीय दृष्ट्या विचार केला तर हे मूलतत्त्व प्रोटान - न्यूट्रान - इलेक्ट्रान यांना बनवते. हे तीन कण एकत्र येतात तेव्हा अणू तयार होतो. हे तीन कण एकत्र येण्याच्या क्रिया बदलल्या की, वेगळे अणू तयार होतात. हे अणू एकत्र येऊन रेणू तयार होतात व या रेणू एकत्र येण्याने पदार्थ तयार होतात. या पदार्थांचे विघटन झाले की पुन्हा मूळ प्रोटान-न्युट्रान-इलेक्ट्रान एवढेच शिल्लक राहतात.

हे मूलतत्त्व जे परब्रह्मात असते, ते सर्व कांही जाणणारे असते व सर्वत्र असते. अशा ब्रह्माचे वर्णन मुंडकोपनिषदात ऋषींनी असे केले आहे.

यः सर्वज्ञः सर्वविद्यस्य ज्ञानमयं तपः ।
तस्मादेतद् ब्रह्म नाम रूपमन्नं च जायते ।। ९ ।। मुंडक पहिले

अर्थ - जो सर्वज्ञ आहे. जो सर्वविद् म्हणजे सर्व जाणणारा आहे, ज्याचे तप म्हणजे मोठेपणा हा ज्ञानमय आहे, त्याच्यापासून हे विराट जग

नाव, रूप आणि अन्न उत्पन्न होते.

या परब्रह्माचे तप म्हणजे तेज किंवा मोठेपणा ज्ञानमय आहे. तप म्हणजे प्रबल होणे, मोठे होणे किंवा अधिकार गाजवणे असा ही समजला जातो. याचा अर्थ असा आहे की, त्याच्या तेजाची महानता ही केवळ ज्ञानानेच जाणता येईल. येथे ज्ञान म्हणजे ब्रह्मज्ञान असाच आहे. या परब्रह्माचे तप म्हणजे तेज हे देखील ज्ञानमय असते. सर्व ज्ञान परब्रह्मात असतेच व त्याच्यापासून ते जीवांना प्राप्त होते. जसे कीटकांना, मुंगी किंवा मधमाशी यांना ज्ञान कोणी शिकवत नसते. जे ब्रह्मात असते, तेच त्यांना प्राप्त होते. मानवाला देखील ब्रह्मातूनच किंवा ब्रह्मज्ञान प्राप्त झाल्यावर ज्ञान प्राप्त होते. सर्वांना सारखेच ज्ञान प्राप्त होते. असे नाही. ते त्याच्या पूर्वसुकृतावर अवलंबून असते. असे भारतीय संस्कृती मानते.

याच श्लोकात परब्रह्मापासून रूप व अन्न उत्पन्न होतात. सभोवार जे दिसते म्हणजे जे रूप आहे त्यालाच ऋषींनी हे ब्रह्म म्हटले आहे. कारण अग्नी आपले रूप दाखवतो, आकाश आपले रूप दाखवते. सर्व चराचरातील पदार्थ आपले रूप दाखवतात. हे जे रूप दिसते ते ब्रह्माच्या तेजातून येते. तसेच या तेजाबरोबर अन्नाचा पण उल्लेख केला आहे. कारण चराचरातील हालचाल जी होते ती शक्तीमुळे होते व ती शक्ती अन्नामधून मिळते. म्हणून त्या तेजाबरोबर अन्न देखील ब्रह्मच आहे. नुसते दिसणारे रूप ब्रह्म नाही तर न दिसता कार्य करणारेही ब्रह्म आहे. म्हणून सर्वत्र दिसणारे रूप व सर्वत्र अनुभवाला येणारे शक्तिदायक अन्न यांना ब्रह्म असे नाव दिले आहे.

मुंडकोपनिषद

तपसा चीयते ब्रह्म ततोऽन्नमभिजायते ।
अन्नात्प्राणो मनः सत्यं लोकाः कर्मसु चामृतम् ॥ ८ ॥

तपामुळे ब्रह्म प्रसरण पावते, वाढते, तेव्हा अन्न उत्तम प्रकारे उत्पन्न

होते. अन्नापासून प्राण उत्पन्न होतो. प्राणापासून मन, मनापासून सत्य, सत्यापासून लोक, लोकापासून कर्म आणि कर्मापासून अमृतत्व येते.

या मंत्रातून ब्रह्माचे उष्णतेमुळे म्हणजे तपामुळे प्रसरण पावणे व त्यातून विश्वनिर्मिती होऊन अन्न तयार होणे हा अर्थ निघतो. म्हणजे ऋषी तपापासून अन्न तयार होते असे म्हणतात व तज्ज्ञाच्या मते हे अगदी योग्य आहे व विश्वनिर्मितीचीच ऐतरेय उपनिषदात म्हटल्याप्रमाणे एक मालिका तयार होते व ती थेट कर्मापर्यंत व पुढे त्यातून अमृतत्वापर्यंत नेली जाते.

तपापासून अन्न कसे तयार होते ?

ब्रह्म प्रसरण पावले ते तपामुळे व या ब्रह्मातील परमतत्त्व एकत्र येऊन एक गोल निर्माण झाला. आसमंतातून हा निर्माण झाल्यामुळे त्याला 'आभु' म्हणतात. या गोलाच्या मध्यभागी, भोवतालच्या वस्तूंच्या दाबामुळे उष्णता निर्माण झाली. त्यामुळे तो गोल प्रसरण पावू लागला. फार उष्णता झाल्यावर त्याचा स्फोट झाला व विश्वाची उत्पत्ती झाली. (हीच ती बिग बँग थेअरी) या स्फोटातून जे परमतत्त्व बाहेर पडले, तेच एकत्र येऊन विश्व निर्माण झाले. विश्वात त्याच घडामोडी होऊन त्यापासून तारे बनले. ताऱ्यांत घडामोडी होऊन ग्रह बनले. हे ग्रह पंच महाभूतांनी बनले आहेत. ही पंच महाभूते मूळ परम तत्त्वापासून बनली आहेत व ती पंच महाभूते हीच अन्न आहेत.

'आभु' तील स्फोटातून क्रमाने आकाश, वायू, तेज, आप आणि पृथ्वी ही पंचमहाभूते निर्माण झाली असून पहिल्यापासून दुसरे, दुसऱ्यापासून तिसरे या पद्धतीने निर्माण झाली असून दुसऱ्यात पहिले असते, तिसऱ्यात दुसरे व पहिले असते. अशी त्यांची रचना असते व शेवटी पृथ्वीतत्त्वात सर्वच महाभूते असतात. या मातीतून या वनस्पती अन्न घेतात. त्या वनस्पती आपले अन्न आहे. म्हणजे आपल्या अन्नाचे मूळ देखील मातीच ठरते. याच रीतीने सर्व जीवांचे अन्न माती ठरते आणि माती ही सर्व पंच

महाभूतांचे मिश्रण आहे. याचाच अर्थ असा होतो की, पंच महाभूते हीच सर्व जीवांचे अन्न ठरते.

सर्व जीव म्हणजेच प्राण हे पंच महाभूतांतूनच बनले आहेत. प्रत्येक प्राण्यांत ही आकाश, वायु, तेज, आप व पृथ्वी ही तत्वे असतात. मग तो अमिबासारखा एकपेशी असो किंवा हत्ती अथवा मानवासारखा प्राणी असो.

याच मंत्रात अंगिरस ऋषी पुढे अन्नापासूनच प्राण, मन व त्यातून सत्य निर्माण होतात असे म्हणतात. कारण मनच सत्य अथवा असत्याबाबत निवाडा करू शकते. सत्यापासूनच लोक निर्माण होतात. लोक म्हणजे समाज. एका मनाने एक गोष्ट सत्य मानली की त्याच गोष्टीला सत्य मानणारी मने एकत्र येतात. म्हणजेच समाज तयार होतो. लोकांपासूनच कर्म निर्माण होते. माणूस एकटा असला तर कर्म तयार होणार नाही. पण समाज बनला की, एकमेकांच्या कार्यानुसार कर्म तयार होते. या कर्मापासूनच अमृत तत्त्व येते, असे येथे ऋषी सांगत आहेत. कारण कर्माचा परिणाम लिंगदेहावर होतो व त्यानुसार त्याला फळ मिळते.

२) ब्रह्माची दुसरी एक महत्त्वाची संकल्पना म्हणजे या विश्वातील प्रत्येक सजीव ब्रह्मापासूनच निर्माण होतो व परत त्यातच तो विलीन होतो. तसेच पृथ्वीवर राहणाऱ्या प्रजा अन्नापासून उत्पन्न होतात, नंतर अन्नानेच जगतात आणि शेवटी अन्नातच विलीन होतात. अन्न हेच अस्तित्वात असलेल्या वस्तूंत ज्येष्ठ आहे. म्हणून त्यास 'सर्वौषध' (सर्वांचे औषध) असे म्हणतात. जे अन्नाची ब्रह्म म्हणून उपासना करतात, ते सर्व प्रकारचे अन्न मिळवतात. अन्नापासूनच प्राणिमात्र उत्पन्न होतात. जन्म पावलेले अन्नामुळेच वाढतात. ते भूतांकडून खाल्ले जाते व ते भूतांना खाते, म्हणून त्याला 'अन्न' म्हणतात.

तैत्तिरीय उपनिषदामध्ये असे म्हटले आहे

अन्नाद्वै प्रजा: प्रजायन्ते। या: काश्च पृथिवीं श्रिता:।
अथो अन्नेनैव जीवन्ति। अथैनदपियन्त्यन्तत: ।।
अन्नं हि भूतानां जेष्ठम्। तस्मात्सर्वौषधमुच्यते।
सर्वे वै तेऽन्नमाप्नुवन्ति।
येऽन्नं ब्रह्मोपासते। अन्नं हि भूतानां ज्येष्ठम्। तस्मात्सर्वौषधमुच्यते।
अन्नाद् भूतानि जायन्ते। जातान्यन्नेन वर्धन्ते।
अद्यतेऽत्ति च भूतानि। तस्मादन्नं तदुच्यत इति ।। १ ।। ब्रह्मानंदवल्ली

अशा तऱ्हेने तेज, शक्ती, अन्न यांचा अर्थ ब्रह्माशी निगडित आहे.

३) परब्रह्म हे दिव्य व अमूर्त आहे. ते आंत, बाहेर सर्व ठिकाणी असून त्याला जन्म नाही, मन नाही, प्राण नाही. ते स्वच्छ असून अक्षर ब्रह्मापेक्षाही श्रेष्ठ आहे.

मूलतत्त्व सर्वत्र एकच भरलेले आहे आणि त्याप्रमाणे रचनाही सर्वत्र सारखी आहे. अनेक अणूंचा एक रेणू होतो. अनेक रेणूंची एक पेशी बनते. अनेक पेशींचे शरीर बनते. पेशींच्या नजरेतून बघितले तर कोट्यवधी पेशींचे हे शरीर एक विराट पुरुषच होय. असे कोट्यवधी लोक एकत्र येऊन एक समाजपुरुष होतो. अशा १२० कोटी पुरुषांचा भारत तयार झाला आणि अनेक प्राणी मिळून इहलोक तयार झाला. इहलोक म्हणजे पृथ्वी. पृथ्वीसारखे असंख्य खगोल एकत्र येऊन विश्व तयार झाले. अनेक विश्वे एकत्र येऊन ब्रह्मांड तयार होते व अनेक ब्रह्मांडे एकत्र येऊन परब्रह्म तयार होते.

आपल्या शरीराच्या बाहेर त्या प्रचंडाकडे गेल्यानंतर आपल्याला परमात्मा दिसेल व शरीराच्या आत सूक्ष्माकडे गेल्यास तेथे आत्मारूपी परमात्माच दिसेल.

आपण ज्याला ब्रह्म म्हणतो, जे आपल्याला दिसते व अनुभवाला येते ते ब्रह्म अक्षर म्हणजे विनाशहीन आहे. श्रेष्ठ आहे. परब्रह्म त्या ब्रह्माहून श्रेष्ठ आहे. असे ऋषी अंगिरस मुंडकोपनिषदामध्ये म्हणतात.

आत्मा :

याच ब्रह्माचा अंश जो सजीवांत तसेच मानवी शरीरामध्ये पंच कोशात्मक तऱ्हेने वास्तव्य करतो, त्याला आत्मा किंवा त्या परमतत्त्वाचा एक अंश समजला जातो. हा आत्मा अंशात्मक असला तरी तो पूर्णच असतो, असे ईशावास्य उपनिषद सांगते.

या आत्म्याचे वर्णन मुंडकोपनिषदात असे केले आहे. जो सर्वज्ञ आहे. जो सगळीकडे आहे, ज्याचा महिमा या भूलोकी आहे. तो हा आत्मा दिव्य ब्रह्मपुरात आकाशामध्ये उत्तम रीतीने बसलेला आहे. मनोमय असून प्राण व शरीर याचा नियंता असलेला तो, हृदयाचा आश्रय करून अन्नमय शरीरात राहतो. आनंदरूप व अमृत असून असा जो विलसतो त्याला धीमान लोक विशेष ज्ञानाने म्हणजे ब्रह्मज्ञानाने पूर्णपणे पाहतात.

आत्म्याचे वास्तव्य :

आत्मा शरीराच्या आत 'अंत: शरीरात' असतो, असे वेदांतात सांगितले आहे. अंत:शरीर म्हणजे जे सूक्ष्म शरीर किंवा 'लिंग देह' किंवा 'प्राणमय कोश' ज्याला म्हटले जाते, त्यात हा आत्मा असतो. हा लिंगदेह किंवा सूक्ष्म देह हा तीन कोशात्मक आहे. ज्यात प्राणमय, मनोमय व विज्ञानमय कोश असतात आणि त्यांत आत्मा साक्षी रूपाने वसत असतो. आत्म्यापासूनच प्राण निर्माण होतो. प्राण सूक्ष्म देह व्यापून असतो व त्याच्या आत आत्मा असतो.

हा आत्मा ज्योतिर्मय असतो. ज्योत ही पंचमहाभूतात्मक असते व त्यातून सूक्ष्म शक्तीचा आविष्कार होतो. ज्योत म्हणजे शक्ती असा ही अर्थ समजला जातो. आत्मा ही अशी शक्ती आहे म्हणून तिला ज्योतिर्मय म्हटले जाते. ही ज्योत शुद्ध व पांढरी शुभ्र असते.

अशा या आत्म्याचे दर्शन लाभण्यासाठी एक सुसूत्र तऱ्हेने आयुष्याचा अभ्यास करावा असे उपनिषदकार सांगतात आणि त्या अभ्यासात सत्य, तप, पूर्ण ज्ञान आणि ब्रह्मचर्य यांचा समावेश आहे.

याचबरोबर भारतीय ऋषीमुनींनी विचारांती जीवन कसे जगावे यासाठी जीवनाची आखणी अशी केली आहे. चार आश्रम म्हणजे १) ब्रह्मचर्याश्रम २) गृहस्थाश्रम ३) वानप्रस्थाश्रम ४) संन्यासाश्रम, चार पुरुषार्थ म्हणजे १) धर्म २) अर्थ ३) काम ४) मोक्ष आणि ते अंतिम ध्येय म्हणजे मोक्ष किंवा आत्मसाक्षात्कारासाठी चार उपासनेचे मार्ग सुचवले आहेत ते १) ज्ञानमार्ग २) कर्ममार्ग ३) योगमार्ग व ४) भक्तिमार्ग.

अन्न :

अन्न हा मानवी किंवा सजीवाच्या जीवनाचा अविभाज्य घटक. अन्न हा शब्द अद् या धातूपासून झाला आहे. अद् म्हणजे खाणे. तसेच काही तज्ज्ञांच्या मते अन्न हा शब्द अन् या मूळ धातूपासून झाला आहे. अन् म्हणजे हालचाल व ही हालचाल शक्तीशिवाय होत नाही व शक्ती अन्नाशिवाय येत नाही. हे शक्ती देणारे अन्न या जगातच भरले आहे. पंच महाभूतांपासून वनस्पती बनतात व त्यांपासून शक्ती मिळवतात. म्हणजेच अन्नातही महाभूते आहेत. शाकाहारी जीव वनस्पती खाऊन जगतात म्हणजे पंचमहाभूतांपासूनच शक्ती घेतात. ही शक्ती देणारी पंच महाभूते प्रत्येकात असतात. म्हणून तेजरूपात दिसणारेच ब्रह्म नाही, तर अन्नात असणारी पंचमहाभूतेदेखील ब्रह्मच आहेत, असे ऋषी उपनिषदांत म्हणतात.

भगवद्गीतेमध्ये स्वत: भगवंत सांगत आहेत.

गाम् आविश्य च भूतानि धारयामि अहं ओजसा ।
पुष्णामि च औषधी: सर्वा: सोमो भूत्वा रसात्मक: ।। (गीता १५.१३)

अर्थ - मी पृथ्वीत राहून आपल्या सामर्थ्याने सगळ्या भूतांना धारण करतो. तसेच मीच रस हाच आत्मा असलेला सोम होऊन सगळ्या वनस्पतींचे पोषण करतो.

सर्व जीवांची उत्पत्ती पंचमहाभूतातून होते व त्यांचे धारण पोषण

तेजाने आणि त्यांच्यातील सोमरसाने भगवंताकडूनच होते. रस हाच वनस्पतीचा आत्मा. सोम हा रसात्मक आहे. रस हेच त्याचे कार्यस्थान आहे अशी प्राचीन भारतीय विज्ञानाची धारणा. सोम म्हणजे चंद्र हा वनस्पतींचा राजा समजला जातो. कारण चंद्रप्रकाशाने वनस्पतीची वाढ झाल्याचे शास्त्रीय निरीक्षणात दिसून आले आहे.

या श्लोकात कृष्ण स्वत:ला परमात्मा समजूनच हे अर्जुनास सांगत आहेत. ते स्पष्ट सांगत आहेत की, तेच त्यांच्या तेजाने व वनस्पतीतील रसाने त्यांचे भरण पोषण करतात.

नुसत्या तेजावर म्हणजे अन्न ग्रहण न करता किंवा फक्त पाण्यावर अथवा रससेवनावर काही योगी योगमग्न असल्याचे दाखले मिळतात. म्हणूनच उपनिषदात ब्रह्माला तेजान्न म्हटले आहे, ते सार्थ वाटते.

अन्नाची व्याख्या अशी करता येईल.

''असा पदार्थ (घन, द्रव किंवा वायुरूपात) ज्याला चव व स्वाद असून तो पचनी पडणारा, शरीरात सामावणारा व उपयोगी पडणारा असून योग्य रीतीने, योग्य प्रमाणात घेतल्याने शरीरातील पेशींची झीज भरून व नवीन शक्तिदायी पेशी निर्माण होऊन बल संवर्धनास मदत करतो व ऊर्जा व 'आनंद' निर्माण करतो.

अन्नाची दुसरी एक अशीही व्याख्या केली जाते.

'जे खाल्ले जाते ते अन्न व जे खाते तेही अन्न' येथे विरोधाभास जाणवण्याची शक्यता आहे. खरे तर हे एक अन्नाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. माणूस, वनस्पती अथवा इतर प्राणी खातो-वाढतो-हालचाल इत्यादी करतो व शेवटी मृत्यू पावतो. मृत्यूनंतर पुरला जातो. त्याचा मृत देह दुसऱ्याचे अन्न होतो. ''जीवो जीवस्य जीवनम्'' म्हणजे त्यावर इतर वनस्पती किंवा प्राणी जगतात. याचाच अर्थ जे पंचमहाभूतरूपी अन्न खाल्ले जाते, तीच पंचमहाभूतेदेखील खाणारी होतात. याचाच व्यापकतेने विचार केला तर जे ब्रह्मातून निर्माण होते, तेच परत ब्रह्मात विलीन होते.

म्हणूनच तैत्तिरीय उपनिषदात ऋषी म्हणतात.

अन्नाद् भूतानि जायन्ते । जातान्यन्नेन वर्धन्ते ।
अद्यते अत्ति च भूतानि । तस्मादन्नं तदुच्यत इति ।।

अर्थ : अन्नापासून जन्म पावलेले अन्नामुळेच वाढतात. ते भूतांकडून खाल्ले जाते व ते भूतांना खाते. म्हणून त्याला 'अन्न' म्हणतात.

हा वरील आध्यात्मिक विचार सर्वच संस्कृतीमध्ये असल्याचे जाणवते. म्हणून W. Keera सारखा तत्त्वज्ञ म्हणतो.

"Spiritual nutrition transcends all cultural borders. It is a part of original spiritual teachings in every country in the world, in every faith, all the way back to the ancient Essenes and the wisdom of the Rishis masters of India, regardless of our creed or culture. It was given to all of us as a tool to step in the path of Enlightment" - W. Kacora

अन्नाकडे चार दृष्टिकोनातून बघता येते.

१) **जैविक पोषण** - हे शारीरिक निरोगीपणासाठी व शरीराचे संतुलन राखण्यासाठी आवश्यक असते.

२) **मानसिक पोषण** - अन्न हे भावना, स्वभाव व दुसऱ्याबद्दल आस्था व सहानुभूती या दृष्टीने बघितले जाते. कारण अन्नाचा तसा प्रभाव व्यक्तीवर पडतो.

३) **सामाजिक पोषण** - या विचारांत इतराच्या सहवासांतील आनंददायक अन्नाचे ग्रहण हा सर्व समाजात आढळून येणारा प्रकार आहे. उदा. सस्नेह भोजन, अन्नछत्र, इफ्तार पार्टी इत्यादी यामुळे सामाजिक समन्वय साधला जातो.

४) **आध्यात्मिक पोषण** - या विचारामध्ये अन्नातील दैवी शक्तीची जाणीव ठेवून प्रेमपूर्वक ग्रहण करणे, ज्यामुळे चित्तशुद्धीस मदत मिळते. (आहारशुद्धौ सत्त्वशुद्धिः) येथे फक्त अन्नाच्या आध्यात्मिक

बाजूचा विचार करण्याचा प्रयत्न आहे.

सांप्रतच्या गतिमान व ताणतणावाच्या जीवनशैलीमुळे आपण अन्नाच्या आध्यात्मिक बाजूचा विचार पूर्णपणे दुर्लक्षिला आहे. आता अन्न फक्त 'इंधन' म्हणूनच विचारात घेतले जाते व त्यावरच त्याचे मूल्य ठरवले जाते. केवळ पोटाची खळगी भरणे हाच त्याचा एकमेव उपयोग असून कसे तरी जिवंत राहणे हाच आजच्या जीवनाचा स्थायीभाव झाला आहे. समर्थांनी वर्णन केल्याप्रमाणे आजची स्थिती दिसून येते.

भक्ती न लगे भाव न लगे । देव नलगे आम्हांसी
आम्ही पोटाचे पाईक । आम्हां न लगे आणिक ॥

अन्न पंचक - रामदास

शरीराशिवाय मन आणि सामाजिक आशय असतो, याचा व्यक्तीला विसरच पडला आहे. औद्योगिकीकरणाच्या क्रान्तीनंतर अन्नाच्या प्रक्रियेमध्ये खूप बदल होऊन त्याचे रूपांतर फक्त इंधनात झाल्याचे जाणवते. त्याचे रूपांतर अन्नाच्या पाकिटावर यात किती पोषणमूल्य आहे, याची माहितीही सविस्तर मिळते आणि ज्या तऱ्हेने ते जेवणात घेतले जाते, यावरून त्याचे पोषणमूल्य शरीरात योग्य तऱ्हेने उतरत नाही. एक अधिक तरी होईल किंवा कमी तरी होईल. समतोल साधला जात नाही. तो साधण्यासाठी अन्नाची आध्यात्मिक बाजू विचारात घेतली, तर त्याच्या पोषणक्षमतेचा अधिक चांगला उपयोग होऊ शकेल.

असे हे अन्नाचे आध्यात्मिक पोषणमूल्य अन्न व मानवात असलेल्या जीवाच्या गूढतेसंबंधी असते. अन्नामध्ये जीव असतो, तसाच मानवात, देखील असतो आणि दोघेही पंचमहाभूतांवर अवलंबून असतात. आध्यात्मिक पोषण सजीव वनस्पती व मानव यांच्या अंतरसंबंधाची दखल घेते. या आध्यात्मिक पोषणाच्या मनाच्या व आरोग्याच्या शुद्धतेसाठी फायदा किंवा उपयोग करून घ्यावयाचा असेल, तर आपल्यात जाणीव, रसग्रहण किंवा त्याची योग्यता ओळखणे व प्रेम असणे आवश्यक आहे.

कारण आध्यात्मिक पोषणाचा उद्देशच

१) आपण देहापेक्षा अधिक असून आपल्यात आध्यात्मिक स्त्रोत आहे.

२) अन्न हे देहाचे भरण पोषण करून आपल्यातच असलेल्या स्फुल्लिंगाचे पण भरण पोषण करते.

३) आपला देह पवित्र असून त्याचे पोषण देखील पवित्र आहे.

४) आपल्यातील स्फुल्लिंगाच्या पोषणाची पद्धत आपणास देहाच्याही पुढे घेऊन जाते.

५) आपले अन्नाशी असलेले नाते आपण कसे आहोत व कसे जगतो याची ओळख करून देते.

वरील उद्देशाने जर अन्न ग्रहण करण्याचे यज्ञकर्म आपल्याकडून झाले, तर शरीर व मन जागृत व जाणीवेने भरून जाते व अन्नातील सुप्त दैवी शक्ती आपल्याला प्राप्त होतात. म्हणूनच गीतेमध्ये म्हटले आहे.

देवान् भावयत अनेन ते देवा: भावयन्तु व: ।

परस्परं भावयन्त: श्रेय: परमवाप्स्यथ ।। ११ ।। अध्याय ३ रा.

अर्थ - या यज्ञाने देवांना सांभाळा आणि मान द्या. म्हणजे देव तुम्हांला सांभाळतील. अशा रितीने परस्परांना सांभाळणारे तुम्ही परम कल्याण मिळवाल, असे प्रजापती म्हणतात.

येथे भगवान म्हणत आहेत की, इंद्रियातील देवतांना सांभाळा. इंद्रियांना कसे सांभाळायचे, तर शक्ती पुरवून आणि ही शक्ती येते ती अन्नातून. योग्य आहार आपण घेतल्यास त्यातूनच इंद्रियांना पोषणमूल्य मिळेल व इंद्रियांची कार्यशक्ती वाढेल. कार्यशक्ती वाढली की इंद्रियदेवता प्रसन्न झाली असे समजावे. म्हणून अन्न हे नुसती पोटाची खळगी भरण्याचे साधन नसून तो एक यज्ञ समजावा, म्हणजेच ईश्वराचे स्मरण करून समर्पित भावनेने अन्न ग्रहण करावे. म्हणूनच समर्थ म्हणाले 'उदर भरण नोहे जाणिजे यज्ञकर्म.' येथे हे लक्षांत घेतले पाहिजे की, ब्रह्मामुळे अन्न तयार होते तसेच अन्नामुळेच आध्यात्मिक पोषण होऊन मानवास ब्रह्मप्राप्ती

होते. जेव्हा आपण फक्त शास्त्रीय दृष्टिकोनातून अन्नाचा विचार करता तेव्हा तेथे जाणीवेला जागा रहात नाही. तरी पण जाणीव ही चयापचयाच्या क्रियेमध्ये महत्त्वाची ठरते.

यासाठी भारतीय संस्कृतीमध्ये अन्नाच्या ग्रहणाविषयी काही शिस्त असावी, ज्यायोगे मनाची शांतता टिकून अन्नाचे अधिकतम परिणाम आपल्या बलप्राप्तीत दिसून येतील. यांत अधिक न जाता जेवणा अगोदरच्या ध्यानात व वरील जेवणाअगोदरच्या म्हणण्यात येणाऱ्या श्लोकांचा उल्लेख केला तरी पुरे होईल. कारण अशा पद्धतीने अन्नग्रहण केले तर आपल्या लाळेतील पाचक द्रव्यात २२% वाढ होते, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

मानवी जीवनात अन्नाचे महत्त्व व त्याच्या पूर्णत्वाचा विचार :

१) मानवी जीवनात त्या परम तत्त्वाचा म्हणजे आत्मतत्त्वाचा प्रवेश कसा होतो, याचा विचार वेदांतामध्ये फारच सूक्ष्मरित्या केला गेला आहे. आणि तो अन्नातूनच होतो असे ठामपणे प्रतिपादले आहे. शुक्र हा प्रजोत्पत्तीचा धातू आहे. मानव मेल्यावर त्याच्या जड शरीरातून लिंगदेह दूर जातो. तो आसमंतात फिरत असतो. पर्जन्याने तो पृथ्वीवर पडतो व पृथ्वीतून उत्पन्न होणाऱ्या अन्नात त्याचा प्रवेश होतो. तेथून तो पुरुषाच्या देहात अन्नग्रहण करताना प्रवेश करतो. हा परमतत्त्वाचा अंशात्मक भाग, जो स्वत: पूर्णच असून त्यास आत्मा म्हणून संबोधले जाते. स्त्रीसमागमातून स्त्रीयोनीत उतरतो व गर्भात प्रवेश करतो. गर्भ वाढून नऊ महिन्यांनी जन्म घेतो. जन्मानंतर भरण पोषण होऊन जगतो. नंतर मरण हे आलेच. असे हे जन्म मरणाचे रहाट गाडगे चालू असते. जेव्हा लिंगदेहातील वासनांचा पूर्ण क्षय होऊन आत्मा पूर्णपणे ब्रह्मात विलीन होत नाही, तोपर्यंत त्या आत्म्याला मुक्ती नाही, असे भारतीय अध्यात्म मानते.

येथे विचारात घेण्याचा मुद्दा म्हणजे प्रथमत: ब्रह्मतत्त्वाचा म्हणजेच आत्म्याचा मानवी देहांत प्रवेश हा अन्नामार्गेच होतो. अन्न हे त्या आत्म्याचे

वाहनच समजले जाते. म्हणून अन्नाचे महत्त्व अबाधित आहे.

२) अशा या अन्नाला आपण साधारण मुळीच समजू नये. यासाठी संत ज्ञानेश्वर यांनी अन्नासंबंधी ज्ञानेश्वरीमध्ये असे त्याचे महत्त्व सांगितले आहे.

हे न जाणावे साधारण ।
अन्न ब्रह्मरूप जाण ।
जे जीवन हेतु कारण ।
विश्वा यया ।। ज्ञानेश्वरी ३.१३.३

अर्थ - अन्नाला सामान्य समजू नये. हे प्रत्यक्ष ब्रह्मरूपच जाणावे, कारण हेच या सर्व विश्वाचे जीवनसाधन आहे.

असाच अर्थ समर्थांच्या 'जीवन करी जिवित्वा, अन्न हे पूर्ण ब्रह्म' यात आहे. कारण आपल्या अस्तित्वाचा निर्वाह करणारे किंवा आपले जीवन जगविणारे अन्न हेच पूर्ण ब्रह्म आहे. वरील माउलींच्या ओवीवर हिंदू जागृती संस्था त्यांच्या www.hindujagruti.org या वेबसाईटवरील why is food is called Brahma या लेखात असे भाष्य केले आहे.

"Saint Dnyneshwar says, 'Food itself Brahma'. The whole universe origenates from susstains on and merages into Brahma. Similary, all living beings origenate from, Survive on and merge in to food."

माउली अन्नाला ब्रह्मरूप म्हणते. म्हणजे प्रकृतीतील अन्न हे ब्रह्माची प्रतिकृती असून किंवा ब्रह्माचे कार्य म्हणजे उत्पत्ती - भरभराट - लय ते असून तेच कार्य या विश्वात अन्न करते म्हणून ते पूर्ण ब्रह्मच ठरते. येथे अन्नातच शरीराचा लय होतो म्हणजे स्थूल शरीराचाच फक्त लय होतो. कारण आत्म्यासहित असलेल्या पंचकोशात्मक सूक्ष्म शरीराचे मृत्यूनंतर आसमंतात उत्सर्जन होते व कर्माप्रमाणे पुनर्जन्माच्या प्रतीक्षेत ते राहते. स्थूल शरीराचे विघटन होऊन ते पंचमहाभूतातच विलीन होते.

३) अन्नाचे महत्त्व हिंदू संस्कृतीमध्ये अन्नपूर्णा देवीच्या कथेतून चांगले

स्पष्ट होते. थोडक्यात ती कथा अशी आहे. अन्नपूर्णा देवी या ऐहिक जगातील सर्व भोग्य वस्तूंची देवता. यात अन्न देखील आले. अन्नपूर्णा ही शंकरांची पत्नी पार्वती हिचा अवतार. एकदा शंकर विनोदाने म्हणाले, जग हे माया आहे व अन्न त्यातीलच असल्याने तो भ्रमच आहे. या त्यांच्या विनोदावर अन्नपूर्णा देवीस राग आला व ती गुप्त झाली. त्यामुळे सर्व जगातील जमीन पडीक झाली. अन्नच उगवेना. सगळी भरभराट गेली. लोकांचे अतोनात हाल होऊ लागले. अन्नपूर्णा देवीस दया आली व ती परत काशी येथे अवतरली व तेथेच एक अन्नछत्र घालून तिने अन्नदान सुरू केले. त्याच अन्नछत्रात स्वत: भगवान शंकर वाडगा घेऊन अन्नाची भिक्षा मागण्यास आले व म्हणाले, ''आता मला उमजले की, हे ऐहिक जग देखील त्या ब्रह्मासारखेच आहे व अन्न हा भ्रम आहे याचा विचार सुद्धा करता येणार नाही. म्हणजे ते देखील ब्रह्मच आहे.'' यावरून अन्नाची महती देवादिकांनाही जाणवली होती.

४) अन्नाचा महिमा पुरुष सूक्तातून देखील वर्णिला आहे. अमरत्वाचा स्वामी तो विराट पुरुष हा अन्नामधूनच वाढत असतो अशी कल्पना पुरुष सूक्ताच्या दुसऱ्या मंत्रात मांडली आहे.

पुरुष एवेदं सर्वं यद्भूतं यच्च भव्यम् ।
उतामृतत्वस्येशानो यदन्नेनातिरोहति ॥

अर्थ - हे सर्व वर्तमान जग जे भूतकालातही होते, ते भविष्यात ही असेल. ते ही आणि तो अमरत्वाचा स्वामी (म्हणजेच विराट पुरुष) अन्नामधून वाढत असतो. विकसित होत असतो. हा पुरुष तोच होय.

या मंत्रातील 'यद्भूतं यच्च भव्यम्' यामुळे सर्व पुरुष आहे, जो भूतकाळात होता व भविष्यात ही असेल तसेच 'यदन्नेनातिरोहति' यानेही सर्व पुरुषाचा बोध होतो आणि तो अन्नातूनच वाढत असतो. (Ruling over immortality, he was all (पुरुष) that grows on food) 'यदन्नेनातिरोहति' म्हणजे पुरुष हा अमृतत्वाचा स्वामी आहे व तो अन्नात

जसा आरूढ आहे तसा तो कालावरही आरूढ आहे.

या मंत्रात संपूर्ण जगतालाच पुरुष संबोधिले आहे. यामुळे वैदिकादि दर्शनाचा निर्देश होतो. कालांतराने याचा उपनिषदात 'सर्वं खल्विदं ब्रह्म'। ह्यामध्ये झाला. एक देव किंवा तत्त्व विश्वरूप आहे असे मानले म्हणजे जगाला एका देवाचेच रूप मानता येते.

या पुरुषाला समाजपुरुषदेखील म्हटले जाते. हा समाजपुरुष देखील अन्नातूनच निर्माण होतो. समाजातील सहस्त्र डोळे अथवा पाय हे विराट पुरुषाचेच वर्णन समजले जाते आणि या विश्वातील समिधा म्हणजे अन्नरूपी वनस्पती. जेव्हा सर्वात प्रथम यज्ञ झाला, तेव्हा अन्नदेवाचीच पहिली समिधा पडली असेल असे मानले जाते.

अन्न जरी भोग वस्तू असली तरी अन्नामुळेच समाजाची भरभराट होते. अन्न शेतातून होते. शेती व्यवसायामुळे अधिक अधिक श्रमविभाजन झाले व समाज चार वर्णांचा झाला.

पुरुष सूक्तात देखील अन्नाचे महत्त्व वर्णिले असून जीवनातील समाजाचा संदर्भ असल्याचे जाणवते.

भृगु ऋषींना झालेला साक्षात्कार -

तैत्तिरीय उपनिषदांत भृगुऋषींना त्यांच्या तपाचरणानंतर असे जाणवले की, मानवाच्या अंतरंगात असलेले सत्य स्वरूप आणि सूर्याच्या ठिकाणी असलेले सत्य स्वरूप ही एकच आहेत. हे जो जाणतो, तो या जगताला सोडून पहिल्याने अन्नमय 'आत्मतत्त्वाची' प्राप्ती करतो. नंतर प्राणमय 'आत्मतत्त्व' प्राप्त करतो. त्यानंतर मनोमय 'आत्मतत्त्व' नंतर विज्ञानमय (बुद्धिमय) 'आत्मतत्त्व' आणि अंती आनंदमय 'आत्मतत्त्व' प्राप्त करतो. आणि शेवटी त्यांना जो ब्रह्मसाक्षात्कार झाला आणि त्याच आनंदात त्यांनी अन्नाच्या पूर्णब्रह्माचे वर्णन पुढील सामाचे आनंदगीत गात केले आहे.

हा ३ वु हा ३ वु हा ३ वु । अहमन्नं अहमन्नं अहमन्नं ।

अहमन्नादो ३ हमन्नादो ३ हमन्नादः ।
अहं श्लोककृत् अहं श्लोककृत् अहं श्लोककृत् ।
अहमस्मि प्रथमजा ऋता ३ स्य ।
पूर्वं देवेभ्यो अमृतस्य ना ३ भायि ।
यो मा ददाति स इदेव मा ३ आवाः ।
अहमन्नं अन्नं अदन्तमा ३ आद्मि
अहं विश्वं भुवनं अभ्यभवा ३ म् ।
सुवर्न ज्योतीः य एवं वेद । इत्युपनिषत् ॥

अर्थ - अहाहा ! अहो मीच अन्न, मीच अन्न भक्षक, मीच मंत्रकर्ता असून ऋताच्या अगोदरचा माझा जन्म आहे. मी देवांच्या अगोदरचा असून अमृतत्वाचे स्थान मीच आहे. जो मला अन्न देतो तोच माझे रक्षण करतो. मी अन्नच आहे. जो मला अन्न देत नाही त्याचा मी भक्षक आहे. मी सर्व विश्व व्यापले आहे आणि माझे तेज आदित्याप्रमाणे आहे. ब्रह्मज्ञानी पुरुषाला असे ज्ञान होते. येथे उपनिषद संपले.

भृगूला जेव्हा साक्षात्कार झाला, तेव्हा त्याला विश्वातील प्रत्येक गोष्ट खाल्ली जात आहे, हे दिसले होते. पुढे त्याला दिसले की, विश्वातील प्रत्येक खाह:या जाणाऱ्या गोष्टीत तोच भरलेला आहे. तसेच तो स्वत:ही खाल्ला गेला आहे. म्हणून तो म्हणाला, 'मी अन्नच आहे'.

'जो मला देतो, माझे रक्षण करतो' या वाक्यातील देतो म्हणजे 'जन्म देतो' किंवा 'अन्न देतो' असे दोन्हीही होतात. म्हणजे योगक्षेम चालवणारे देखील अन्नच म्हणजे ब्रह्मच आहे, असा अर्थ निघतो.

शेवटी भृगू म्हणतात, मी अन्न आहे. कारण सर्व अन्नामध्ये मीच भरलेला आहे. तसाच मी सर्व अन्न खाणाऱ्यांना खाणारा आहे. खात खात जे जगतात, त्या सर्वांना मी भक्षण करतो. माती खाऊन वनस्पती जगतात, त्या वनस्पतींना खाणारा मीच परमात्मा आहे. वनस्पती खाऊन शाकाहारी प्राणी जगतात. या प्राण्यांना खाणारा मीच परमात्मा आहे. त्या

मांसाहारी प्राण्यांना खाणारा मीच परमात्मा भक्षण करतो. प्राणी मेल्यावर मातीत मिसळतात. माती म्हणजे पृथ्वी त्यांना खाते. पण पृथ्वीलाही मी भक्षण करतो. पृथ्वी अजून ५-१० अब्ज वर्षांनी नष्ट होईल. त्यावेळी वायूत मिसळेल. तो वायूसुद्धा मी भक्षण करतो. तो वायू काही अब्ज वर्षांनी नष्ट होऊन आकाशात विलीन होईल. वायूला भक्षण करणारे आकाश सुद्धा मी भक्षण करतो. कारण माझ्या पोटातच आकाश वसलेले आहे. असा मी परमात्मा सर्वभक्षक आहे.

मी म्हणजेच देहातील आत्मतत्त्व. मी म्हणजे परमात्मा असा मी संपूर्ण भुवन व्यापून राहिलो आहे.

असे अन्नाच्या पूर्णब्रह्माची कल्पना करताना भृगू ऋषीने सूक्ष्मातून निर्माण होणारे हे विश्व, भरभराट पावून परत सूक्ष्मात कसे जाते व या विश्वाचे एक उत्पत्ति-लय चक्र कसे पूर्ण होते, याचेच विवेचन केल्याचे दिसून येते.

वरील सर्व विवेचनावरून अन्नाचे महत्त्व व त्याला पूर्ण ब्रह्म समर्थांनी का म्हटले आहे, याचा उलगडा होण्यास मदत होईल, असे वाटते.

संदर्भ ग्रंथ -

१) उपनिषदांचे विज्ञाननिष्ठ निरूपण	लेखक डॉ. प. वि. वर्तक
२) गीता विज्ञाननिष्ठ निरूपण	लेखक डॉ. प. वि. वर्तक
३) सार्थ पुरुषसूक्त	महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर प्रकाशन
४) सार्थ ज्ञानेश्वरी	लेखक बा. अ. भिडे
५) उपनिषदांचा अभ्यास	लेखक प्रा. के. वि. बेलसरे
६) तैत्तिरीय उपनिषद	लेखक स्वामी चिन्मयानंद
७) Spiritual Nutrition	www.the living center.com
८) Annapoorna Devi	wikipedia
९) Why Food is called Brahma	www.hindujagruti.org

५

अध्यात्म व विज्ञान

बहुतेक वेळा सुशिक्षित मंडळी किंवा पाश्चात्य विद्या विभूषित यांच्या सान्निध्यात आलेल्या सुशिक्षितांमध्ये, जर कोणी अध्यात्म शब्द उच्चारला किंवा त्यासंबंधी चर्चेची तयारी दर्शविली, तर 'हे काय खूळ याच्या डोक्यात शिरले ?' अशा भावनेने त्याच्याकडे बघितले जाते व त्याची हेटाळणी करण्यापर्यंत मजल जाते. म्हणून अध्यात्म आहे तरी काय ? याचा अर्थ समजून घेण्याचा एक प्रयत्न.

अध्यात्म हे तत्त्वज्ञान आहे, ते एक दर्शन आहे, त्याचबरोबर ते एक शास्त्र असून, त्या तत्त्वप्रणालीला अनुसरून वागताना ती एक वृत्ती बनून जाते, असा ज्ञानी लोकांचा अनुभव आहे.

कोणतेही तत्त्वज्ञान हे समग्र अनुभवाचे दर्शन घेऊन पाहात असते. तत्त्वज्ञान म्हणजे तत्त्वासंबंधीचे ज्ञान. तत् म्हणजे ते, जे काही आहे ते, ते सर्व एकूण एक. या ततूचा ततूपणा म्हणजे तत्त्व. जसे मनुष्याचा मनुष्यपणा म्हणजे मनुष्यत्व. म्हणून मनुष्यातील जे तत्त्व आहे, त्याचे एकूण अस्तित्व काय आहे, त्याचे सार काय, त्याचा अर्थ काय, त्याचे वास्तव स्वरूप काय, त्याचे तात्पर्य काय, अशा तऱ्हेचे प्रश्न जेव्हा मनुष्यातील तत्त्वासंबंधी म्हणजेच आत्मतत्त्वासंबंधी उपस्थित होऊन त्याचे निराकरण करण्याचा प्रयत्न चर्मचक्षूला दिसणाऱ्या दृश्य गोष्टीवरून तसेच ज्ञानचक्षूला इंद्रियातीततेतून येणाऱ्या अनुभवावरून जे ज्ञान सांगितले जाईल, त्याला अध्यात्म ज्ञान किंवा अध्यात्म शास्त्र म्हणता येईल.

व्यावहारिक बुद्धीने पाहण्यापेक्षा सूक्ष्म, शुद्ध व व्यापक झालेल्या बुद्धीने पाहणे सर्व पाहण्यांमध्ये श्रेष्ठच समजले जाते. शुद्ध बुद्धीला सद्‌बुद्धी किंवा प्रतिभा (Intution) असे म्हणतात. या प्रतिभेच्या साह्याने आत्मज्ञान झाल्यावर तर्काने त्याची व्यवस्थित मांडणी करणे याला दर्शन असे म्हणतात. दर्शन या शब्दाने आत्म्याचा साक्षात अनुभव व त्या अनुभवांची तर्कसंगत पद्धतीने मांडणी असे दुहेरी अर्थ सूचित होतात.

तसेच शास्त्र म्हणजे तर्कशुद्ध, सुसूत्र मांडणी केलेली नियमबद्ध, सिद्धांतग्रथित ज्ञानशाखा. ही शास्त्राची व्याख्या आत्मज्ञानाला देखील योग्य रितीने लागू पडते. म्हणून अध्यात्मशास्त्र हे एक असे शास्त्र आहे, जे माणसाला प्रापंचिक दु:खातून वर काढते आणि दु:ख टाळून सात्विक आनंदाने कसे जगावे याचे गुपित सांगते, या शास्त्राचे नाव 'अध्यात्म' असे आहे. वसिष्ठ म्हणतात -

अध्यात्मविद्या विद्यानां प्रधानं तत्कथाश्रयम् ।
शास्त्रं सच्छास्त्रमित्याहुर्मुच्यते तद्विचारणात् ।।

अर्थ - सर्व विद्यांत अध्यात्म विद्या श्रेष्ठ होय. त्या विद्येसंबंधी कथा, चर्चा करणारे शास्त्र तेच सच्छास्त्र समजतात. अशा सच्छास्त्रांच्या परिशीलनाने माणूस मुक्त होतो.

अध्यात्मशास्त्र मनुष्याला जीवनाचे सार्थक कशात आहे व ते कसे साध्य करावे, हे शिकवते. मानवी जीवनाची सफलता निर्वाण पद - मोक्ष मिळवण्यात आहे, अशी भारतीय सनातन धर्माची श्रद्धा आहे.

मोक्ष म्हणजे काय ? वसिष्ठ म्हणतात -

न मोक्षो नभस: पृष्ठे न पाताले न भूतले ।
न देशो मोक्षनामास्ति न कालो नेतरा स्थिति: ।
अहं भ्रान्तिर्हि बंधाय मोक्षो ज्ञानेन तत्क्षय: ।।

अर्थ - मोक्ष काही आकाशात नाही, पाताळात नाही किंवा भूतलावर नाही. मोक्ष नावाचे एखादे स्थळ नाही, काळ नाही किंवा दुसरी

कोणती स्थिती नाही. अहंतेचा भ्रम हा बंधकारक असतो. ज्ञानाने होणारा त्याचा क्षय हाच मोक्ष.

तीन निष्ठा -

पूज्य विनोबांनी अध्यात्माच्या व्याख्येसंबंधी सांगताना तीन निष्ठा आवश्यक आहेत असे प्रतिपादन केले. त्या अशा

१) पहिली निष्ठा अशी की, आमच्यात नैतिक मूल्यांवर श्रद्धा असली पाहिजे. कधी खरे कधी खोटे असे विचार नसले पाहिजेत. मानवी जीवनासंबंधी अध्यात्माचा दृष्टिकोन असाच असायला हवा. जो मूलभूत आधारावर, अपरिवर्तनीय आणि निरपेक्ष असावा.

२) जीवमात्राच्या एकतेवर आणि पवित्रतेवर आमचा विश्वास असला पाहिजे.

३) तिसरी गोष्ट मृत्यूनंतरही जीवनाची अखंडता असते, याचा स्वीकार करायला हवा.

यांव्यतिरिक्त आणखी काही गोष्टी असू शकतात, पण या तीन श्रद्धा आवश्यक आहेत.

(वरील तात्त्विक विवेचनावर आपणाला आजच्या परिस्थितीत अध्यात्म म्हणजे आशावाद, सकारात्मक वृत्ती, मनाची शांती व दुसऱ्याविषयी करुणा असणे म्हणजेच अध्यात्म अशी व्याख्या करावी लागेल.)

अध्यात्माचे ध्येय

अर्थात आत्म्याचे ज्ञान म्हणजे आत्मज्ञान प्राप्त करून आत्म साक्षात्कारी होणे व अंतिमत: जीवन्मुक्ती मिळवणे. (आत्मसाक्षात्कार ही एक अवस्था आहे. ज्यामध्ये सगळ्या कल्पनांचा निरास म्हणजे साक्षात्कार. मन, जग, विषय, व्यवहार, देव, परमार्थ इत्यादी सर्व कल्पना आहेत. कल्पनांचा निरास होतो, तेव्हा आत्मवस्तू दिसते. कल्पनेचा निरास म्हणजे ब्रह्मवस्तूची ओळख. आत्मसाक्षात्कार टप्प्याटप्प्याने होतो

रिद्धी-सिद्धी हा एक टप्पा आहे. त्याच्या पलीकडे साक्षात्कार आहे. आत्मसाक्षात्कारात नाद, बिंदू, कला व ज्योती हे टप्पे आहेत. परमेश्वराचा किंवा आत्म्याचा साक्षात्कार ही एक अवस्था आहे.)

पूज्य विनोबांनी आत्मज्ञानाचे ध्येय काय आहे, हे सांगताना असे सांगितले की, भारतात आत्मज्ञानाचे ध्येय फारच छोटे आहे. माया, मोह, पाप आणि पुण्य असो नसो, जशी परिस्थिती येईल त्यात समाधानी राहणे. त्यांच्या मते हे अर्धवट आत्मज्ञान आहे. खरे आत्मज्ञान प्राप्त झाले की, सर्व जीव एकच आहेत. कारण ते सर्व त्या ब्रह्माचे अंश आहेत, ही भावना प्राप्त होऊन एका जीवास त्रास व दु:ख झाले, तर मलादेखील दु:ख वाटणे ही खरी आत्मज्ञानाची अनुभूती समजावी. योगी अरविंदांनी अध्यात्माच्या एक पाऊल पुढे टाकून अतिमानसयोगदर्शनाचे तत्त्वज्ञान स्वानुभवाने सांगितले व त्यासाठी प्रयत्न केले व ते त्याला पूर्णयोग म्हणत असत.

आत्मज्ञानाची प्राप्ती ही जीवनाची समाप्ती न समजता त्या आत्मज्ञानाच्या योगाने, परमेश्वरदर्शनावर संतुष्ट न राहता परत पृथ्वीवर येऊन मानवाचे महामानवात रूपांतर करणे हे खरे अध्यात्माचे ध्येय असावे. त्यालाच त्यांनी पूर्ण योग (Super Mental Yoga) हे नाव दिले. पृथ्वीतलावर आढळणाऱ्या उत्क्रान्तिप्रक्रियेत जाणीवपूर्वक सहभागी होणे हे पूर्ण योगाचे प्रधान लक्षण आहे. यात पार्थिवाला अतिमानसाचा स्पर्श घडविण्याचा प्रयत्न आहे. मनाचे उन्नयन व रूपांतर अतिमानसांत घडविणे अतिमानसाचे अवतरण भूतलावर घडवून आणणे हे पूर्णयोगप्रणीत कार्य कोणत्याही मार्गाने केले नव्हते. जग ही माया नसून ती परब्रह्माची लीला आहे. तिचे स्वरूप ओळखून तिच्यात सहभागी होणे हाच आनंदप्राप्तीचा मार्ग आहे. निसर्ग किंवा प्रकृती हा आदितत्त्वाचा आविष्कार आहे. निसर्गव्यापारात आढळणारी उत्क्रान्ती म्हणजे आदितत्त्वाचे मूळ रूपाकडे जाणे होय.

आत्मज्ञान्याची लक्षणे :

१) आत्मसाक्षात्कार -

आत्म्याचे प्रत्यक्ष दर्शन होणे हे आत्मज्ञानाचे मुख्य लक्षण आहे. यालाच आत्मसाक्षात्कार होणे म्हटले जाते. सगळ्या कल्पनांचा निरास म्हणे साक्षात्कार. मन, जग, विषय, व्यवहार, देव, परमार्थ, इत्यादी सर्व कल्पना आहेत. कल्पनांचा निरास होतो, तेव्हा आत्मवस्तू दिसते. कल्पनांचा निरास होतो, तेव्हा आत्मसाक्षात्कार टप्प्याटप्प्याने होतो. रिद्धी-सिद्धी हा एक टप्पा आहे. त्याच्या पलीकडे साक्षात्कार आहे. आत्मसाक्षात्कारात नाद, बिंदू, कला व ज्योती हे टप्पे आहत. परमेश्वराचा किंवा आत्म्याचा साक्षात्कार ही एक अवस्था आहे.

ही अवस्था योग, भक्ती, ज्ञान व कर्म या मार्गाने प्राप्त होऊ शकते, असे भारतीय तत्त्वज्ञान सांगते. या चारीपैकी कोणताही एक मार्ग, आपल्या ताकदीनुसार मानव निवडू शकतो व आत्मसाक्षात्काराची प्रचीती घेऊ शकतो. त्या प्रचीतीचे वर्णन सर्व साक्षात्कारी पुरुषांनी, अनिर्वचनीय असते असे केले आहे. हेच तुकोबानी असे सांगितले आहे,

तुझे रूप पाहता देवा । सुख झाले माझ्या जीवा ।
हे तो वाचे बोलवेना । काय सांगों नारायणा ।।

साक्षात्कार झाला, तेव्हा काय झाले व त्यामुळे अष्टसात्विक भाव कसे प्रकटले व आनंद कसा दाटला, तेवढेच सांगता येईल, पण त्या आनंदाचा अनुभव मात्र ज्याचा त्यालाच येईल.

धवळले जगदाकार । अंधार तो निरसला ।
लपो जाता नाही ठाव । प्रगट पाहे पसारा ।।
खरियाचा दिवस आला । वाढी बोला न पुरे ।।
तुका म्हणे जीव साठी । पडिली मिठी धुरेसी ।।

जगाच्या आकाराचा अंधार नाहीसा होऊन सर्वत्र धवल तेज दिसू लागले. हेच ते '**तत् शुभ्रं ज्योतिषां ज्योतिः तद्यत् आत्मविदो विदुः ।**

(मुं. २.२.९) असे वर्णिलेले उपनिषदांतील शुभ्र ज्योतिः आहे. आत्मवेत्त्याच्या अनुभवाला जे तेज येते, त्या तेजासमोर कोणाला लपता येत नाही. सर्व विश्वाचा पसारा तेजोमय होतो व त्यांत नामरूपाचे भेद विलीन होऊन खरे तेवढे उरते. पुष्कळ बोलल्याने ते समजत नाही. कारण ते अनिर्वचनीय आहे. त्या अवस्थेत जीवांची व अंतिम सत्याची मिठी पडते व जीवाचे जीवत्व जाऊन तो तेजोमय होतो आणि मग

आनंदाचे डोही आनंद तरंग। आनंदची अंग आनंदाचे।
काय सांगो जाले कांहीच्या बाही। पुढे चाली नाही आवडीने

अशी अवस्था होते. असे तुकाराम महाराज साक्षात्काराचे वर्णन करताना सांगतात.

ईश्वर तर अव्यक्त म्हटला आहे. मग त्याचे रूप-दर्शन कसे व्हायचे? यावर ब्रह्मसूत्रांनी उत्तर असे दिले आहे. 'अपि च संराधने प्रत्यक्षानुमानाभ्याम् (ब्रह्मसूत्र ३.२.२४)

अर्थ - ध्यान अवस्थेमध्ये अव्यक्त ईश्वराचे दर्शन होऊ शकते, असा श्रुतीचा व स्मृतीचा निर्णय आहे. सूत्राचा दुसरा अर्थ ईश्वरी शब्द ऐकणे, ईश्वरी रूप पाहणे, ईश्वरी स्पर्श अनुभवणे, इत्यादी सगुण साक्षात्कार अनेक भक्तांनी अनुभवले असून (वैयक्तिक) अनुमानाला ते जुळणारे आहेत.

परस्पर विरोधी द्वंद्वे एकत्र नांदू शकतात, असा वेदांताचा विशेष तर्क आहे. याला इंग्रजीत 'डायलेक्टीस' म्हणतात. अशा वैयक्तिक विचारसरणीने जगाविषयीचे ज्ञान कायम राखून आत्म्यात मग्न होऊ शकणारा 'संप्रज्ञात' समाधी साधतो, असे योगशास्त्र म्हणते (योगसूत्र १-१७)

आत्मसाक्षात्कारी व्यक्ती प्रत्यक्ष ईश्वराशी बोलू शकते, हे रामकृष्णांनी दाखवून दिले आहे. असाच अनुभव स्वामी विवेकानंदांना आल्याचे सांगितले जाते. ईश्वर निराकार आहे, असे जरी असले तरी भक्ताच्या कल्पनेतील ईश्वराच्या कल्पनेप्रमाणे त्याला त्याचे दर्शन होते,

असे अनुभवांनी सांगितले जाते. असाच ईश्वराशी म. गांधींचा झालेला संवाद पू. विनोबाजींनी त्यांच्या 'आत्मज्ञान और विज्ञान' या ग्रंथात कथन केला आहे. म. गांधींच्या सत्य बोलण्याबाबत आजपर्यंत कोणीही शंका घेतली नाही. तेव्हा त्यांचे सांगणे ग्राह्य मानायला हरकत नसावी. तसेच पूज्य विनोबा यांनी ही घटना कल्पित म्हणून सांगितली नाही. त्यांनाच महात्मा गांधींनी ईश्वरी आवाजाचे प्रत्यक्ष अनुभव आल्याचे सांगितले. पूज्य विनोबांनी महात्मा गांधींना बरेच छेडल्यावर हा संवाद सांगितला असे नमूद केले आहे. प्रसंग होता खान अब्दुल गफार खानाच्या वेळचा. बापूंना २१ दिवसांचे उपोषण करण्याचा आदेश प्रत्यक्ष त्यांच्या हृदयातून ईश्वरी आवाजाने त्यांना दिला, असे सांगितले. आकृती दिसली नाही, पण बापूंचा संवाद त्या आवाजाशी झाला आणि त्यावरून २१ दिवसांचे उपोषण करण्याचे ठरले, असे त्या ग्रंथात नमूद केले आहे.

२) आत्म्याच्या अस्तित्वाबद्दल पूर्ण संशयरहित बनणे हे एक साधकाचे महत्त्वाचे लक्षण आहे व यासाठी श्रद्धेची नितांत गरज आहे. श्रद्धा 'आत्मा आहे', यावर जशी असू शकते. तशीच 'आत्मा नाही' यावर देखील असू शकते. आत्मा आहे, यावर असणाऱ्यांची श्रद्धा ही लवचिक असते. थोड्याशा संशयाने किंवा बुद्धिभेदाने ती नाहीशी होऊ शकते, असे तज्ज्ञांचे मत आहे. म्हणून ती दृढ असावी, तरच आत्मज्ञानाची प्राप्ती होऊ शकते. बुद्धिप्रामाण्यवादी व्यक्ती हे मान्य करत नाहीत. या श्रद्धेला ते अंधश्रद्धा म्हणून संबोधतात. वास्तविक बुद्धी व श्रद्धा या दोन वेगळ्या गोष्टी असून त्या एकमेकांस पूरक आहेत. बुद्धी ही ज्ञानशक्ती आहे. तर श्रद्धा ही कर्मशक्ती आहे, असे पूज्य विनोबांनी म्हटले आहे. बुद्धी आपल्या विवेकाने एक दिशा दाखवते व त्या दिशेने श्रद्धेने - विश्वासाने कार्य करणे, हे श्रद्धेचे काम आहे. जसे मोटारीमध्ये दोन यंत्रे आहेत. एक दिशादर्शक व दुसरे गतिवर्धक. दोन्हीत काही विरोध नाही, पण दोन्ही मिळूनच मोटार चालू शकते. असेच बुद्धी व श्रद्धेचे आहे.

पण श्रद्धा आंधळी नसावी. जो माणूस शिक्षित आहे, तो बुद्धी व विवेक व त्याचबरोबर तर्काचा वापर करू शकतो व त्याप्रमाणे कोणत्याही गोष्टीचा विचार करू शकतो. विचार करून एखाद्या गोष्टीवर विश्वास ठेवल्यास त्यातील तत्त्वज्ञानातील अधिक सखोल ज्ञान प्राप्त होऊ शकते.

आत्मसाक्षात्कार हा स्वानुभव आहे. पण गांधीजींनी आपल्या आतल्या आवाजाचा अनुभव सांगितल्यापासून आजकाल राजकारणी मंडळी आपल्या आतल्या आवाजाने हे निर्णय घेतल्याचे सांगताना दिसतात. पण त्यांच्या सत्य बोलण्याबाबत लोकांत शंकाच अधिक असतात. ईश्वरी स्वानुभव पूज्य विनोबांना त्यांच्या ध्यान साधनेत आल्याचे 'महागुहेत प्रवेश' या त्यांच्या पुस्तकात नमूद केले आहे. बऱ्याच लोकांचे म्हणणे असे असते की, जेथे बुद्धी चालते तेथे बुद्धी न चालवणे म्हणजेच श्रद्धा. जिथे समोर धूर दिसत आहे, तेथे श्रद्धा काय सांगेल ? तेथे तर बुद्धीची गोष्ट आहे. कारण जेव्हा धूर दिसतो, तेव्हा तिथे अग्नी असणार हे बुद्धी व तर्काने सांगता येते.

तेव्हा साधकांनी देखील केवळ श्रद्धा व कोणी सांगितले म्हणून विश्वास न ठेवता आपल्या बुद्धी व तर्काचा वापर करून संशयरहित श्रद्धा ठेवल्यास कर्मशक्तीस अधिक जोम येतो, असा तज्ज्ञांचा अनुभव आहे.

३) आत्म्याच्या ठिकाणी बुद्धी निश्चल ठेवणे अगत्याचे आहे. कारण त्यामुळेच जीव आनंदमय होतो, असे अध्यात्मशास्त्र सांगते. मानवी मनाला भावनेची बाजू असते. बुद्धीमुळे वस्तूचे ज्ञान होते खरे, पण त्याच्या मनातील भावनांवर त्यांची आवड नावड ठरते. किंबहुना जीवनातील मूल्यांचा उगम माणसाच्या अंतरंगामध्ये असलेल्या भावनांमध्ये सापडतो. भावनेमध्ये समाधान देण्याचे सामर्थ्य आहे. भावनेमध्ये प्रेमाची भावना सर्वोत्तम आहे. प्रत्येक जीवाला प्रेमाची गरज असते. खरे प्रेम न मिळाल्यानेच त्याचे समाधान होत नाही. म्हणूनच योगगुरु श्री श्रीरविशंकर

प्रेमाचाच ध्यास धरायला सांगतात. म्हणून परमार्थ म्हणजे शुद्ध नि:स्वार्थी व निष्काम प्रेम समजावे ('रसो वै स:तैत्तिरीय उपनिषद २ - ७ १) आत्मानंद व प्रेम यामध्ये भेद नाही.

४) कर्तृत्वाचा अभिमान सोडून नि:स्वार्थीपणे म्हणजे निष्कामपणाने जगातील दु:खी व दीन जीवांची सेवा करणे हे परमार्थाचे चौथे लक्षण आहे.

अध्यात्मातील पहिली तीन लक्षणे ही माणसाच्या अंतरंगाशी निगडित असून आत्मानुभवांशी संबंधित आहेत. पण हे चौथे लक्षण त्या व्यक्तीच्या बाह्यरंगाचे दर्शन घडवते. ज्यामध्ये सर्व जीव एकच आहेत व त्यांची सेवा करणे हाच खरा मानव धर्म समजून, कर्तव्य करताना मीपणाचा अहंकार सोडून, प्रवाहपतित कर्म कर्तव्य म्हणून करण्याची युक्ती साधली जाते व अशी युक्ती साधण्यासाठी आध्यात्मिक वृत्तीची वाढ होणे आवश्यक आहे. याचे उदाहरण म्हणून महात्मा गांधी, मदर तेरेसा, कैकाडी महाराज, तुकाराम महाराज यांच्याकडे बघता येईल.

वास्तविक जगात जितके म्हणून धर्म आहेत किंवा पंथ आहेत त्यांमध्ये मानवता हीच केंद्रीभूत आहे. मानवाच्या अभ्युदयासाठीच त्यांची निर्मिती झाली आहे. आजच्या विज्ञानयुगामध्ये व भौतिकवादी जगात श्रद्धा व भोळेपणावर आधारित धर्म न राहता तो विचार व विज्ञान यांवर आधारित धर्म असावा व तो मानवताधर्म म्हणूनच ओळखला जावा, असे पूज्य विनोबांचे म्हणणे होते. स्वामी विवेकानंद देखील मानवतेच्या धर्माचाच पुरस्कार करतात.

भगवद्गीता अशी सेवा करताना स्वधर्म व स्वभाव हे दोन शब्द वापरते. गीता म्हणते की, ज्या काली, ज्या समाज व्यवस्थेत ज्या परिस्थितीत, जी मनोरचना घेऊन आपण जन्मास येतो, त्याला अनुसरून आपले कर्तव्य ठरत असते. अशा रितीने आपल्या वाट्याला आलेले कर्म

अगदी मनापासून केले असता लोकसंग्रह घडतो व ईश्वरप्राप्तीचा मार्ग मोकळा होतो. 'जनसेवा हीच ईश्वरसेवा' हा अनुभव मिळतो व मानसिक शांतता मिळते. कारण आत्मा सर्वांच्या अंतर्यामी असल्याने व सर्वांचा तो एक असल्याने आपण ज्याच्यावर प्रेम करतो, त्याच्यासाठी अहोरात्र प्रयत्न करणे व त्यापासून कशाचीही अपेक्षा न करणे हेच प्रेमाचे व्यक्त स्वरूप आहे. म्हणूनच आत्म्याच्या प्रेमाने अंत:करण निर्वैर बनलेल्या पुरुषाला जगातील रंजल्या गांजलेल्याची व दीन दुबळ्यांची निष्काम सेवा केल्याशिवाय चैनच पडत नाही. म्हणून तुकाराम महाराज म्हणतात.

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टविती उपकारें
भूतांची दया हे भांडवल संतां । आपुली ममता नाहीं देहीं ।
तुका म्हणजे सुख पराविया सुखें । अमृत हे मुखें स्त्रवतसे ॥

इथे हे लक्षात घेतले पाहिजे की, सेवा म्हणजे गरिबांना केवळ अन्नवस्त्र, औषधपाणी, घरदार, इत्यादी देहाला आवश्यक वस्तू पुरविणे नसून त्या सर्वांची वृत्ती ईश्वराकडे म्हणजेच आपल्या हृदयांतील आत्म्याकडे वळेल असा प्रयत्न करणे. हे काम फक्त संतच करू शकतात.

तसे बघितले तर आजकाल समाजकार्य म्हणून अन्नछत्रे घातली जातात. याचा अर्थ ते सर्व आत्मज्ञानी असतात असा नव्हे. पण अशीही आध्यात्मिक पुरुषांची धारणा असते की, जेथे अन्नछत्र घातले जाते त्याच्या जवळपास कोणी तरी आध्यात्मिक, अधिकारी पुरुषांचे वास्तव्य असते.

सांप्रत वैद्यकीय क्षेत्रातील प्रगत अशा चाचण्यांवरून आध्यात्मिक व्यक्तीच्या शरीरांतील अवयवांवर काय परिणाम होतो किंवा त्यात कोणते बदल संभवतात, यावर गेल्या २० - २५ वर्षांपासून पाश्चात्य देशांत याबाबत तपासण्या करून नंतर त्याचे निष्कर्ष काढले आहेत. त्यावरून असे अनुमान काढण्यास वाव आहे की, आध्यात्मिकतेच्या किंवा त्या वृत्तीच्या मानवी जीवनाच्या मानसिक, शारीरिक व सामाजिक आरोग्यावर

सकारात्मक परिणाम होत असतो. हे एक फार आशादायक चिन्ह आहे असे वाटते. कारण प्रगत वैज्ञानिकतेमुळे संहारक शस्त्रांची निर्मिती होत आहे. पण त्याचा विवेकाने कसा उपयोग करायचा, याचा अध्यात्माच्या ज्ञानामुळे उपयोग करून घेण्यास मदत मिळू शकते.

अध्यात्माचे दोष व गैरसमज -

१) सहसा अध्यात्माच्या दोषांबाबत कोणी परखड मत व्यक्त करीत नाही. परंतु विनोबांनी त्यांच्या 'आत्मज्ञान और विज्ञान' या ग्रंथात अगदी ठामपणे नमूद केले आहे की, आमच्या आध्यात्मिक चिंतनात एक दोष राहून गेला आहे आणि असा समज झाला आहे की, आता अध्यात्म परिपूर्ण आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, त्या महापुरुषांचा यात दोष नाही, पण आम्हांस त्यांचे विचार समजण्यात व समजावून सांगण्यात दोष आहे. त्यांच्या मते आमचा समज असा झाला आहे की, आत्मज्ञान पूर्णत्वाला पोहोचले आहे व त्यात काही वृद्धी होण्याची शक्यता नाही आणि येथेच समाप्तीची रेषा मारावी. पण ती एक चूक आहे. जसे विज्ञानाची इतकी प्रगति होऊन देखील वैज्ञानिक म्हणतात की, आमची प्रगती सिंधूतील बिंदूइतकीच झाली आहे. त्याचप्रमाणे अजूनही अध्यात्मामध्ये बरीच प्रगती होण्याची गरज आहे. आणि आज जी अध्यात्मविद्या प्राप्त आहे, ती अंशमात्र आहे, अशी विनोबांची पक्की धारणा आहे.

२) **आत्मसंतुष्टपणा :**

आत्मज्ञान प्राप्त झाले किंवा साधक आत्मज्ञानाच्या प्रगतिपथावर आहे असे जाणवले की, तो आत्मसंतुष्ट होतो व आपल्याच आत्मानंदात मग्न होतो, असे बऱ्याच विचारवंतांचे निरीक्षण आहे. समाजाच्या अभ्युदयात त्यांचा सक्रिय भाग असत नाही. विनोबा म्हणतात की, पूर्वीच्या आत्मज्ञानी लोकांना याची कल्पना होती. म्हणूनच भक्त प्रल्हादाने नृसिंहाला सांगितले की, ''बहुतेक देव और मुनी अपनीही मुक्तीकी कामना करते हैं और विजन अरण्यमें मौनादिका आधार ले मुक्तीका आभास कर लेते हैं,

लेकिन मैं इन दीन जनों छोडकर अकेला मुक्त होना नहीं चाहता.'' असे आत्मज्ञान और विज्ञान या ग्रंथात नमूद केले आहे.

३) कर्मत्यागाची भावना :

आत्मज्ञान प्राप्त झाले की कर्मत्यागाची भावना निर्माण होते. ती व्यक्ती समाजविन्मुख होण्याची शक्यता असते. म्हणूनच ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत यावर विचार मांडून त्यांनी कसे वागावे, याचे योग्य मार्गदर्शन केले आहे. माउली म्हणते,

१) **आम्ही पूर्णकाम होऊनी । जरी आत्मस्थिती राहूनी ।**
तरी प्रजा हे कैसेनि । निस्तरेल ।।

२) **इहीं आमुची वास पहावी । मग वर्तती परी जाणावी ।**
ते लोकस्थिती आघवी । नासिली होईल ।।

३) **म्हणोनि समर्थु जो एथे । आणि लाळी सर्वज्ञते ।**
तेणे सविशेषें कर्मातें । त्यजावें ना ।।

अर्थ - आम्ही पूर्णत्वाला पोचून जर आत्मस्थितीत अकर्तेपणाने राहिलो तर या प्रजेचा निभाव कसा लागेल ? यांनी आमची वागण्याची पद्धत पहावी, आणि मग तीवरून सदाचरणाची पद्धती जाणावी अशी जी आज मितीस समाजसंस्थेची घडी आहे, ती सर्वच बिघडून जाईल की !

म्हणून ज्या सामर्थ्यवान पुरुषाने या जगात सर्वज्ञतेचे पीक गोळा केले आहे, त्याने तर कर्माचा त्याग विशेषकरून करूच नये.

आजही माउलीचा उपदेश प्रभावीपणे अंमलात आणण्याची नितांत गरज भासते. कारण समाज पूर्णपणे गोंधळलेला आहे. प्रयत्न होत नाहीत, असेही म्हणता येणार नाही. कारण आध्यात्मिक केंद्रांची संख्या पूर्वीपेक्षा खूपच वाढली आहे. पण म्हणावा तसा प्रभाव समाज घटकांवर दिसून येत नाही. याला समाज वा आध्यात्मिक व्यक्ती व शासनही तितकेच जबाबदार असल्याचे जाणवते.

समाज स्वार्थी व संशयखोर झाला आहे. आध्यात्मिक केंद्रात

पुंजीवाद अधिक प्रभावी झाला असून खरा आध्यात्मिक अधिकारी विजनवासी झाल्याचे चित्र आहे. जे अध्यात्मकेंद्रात कार्यरत असतात त्यांच्या चरित्र व चारित्र्याबाबत संशयाचे वातावरण असल्याचे जाणवते. तसेच शासनही याबाबत बरेच उदासीन आहे. म्हणूनच श्री. व्यं. केतकरांनी ७५-८० वर्षांपूर्वी आपल्या 'भारतीय समाजशास्त्र' या पुस्तकात परखडपणे लिहून ठेवले आहे की,

"विचार अमलात येण्याची शक्यता असली तरच विचारांची प्रेरणा होते. शासनसत्ता त्या विचारांची काहीच किंमत करणार नाही, असे अनुभवास येऊ लागले म्हणजे विचार प्रदर्शित करणारा अर्थात विचार करणारा व मार्गदर्शन करणारा मूर्ख ठरू लागतो." केतकरांनी पुढे असेही म्हटले आहे की, "देशात परकीय सत्ता असेल अगर बेजबाबदार लोकांच्या हाती सत्ता असेल, तर विचारी वर्ग निरुपयोगी व पराभवाने लज्जित होऊ लागतो आणि देशकल्याणाच्याविषयी आस्था असणाऱ्या वर्गाचे समाजात उन्मूलन होते."

३) ऐहिक जीवन जगताना वैज्ञानिक प्रगतीकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे जगाच्या वैज्ञानिक प्रगतीबरोबर आपली वाटचाल होऊ शकली नाही. आम्ही अध्यात्माच्या नावांखाली त्यासाठी केल्या जाणाऱ्या कर्मकांडाला अधिक महत्त्व देऊन मूळ भूमिकेपासून खूप दूर गेलो. त्यामुळे धड अध्यात्म नाही व विज्ञानही नाही अशी स्थिती निर्माण झाली. आमच्या आध्यात्मिक कुशाग्र बुद्धीचा उपयोगच आम्हांला करून घेता आला नाही, असे काही विचारवंतांचे मत आहे. Morris Kline या अमेरिकन लेखकाने त्याच्या Mathematics - The loss of certanity या पुस्तकात भारतीय गणित तज्ज्ञाच्या बाबत खालील तऱ्हेने लिहून ठेवले आहे.

It is fairly certain that the Hindus did not appreciats the significance of their own contributions. The few ideas they had such as seperate symbols for the numbers from

1 to 9, negative numbers and recognition of 0 as number, were introduced casually with no apparant realisation that they were valuable innovations. The fine ideas which they themselves advanced they commongled with the crudest ideas of the Egyptians and Babylonians. The Arab Historian Al Biruni (973 - 1040) said of Hindus can only compare their mathematical and astronomical literature to a mixture of peral shells and sour dates or Peral with dung. Both kinds of things are equal in their eyes since they can not raise themselves the methods of strictly scientific deductions.

या अलबिरोनी इतिहासकाराच्या मतावरून आम्ही किती आत्मसंतुष्ट ऐहिक व वैज्ञानिक प्रगतीकडे दुर्लक्ष करणारे होतो, याची कल्पना येते.

गैरसमज :

१) वैज्ञानिक प्रगती व २१ व्या शतकातील अध्यात्मासंबंधीचे गैरसमज. जागतिकीकरणाच्या काळात अध्यात्म कालबाह्य झाल्याची व ती फार जुनाट विचारसरणी आहे असे मानले जाते.

२) अध्यात्माचा विचार फक्त वृद्धापकाळी करायचा असतो. त्यासाठी वनात जावे लागते व वैराग्य प्राप्त करून घ्यावे लागते. प्रापंचिक जीवनात त्याची गरज नाही.

३) निरीश्वरवादी, वैज्ञानिक यांच्याकडे आध्यात्मिक वृत्ती नसते व ते आध्यात्मिक असू शकत नाहीत.

४) पाश्चात्य विचारवंत व समाज अध्यात्माबद्दल फारच अनभिज्ञ आहे.

वास्तविक युरोपियन विचारवंत श्रीमती अंडरहील या लेखिकेने आत्मज्ञानी पुरुषाच्या आधारावर दोन प्रकार सांगितले १) निर्गुण व ज्ञानमय २) सगुण व प्रेममय यामध्ये प्रेमाच्या मार्गाने भक्त सगुणाची पूजा करतो व आपले सर्वस्व त्याच्या भगवंताला अर्पण करतो. त्यालाच ती Spiritual

Marrage म्हणजे दिव्य विवाह म्हणते. हा आपल्याकडील मधुराभक्तीत मोडणारा विचार आहे.

तसेच डॉम कथबर्ट बटलर या विचारवंताने ज्ञानी पुरुषांचे वर्णन करताना ज्ञानध्यान प्रधान आणि कर्मध्यान प्रधान असे प्रकार सांगितले. यावरून असे जाणवते की, गीतेने सांगितलेल्या अध्यात्मासाठी ज्ञान, कर्म व भक्ती हा प्रकार पाश्चात्य विचारवंतांच्या विचाराधीन होताच.

५) अध्यात्मसाधनेत कर्मकांड आवश्यक आहे. ते केल्याशिवाय आत्म्याचे दर्शन होऊ शकत नाही. पुढे पुढे त्याचे रूपांतर कर्मकांड म्हणजेच अध्यात्म ही भावना धार्मिक लोकांत रुजून गेल्याचे जाणवते.

अध्यात्म व विज्ञान :

या दोन्ही ज्ञानशाखांचे उद्देश विश्वाचे सत्य काय हे जाणून घेणे आहे. मानव या विश्वाचाच घटक असल्याने आत्म्याचे ज्ञान जाणून घेणे हे देखील विज्ञानाच्या कक्षेत येऊ शकते. दोन्ही शाखांच्या कार्यप्रणाली मध्ये काही मूलभूत फरक आहेत पण ऐहिक जीवन जगताना दोन्ही शाखांचा समन्वय असणे आवश्यक आहे, असे सर्व तज्ज्ञांचे मत आहे.

अ.नं.	अध्यात्म	विज्ञान
१.	अनुभवावर अवलंबून पण तो अनुभव इंद्रियातीत असतो.	अनुभवावर आधारित पण अनुभव इंद्रियाधीन असतो.
२.	इंद्रियाच्या पलीकडे असणाऱ्या सूक्ष्म तत्त्वांचे सर्व अनुभव लक्षात घेऊन, जगाचे स्वरूप ठरवणे व जीवनाचे मूल्य सांगणे.	इंद्रियाला येणारे अनुभवांचे निरीक्षण परीक्षण, वर्गीकरण करणे व त्यांचे नियम शोधून काढणे.
३.	विवेक आणि ज्ञान ही अध्यात्माची रीत आहे.	इंद्रियांनी निरीक्षण व बुद्धीने परीक्षण ही विज्ञानाची रीत.
४.	सूक्ष्माचा शोध घेण्याची लालसा असते	तशी लालसा विज्ञानात नसते.

अ.नं.	अध्यात्म	विज्ञान
५.	अध्यातमामध्ये तत्त्वज्ञान आहे तसेच शास्त्र आहे म्हणजे आत्म्याचे अस्तित्व काय त्याचे वास्तव व त्याचे तात्पर्य काय, तपशिलावरून हे सर्व तत्त्वज्ञानाचे विषय तसेच अनुमान व तर्काच्या जोरावर निष्कर्षाची तऱ्हा ही अध्यात्मशास्त्राची एक बाजू असते.	फक्त शास्त्र जाणवते म्हणजे इंद्रियांच्या स्फुट अनुभवावरून किंवा चाचण्यांच्या त्यामागच्या तत्त्वाची सिद्धी करण्याचा प्रयत्न असतो.
६.	हे 'असे का?' हे तत्त्वज्ञान सांगू शकते.	हे 'कशामुळे' हे विज्ञान सांगू शकते.
७.	पिंडाकडून ब्रह्मांडाकडे जाते.	ब्रह्मांडाकडून पिंडाकडे परीक्षणानुरूप येते.
८.	मन:शांतीचा प्रत्यय येतो	इंद्रियतृप्ती व भौतिक सुखाचा प्रत्यय येतो.

आध्यात्मिक विद्या किंवा आध्यात्मिकतेची आजच्या विज्ञानयुगात गरज आहे का ?

अशीही एक विचारधारा आहे की, आताच्या विज्ञानयुगात आत्मज्ञानातच मग्न न राहता त्याच्या पुढे जाऊन विज्ञानाचाच विचार करायला हवा, त्याशिवाय तरणोपाय नाही. तुमची इच्छा असो वा नसो विज्ञान तुमच्या दारात आहे, ते घरात आल्याशिवाय राहणार नाही. यासंबंधी उपनिषदांच्या विकास परंपरेमध्ये देखील तसाच अर्थ आहे, असे विनोबा म्हणतात. कारण उपनिषदांनी सांगितले की, ''अन्नं ब्रम्हेति व्यजानात्, 'प्राणो ब्रह्मेति व्यजानात्, मनो ब्रह्मेति व्यजानात्,'' यामध्ये एक विकासाची

सुसूत्रता आहे. प्रथम अन्न हेच ब्रह्म होते, नंतर प्राण हेच ब्रह्म झाले आणि त्यानंतर मन हेच ब्रह्म झाले आणि त्याच्याही पुढे विज्ञान हेच ब्रह्म झाले. विज्ञान युगात व्यक्तिगत मनाचा विचार न करता त्यापेक्षा अधिक विचार करण्याची गरज आहे. आता जुने मनाचे विचार सोडून नवीन विज्ञानाच्या मनाची कास धरली पाहिजे, असे विनोबांचे मत आहे. विज्ञान कशाला म्हणायचे, याबद्दल अधिकारी तज्ज्ञांची वेगवेगळी मते आहेत. काही तज्ज्ञांचे मत 'विज्ञान म्हणजे विशेष ज्ञान म्हणजेच आत्मज्ञान', उलट काहींच्या मते विज्ञान म्हणजे सृष्टीबाबत केलेले निरीक्षण, परीक्षण, यातून पुढे आलेले निष्कर्ष व त्यावर आधारित नियम व सिद्धान्त आणि ज्ञान म्हणजे आत्मज्ञान. परंतु ज्ञानदेवांनी 'ज्ञान' या शब्दातच विज्ञान व आत्मज्ञानाचा समावेश केला आहे. 'विज्ञान' म्हणजे 'प्रपंचज्ञान' अशी व्याख्या केली आहे. ते म्हणतात, ''जाणिव जेथे न दिसे । विचार मागुता पाउली निघे । तया नाव ज्ञान । प्रपंचू हे विज्ञान । तेथ सत्यबुद्धी ते अज्ञान ॥''

शब्दकोषीय अर्थानुसार विज्ञान म्हणजे १) शास्त्रीय ज्ञान Science २) ब्रह्मज्ञान ३) तत्त्वज्ञान, व्यवहारात विज्ञानाचा जेव्हा विचार होतो, तेव्हा सृष्टीचे शास्त्रीय पद्धतीने होत असलेले ज्ञान समजले जाते.

खरे पाहता अध्यात्मविद्येमध्ये आत्मज्ञानप्राप्तीसाठी करावी लागणारी साधना व त्यानुसार ऐहिक व प्रापंचिक जीवन जगताना होणारी सकारात्मक वृत्ती ही फार जमेची बाजू समजावी लागेल. याला आध्यात्मिक वृत्ती म्हणता येईल. ज्यामुळे चित्ताच्या शांततेमुळे व बुद्धीच्या प्रगल्भतेमुळे विवेक प्राप्त होतो. याच विवेकाची हल्लीच्या विज्ञानयुगात नितांत गरज आहे. कारण विज्ञानाला मन नाही किंवा भावना नाहीत. समाजाच्या भल्यासाठी चांगले काय, वाईट काय याची जाणीव नसते. ती व्यक्ती त्या विज्ञानाला कसे वापरते यावर त्या विज्ञानाचे भले किंवा बुरे ठरण्याची शक्यता आहे. उदा. अणुशास्त्राचा उपयोग विकासासाठी का सहारासाठी

करायचा, या वापरासाठी विवेकबुद्धी असणे आवश्यक आहे. म्हणून विज्ञानाच्या प्रगतीचा विचार करता आध्यात्मिक वृत्तीचा विचार व विकास होणे अत्यंत गरजेचे आहे.

समन्वयाची गरज :

मानव जीवाला लाभलेले जीवन परिपूर्ण व सफल व्हावे हीच त्याची अंतिम इच्छा असते. त्या परिपूर्णतेसाठी खालील तीन शक्तींची गरज असते.

१) विज्ञान शक्ती

२) आध्यात्मिक शक्ती

३) साहित्याची शक्ती (वाक्शक्ती)

विज्ञान शक्ती :

विज्ञानामध्ये सृष्टीचे रूप बदलण्याची अफाट क्षमता आहे. याचा फायदा अध्यात्माला देखील होईल, अशी चिन्हे आहेत आणि त्यामुळे आध्यात्मिक अनुभूतीची अधिक स्पष्टता समजून येण्याची शक्यता आहे.

माहिती व तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे येणारा वैज्ञानिक भौतिक वाद समाजाच्या धार्मिक कल्पना व जीवनाची मूल्ये अस्थिर करण्यापर्यंत जाईल, अशी एक शंका घेतली जाते. सखोल विचार केल्यास तसे दिसून येणार नाही. कारण भौतिकवाद एक शास्त्र आहे, ज्यांत निसर्गाचा पुरेपूर उपभोग घ्यावा व स्वत:चे ऐहिक सुख भोगावे, अशी धारणा असते. वैज्ञानिक भौतिकवाद हा वेगळा आहे. हा भौतिकवाद असे सांगतो की, आमचे मन व निसर्ग किंवा पृथ्वी यांचे जे एक दुसऱ्याशी संबंध आहेत, त्यांतील मुख्य कोण व गौण कोण, हे समजून घ्यावे.

भारतीय विचारवंत असे मानतात की, सर्व सृष्टी ब्रह्मरूप आहे व माणसाचे मन हे त्याचे प्रतिबिंब असल्यासारखे आहे. विज्ञान, सृष्टीचा शोध घेत घेत मनापर्यंत पोहोचण्याची शक्यता नाकारता येत नाही. शास्त्र या निष्कर्षापर्यंत आल्यासारखे आहे की, मन हे एक Electro-magnetic

wave सारखे आहे. अशाच विद्युत-चुंबकीय लहरी या निसर्गात आहेत. म्हणजे विज्ञान देखील अव्दैत तत्त्वज्ञानाच्या फार जवळ आहे. कारण पिंडी ते ब्रह्मांडी हाच उपनिषदांचा सिद्धान्त आहे.

तसेच विज्ञान विश्वाच्या उत्पत्तीच्या शोधात आहे. गेल्या वर्षी युरोपमध्ये झालेल्या Large Hadron collider या महाप्रयोगात विश्वातल्या प्राथमिक कणांना वस्तुमान कोठून मिळाले, याचा शोध सुरू आहे. ४० वर्षांपूर्वी एक सिद्धान्त मांडण्यात आला. त्याला पिटर हिग्ज सिद्धांत म्हणतात. त्याच्या सिद्धान्ताप्रमाणे हे कण विश्व निर्मितीच्या वेळेस निर्माण झाले असावेत असे मानून त्यांना 'परमेश्वरी कण' (Gods Particle) असेही म्हटले जाते.

यावरून विज्ञान ब्रह्मांडाकडून पिंडाचा शोध घेत आहे. भौतिक विज्ञान विकास व मानवाच्या अंतर्मनाचा चाललेला शोध हा मानवाला उपकारकच ठरणार आहे.

अध्यात्मशक्ती :

आत्मज्ञान प्राप्त करण्यासाठी ज्ञानमार्ग, कर्ममार्ग, भक्तिमार्ग व योगमार्ग याचा अवलंब केला जातो. कोणत्याही मार्गाने जाण्यासाठी व्यक्तिगत साधनशुचितेस अनन्यसाधारण महत्त्व आहे. या साधन-शुचितेमुळे व एक विशिष्ट नियमबद्ध जीवनप्रणाली अंगीकारल्यामुळे माणसाची बुद्धी व मन अधिक सात्त्विक वृत्तिप्रधान होते. ज्यामुळे त्याच्यात सकारात्मक विचार व विवेकाची जागृती होऊन चित्ताची शांतता ठेवण्यास मदत मिळते. हीच विवेकाची मानसिकता विज्ञानाच्या वापरावर अंकुश ठेवण्यासाठी महत्त्वाची आहे. विवेक नसला की, अनिर्बंध निर्णय माणूस घेऊ शकतो व विज्ञान विकासाऐवजी संहारासाठी उपयोगात आणू शकतो. म्हणून अध्यात्माची गरज आहे.

आध्यात्मिक शक्तीमध्ये मानवी जीवन पार बदलून टाकण्याची क्षमता आहे. उदाहरण: अवतारी पुरुषांचे पृथ्वीवर अवतरण. येशू ख्रिस्त,

मोहंमद पैगंबर, तुकाराम, रामदास इत्यादी आध्यात्मिक व्यक्तींमुळे समाजात खूप बदल होऊन गेले.

साहित्याची शक्ती :

मानवी जीवनाला किंबहुना सर्व सृष्टीला परिपूर्णता देणारी साहित्य एक शक्ती आहे. वाल्मीकी, व्यास, दांते, होमर, शेक्सपियर, रवींद्रनाथ, ज्ञानेश्वर, तुकाराम इत्यादी मंडळींनी मानवाला अशी गोष्ट दिली की त्यांचे जीवन समृद्ध झाले. समाजाला जेव्हा जेव्हा ज्याची गरज होती, तेव्हा तेव्हा त्यांनी तिची पूर्तता केली.

साहित्याला, वाक्शक्ती पण म्हटले जाते. वाक् याचा अर्थ आवाज, शब्द, वाणी असा आहे. म्हणून तर श्री गणेशाला 'त्वं वाङ्मय' म्हणजे तू वाणीरूप आहेस असे म्हटले जाते.

विनोबा म्हणतात, विज्ञानाने जीवनाचे स्थूल रूप बदलते. परंतु त्याचा मनावर परिणाम होत नाही. वाणी विज्ञानाच्याही पुढे जाऊन हृदयावर परिणाम करते. त्यानंतर आत्मज्ञान त्यांत प्रकाश टाकते आणि विज्ञान बाहेरून प्रकाशमान करते. अशा तऱ्हेने वाणी आत्मज्ञान व विज्ञान यांत पुलाचे काम करते व मानवी जीवन समृद्ध होते.

वाणीची ही शक्ती फार प्रभावी आहे. ऋग्वेदात म्हटले आहे.

''सक्तुमिव तितउना पुनन्तो यत्र धीरा मनसा वाचमक्रत।''

अर्थ - जेव्हा धान्य चाळले जाते, तेव्हा ठोस बी घेतले जाते व वरचे टरफल कचरा इत्यादी फेकून दिला जातो. तसेच वाणीची समाजात छानबिन होते. ज्ञानी पुरुष मन:पूर्वक वाणीची छानबिन करून उत्तम, पावन, पवित्र, शब्द शोधून समाजाच्या उन्नतीस हातभार लावतात.

एकंदरीत बघता मानवाच्या परिपूर्ण विकासासाठी या तिन्ही शक्तींच्या समन्वयाची भूमिका मानवाला घेणे भाग आहे.

६

सहनशक्ती व सहिष्णुता

ज्येष्ठांच्या बैठकीत चालू सामाजिक व राजकीय घडामोडींवर चर्चा चालू असताना दोन टोकांची मते ऐकायला मिळाली.

१) आज व्यक्ती किंवा समाज यांची सहनशक्ती संपली तरी आहे किंवा तिने अगदीच नीचतम पातळी गाठली आहे.

२) काही समाज किंवा राष्ट्रांचा सहनशक्तीचा अंत बघण्यात येत आहे.

या दोन्ही मतांवरून जाणवते ते म्हणजे मानवी जीवनात सहनशक्तीची गरज आहे. पण या दोन्ही टोकांच्या मतांमुळे सहनशक्तीचा खोलांत जाऊन विचार करण्याचा एक प्रयत्न.

सहनशक्तीचे शब्दकोशातील अर्थ व व्यवहारी जीवनात वेळोवेळी बदलत जाणारे अर्थ व त्यातून निघणारे काही निष्कर्ष खालीलप्रमाणे -

अ) सहनशक्ती - सोसण्याचे सामर्थ्य किंवा सोशिकता (Endurance Tolerance) सहिष्णुता - सोशिकपणा, सहनशीलता (Patience Tolerance)

ब) व्यवहारी जीवनात हीच सहनशीलता संयमाच्या आधारे तडजोडीमध्ये रूपांतरित होते. व्यक्तिगत जीवनात हीच सहनशीलता यशापशाची वाट पहाण्यात रूपांतरित होते. व्यक्तिगत जीवनांत सोशिकता दुःख व वेदना सहन करण्याच्या कामी येते. त्याचबरोबर आपल्या मनाविरुद्ध गोष्ट होत असताना तिला मान्यता देण्यात होते. म्हणून पाश्चात्य तज्ज्ञांनी

Tolerance or Toleration is the practice of permitting a thing of which one disaproves, such as social ethics, sexual and religions practise अशी व्याख्या केली आहे.

क) पारमार्थिक जीवनात सहनशीलता ही साधकाच्या साधनेतील षट्संपत्तीचा एक महत्त्वाचा भाग आहे. म्हणून शंकराचार्यांनी म्हटले आहे -

शमोदमोपरमस्तितिक्षा श्रद्धा समाधानं चेति / अर्थ-शम, दम, उपरम (उपरती), तितिक्षा (सहनशीलता), श्रद्धा आणि समाधान या सहा गुणांनी साधक संपन्न झाला म्हणजे त्याच्या आंतरिक आध्यात्मिक व्यक्तित्वाचा विकास होतो. तितिक्षा ही मनाची अशी एक धारणा आहे की, जिच्यामुळे शीत-उष्ण, सुख-दु:ख इत्यादी परस्परविरोधी द्वंद्वांचा जो अनुभव, जो आयुष्यात नेहमीच अपरिहार्य असतो, तो सहन करण्याची सहनशीलता. आयुष्यातील हे तरंग कधी समाधानकारक किंवा असमाधानकारक असतात व आहे तसे स्वीकारले तर त्याने 'तितिक्षा' हा गुण आत्मसात केला आहे, असे समजावे.

मानवी जीवनात सहनशक्तीची व्याप्ती खूप मोठी आहे. किंबहुना सर्व जीवनच सहनशक्तीच्या आधारावर उभे असते. याच सहनशक्तीच्या आधारावर माणसांतील दया, क्षमा, शांतीसारख्या सत्वगुणांचा विकास होत असतो. म्हणून ज्ञानेश्वर माउली या गुणांना आधारभूत मानते.

जाणो जगीं आप वोलें । तें तुझिया वोला सुरस जालें ।
तुझेनि क्षमत्व आलें । पृथ्वीयेसी ।। - ज्ञानेश्वरी १४ : ७

अर्थ - आमच्या बुद्धीला इतके कळते की, ज्याला जगात आप (पाणी) म्हणतात, ते तुमच्या द्रवानेच ओले व मधुर झाले. पृथ्वीला (सर्व जीवजंतूंना आधार देण्याची सहनशक्ती) क्षमा गुणाची देणगी तुमच्यामुळेच मिळाली आहे.

याचाच व्यवहारात असाही अर्थ होऊ शकतो की, जसे पाण्यामुळे

मानवी जीवन समृद्ध होते. शास्त्रीयदृष्ट्या शरीरातील पेशीदेखील पाण्यामुळेच जिवंत राहू शकतात.तद्वतच सहनशक्तीमुळेच प्रापंचिक किंवा पारमार्थिक जीवनाची समृद्धी होते. शेवटी प्रपंच किंवा प्रापंचिक जीवन म्हणजे तरी काय ? तर पाच धडपडीने युक्त असे जग. (जननापासून गमनापर्यंत म्हणजे मरेपर्यंत) व या पाच धडपडी म्हणजे १) जीवाची धडपड, २) जगण्याची धडपड, २) खाण्या-पिण्याची धडपड, ४) सुख मिळविण्याची धडपड व ५) प्रजोत्पत्तीची धडपड. अशा या धडपडींतून शांतता व स्वस्थता मिळण्यासाठी सहनशक्तीची नितांत गरज भासते.

बौद्ध दर्शनात तर जीवनाच्या दुःखमयतेवर पराकाष्ठेचा भर दिला आहे. कारण त्यांचे "सर्वं दुःखं" हे जीवनातील सूत्रच आहे. त्यांचा हा दुःखवाद आरंभिक आहे. अंतिम नाही. कारण दुःखाच्या उपशमाचे मार्ग त्यांनी सांगितले आहेत. त्यांत सहनशीलता महत्त्वाची मानली जाते. एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे, ती म्हणजे बौद्ध दर्शनात दुःखाकडे पाहण्याची दृष्टी उदात्तपणाची आहे. दुःख हे खणखणीत सत्य आहे व त्याची उपेक्षा करून चालणार नाही. तर सहनशीलतेने वागून त्याकडे गंभीरपणे पाहण्यास शिकावे.

सहनशक्ती हा मनाचा स्वभाव गुणधर्म. भारतीय विचारवंतांनी मानवी स्वभाववैशिष्ट्यांची १) सत्व, २) रज व ३) तम या तीन वृत्तींमध्ये विभागणी केली आहे. मूळ बीजात या तिन्ही गुणांचे अस्तित्व असते. मेंदूची जशी जशी वाढ होत जाईल, त्याप्रमाणे कर्मसिद्धांतानुसार, आनुवंशिकतेनुसार व संस्कार व सत्संगाच्या प्रक्षेपणाने, या तिन्ही स्वभावगुणांचे प्रकटीकरण होते व त्या व्यक्तीची गुणानुसार समाजास ओळख होते. सहनशीलता हा सत्त्ववृत्तीचा गुणधर्म मानला तो मानवी मनात जन्मतःच अंतर्भूत असतो. या तिन्ही गुणांची लक्षणे व्यवहारात विविध तऱ्हेने प्रदर्शित होतात व ती एकमेकांत इतकी गुंतलेली असतात की, त्यांच्या मिश्रित स्थितीला संनिपातवृत्ती म्हणतात. याचा परिणाम

असा होतो की, सामान्य मनुष्यामध्ये कधी सत्वाचे प्राबल्य आढळले तरी त्याच्या जीवनात तिन्ही गुणांचे प्रतिबिंब कमी जास्त प्रमाणांत आढळते. एकनाथ महाराजांनी याला बाईच्या डोक्यावरील केसांच्या गुंतेची उपमा दिली आहे. कारण प्रत्येक गुणाचे अनंत प्रकार आहेत, त्यांच्यांत जीव एकदा अडकला की, त्याला त्याचा उलगडा करता येत नाही. जे भाग्यवान जीव असतात, त्यांना सद्‌गुरुरूपी आई भेटते व विवेक वैराग्याची तेल फणी घेऊन त्या जीवाच्या त्रिगुणांची सोडवणूक करते. त्रिगुणाने जशी माणसाच्या वृत्तीची कल्पना येऊ शकते, त्याचप्रमाणे भारतीय विचारवंतांनी माणसाच्या कर्मावरून त्याच्या व्यक्तिमत्त्वाची कर्म व वृत्तींच्या आधारे चार प्रकारांत विभागणी केली आहे. जसे १) ज्ञानमार्गी, २) कर्ममार्गी, ३) भक्तिमार्गी व ४) राजयोगमार्गी.

सहनशीलता मनाचा गुणधर्म जरी असला तरी मन हे एकटे कधीच असत नाही. कारण मनाबरोबरच बुद्धी, चित्त व अहंकार यांची संलग्नता असते. डोक्यावर जसा त्रिगुणांचा गुंता असतो, तशी या चारांची मेंदूत सरमिसळ आहे व एकमेकांचे गुण एकमेकांवर अवलंबून असतात. भारतीय विचारप्रणाली असे मानते की, पंचमहाभूतांच्या म्हणजे आकाश, वायू, अग्नी, आप (जल) व पृथ्वी यांच्या एकत्रित सात्विकांशापासून मन, बुद्धी, चित्त व अहंकार या घटकांनी तयार झालेले अंत:करण (अंतरमन) उत्पन्न झाले. रूढार्थाने या अंत:करणास 'मन' म्हणूनच संबोधले जाते. अंत:करण अथवा मन हे विचारांचे बनलेले आहे आणि या विचारांचे चार प्रकार आहेत. ते त्यांच्या स्वरूपानुसार किंवा कार्यावरून ठरविले आहेत. मनाचा स्थायीभाव अनिश्चितता किंवा संशय होय. बुद्धीचा स्थायीभाव निर्णय शक्ती. चित्ताचा स्थायीभाव चिंतन करण्याचा, विचार करण्याचा किंवा स्मरण ठेवण्याचा व अहंकाराचा स्थायीभाव 'मी' कर्ता आहे, ही जाणीव.

म्हणूनच व्यवहारात सहनशीलता या मनाच्या गुणावर बुद्धीचा म्हणजे

निर्णयशक्तीचा किंवा विवेकाचा अंकुश असतो. जेव्हा या चार घटकांचे संतुलन बिघडते, तेव्हा विकृत व विपरीत स्वभाव अनुभवास येतात. याचेच अनुभव आज समाजात जाणवत असलेल्या सहनशीलतेच्या नीचतम पातळीत दिसून येत आहेत, असे जाणवते.

जीवन जगण्यासाठी सहनशक्तीची गरज आहे का ?

माणसाला जिवंत राहण्यासाठी जशी अन्न, वस्त्र व निवारा यांची गरज आहे, तशीच ऐहिक किंवा पारमार्थिक जीवनासाठी व्यक्ती, समाज व राष्ट्रांनादेखील सहनशक्ती व सहिष्णुतेची गरज आहे.

मागे ज्ञानेश्वर माउलींच्या ओवीमध्ये सहनशीलताच विश्वाच्या आधारास कारणीभूत आहे असे म्हटले आहे व तो पारमार्थिक विचार वाटण्याची शक्यता आहे. पण तोच विचार व तेच तत्त्व व्यवहारी जीवनात व्यक्ती व समाज यांच्या अभ्युदयास लागू पडते. सांप्रत काळातील स्पर्धात्मक जीवनात त्याची अधिक जाणीव हाते. मनोवैज्ञानिकदृष्ट्या देखील माउलींचेच तत्त्व माणसाच्या विकासास लागू पडते. प्रख्यात मानसोपचार तज्ज्ञ Myers Briggs यांचा संदेश Steven Reiff या प्राध्यापकाने त्याच्या New Way about thinking people या लेखात असा नमूद केला आहे.

"We are very different from each other in terms of our traits, values and perceptions of the World. The differences are so great that we often misunderstand each other, which leads to unnecessary conflicts and other problems. We need to see the World more through eyes of others to appreciate why they do what they do. We need to stop confusing individualy for disorder. The solution is Tolerance."

सोशिकता किंवा सहनशक्ती जसा व्यक्तीव्यक्तींतील संघर्ष टाळू शकते, तसेच व्यक्तिगत जीवनातील जगण्यासाठीच्या संघर्षाला यशस्वी सामोरे जाण्यास मदत करते. पू. रामकृष्ण परमहंस त्यांच्या शिष्यांना

उपदेश करताना सांगत "लोहाराकडील ऐरणीच्या स्वभावाचे अनुकरण करा. दिवसभरात लोहार त्यावर हातोड्याने असंख्य वेळा घाव घालीत असतो, पण ती ऐरण तशीच अविचल, स्थिर व शांत असते. जग कदाचित मधून मधून प्रहार करील पण त्याला घाबरू नका. त्या ऐरणीप्रमाणे ते प्रहार सोसा. सर्वशक्तिमान परमेश्वर हा दयाळू-कृपाळू आहे. हा आपला विश्वास दृढ धरून ठेवा. संत तुकारामांनी देखील संतांबाबत असेच म्हटले आहे. "तुका म्हणे तोचि संत । सोसी जगाचे आघात". त्याचबरोबर तुकोबांनी लोकांना संकटकाळी सहनशीलतेने वागण्याचाच उपदेश केला आहे. ते म्हणत,

आलिया भोगासी असावे सादर ।
देवावरी भार घालू नये ।
मागतो कृपासिंधू निवारी साकडे ।
येर ते बापुडे काय रंक ।

सहनशक्तीची वाढ :

सहनशक्ती किंवा सहिष्णुता मानवी मनांत उपजतच बीज रूपात असते, पण तिचे संवर्धन करण्यासाठी बाह्य संस्कारांची गरज नेहमीच भासत असते. त्यांत खालील घटकांचा समावेश असू शकतो.

संस्कार व संस्कृती :

प्रत्येक समाजसमूहाच्या वाढीबरोबर त्यांच्या अभ्युदयासाठी काही मूल्ये व जीवननिष्ठा तयार होत असतात व त्या केंद्रस्थानी ठेवूनच संस्कारांची प्रक्रिया तयार होत असते. भारतीय संस्कृती ही ईश्वराधिष्ठित असून या संस्कृतीची जीवननिष्ठा त्यागाची आहे. उपनिषत्कालापासून या संस्कृतीने जगाला समज दिली आहे की, "न प्रजया न धनेन त्यागेनैके अमृतत्वमानशुः". संततीने नव्हे, धनाने नव्हे, केवळ त्यागानेच अमृतत्व प्राप्त होते. मानववंशामागून मानववंशाने हे स्वीकारले आणि त्यांनी वासनांच्या पातळीवर राहूनच जगाचे कोडे सोडवण्याचा प्रयत्न केला.

त्यागाबरोबरच सहनशीलता अहिंसा, दया, क्षमा व शांती यांचा पुरस्कार या संस्कृतीने केला. ही विचारसरणी आचारामध्ये आणण्यासाठी, मानवी मनाच्या तमोगुणाचे संस्काराने, सत्संगाने निर्मूलन करून रज व सत्व गुणांनी मन संस्कारित करण्याचा प्रयत्न सर्वच संतांनी व विचारवंतांनी केला. याच संदर्भात स्वामी विवेकानंदांनी एका वास्तवतेने व मानवीसमाज मनाच्या आकलनाने जो विचार त्यांच्या शिष्यगणासमोर मांडला तो असा. त्यांनी त्यांच्या शिष्यांना सांगितले की, 'समाजातील १६ आण्यांपैकी फक्त १ आणा लोक हे सत्ववृत्तीचे असतात. बाकी १५ आणे तामसवृत्तीचे असतात. या १५ आणे लोकांना आपणास रजोवृत्तीकडे वळवायचे आहे. पुढे ते सत्ववृत्तीकडे वळतील किंवा तामसी तरी राहणार नाहीत.' केवढा वास्तव विचार व समाजाची तळमळ.

भारतीय संस्कृती याच सहनशीलतेबरोबर दुसऱ्याच्या मनाच्या स्थितीचे अवलोकन करण्यास शिकवते म्हणजे Sympathy बरोबरच Empathy याची शिकवणूक देते. जगात सर्व धर्मांनी ताओवादी कन्फुशसचे अनुयायी, बौद्ध, हिंदु, यहुदी, मुसलमान, ख्रिस्ती, झरतुष्ट्रांचे शिष्य या सर्वांनी जवळ जवळ सारख्याच शब्दांत ''इतरांनी तुमच्याशी जसे वागावे असे तुम्हांला वाटते, तसे तुम्ही इतरांशी वागा.'' "Do unto others as you wish to be done by" या 'सुवर्ण नियमाचा' अपूर्व नीतीचा प्रचार केला होता. परंतु फक्त हिंदूंनीच याची उपपत्ती दिली आहे. असे आपण का वागावे ह्याचे कारण स्पष्ट करून सांगितले आहे. कारण त्यांना हे कारण समजले होते. माणसाने इतरांवर प्रेम केले पाहिजे, कारण ते इतर म्हणजे वस्तुत: तो स्वत:च होय. अस्तित्वात आहे फक्त एक वस्तू, तो एकमेवाद्वितीय आत्मा.

जगात उदयास आलेल्या समस्त थोर थोर धर्माचार्यांपैकी फक्त लाऊत्से, बुद्ध आणि येशू ख्रिस्त यांनीच वर उल्लेखलेल्या 'सुवर्ण नियमांच्या' पलीकडे जाऊन उपदेश केला की, ''आपल्या शत्रूचेदेखील

भले करा.'' ''जे तुमचा द्वेष करतात, तुमची घृणा करतात, त्यांच्यावर देखील प्रेम करा.''

याच विचारसरणीवर भारतीय विचारवंतांनी जीवन जगण्याची चार आश्रमांत विभागणी केली व त्यांतील ब्रह्मचर्याश्रमामध्ये झालेले संस्कार पुढील तिन्ही आश्रमांत वास्तवतेत उतरवण्याचा उपदेश केला. आज ब्रह्मचर्याश्रमातील संस्कारांची जागा शाळा व कॉलेज यांनी घेतली आहे. काही तज्ज्ञांच्या मते माणूस संस्कृतीच्या बुरख्याखाली नागडा असून पशू सारखाच आहे व त्याच्या वृत्तीदेखील तशाच. मग सहनशीलता तरी कोठची. पण याच पशुवृत्तीचे माणुसकीमध्ये रूपांतर करण्यासाठी भारतीय संस्कृती तकलुपी नसून बरीच घट्ट आहे. याचे प्रत्यंतर व्यवहारात दिसून येते. कदाचित ती नको तितकी भिनली आहे, असे म्हणण्याची पाळी येते.

सत्संग :

सहनशीलतेच्या संवर्धनासाठी संतसंगति किंवा सज्जनांचा सहवास हा महत्त्वाचा समजला जातो. समाजशास्त्रानुसार माणूस हा समूहाने राहात आलेला आहे व तो सहजीवनाचा भोक्ता आहे. याच सहजीवनाचा परिणाम व्यक्तिविकासास मदत करतो. त्याच्या सहवासातील मित्रांवरून त्या व्यक्तीची समाजात ओळख निर्माण होते. म्हणून म्हटले आहे की, Man is known by his company which he keeps आणि ही प्रक्रिया बालवयापासून होते. स्वभावातील दोषात्मक वृत्तींचे सकारात्मक विचारांत रूपांतर करण्यास गुरूंचा उपदेश व संतांची संगती महत्वाच्या मानल्या जातात. म्हणून तुकोबांनी म्हटले आहे,

चंदनाचे संगे वृक्ष बिघडले ।
जे जे बिघडले ते चंदनचि झाले ।।
परिसाचे संगे लोखंड बिघडले ।
जे जे बिघडले ते सुवर्णचि झाले ।।

अशा या संत संगतीची महती जाणून त्यांनी ईश्वराकडे तशीच मागणी केली.

हेचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ॥
गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ॥
न लगे मुक्ती धनसंपदा । संत संग देई सदा ॥
तुका म्हणे गर्भवासी । सुखें घालावें आम्हासी ॥

सोशिकता व दुर्बलता :

वास्तविक सहनशक्ती किंवा सहिष्णुता हा प्रगत मानवाचा उच्चतम गुण असून त्यापासूनच पुढे दया, क्षमा, शांती व अहिंसा हे गुण वर्धित होतात. पण बऱ्याच वेळा व्यवहारात सोशिकता हे दुबळेपणाचे लक्षण समजले जाऊ शकते. हे व्यक्तिगत पातळीवर काही अंशी खरे वाटण्यासारखे देखील आहे. कारण जेव्हा व्यक्ती असहाय अथवा शारीरिकरित्या दुर्बल असते, किंवा गुलाम म्हणून मिळणारी अमानवी वागणूक यांमुळे त्या व्यक्तीला शारीरिक किंवा मानसिक त्रास व्यवहारातील 'बळी तो कान पिळी' या म्हणीप्रमाणे सहन करावा लागतो. ही असहायतेतून केलेली कृती असते. तिचेच सहनशीलतेच्या नावाने संपादन केले जाते. म्हणजे असहायतेलाच सहनशीलता म्हणण्याचा प्रघात दिसून येतो. असे चित्र एकत्र कौटुंबिक पातळीवर बऱ्याच वेळा दिसून येत असे. कुटुंबातील दुर्बल घटकास असा त्रास व्यक्तिगत पातळीवर सहन करावा लागत असे. अशा सहनशीलतेचा एक धोका पण असतो. कारण सहन करण्याबरोबरच त्या व्यक्तीच्या मनात क्रोधाचे बीज पेरले जाते व ते संग्रहित होत जाते. प्रत्येकाच्या सहनशीलतेची एक मर्यादा असते. (त्याचे मोजमाप करता येत नाही) ती संपली की, संग्रहित क्रोधाचे स्फोटात रूपांतर होऊ शकते व विवेक नष्ट होऊन आत्मनाशापासून ते इतरांचा नाश करण्यापर्यंत मजल जाऊ शकते.

अशीच असहायता सामूहिक पातळीवर जाणवू लागल्यास त्याचे

स्वरूप वेगळेपणाने समाजासमोर येऊ शकते. सर्व समूह एकत्रित येऊन विवेक शाबूत ठेवून असहकार किंवा अहिंसक सत्याग्रहाच्या अस्त्राचा उपयोग करू शकतो. म. गांधींनी दाखवून दिलेल्या निश:स्त्र संघर्षाचा मार्ग जीवितहानी न होता अमलात आणू शकतो.

काही तज्ज्ञांच्या मते सहनशक्ती ही शारीरिक शक्तीचे अधिक विस्तारित रुप आहे. कारण यामध्ये शारीरिक क्षमतेबरोबर मनाच्या शक्तीचा व विवेकाचा भाग अधिक असतो. म्हणून ही शक्ती दुर्बलता न समजता शारीरिक शक्तीपेक्षा मोठी समजली जावी. ती आपल्यातील आत्मबल व ईश्वरशक्तीच असते. अशी सहनशीलता भारतीय संस्कृतीमध्ये मुरलेली आहे. त्यामुळेच सत्याग्रह यशस्वी झालेले आहेत. सहनशक्ती व्यक्तिगत किंवा सामूहिक सहनशीलता बलवानाला मित्रामध्ये रूपांतरित करू शकते. म. गांधींनी त्यांच्या स्वत:च्या अनुभवावरून सांगितले आहे. ते म्हणतात, ''माझ्या इच्छेपुढे माझ्या पत्नीने मान वाकवावी, असा प्रयत्न मी करीत असताना तिच्याकडून मी अहिंसेचा धडा शिकलो. एका बाजूला माझ्या इच्छेला तिने दृढपणे केलेला प्रतिकार आणि दुसऱ्या बाजूला तिला नाहक सोसावे लागणारे मूक कष्ट यांमुळे अखेर माझी मलाच लाज वाटू लागली आणि तिच्यावर अधिकार गाजवण्याचा मला जन्मसिद्ध हक्क आहे, ही माझी मूर्खपणाची कल्पना नाहीशी होऊन शेवटी माझी पत्नीच अहिंसेच्या बाबतीत गुरू बनली.'' असा असू शकतो सहनशीलता व अहिंसेचा परिणाम.

जशास तसे -

संतांनी जसा सोशिकतेचा पुरस्कार केला तसाच परपीडकांना किंवा सामान्यांच्या सहनशक्तीचा अंत बघणाऱ्यांना जशास तसे उत्तर देण्याचा अधिकार भागवत धर्माला अनुसरून सांगितला, हे विशेष जाणवण्यासारखे आहे. सज्जनांचे संरक्षण ही जशी दया आहे, तशीच दुर्जनांना शासन ही सुद्धा त्यांच्यावर दयाच आहे, असे संताचे म्हणणे असते. म्हणून व्यवहारात

वागताना समर्थांनी ''ठकास महाठक'' होण्याचा उपदेश केला व संत तुकारामांनी आमच्या सहनशीलतेचा दुबळेपणा असा अर्थ घेता कामा नये म्हणून त्यांना दंडित करण्याचा विवेकी उपदेशच केला. ते म्हणतात,

मऊ मेणाहूनी आम्ही विष्णुदास । कठीण वज्रास भेदू ऐसे ।
मेले जित असो निजोनिया जागे । जो जो जे जे मागे ते ते देऊ ।
भले तरी देऊ गांडीची लंगोटी । नाठाळाचे काठी देऊं माथां ।
माय बापाहूनि बहु मायावंत । करू घातपात शत्रूहूनि ।
अमृत ते काय गोड आम्हांपुढे । विष ते बापुडे कडू किती ।।

- तु. गा. (९८७)

हा संतांचा उपदेश सहनशक्तीच्या विरुद्ध वाटत असेल, पण विवेकी बुद्धी जागी ठेवून केलेला उपदेश समाज व राष्ट्राच्या अभ्युदयासाठी आवश्यक आहे. म्हणूनच भारताने देखील अणुनिर्मिती करून जगाला आमच्या सहनशीलतेचा अंत कोणी पाहू नये, असाच संदेश दिला.

सहनशीलता कमी होण्याची कारणे : कारण मीमांसा -

समाजामध्ये सहनशीलतेची कमतरता तसेच व्यक्तिगत पातळीवर देखील दिसून येणारी असहिष्णू वृत्ती नेहमीच अनुभवास येत असते. पण आज त्यांचा अतिरेक का झाला, याचा विचार करता खालील काही बाबी लक्षात घ्याव्या लागतात.

व्यक्तिगत पातळीवर सदाचरणाचे शिक्षण अगदी कुटुंबातून, आईवडील यांच्याकडून बालपणापासूनच द्यावे असा भारतीय संस्कृतीचा आग्रह असतो. पण आज त्याला म्हणावा तेवढा प्रतिसाद पाल्याकडून तसेच पालकाकडून मिळत नसल्याचे चित्र आहे. नाही म्हणायला पालक व पाल्य यांच्या समाधानापुरते संस्कार केंद्राचे किंवा संस्कार घडवणाऱ्या शिक्षकाचे शिकवणीरूपात त्यांचे आयोजन केले जाते. काही दिवस त्याचे पालन केले जाते, पण नंतर समाजप्रवाहात ते विरून गेल्याचे आढळून येते.

२) शाळा कॉलेज ही पौगंडावस्थेतील सामाजिक संस्कारांची केंद्रे. त्यांची जबाबदारी शिक्षक व प्राध्यापक यांच्यावर असते. पण आज तो वर्ग ही हतबल झाल्याचे चित्र आहे. मुलांच्या नैतिकतेची जबाबदारी त्यांनी घ्यावी असे त्यांना वाटत नाही. ते पालकावर त्याचे खापर फोडण्याच्या तयारीत असतात. परवा चर्चा करत असता असे ऐकायला मिळाले की, काही पाल्यांनी शाळांमधून, संस्कारक्षमता कमी होत असलेल्या पार्श्वभूमीवर, संस्कार व सदाचाराच्या गुणांच्या वृद्धीसाठी थोडे कठोर निर्णय घेण्याचे ठरवले आहे व विद्यार्थी शाळेतून बाहेर पडताना सर्व संस्कारांची, चांगल्या वाईटाची जाण करून देणारे शिक्षण देण्याचे प्रयत्न करीत आहेत. त्यातील पहिली अट पालकांपैकी एकानेच नोकरी / व्यवसाय करावा व एकाने पाल्याकडे लक्ष देण्यास मोकळे असावे. जेणेकरून घरी व शाळेमध्ये त्याच्या व्यक्तिविकासास मदत मिळेल. प्रयत्न स्तुत्य असला तरी आताच्या काळी किती फलद्रूप होईल, याची शंका वाटते.

३) पालकाने स्वत: आदर्शवत राहून पाल्यास सत्य व प्रामाणिकता, स्वयंशिस्त, धैर्य, आत्मविश्वास, शांतताप्रियता व सहनशीलता, निष्ठा व भक्ती, न्याय आणि करुणा, प्रेम व गुरुजनांचा आदर यांवर भर देऊन पाल्याचे बालपण आकाराला आणावे अशी अपेक्षा असते. आजच्या गतिमान जीवनात याकडे वेळ देण्यास पालकांस जमत नाही व पाल्यावर अपेक्षित संस्कार होत नाहीत. तसेच पालकांचे स्वत:चे आदर्शवत वर्तन फार कमी पालकांमध्ये दिसून येत आहे.

वरील गोष्टींचा संस्कारक्षम वयात अभाव होत असल्याने मुलाच्या स्वैरवृत्तीला आळा बसणे कठीण झाले आहे.

४) सामाजिक स्तरावर विचार करता स्वातंत्र्यप्राप्तीनंतर झालेली शिक्षणाची वाढ, आपल्या हक्कांची झालेली जाणीव, अस्मितेत झालेला फरक, यांमुळे व स्वातंत्र्याच्या स्वैरतेच्या कल्पनेमुळे मी म्हणेन तसेच व्हावे ही

भावना अधिक बळकट होऊन कोणताही प्रतिकूल निकाल सहन करण्याची तयारी राहिली नाही. याचा परिणाम व्यवहारात शीघ्र कोपातून अनुभवास येतो.

५) जागतिकीकरणामुळे अटळ झालेली स्पर्धा, अपयशामुळे येणारे वैफल्य याचा सहनशीलता कमी होण्यास हातभार लागत आहे.

६) विभक्त कुटुंब पद्धतीमुळे व आत्मकेंद्रित वृत्तीमुळे एकमेकांचा संवाद प्रमाणाबाहेर कमी झाल्याने सहजीवनाच्या अभावी सहनशीलतेत खूप कमतरता दिसत आहे.

७) शासन स्तरावर विचार करता, शासन यंत्रणेत जाणवणारी अकार्यक्षमता व नियंत्रणाचा अभाव, वाढीस गेलेला भ्रष्टाचार, कायद्याच्या अंमल बजावणीच्या अभावामुळे जाणवणारी टोळीयुद्धासारखी परिस्थिती, वाढती महागाई व आपण काहीही करू शकत नाही ही समाजमनाची हतबलता, असहिष्णू वृत्तीस पोषक ठरत आहे व त्याचा उद्रेक क्षुल्लक घटनांवरून होणाऱ्या खुनामध्ये दिसून येत आहे.

८) वरील कारणामुळे जाणवणारी मानसिक अस्थिरता व असुरक्षितता सहनशीलतेच्या घसरणीत भर टाकत आहे व त्याचे दृश्य परिणाम समाजात दिसून येत आहेत.

असोशिकपणाचे दुष्परिणाम :

वरील ढोबळ तात्त्विक विवेचनावरून सहनशक्तीचे मनाशी, जनाशी आणि संस्कृतीशी किती घट्ट नाते असते याची कल्पना येऊ शकते. आजच्या घडीचा विचार करता याबाबत मन विषण्ण करणाऱ्या घटनात रोज वाढ होत असताना दिसत आहे. याचे व्यक्तिगत जीवनावर व समाजात दिसून येणारे काही दृश्य परिणाम.

१) युवकांच्या वागण्यात दिसून येणारा जाणवण्याइतका फरक असा आहे की, त्यांच्या भावनिक सहनशीलता व मानसिक ताण सहन करण्याच्या क्षमतेत कमालीचा उतार दिसून येत आहे. त्यामुळे त्यांची

शीघ्रकोपी वृत्ती झालेली दिसून येते.

२) जागतिकीकरणामुळे व्यवहारी जीवनात अटळ झालेली स्पर्धा, मानसिक शांती बिघडवून टाकत आहे. त्यामुळे होणारे वागणुकीतील बदल "Impulsive Disorder" सारख्या आजारात रूपांतरित होत आहेत.

३) नवीन चंगळवादी जीवनशैली अंगीकारल्यामुळे सुखाच्या बदलत्या कल्पना व त्यासाठी दुसऱ्याचेही ओढून घेण्याची वृत्ती व आत्मकेंद्रित विचारसरणीत होणारी वाढ ठळकपणे नजरते भरते.

४) शारीरिक आजारांना सहन न करण्याची क्षमता व त्यामुळे होणारे रक्तदाब व मधुमेह यासारख्या आजारांचे वाढते प्रमाण.

५) सामाजिक क्षेत्रात स्वार्थी वृत्तीमुळे अविश्वास वाढत जाऊन संवादापासून दुरावत चाललेले मित्र.

६) व्यक्तिगत अस्मिता जरी वाढली असली तरी रसातळाला गेलेली सामाजिक मूल्ये, बोकाळलेला भ्रष्टाचार व शासनाचा नियंत्रण ठेवण्यातील ढिलेपणा यामुळे येणारी हतबलता व नैराश्याची भावना असे सामाजिक चित्र असून कधी स्फोट घेईल अशी परिस्थिती आहे.

७) अविश्वास व विभागीय अस्मितेच्या वाढीमुळे क्षीण होत चाललेली राष्ट्रीय भावना, फक्त राष्ट्रीय एकात्मतेचा उच्चार करण्यापर्यंतच शिल्लक असल्याची जाणीव होत आहे.

उपाययोजना -

वरील लक्षणांवर मात करण्यासाठी विविध स्तरांवर योजना करून प्रशिक्षित व स्वकर्म व कर्तव्याची जाणीव निर्माण करून समाज जीवनात कार्यरत करण्यासाठी, अगदी मूलभूत गोष्टींचा विचार व आचार अंमलात आणण्याची गरज आहे. त्यासाठी

१) जबरदस्त निश्चयी इच्छाशक्ती

आज समाजमनाची स्थिती एका रुग्णासारखी झाली आहे आणि हा रुग्ण असा आहे की, त्याच्या रोगाचे निदान माहीत आहे किंबहुना ते

त्याच्या कपाळावरच लिहिले आहे. त्यावर गुणकारी औषधे व पथ्य पाण्याची चांगली माहिती आहे. त्याप्रमाणे कांही औषधोपचार धरसोड वृत्तीने व वैदू पद्धतीने चालू आहेत. शास्त्रोक्त औषधोपचार व योग्य पथ्य पाळल्याशिवाय हा रोग बरा होणार नाही, हे नक्की.

कोणत्याही व्याधीवर मात करण्यासाठी इच्छाशक्ती व मनोबलाची नितांत गरज असते. मग ती व्याधी वैयक्तिक, सामाजिक अथवा राष्ट्रीय स्तरावरील असो. त्याचबरोबर सर्व स्तरांवर पोषक वातावरण असण्याची गरज असते. याबाबतीत भारताच्या स्वातंत्र्य लढ्याचे उदाहरण बोलके आहे. कारण त्या वेळी सर्वांचे ध्येय स्वातंत्र्य मिळवावयाचे होते आणि त्या एका ध्येयाने सर्व स्तरावरील मंडळी भारावून गेली होती व मनोबल उंचावलेले होते. तसेच बाह्य व आंतर जगातील वातावरण स्वातंत्र्यास पोषक होत गेले होते असे तज्ज्ञांचे मत आहे. पण आज सर्व पातळ्यांवर त्याच्या उलट परिस्थिती आहे. इच्छाशक्तीचा अभाव व पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव आणि जागतिकीकरणाने झालेले बदल या सर्वांचा परिणाम सद्गुणांची वृद्धी होण्यासाठी आडकाठी ठरू पहात आहे. कारण पालकाची इच्छा व प्रयत्न असूनदेखील पाल्य त्यांच्या इच्छेला व अपेक्षेला प्रतिसाद देताना दिसत नाही. उलट अनैतिकतेचीच वाढ होताना दिसून येते. त्यामुळे कितीही योजना केल्या पण ज्यांनी अंमलात आणावयाचे आहे, तेच त्यापासून दूर जाताना दिसत आहेत. बाह्य शक्तींचा जाणून बुजून पण आडमार्गाने होणारा अदृश्य हस्तक्षेप अडचणीत भर घालत आहे, असे जाणवते.

यासाठी एक असे नेतृत्व पाहिजे की, सर्व स्तरांवरील उपाय योजनांचे नियंत्रण करून व्यक्तीला आदर्शवत करून समाजोन्मुख व सत्प्रवृत्त करू शकेल व प्रत्येक व्यक्ती त्याला तितकाच सकारात्मक प्रतिसाद देईल.

२) मूलभूत वृत्तीत बदल घडवून आणणे.

हे काम कधीच सोपे नव्हते व आताही असणार नाही असे इतिहास

सांगतो. पण प्रयत्नाने ते अशक्य नाही हे मात्र खरे. विवेकानंदांनी म्हटल्याप्रमाणे १५ आणे लोक तामसीवृत्तीचे असतात व त्यांच्यात रजोवृत्ती निर्माण करण्याची गरज असते. इथेच खऱ्या समाजधुरीणांची, धर्मगुरूंची व धर्मप्रवर्तकांची त्याचबरोबर राजकीय नेतृत्वाची व शासनयंत्रणेची कसोटी आहे. काही धर्मप्रसारक सद्गुणांची वाढ होण्यासाठी त्यांच्या स्तरावर प्रयत्न करीत असल्याचे जाणवते. पण ते प्रयत्न फार अपुरे पडत आहेत. आज समाज हतबल व गोंधळून गेल्याचे जाणवते. समाजातील विश्वासच नाहीसा झाल्याचे चित्र आहे. हा कदाचित टोकाचा निराशावाद वाटेल, पण व्यवहारातील वास्तवता नाकारता येत नाही.

वृत्तीत बदल घडवून आणण्याची प्रक्रिया सर्व स्तरांवर पूर्ण निष्ठेने, श्रद्धेने, राष्ट्र व समाजहित डोळ्यांसमोर ठेवून एकदिलाने केली, तरच यावर मात करता येईल असे वाटते.

७

संस्कृतीमुळे अवनती ?

परवा विचारवंताशी चर्चा करताना आपल्या सद्य:स्थितीला आपली भारतीय संस्कृतीच जबाबदार आहे, असे ठामपणे सांगण्यात आले व त्यासाठी ''Culture can kill by S. Subodh'' या पुस्तकाचा दाखला व त्याला लिहिलेली विचारवंत व राजकीय विश्लेषक श्री. कुमार केतकर यांची प्रस्तावना यांचा उल्लेख करण्यात आला. प्रस्तावनेमध्ये श्री. कुमार केतकरांनी असे लिहिले आहे.

"Subodh does not minces words. Upfront he says. This book will present a theory that neither fate nor foreigner and nor genes nor sins cause our demise as a strong nation and our degradation to the depths of destitution. We our selves are responsible for our fall. Our culture has killed us. Since culture closely aligned with and forms an indistinguishable part of our religion at the root of our seemingly intractable problems, making us as a disabled to create and complete. Our traditional beliefs, values and attitudes, as they say the devil in the detail. But very briefly, they are fatalism, contentment, irrationally. obsession with spirituality, faith. Elevation of poverty and renunciation as desirable values encourage tradition and discouraging creativity and many more. Such beliefs led to neglect this world, diversion of resources and abstract pursuits, inertia and negativity in worldly affairs. they lie at the root of regression."

ते पुढे असेही म्हणतात की, त्यांना खात्री आहे की, आपण एक आदर्श समाज होऊ शकू, जेव्हा आपण सुबोध यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांकडे गंभीरपणे लक्ष देऊ. त्याचबरोबर त्यांचे असेही मत आहे की, "On the other hand, there is a distinct possibility of India and the Sub Continent both regressing with the part that wil be a journey into dark ages."

थोडक्यात आपल्या नाशाची मुळे संस्कृतीत असून आणि ही संस्कृती दैववाद, आध्यात्मिकता, परंपरावादी इत्यादींमध्ये आहेत.

मला वाटते, या प्रस्तावनेतील 'We ourselves are responsible for our fall' हे वाक्य अधिक महत्त्वाचे वाटते. हे त्याचेच थोडे विश्लेषण करण्याचा एक प्रयत्न. "Culture can kill by S. Subodh" या पुस्तकाचा सारांशाचा कांही भाग.

१) भारतीय संस्कृतीमुळे भारत या रोगाचा बळी पडला आहे व या रोगामुळे आमचा नाश झाला आहे तो रोग,

   १) गेल्या ८०० वर्षातील परकीयांचे आक्रमण व त्यांची गुलामगिरी.
   २) अजूनही भारतीय हे सनातनी व अतार्किक व मागासलेले आहेत.

२) या रोगाची कारणे - लेखकाने खालीलप्रमाणे दिली आहेत.

   १) स्त्रियांना अधिकार देण्यात अपयश.
   २) वर्णाश्रम पद्धती
   ३) नियंत्रित शिक्षण
   ४) मुलांचे चुकीचे संगोपन व एकाधिकारी संस्कृती
   ५) अध्यात्माचा व श्रद्धेचा अतिरेक. त्यामुळे नवविचारांना व नवनिर्मितीस खीळ.
   ६) पौराणिक व दंतकथांमुळे निर्माण झालेला भोळेपणा.

७) जगापासून अलिप्त व स्वत:च्या पावित्र्याबद्दल आणि वर्चस्वाबद्दलच्या अतिरंजित कल्पना आणि

८) जेव्हा पाश्चात्य जग औद्योगिक व यांत्रिक क्रांतीमुळे आधुनिक झाले, पण भारत नाही. कारण जुन्या विचारांना आव्हान देण्यासाठी आमच्या संस्कृतीची अनिच्छा.

या बरोबर आणखी एका मौलिक आणि मूलगामी समाजशास्त्रज्ञ, डॉ. पिटरिम सोरोकिन यांच्या "The crisis of our age" या विचारप्रवर्तक ग्रंथात पाश्चात्य संस्कृतीबद्दल असे वर्णन केले आहे. "We are in the mids of an enormous conflagration burning everything into ashes --- Ever expanding misery spreads is gloomy shadow over larger and larger areas. The fortunes, happiness and comfort of untold millions have disappeared Peace, Security and safty have vanished ---- A great tormado sweeps over the whole of mankind. (आपल्या युगातील आणीबाणीचे प्रसंग) या विचार प्रवर्तक ग्रंथात आताच्या पाश्चात्य संस्कृतीबद्दल असे वर्णन केले आहे.

"अर्थात आपण एका विक्राळ वणव्याने घेरलो आहोत. तो साऱ्यांची जाळून राख रांगोळी करत आहे..... सतत वाढते दु:ख उत्तरोत्तर अधिकाधिक विस्तीर्ण भूभागावर आपली विषण्ण छाया पसरवीत आहे. गणता येणार नाहीत अशा लाखांची संपदा, सुख नि समाधान लुप्त झाली आहेत. शांती, सुरक्षितता, आणि निश्चिती अस्तंगत होऊन गेली आहेत. सारी मानवजात एका प्रचंड झंझावाताच्या झपाट्यात सापडली आहे."

या विचारवंताचा हा ग्रंथ साधारण १९३०-१९४० च्या काळातील आहे. आज वरील वर्णिलेल्या स्थितीत सुधारणा न होता आधुनिक जडवादी विचाराने मानवतेची अधिक हानी व पतन अनुभवास येत आहे.

याच ग्रंथात त्यांनी एक उपशीर्षक दिले आहे. त्याचे नाव "The

social and cultural out look" आधुनिक मानवाच्या दुरवस्थेचे खरे, मूलभूत कारण त्याची जडवादी जीवनदृष्टी होय. हाच निष्कर्ष या ग्रंथातून प्रतिपादला आहे. ते म्हणतात.

"Begening roughtly with the 16th century new principle became dominant and with the new form of culture that was based upon it in this way the modern form of culture emerged - the sensory, empirical and this, "this worldly culture" It may be recalled SENSATE it is based upon and is intigrated around the new principle value: True reality and value in sensory (crisis of our age - Chapter 1)

अर्थात ढोबळ मानाने सोळाव्या शतकाच्या प्रारंभापासून हे नवीन तत्त्व खूप बळावले. आणि त्याबरोबर त्यावर आधारलेली नव्या धर्तीची संस्कृती वरचढ झाली. ह्या अशा रितीने आपल्या, संस्कृतीचे आपल्या इंद्रियनिबद्ध, ऐहिक, धर्मनिरपेक्ष, पार्थिव व इहलौकिकनिष्ठ संस्कृतीचे आजचे, आधुनिक रूप उदयास आले. हिला इंद्रियकेंद्री संस्कृती म्हणता येईल. ती ह्या नवीन तत्त्वमूल्यावर आधारलेली आहे की, 'खरे सत्य नि खरे जीवनमूल्य इंद्रियनिष्ठच असते.'

वरील तिन्ही विचारवंतांच्या सामाजिक अवलोकनाचा विचार करताना, स्वामी विवेकानंदांच्या दूरदृष्टीने व त्यांनी वर्तविलेल्या जागतिकीकरणाच्या धोक्याची घंटा, यांच्या १८९३ सालच्या जागतिक धर्म परिषदेतील भाषणाची आठवण करून देते, ते म्हणाले होते.

Shall India die ? then, from the world all spirituality will be extinct all sweet souled sympathy for the religion will be extinct, and in its place will reign the duality of lust and Luxury as the male and female deities with money and its priest, fraud force and competition its ceremonies and human soul its sacrifice. Such a things can never be."

वरील स्वामीजींचे विचार व वास्तव संस्कृतीच्या उतारांची चाहूल

आज आपणास भारतात देखील दिसत आहे. पण वरील विचारात त्यांचा आशावाद जबरदस्त आढळून येतो आणि त्याचे एकमेव कारण भारतीय संस्कृतीची आध्यात्मिक बैठक असे वाटते. कारण स्वामीजी पुरोगामी व विज्ञानवादी असून अद्वैताचे पुरस्कर्ते होते.

"Culture can kill by S. Subhodh" या पुस्तकातील त्यांचा मुख्य आशय हा भारतीय संस्कृतीने आमचा नाश केला आणि त्याला फक्त या संस्कृतीतील दैववाद, अध्यात्मवाद, रूढी व परंपरा, अपेक्षित मूल्य वैराग्य इत्यादी आणि बाकी इतर कोणतीही गोष्ट जबाबदार नाही.

तसे पाहता भारतातील संस्कृतीच्या संदर्भात व धर्माच्या विकृत होत गेलेल्या कल्पना व अंमल यांवर गेल्या १००-१२५ वर्षांपासून चर्चा चालू आहे. स्वामी विवेकानंदांसारख्या विज्ञान व आध्यात्मिक अधिकारी विचारवंतांनी यावर परखड, मतं मांडलेली आहेत व ती सुधारण्याचा मार्ग देखील सांगितला आहे व त्यासाठी कोणती जीवनप्रणाली अधिक सोईची होईल याचे मार्गदर्शन केले आहे. प्रा. बेलसरे सारख्या विचारवंतांनी आध्यात्मिक व चेतन यांकडे एकांगी लक्ष दिल्याने आमचे जडाकडे दुर्लक्ष झाल्याने आमच्यातील आत्मघातकी वृत्ती कशी स्थिरावली व आम्ही अपकर्षास कारणीभूत ठरलो, यांचे सविस्तर विवेचन केले आहे. पूर्वी केलेल्या या व इतर विचारवंतांनी केलेल्या विश्लेषणाबद्दल लेखक या पुस्तकात ते मान्य करतात, पण त्यांचा मुख्य जोर फक्त अध्यात्मामुळेच आमचा नाश झाला हे मुख्य व एकमेव सूत्र आहे.

म्हणून हा विचार थोडा एकतर्फी व एका विशिष्ट दृष्टिकोनांतून बघितल्यासारखा आहे. शिवाय यांत संस्कृती व धर्म एकच धरून संस्कृतीबाबत विचार केल्याचे जाणवते. व्यवहारामध्ये कदाचित या दोन्हींची सर-मिसळ जाणवते हे खरे, पण तात्त्विक विचार करताना त्यांतील भेद करणे जरुरीचे वाटते.

वास्तविक कोणत्याही संस्कृतीला कोणी संस्थापक नसतो. ना

व्यक्ती ना धर्म. ती अखंड प्रवाही असून तिचा आधार संपूर्ण प्रकृती असते. कोणत्या एका व्यक्तीच्या इच्छेने संस्कृती बदलत नाही. संस्कृती सदैव जिवंत राहण्याची दिशा दाखवते. संस्कृती एक जीवन जगण्याची कला आहे. ज्याला तत्त्व, अंतरंग व बाह्य रंग असतात. तसेच संस्कृतीला उदय-उत्कर्ष उतार व लय या अवस्थेतून जावे लागते. हा कालावधी हजारो वर्षांचा असू शकतो.

या संदर्भात विचार करता भारतीय संस्कृतीचा तात्त्विक गाभा ब्रह्मविद्या व आत्मज्ञान, श्रद्धा, त्याग, सत्य व प्रेम असून त्याच्या उपांगात कला, संगीत, शिक्षण, खाण्याच्या व कपड्यांच्या बाबत विचार असतो. हे खरे आहे की, या संस्कृतीमध्ये विज्ञानाची वाढ झाली नाही. पण वेदांत हाच ज्ञानाचा व विज्ञानाचा भाग समजला गेला.

कोणतीही संस्कृती तीन टप्प्यांतून जाते. प्रथम अग्नीचा उपयोग, दुसरा टप्पा कृषी व पशु पालन व तिसरा टप्पा विज्ञानाची पुष्कळ वाढ होऊन त्यापासून निर्माण झालेली यंत्रविद्या व पूर्ण सुधारलेली अवस्था हीच अवस्था पाश्चात्य संस्कृतीचा मूलभूत पाया होऊन ती संस्कृती जडवादी (Materialistic) समजली जाते व तीच संस्कृती प्रगत समजली जाऊ लागते. येथे हेही लक्षात घेतले पाहिजे की, यंत्रविद्येची मदत घेऊन जीवनावश्यक गरजा उत्तम प्रकारे तृप्त करणे हे काही संस्कृतीचे एकमेव लक्षण होऊ शकत नाही. माणसामध्ये मीपणाच्या जाणीवेबरोबर चांगले-वाईट, योग्य-अयोग्य वगैरे मूल्य विषयक कल्पना आल्या आणि सूक्ष्म अशा मूल्यमय जगाची जाणीव ठेवून जीवन जगणे हे माणुसकीचे प्रधान लक्षण आहे हे पाहाण्यासाठी म्हणून संस्कृती प्रगतीवर आहे की नाही. या मूल्यांचा विचार करणे आवश्यक आहे.

या पुस्तकात यांत्रिक क्रांतीनंतर झालेल्या वैज्ञानिक प्रगतीमुळे व त्याच्या तुलनेत भारत किती मागे आहे याची तुलना होऊन 'आमचा नाश' झाला ही हाकाटी पिटण्यात येत असते.

१) येथे हे ही लक्षांत घ्यावे लागते की, समतोलपणा व स्वस्थपणा हा नियम माणसाला लागू आहे. माणसाला देहाबरोबर मन देखील असल्याने त्याच्या समतोलपणाचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे आहे. आजकालच्या पाश्चात्य संस्कृतीमुळे हा समतोलपणा बराच बिघडून मनाची शांतता भंग पावत आहे. हा सगळा प्रवृत्तिवादाचा प्रकार समजला जातो.

२) माणसाच्या जीवनात देहापेक्षा मनाला अधिक महत्त्व असून, हे मन पशूच्या मनापेक्षा अधिक सूक्ष्म व व्यापक बनल्याने आवड-निवड, हवे नको, त्याचबरोबर षड्रिपूंचे वास्तव्य याच्यात असल्याने बाह्य जगातील घटनांमुळे त्याचे समाधान बिघडू शकते व समाधान तर जीवन जगण्यासाठी अवश्य आहे आणि हे मिळवण्यासाठी निवृत्तिवादाचा भारतीय संस्कृतीत सखोल विचार केला आहे. नेमका हाच विचार आधुनिकतेला नको असतो व आसक्ती, तृष्णा, अखेरपर्यंत पूर्ण व्हावी हीच इच्छा असून, संस्कृतीचा डोलारा यावर उभा असावा अशी अपेक्षा असते. म्हणून भारतीय संस्कृती ही 'नाशास' कारणीभूत आहे, असे मानले जाते.

३) तिसरा एक दृष्टिकोन असा आहे की, माणसाचा विशेष गुण हा सारासार विचार व विवेकाचा आहे. आणि हाच गुण त्याला सदसद्‌विवेकाने शाश्वत मूल्याकडे किंवा त्याचा अनुभव घेण्याकडे वळवतो व आत्म्याचा शोध घ्यावा, यासाठी शरीर व मन वळवतो आणि हाच तो अध्यात्मवाद.

या पुस्तकात याच अध्यात्मवादाला सर्वनाशास कारणीभूत समजले जाते किंवा सर्वजणच असे समजतात. ही विचारप्रणाली फार खोलात जाऊन न केल्यामुळे किंवा अगदी नकारात्मक विचाराने भारून गेल्याने होत असावी. येथे हेही ध्यानात घेतले पाहिजे की प्रत्येक संस्कृतीत वरील तिन्ही दृष्टिकोनांचा समावेश असतो व या तीनपैकी एक प्राबल्याचा ठरतो. भारतीय संस्कृतीमध्ये आध्यात्मिक दृष्टिकोन प्रधान समजला जातो.

आमच्या अध:पतनास आम्हीच कारणीभूत

भारतीय संस्कृती माणसाच्या गतिमान जीवनावर क्रिया-प्रक्रिया घडवून त्याचे माणूसपण वाढीस लावणे व माणसाची मानसिक शक्ती वाढीस लावून त्याच्या ठिकाणी मानवतेचा पूर्ण विकास करून देणे हे जिवंत संस्कृतीचे खरे काम करते. समाजातील प्रत्येक व्यक्ती समाधानी राहावी हाच उद्देश असतो आणि यासाठी भारतीय ऋषी-मुनींनी सखोल विचार करून, अनेक प्रयोगांनी व द्रष्टेपणाने वर्णाश्रम जीवनपद्धती आचरणात आणावयास लावली. भारतीय संस्कृतीच्या आधारे आनंदी जीवनाचे रहस्य कशात आहे. हे सांगताना वसिष्ठ ऋषींनी श्री प्रभू रामचंद्रास खालीलप्रमाणे उपदेश केला.

अंतस्त्यागी बहि:संगो, अंतर्बोधो बहिर्जड: ।
अंतरेको बहिर्नाना लोके विहर राघव ।।

अर्थ - तू मनाने प्रपंचातून सुटलेला पण देहाने प्रपंचात गुंतलेला, मनात आत्मज्ञान जागे असलेला पण देहाने ज्ञान नसल्यासारखे वागणारा, मनाने एका आत्मवस्तूला सत्य मानणारा आणि देहाने बहुरंगी जग सत्य मानणारा अशी प्रपंच-परमार्थाची जोड घालून, रामा, तू जीवनात विहार कर.

पण आज समाधानी व्यक्ती मिळणे कठीण आहे. कारण जडवादाचे प्राबल्य वाढल्याने त्याच्या इच्छा-आकांक्षा व सुखाच्या कल्पना अमलात आणण्यासाठी गैर नीतींचा मार्ग स्वीकारावा लागतो. त्यामुळे त्यांचा समतोल बिघडत चालला आहे. "जग जवळ आलं, पण माणसं दुरावली. पैसा मोठा झाला, पण मनं छोटी झाली. कुटुंबातील नातेसंबंध सैल झाले, मुलांची माया पातळ झाली. कामाचे तास वाढले आणि सहकाऱ्यांशी नाती बदलली" अशी स्थिती आज आधुनिकतेच्या अंगीकारलेल्या जीवनप्रणालीमध्ये दिसत आहे. त्यामुळे १) अत्यंत आकुंचित दृष्टीच्या व स्वार्थी माणसांचे प्रमाण अधिक झाले २) सत्तेसाठी व पैशासाठी संघर्ष व द्वेषाची भावना सर्वत्र पसरली आहे. ३) विवेकावरील श्रद्धा उडून,

माणुसकीचे पतन होऊन समाजात व्यक्तीस किंमत उरली नाही. ४) आत्मकेंद्रित होऊन 'समाज व राष्ट्राला माझे काय देणे' ही भावना निर्माण झाली. ६) धर्माला व्याख्यानबाजीचे रूप येऊन नीतीमध्ये सुखवाद बोकाळला आहे. ही समाजाची अवस्था आमच्या संस्कृतीच्या उताराची दिशा दाखवत आहे. याला आम्हीच जबाबदार आहोत. वरील संदर्भीय पुस्तकातील We ourselves are responsible for our fall हे वाक्य महत्त्वाचे वाटते. गंगा पवित्र आहे. आम्हीच तिला घाण करीत आहोत. त्यात गंगेचा काय दोष ? तीच स्थिती आपल्या संस्कृतीची आहे.

भारतीय संस्कृती जी उच्च शिखरावर होती, ती आज उताराला का लागली ? याचा विचार करता त्याला आंतर व बाह्य कारणे असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. केवळ आधुनिक पाश्चात्य विचारसरणीबरोबर समाज नाही गेला, म्हणून व संस्कृतीनेच ती स्थिती आणली, असे म्हणणे संस्कृतीवर अन्याय करण्यासारखे व ज्या ऋषी व मुनींनी या उच्च संस्कृतीचा पाया घालून एक प्रापंचिक व पारमार्थिक जीवनप्रणालीचा आदर्श आमच्या समोर ठेवला त्यांच्याशी प्रतारणा केल्यासारखे होईल. म्हणून आम्हीच कसे जबाबदार आहोत, याचे विश्लेषण करण्याचा एक प्रयत्न.

अंतर्गत कारणे -

१) समाजरचना व समाजमन

२) धार्मिक व नैतिक मूल्यांचा स्वार्थासाठी उपयोग

बाह्य कारणे -

१) परकीय आक्रमण व गुलामगिरी

२) इतर पाश्चात्य संस्कृतींचे अनुकरण व आक्रमण

समाजरचना - भारतीय संस्कृती ही वर्णाश्रमावर आधारित असून यांत चार वर्ण १) ब्राह्मण २) क्षत्रिय ३) वैश्य व ४) शूद्र व चार आश्रम १) ब्रह्मचर्य, २) गृहस्थाश्रम ३) वानप्रस्थाश्रम ४) संन्यासाश्रम. गृहस्थाश्रमात १) धर्म २) अर्थ ३) काम व ४) मोक्ष चार पुरुषार्थांनी जीवन सफल

करण्याचा विचार मांडला आहे.

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी 'महाराष्ट्रातील शिवकालीन समाजरचना' या लेखात भारतीय संस्कृतीतील चातुर्वर्ण्य या समाजरचनेबाबत वस्तुनिष्ठ विवेचन करून आर्यांनी आखून दिलेली गुणाधिष्ठित चार वर्णांची रचना जन्माधिष्ठित कशी झाली व नाशास कशी कारणीभूत ठरली याचे उत्तम विश्लेषण केले आहे. त्यांच्याच शब्दांत हे वाचणे योग्य ठरेल.

''अशा ह्या चातुर्वर्ण्य संस्थेचा व तत्रस्थ राज्यसंस्थेचा नाश किंवा ऱ्हास कशाने झाला, ते आता आपण पाहू. नाशाची कारणे दोन, बाह्य किंवा आंतर. दैत्य, असुर, राक्षसादी अनार्य समाजाकडून पराभव होऊन संस्थेचा क्षय व लय होणे हे बाह्य कारण आणि चार वर्णांत कलह माजून यादवीने क्षय व लय होणे हे आंतर कारण. पैकी दुसऱ्या म्हणजे आंतरकारणाचा विचार करू. शौनकाच्या चातुर्वर्ण्यात कोणत्याही वर्णातील मनुष्याला कोणत्याही वर्णात गुणकर्मानुसार प्रवेश करता येत असल्यामुळे, इतर वर्णांना स्ववर्णात राहून हट्टाने कर्म करण्याचा व तद्वारा इतर वर्णांना विषाद उत्पन्न करण्याचा प्रसंगच येत नसे. प्रत्येकाला आपली महत्त्वाकांक्षा पुरवून घेण्यासाठी महातपश्चर्या व ब्राह्मणांची दु:साध्य सम्मती मिळवावी लागे, परंतु महत्त्वाकांक्षा पुरवून घेण्याला मार्ग होता. अशी समाधानकारक स्थिती असल्याकारणाने ह्या मार्गाने चलबिचल उडण्याची सोय नव्हती. प्राय: त्या काली आंतरकारणाने जी चलबिचल उडे, ती वैयक्तिक असे. एखादा हटवादी क्षत्रिय उन्मत्त झाला व त्याने एखाद्या कोपिष्ट ब्राह्मणाचा अपमान केला, तर त्या दोघांत युद्ध व कलह जुंपे किंवा क्षत्रिय वर्ण श्रेष्ठ अथवा ब्राह्मण वर्ण श्रेष्ठ भांडण एखादेवेळी विकोपास जाऊन कोणत्या तरी एका पक्षाचा मोड होई. तत्काली घडलेली असली उदाहरणे पुराणांतून व इतिहासातून अनेक आहेत. परंतु त्यामुळे चातुर्वर्ण्यव्यवस्थेचा नाश होत होता, असे म्हणता येणार नाही. तर अन्योन्यपोषक असे हे दोन्ही

वर्ण दुर्बल होत असत. कधी कधी ब्राह्मण क्षत्रियांच्या ह्या भांडणात ब्राह्मण वर्ग अनार्य जे शकयवनादी दस्यू त्यांचे सहाय्य घेत. त्यामुळे मोठ्याच भावी विपत्तीचे बीज पेरले जाई. दस्यूंचा चातुर्वर्ण्य भूमीत कायमचा शिरकाव होई व क्षत्रियांचा पराभव होऊ शकतो, हे दस्यूंच्या अनुभवास येई. ह्याच वृत्तीला अनुलक्षून भीष्मांनी खालील उद्‌गार काढले आहेत.

ब्रह्मक्षत्रं यत्र विरुध्यतो हि

अन्वग्बलं दस्यवस्तद् भजन्ते ॥

ब्राह्मण आणि क्षत्रिय ह्यांच्यात कलीचा प्रवेश झाला असता, म्हणजे ब्राह्मणांनी व क्षत्रियांनी स्वधर्म सोडला असता, साक्षात गर्दभही येथे राज्य करू शकतील, मग दस्यू करतील ह्यात नवल नाही. क्षत्राक्षत्रांत युद्ध झाले असता त्यानेही समाजाला दुर्बलता येई. परंतु चातुर्वर्ण्याला धक्का बसत नसे. ब्रह्मक्षत्राने अन्योन्य साहित्य केले, तरच चातुर्वर्ण्य संस्था सुरळीत चाले.

यदुतुर्वसूंच्या काळी भारत वर्षात चातुर्वर्ण्यव्यवस्था सुरू झाली, हे निश्चित आहे. ह्या यदुतुर्वसूंची नावे ऋग्वेदात ज्या प्राचीन ऋचा आहेत, त्यांत येतात. ऋग्वेदातील अत्यंत अर्वाचीन जे पुरुषसूक्त त्यात शौनकाच्या चातुर्वर्ण्याचा उल्लेख भूतवृत्त म्हणून केलेला आहे. तात्पर्य, ऋग्वेद काली चातुर्वर्ण्य संस्था होती, अशी जी आपल्याकडे पारंपरिक समजूत आहे, ती खरी असून कित्येक युरोपियनांचे, त्या काळी ती नव्हती, हे म्हणणे निराधार आहे. शौनकाने प्रचलित केलेली चातुर्वर्ण्य व्यवस्था सुमारे दाशरथी रामाच्या कालापर्यंत चालली. नंतर तिच्यात बदल झाला.''

श्री. वि. का. राजवाडे यांच्या या लेखातून असाही बोध होतो की शौनकाच्या काळानंतर समाजरचनेचा ढाचा जन्माधिष्ठित चातुर्वर्ण्याचा झाला. याच सुमारास शूद्रादींशी संकर होऊन प्रजोत्पादन झाले. याच काळात प्रद्‌योत वंशातील महानंदी राजाने शूद्रीच्या पोटी झालेल्या नंद नामक पुत्रास राज्यारूढ केले. ह्या संकरज उग्राने तत्कालीन क्षत्रियांना

नामशेष करून टाकले. पुढे चंद्रगुप्तासारखे क्षत्रिय राजे आपल्या शौर्याने राज्यारूढ झाले. पण या काळातील घटनांनी समाजमनावर एक वेगळाच प्रभाव टाकून दिला. या लेखातून असा अर्थबोध होतो की, हा जो 'कली' क्षत्रिय व ब्राह्मणांत शिरला, तेव्हापासून संस्कृतीच्या मूल्यात बदल होऊन तमोगुणाचे प्राबल्य खूप वाढले. त्याचबरोबर क्षत्रिय, ब्राह्मण व वैश्य यांना स्वधर्माचा विसर पडला. पराभूत मनोवृत्ती निर्माण होऊन अवसानघातकी प्रवृत्ती अधिक झाली. याचे प्रत्यंतर महाभारताच्या लढाईत अर्जुनाच्या मानसिकतेतून दिसून येते. इतका पराक्रमी अर्जुन युद्धाच्या वेळी त्याच्यात अवसान-घातकीपणा आल्याचे जाणवते. कारण काहीही असो, समाजाने वर्णाश्रम पद्धतीचा व चार पुरुषार्थांचा वापर स्वार्थासाठी केला. तो इतका झाला असावा की, शेवटी व्यासांना हताश व्हावे लागले व दोन्ही हात उंच करून सांगावे लागले की, मी ओरडून सांगत आहे की, धर्म-अर्थ-काम-मोक्ष यांचे पालन करून वागा, तर कोणी ऐकतच नाही. येथूनच कदाचित आम्ही आमच्या संस्कृतीच्या उतारास हातभार लावायला सुरुवात केली. शास्त्रीय विचारानुसार याच काळापासून आमच्यातील वर्णसंस्कारांमुळे जनुकीय बदल घडवून अशा प्रवृत्ती निर्माण झाल्या असाव्यात का ? असा विचार मनात येतो.

धर्माचा स्वार्थासाठी उपयोग व परकीय आक्रमणाचा परिणाम -

व्यवहारी जीवनात धर्माचा संस्कृतीवर खूप पगडा असतो व तो धर्म त्या संस्कृतीचे अंगच होऊन जाते. भारतीय संस्कृतीवर हिंदू धर्माचा, अद्वैत विचारांचा मोठा प्रभाव दिसून येतो. पण आचारांत तसे दिसून येत नाही. थोर स्वामी विवेकानंद म्हणूनच खेदाने म्हणत की, 'हिंदू धर्माइतकी तत्त्वे सांगणारा दुसरा धर्म नाही आणि हिंदू लोकांइतके प्रत्यक्ष आचारात अनुदार लोकही अन्यत्र सापडणार नाहीत.'

वेदांत म्हणजेच उपनिषदे हेच भारतीय संस्कृतीचे व हिंदू धर्माचे मूलाधार व त्याचेच आचरण होत असे. पण पुढे असे दिसून येते की

समाजमनातील विकृत विचारांमुळे त्यातील सद्‌विचारही सडून गेले व दुर्विचार उत्पन्न झाले.

पहिला विचार असा झाला की, माझे विचार कोणास सांगणे योग्य नाही. या माझ्या विचार मंदिरात इतर कोणाला प्रवेश नाही. या विचारसरणीमुळे हिंदू धर्मात संकुचितपणा आला. या संकुचितपणामुळे हिंदुधर्मातला मूळचा शहाणपणाचा अधिकारवाद मर्यादेच्या बाहेर गेला व आज तो केवळ भोगवाद झाला आहे. विचार पण माझ्या भोगासाठी, असे विनोबांचे हिंदुधर्माबद्दलचे निरीक्षण आहे. अशा वृत्तीमुळेच आमच्यात आत्मघातकी व आत्मवंचनात्मक प्रवृत्ती निर्माण झाली, असे प्रा. बेलसरे यांच्या लिखाणातून जाणवते.

वरील तात्त्विक विकृतीचा परिणाम, गेल्या ८००-१००० वर्षांच्या गुलामगिरीचा काळ, मुसलमानी अंमल, इंग्रजांची सत्ता या काळांतील राजसत्तेपुढे भारतीयांमध्ये दिसून येणारी स्वार्थी वृत्तीची चढाओढ व पुरोहित मंडळींनी स्वार्थासाठी (तत्त्व सोडून) कर्मकांडाचा केलेला व्यापार या गोष्टी देखील तितक्याच संस्कृतीच्या ऱ्हासास कारणीभूत आहेत. अशा संबंधीचा मजकूर - 'शोध स्वामी विवेकानंदांचा' ले. दत्तप्रसाद दाभोळकर या पुस्तकात पान १३३ वर दिसून येतो. लेखक म्हणतो. ''१२ व्या शतकाच्या कालखंडात एकीकडे राजसत्ता अशा राजांच्या हाती केंद्रीभूत झाली होती की, ज्यांचा धर्म निराळा होता, ज्यांच्या चाली रीती भिन्न होत्या, दुसरीकडे समाजशासकाच्या मानाच्या जागेपासून पुरोहित शक्तीचे समूळ उच्चाटन झाले होते. या कालखंडात मनू आदींच्या धर्मशास्त्रांची जागा कुराण व त्यांतील नियम यांनी घेतली. फारशी आणि अरबी भाषांनी संस्कृतचे स्थान घेतले. ब्राह्मणशक्तीचे अवशेष म्हणून राहिलेले पुरोहित विवाहासारखे सर्वसामान्य संस्कार चालवून आपली उपजीविका करू लागले.

ब्राह्मण शक्तीला पायदळी तुडविल्यावर मुसलमान राजांना मौर्य,

गुप्त, आंध्र आणि क्षत्रिय कुळातील सम्राटासारखे वैभव प्राप्त करून घेणे शक्य झाले.

पुरोहित शक्ती मुसलमान अंमलाखाली कायमची झोपी गेली. या कालखंडात खरा विरोध राजा आणि पुरोहित यांच्यात नव्हता तर राजा-राजांमध्ये होता. या काळाच्या शेवटी जेव्हा हिंदू सत्तेने आपले डोके पुन्हा मराठा व शीख यांच्या साहाय्याने वर काढले, तेव्हा त्या कार्याशी पुरोहित शक्तीचा संबंध होता, असे आपणास आढळत नाही.

अशा रितीने या दोन शक्तींमधील दीर्घ आघात-प्रत्याघातानंतर या भारतभूमीवर सरतेशेवटी राजसत्तेचा विजय झाला आणि भारतीयांच्या धर्माहून सर्वस्वी भिन्न असा धर्म असलेल्या परकी राजांच्या हाती अनेक शतके ती सत्ता टिकली. या मुसलमानी कालखंडाच्या अखेरीस एका अभिनव शक्तीचा या देशाच्या राजकीय क्षितिजावर उदय झाला आणि भारताच्या कारभारात हळू हळू तिने आपली सत्ता प्रस्थापित केली.

ही शक्ती इतकी अभिनव होती की तिचे स्वरूप व कार्यपद्धती भारतीय मनाला पूर्ण परकी होती. तिचा उदय इतक्या अतर्क्य रीतीने झाला आणि तिचे बळ इतके अजिंक्य होते की, अजून तिची अधिसत्ता चालू असली तरी मूठभर भारतीयांनाच या शक्तीचे स्वरूप काय आहे, हे कळले होते. इंग्लंडने जो भारताचा ताबा घेतला त्याबद्दल मी बोलत आहे.''

वरील स्वामी विवेकानंदांचे वास्तव निरीक्षण 'उद्बोधन' नावाच्या बंगाली मासिकात मार्च १८९९ च्या अंकात 'आधुनिक भारत' या लेखात वर्णिले आहे.

चार्वाकाच्या विचारांचा प्रभाव -

भारतीय संस्कृतीच्या सनातन धर्माच्या इतिहासात डोकावून पाहता, चार्वाकाच्या विचारांचा प्रभाव १००० ते १०५० वर्षे एवढ्या मोठ्या कालावधीत दिसून येतो. वरील राजवाड्यांच्या संदर्भीय लेखातून असे

जाणवते की, या काळांत समाजाची आस्तिक्य बुद्धी अस्तास गेली. ज्या चातुर्वर्ण्य समाजरचनेने व्यक्तीला कुल, जाती, देश, वर्ण व आश्रम यांच्या धर्माशी सन्नद्ध केले होते, त्याउलट चार्वाकांनी पाखंडमताचा प्रसार केला व यज्ञकर्म लोप पावले. समाजाने चार्वाकांच्या सुखवादाला अधिक प्राधान्य दिले व त्याला स्वधर्माचा विसर पडल्याचे दिसून येते. त्याच्या जीवनाकडे बघण्याच्या सोप्या तत्त्वाला समाज भुरळून गेला. त्याचे साधे तत्त्व होते.

यावज्जीवं सुखं जीवेत् ऋणं कृत्वा घृतं पिबेत् ।
भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुत: ।।

अर्थ - आयुष्य आहे तोपर्यंत सुखाने जगावे, कर्ज काढूनही तूपरोटी खावी. एकदा देहाची राख झाल्यावर कोण परत येणार? याचबरोबर चातुर्वर्ण्यातील प्रत्येक व्यक्ती पुत्रधर्म, कुलधर्म, जातिधर्म, वर्णधर्म, आश्रमधर्म व देशधर्मांनी बांधलेली असता संस्कृती व धर्म टिकून राहण्यास मदत होते व ते दुर्भेद्य होतात. ही संस्कृती व हा धर्म कशाने सुभेद्य होईल, याच्या शकला चार्वाकादि पाखंड्यांनी काढल्या. वेदादिग्रंथांवर, स्वपिरावर, स्वगुरू (म्हणजे ब्राह्मण) व स्वदेशावर वैदिक धर्मीयांची परम श्रद्धा आहे, असे त्यांनी पाहिले, तेव्हा ही श्रद्धा ढासळविण्याकरिता वेदादिग्रंथांची, त्यांतील मतांची, ब्राह्मणांची व यज्ञकर्माची थट्टा व उपहास करण्याचा अप्रतिम मार्ग त्यांनी शोधून काढला.

पशुश्चेन्निहत: स्वर्गे ज्योतिष्टोमेन गच्छति ।
स्वपिता यजमानेन तत्र कस्मान्न हिंस्यते ।।
न स्वर्गो नापवर्गो वा नैवात्मा पारलौकिक: ।
नैव वर्णाश्रमादीनां क्रियाश्च फलदायका: ।
अग्निहोत्रं त्रयो वेदास्त्रिदंडो भस्मगुंठनं ।
बुद्धिपौरुषहीनानां जीविकेति बृहस्पति: ।।

या विचाराने समाज मोहित झाला. ज्यामुळे ब्राह्मणांचा दाब नाहीसा झाल्याने क्षत्रिय स्वैराचरणी झाले व शूद्र उन्मत्त झाले. शूद्रांचा सल्ला

क्षत्रिय घेऊ लागले व शूद्र स्त्रियांशी लग्न करून त्यांची प्रजा राज्यारूढ होऊ लागली. याच काळात महानंदी राजाने शूद्रेच्या पोटी झालेल्या नंद नामक पुत्रास राज्यारूढ केले. याने तत्कालीन क्षत्रियांना नामशेष करून टाकले. यज्ञक्रियेचे, ब्राह्मणांचे व चातुर्वर्ण्याचे पुरस्कर्ते जे क्षत्रिय तेच हतप्रभ झाल्यावर सनातन धर्म व चातुर्वर्ण्य यांचे फार हाल झाले. यज्ञक्रिया बंद पडल्याने वेदांची ओळख बुजली, आस्तिक्यबुद्धि लयास गेली व सनातन धर्म साफ बुडतो की काय अशी शंका येऊ लागली.

यावरून असे जाणवते की, स्वार्थ व सुखलोलुप जीवनप्रणालीचा प्रभाव अधिक वाढत गेला व स्वधर्माचा व स्वकर्माचा विसर पडत गेला.

चार्वाकाचे नास्तिकवादी तत्त्वज्ञान व सुखाच्या कल्पना याबरोबरच त्याने अपेक्षिलेले नीतिनियम, कृषिक्षेत्राला प्राधान्य याकडे समाजाने दुर्लक्ष केले व त्याच्या तत्त्वज्ञानाचा सोयीने स्वार्थासाठी उपयोग करून घेतला. इतके असूनही भारतीय दर्शनकारांनी चार्वाक दर्शनाला गौण मानले नाही. त्याच्या तत्त्वज्ञानाचा समावेश भारतीय दर्शनात करून घेतला. यावरूनच भारतीय संस्कृतीचे विशालपण व व्यापकता लक्षात येते.

भक्तिमार्गातून निर्माण झालेले कर्मकांड -

भारतीय संस्कृतीचा प्रारूप आराखडा हा उपनिषदे व भगवद्गीतेतील तत्त्वज्ञानानुसार तयार झालेला आहे. ज्यामध्ये ज्ञान, कर्म, भक्ती व योग मार्ग यांनी अंतिम ध्येयाप्रत व्यक्ती जाऊ शकते असे म्हटले आहे. भक्तिमार्गाचा विचार करताना व्यावहारिक पातळीवर भागवत पुराणाचे अवलोकन करणे गरजेचे वाटते. कारण याच भागवतांतील तत्त्वज्ञानावर संतांची विचारसरणी असून ज्यामुळे महाराष्ट्रात हिंदू धर्म व हिंदू संस्कृती टिकण्यास मदत झाली. पण त्याचबरोबर भागवत पुराणकाळांतील भक्तिमार्गाच्या तऱ्हेने उच्चशिखरावर असलेल्या भारतीय संस्कृतीला अपकर्षाचा काळ सहन करावा लागला.

भागवत धर्म सर्वसमावेशकच आहे. त्याचे तत्त्वज्ञान अगदी साधे

आहे. मनुष्याला जे कोणते तत्त्वज्ञान पटते, आवडते किंवा मानवते ते वेदोपनिषदांत प्रतिपादित निर्गुण व सगुण सर्वव्यापक परब्रह्माला किंवा परमेश्वराला मानून त्याची जो भक्ती करतो व वेदोक्त चातुर्वर्ण्यप्राप्त कर्तव्य कर्मे निष्काम, निर्लोभी व प्रामाणिकवृत्तीने करून ती ब्रह्मार्पण किंवा ईश्वरार्पण करतो, तोपर्यंत तो माणुसकीने वागणारा मनुष्य आपला आहे. मग त्याचे जाति-कुल-वर्ण कोणतेही असो.

याच तत्त्वाला धरून भागवत पुराण काळातील (इ. स. २०० व इ. स. पूर्वी) भारतीय संस्कृतीचीउत्कर्षाकडे वाटचाल होत होती. याच काळात मूर्तिपूजाच सगुणाकडून निर्गुणाकडे जाण्याचा मार्ग आहे, असा खूप बोलबाला होत होता. कालगतीने याच काळात हिंदू संस्कृतीस अपकर्षाचे दर्शन झाले. याचे अत्यंत समर्पक वर्णन ''पौराणिक भागवत धर्म (उत्कर्षापकर्षाचा इतिहास)'' या ग्रंथात आहे. या ग्रंथात श्री. शं. दा. पेंडसे लिहितात, ''भगवद्गीता, ही 'ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे, ब्रह्मविद्यांतर्गत कर्मयोगशास्त्र सांगते. ज्ञान, कर्म आणि भक्ती यांचा त्यांत समन्वय होता. भागवतात त्या कर्माच्या जागी कर्मत्याग आला. परिणाम असा झाला की, भक्तीचे संन्यासात आणि नैष्कर्म्याचे निष्क्रियतेत पर्यवसान झाले आणि भागवत पुराण ''परमहंस संन्याशांची संहिता'' होऊन कर्मयोग दुर्लक्षित झाला.

वर्णप्राप्त सामाजिक कर्तव्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संन्यास वैराग्ययुक्त भक्तीचे नंतर तांत्रिक भक्तीत आणि मूर्तिपूजेत पर्यवसान झाले. मूर्ती म्हणजे ईश्वर समजून त्याच्या पूजेचे अवडंबर इतके वाढले की, त्याने यज्ञाच्या अवडंबरालाही मागे टाकले. अकराव्या स्कंधाच्या २७ व्या अध्यायात श्रीकृष्ण म्हणतात ''न ह्यन्तोऽनन्तपारस्य कर्मकाण्डस्य चोध्दव'' पूजेच्या या कर्मकांडाला अंतपार नाही. यज्ञातील कर्मकांडाला हसता हसता भक्तियोगातही मूर्तिपूजेचे मोठे कर्मकांड सिध्द झाले. सर्वव्यापक परमेश्वर मंदिरात येऊन शिलामूर्तीइतका संकुचित झाला.

भूमात्रात असणाऱ्या निराकार अव्यक्त भगवतांची कर्तव्यकर्मांनी होणारी गीतेतील भक्ती मागे पडली आणि सामाजिक कर्तव्यकर्माकडे दुर्लक्ष करणारी जड मूर्तीची तिलाच परमेश्वर समजून पूजा चालू झाली. प्रचंड मंदिरे आणि त्यांतील मूर्तींची नानाविध भोग चढवून ऐश्वर्ययुक्त उपचारांनी केली जाणारी अहर्निश पूजा यांना महत्त्व आले. जिवंत दरिद्र नारायण बाजूला पडले आणि घरादारांत तांत्रिक मूर्तिपूजा लोक करू लागले. मूर्तिपूजा ही केवळ ध्यानाकरता केलेल्या ईश्वराच्या प्रतीकाची आहे, हे जेव्हा विसरले जाते आणि मूर्ती म्हणजेच परमेश्वर बनतो तेव्हा खरा सर्वव्यापक परमेश्वर गुप्त होऊन मूर्तिपूजेचा विपर्यास होतो.

ईश्वराचा देहधारी अवतार असणाऱ्या श्रीकृष्णाच्या भक्तीचे व सत्संगाचे महत्त्व सांगत असताना श्रीकृष्णाच्या गोकुळातील बाललीलांचे अद्भुत रसात्मक वर्णन कवी करू लागले. त्यांतील रूपकात्मक काव्य लोक खरेच समजू लागले. बाळकृष्णाने तरुणाचे रूप घेऊन व जितक्या गोपी तितकी रूपे धारण करून गोपींबरोबर रासक्रीडा केली आणि गोपी त्याच्याशी जारभावाने रमल्या, याची मोठी रसाळ वर्णने भागवतादिपुराणे करू लागली. त्यामुळे भागवत धर्माचे शृंगार रसात पर्यवसान झाले. राधाकृष्ण सांप्रदाय कित्येक प्रदेशात भरभराटीला आला. पांचरात्रागमाच्या ज्ञानामृतसार संहितेसारख्या संहितेतून राधाकृष्णांच्या कामलीलांची वर्णने येऊ लागली. शृंगारप्रिय लोकांना भक्तिमार्गात आणण्यासाठी जरी ही शृंगारिक वर्णने केलेली असली, तरी त्याचा परिणाम मात्र उलटा झाला. राधाकृष्णाच्या नावाखाली शृंगाराची हौस राजरोस भागवण्याची सोय या कथांनी करून दिली आणि व्यभिचाराचे अप्रत्यक्ष समर्थन करता येऊ लागले. जारभावाने परपुरुषाशी चाललेली गोपिकांची रासक्रीडा यामुळे भक्तीपेक्षा शृंगारभावनाच उत्कट होणे स्वाभाविक आहे. हीच तऱ्हा तीर्थयात्रा, तीर्थक्षेत्री जाऊन श्राद्ध करणे व ब्राह्मणांची सहस्त्र भोजने घातल्याने पितरांना शांती मिळते अशा कल्पना दृढ झाल्या व स्वकर्म

आणि स्वधर्म विसरून यालाच धर्म असे लोक समजू लागले.

राज्य करणारे मंत्रीगण देखील याला अपवाद ठरेनात. यादवकाळी हेमाद्रीसारख्या मंत्र्याने व्रतखंडासारखा ग्रंथ लिहून व्रतांचे व श्राद्धांचे समर्थन केल्याचे दिसते".

वरील श्री. पेंडसे यांच्या विश्लेषणावरून असेच जाणवते की, पुरोहित वर्गाच्या स्वार्थी अभिलाषेतून कर्मकांडाच्या प्रसाद व शृंगारिक वर्णनामुळे वाढत गेलेली विषयवासना समाजास भोगवादी बनवण्यास समर्थ ठरली. येथे भारतीय संस्कृतीतील चेतन किंवा जड तत्त्वाचा म्हणजेच अध्यात्माचा विचार बाजूला पडला. याला सर्वस्वी समाजमन जबाबदार असल्याचा निष्कर्ष निघू शकतो. मग आम्हीच नाही का संस्कृतीला उतरणीला लावले ?

विचार करायला लावणारी गोष्ट म्हणजे आजच्या तंत्र-वैज्ञानिक नव्या २१ व्या शतकातील जगात मानवातील परस्पर संबंधांची व संवादांची संरचना बदलत असताना देव आणि भक्त यांच्यातील नातेही आमूलाग्र बदलत आहे.

उद्योग आणि व्यवसायाची मक्तेदारी असलेल्या 'ब्रँड' आणि 'इमेज' या संकल्पना आता देवाच्या दारीही सेवेकरी म्हणून द्वारपालासारख्या उभ्या राहिल्या आहेत. ग्राहकांच्या मनांत कृत्रिम गरजा निर्माण करून आपापला माल खपण्याची धंदेवाईक क्लृप्ती आता देवस्थान चालवणाऱ्या नवउद्योजकांनीही आत्मसात केली आहे. खप वाढवण्याचे 'टार्गेट' जसे ठरवून दिले जाते, तसे भक्त वाढवण्याचे उद्दिष्ट ठरवून दिले जाते. अध्यात्माला, भक्तीला झाकोळून टाकणारी विवेकहीन समाजाची देवताशरणवृत्ती परागतीचं लक्षण आहे, हे ज्ञानोबा तुकारामांच्या महाराष्ट्राला कळू नये, एवढे गारुड देवाच्या नावाने लोकांच्या मनावर केले जात आहे.

यावरून असे जाणवते की, प्राचीन काळी किंवा सांप्रतकाळी स्वार्थी व व्यापारी म्हणजे तमोगुणाचे प्राबल्य समाजात वाढते, तेव्हा भारतीय

संस्कृती उताराकडे झुकलेली दिसते. प्रत्येक शतक वा दोन शतकांनंतर एखादी व्यक्ती किंवा राज्यशासन असे येते की, या तमोवृत्तीचा प्रादुर्भाव कमी होऊन खऱ्या भारतीय संस्कृतीचे दर्शन होते.

येथे धर्म, धार्मिक नैतिकता व संस्कृती यांतील सूक्ष्म व मूलभूत फरक जाणून घेतला पाहिजे. कर्मकांडाचे उदात्तीकरण व स्तोम, देव व देवळांचा वाढता प्रसार व प्रभाव यांची संस्कृतीवर दिसून येणारी सरमिसळ ही भारतीय संस्कृती विज्ञानापासून किती अलग आहे हे लक्षात येते आणि त्यामुळेच असे समीकरण मांडले जाते.

आज ९८-९९ टक्के लोक धर्मपालन व कर्मकांड करतात व १-२ टक्के लोक धर्मपालन करणारे असतात. आज तरी आणि प्राचीन काळीही धर्मनिष्ठ लोक दोन पातळ्यांवर जगत असतात. एका पातळीवर उच्च तत्त्वज्ञान, कर्मकांड, उदात्तता, शीलमहत्त्व इत्यादी उपदेश करतात आणि रोजच्या व्यवहारांत लबाडी, फसवणूक, विश्वासघात दिसून येतो. म्हणून संस्कृती आमचा नाश करते हे म्हणण्याऐवजी आम्ही तिला विकृत करीत असतो असे म्हटले पाहिजे.

परकीय आक्रमण व गुलामगिरी -

इतिहासाचे अवलोकन करताना असे जाणवते की, भारतात इस्लामी आक्रमणाअगोदर, भारतातील चातुर्वर्ण्य समाजरचनेत कलीच्या प्रवेशानंतर जी बेदिली माजली व प्रत्येक वर्ण धर्मभ्रष्ट झाल्याचे दिसून येते, याचे सविस्तर वर्णन, श्री. वि. का. राजवाडे यांच्या लेखात स्पष्ट झाले आहे. ते लिहितात, ‘‘ब्राह्मणवर्ण धर्मच्युत होत असलेला दृष्टीस पडतो. साधारण शके १२४० मध्ये दक्षिणेस मुसलमानांचे पुन: एकदा राज्य आले. ह्या कालात ब्राह्मण, क्षत्रियांची जी दैना झाली. ती सांगता पुरवत नाही. शके १३५० च्या सुमारास एकही क्षत्रिय संस्थानिक राहिला नाही. सर्व खालसा झाले. हिंदू माणसाला नेऊन मुसलमान सुंतेची दीक्षा बलात्काराने देऊ लागले. देवळे मोडली, देव फोडले गेले. बायका भ्रष्ट केल्या गेल्या.

साधुसंत छळले गेले. ब्राह्मणांना स्वधर्म चोरून पाळणे आले आणि क्षत्रियांचे शौर्य वांझ झाले. चातुवर्ण्य संस्थेला उतरती कळा आली. वैश्यवर्ग नागवला गेला. अतिशूद्रांपैकी, खाटिक, तांबोळी, चांडाळ हे मुसलमान झाले. मराठ्यात एक भाऊ हिंदू तर दुसरा मुसलमान दिसू लागला. काजी न्यायासनावर बसला आणि खाटीक बलुतेदार झाला. घाटांचे दर्गे बनले आणि राउळांचे महाल. धर्म केवळ लोपून गेला. अशी मुसलमानी अंमलात धर्माची व संस्कृतीची हैराणगत झाली. फार काय सांगावे, ब्राह्मण दावलमलिकादि पीरांना भजू लागले. ही धर्मभ्रष्टतेची परा सीमा झाली. कित्येक अग्निहोत्री पीरांचे मुजावर झाले. ब्राह्मण बहुतेक साफ बुडाले.

हिंदू धर्म व हिंदू संस्कृती पूर्ण लयाला जाते की काय ? असे चित्र निर्माण झाल्याचे दिसते.

धर्मभ्रंशाच्या मुळाशी ब्राह्मणच होते. ब्राह्मणच स्वधर्मभ्रष्ट झाले, म्हणजे क्षत्रियही स्वधर्म भ्रष्ट होतो आणि सर्वत्र कली मातती. जगामध्ये कली मातला, कली मातला, असा विलाप हजारो साधुसंतांनी केला आहे, याचा अर्थ वरील समाजमनात दिसून येतो.

याच लेखात राजवाडे यांनी असे नमूद केले आहे की, जर भरतखंडात व महाराष्ट्रात त्या काली भक्तिमार्ग नसता, तर अफगाणिस्थान, इराण वगैरे देशांतल्याप्रमाणे या देशातील सर्व प्रजा एकवर्णी मुसलमान झाली असती आणि आर्य संस्कृती, आर्य सारस्वत, आर्य चातुर्वर्ण्य हया जगातून समूळ उच्छिन्न झाले असते. इराणातील सर्व प्रजा मुसलमान झाली असता चारशे पाचशे पारशी आवेस्ता घेऊन जसे भरतखंडात पळून आले, तसा शोचनीय प्रकार झाला असता. बिचाऱ्या निराश्रित पारश्यांना सात्विक भरतखंड तरी होते !

संतांची अतुलनीय कामगिरी -

वरील इस्लामी अमलात भारतीय संस्कृती व हिंदू धर्माची किती वाताहत झाली, हे तर दर्शवितेच. पण पुढे भारतीय संस्कृती जीवित राहू

शकते का, असे प्रश्नचिन्ह उभे करते. कारण अठरा पगड जातीचे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र स्वधर्मभ्रष्ट झाले. मुसलमान बनल्यासारखेच झाले. त्यांनी सुंतेची दीक्षा पण घेतली असती, (काहीनी घेतली पण) पण त्यांच्या आड एक धोंड साधुसंतांच्या रूपांत महाराष्ट्रात होती. भांडणे, तंटे, अपेय पान इत्यादींची बजबजपुरी मातलेली पाहून या साधुसंतांनी सर्वांना सहजगम्य व सुलभ असा भक्तिमार्ग सुरू केला. भक्तिमार्ग पूर्वीही होता, पण तो ब्राह्मणांमुळे व संस्कृत भाषेमुळे अधिक असा आचरण्यास कठीण होता.

तेराव्या शतकाच्या अखेरीस ज्ञानदेव व नामदेव यांनी महाराष्ट्रातील सांस्कृतिक चळवळीला नव्याने प्रारंभ केला. प्राप्त परिस्थितीला अनुसरून त्यांनी समाजाला नवे विचार दिले. क्षुद्र देवतांचे पूजन, वर्णविषमता, कर्मकांड इत्यादींमुळे समाजात सामान्य व्यक्तीच्या विकासाला वाव नव्हता. अशा परिस्थितीत स्वधर्म, सामाजिक नीती आणि जातिभेदातीत अशी मानवतेची शिकवण देणे आवश्यक होते, त्यासाठी ज्ञानदेवांनी गीता-भाष्याच्या निमित्ताने चिद्‌विलासवाद व अजातवादाच्या आश्रयाने आपले तत्त्वज्ञान मांडले आणि समाजास निष्काम कर्मयोग शिकवला. हरि-हरात भेद नाही, देव दगडात नाही, तो सज्जनात आहे, असे स्पष्ट सांगून भूतमात्राला भगवंत मानण्यास प्रवृत्त केले. स्वोध्दारासाठी "नाममंत्र सहज सुलभ सोपारे" सांगितला. संसारात राहूनही ईश्वरभक्ती करता येते, हे दाखवून दिले. शास्त्रप्रामाण्य व समाजातील जातिव्यवस्था यांना मुळीच धक्का न लावता स्त्रिया व शूद्र यांना आपल्यात समाविष्ट करून त्यांच्या आत्मविकासाला त्यांनी वाट करून दिली. देव फक्त भावाचा लंपट असून 'याति कुळ न लगे त्याला' असे स्पष्ट बजावले. 'भेदाभेद भ्रम अमंगळ' धुऊन काढण्यात संतांना यश मिळाले आणि याचे वर्णन 'ज्ञानदेवें रचिला पाया, तुका झालासे कळस' असेच लोकांनी केले.

या साधुसंतांमुळे हिंदुधर्म व हिंदू संस्कृती बुडता बुडता वाचली.

पूज्य विनोबांनी याचे वर्णन सर्व काही बुडाले असले तरी धर्म व संस्कृतीची लंगोटी तरी शाबूत ठेवण्यात या संतांना यश आले असे केले आहे. पुढे हाच धर्म समर्थ रामदासांनी महाराष्ट्र धर्म म्हणून अधिक वृद्धिंगत केला व भक्तीबरोबर बलोपासना आचरणात आणण्यास लोकांना प्रवृत्त केले व भारतीय संस्कृतीचे पुनरुज्जीवन केले असेच म्हणावे लागते.

वरील विवेचनावरून हे लक्षात येते की, राज्यशासन हे धर्माच्या आणि संस्कृतीच्या वृद्धीसाठी किती आवश्यक असते. फक्त संस्कृतीच आमचा नाश करते हे म्हणणे योग्य वाटत नाही. म्हणूनच म्हटले आहे 'यथा राजा तथा प्रजा.' भारतीय संस्कृतीबद्दलचे परखड विचार साने गुरुजींनी त्यांच्या 'भारतीय संस्कृती' या पुस्तकात वस्तुनिष्ठ रीतीने मांडले आहेत. त्यांच्या मते भारतीय संस्कृतीचा मूलभूत पाया हे अद्वैत तत्त्वज्ञान आहे. श्री. शंकराचार्यांनी महत् प्रयासाने व समन्वयाने वैदिक तत्त्वज्ञानी लोकांच्या सिद्धांतांना अद्वैत तत्त्वज्ञानाच्या एका छत्राखाली आणले आणि भारतीय संस्कृतीला एक थोर मंत्र दिला. तो म्हणजे

''सहनाववतु । सह नौ भुनक्तु । सह वीर्यं करवावहै ।
तेजस्विनावधीतमस्तु मा विद्विषावहै ।
ॐ शांति: शांति: शांति: ।।''

ते म्हणतात, हा मंत्र फक्त गुरु-शिष्यांपुरता नाही. ब्राह्मणांना ब्राह्मणेतरांबद्दल व ब्राह्मणेतरांना ब्राह्मणांबद्दल दुजाभाव वाटत आहे का ? मग येऊ देत एक ठिकाणी व म्हणू देत हा मंत्र. स्पृश्य अस्पृश्य परस्परांपासून दूर आहेत का ? येऊ देत त्यांना जवळ व उच्चारू दे त्यांना हा मंत्र.

साने गुरुजी म्हणतात, मनुष्ये पतित तरी का होतात ? समाजाच्या दोषामुळेच ती पतित होतात.

''स्तेनानां पतये नमो''

अद्वैताचा विसर पडलेल्या समाजात क्रांती होत असते. शेजारी भावाला, तो रात्रंदिवस श्रम करीत असूनही राहायला नीट घर नाही.

खायला पोटभर अन्न नाही आणि मी माझ्या प्रचंड बंगल्यात रेडिओ ऐकत बसतो. ही भारतीय संस्कृती नाही. भारतीय संस्कृतीचा खून आहे. ते म्हणतात, अद्वैताला जन्म देणाऱ्या व अद्वैत जीवनात अनुभवू पाहणाऱ्या थोर संतांच्या या भरतभूमीत आज अद्वैताचा संपूर्ण अस्त झाला आहे. आम्हाला आजूबाजूचे दु:ख दिसत नाही. आमचे कान बधिर झाले आहेत. डोळे आंधळे झाले आहेत. वेदातील एक महर्षी हृदय पिळवटून सांगत आहेत, **''मोघमन्नं विन्दते अप्रचेता:**

सत्यं ब्रवीमि वध इत स तस्य ।

न अर्यमणं पुष्यति नो सखायं

केवलाघो भवति केवलादी ।''

अर्थ - 'संकुचित दृष्टीच्या मनुष्याला मिळालेल्या धान्याच्या राशी फुकट आहेत. त्याच्या घरात साठवलेले ते धान्य नसून ते त्याचे मरण साठविलेले आहे. जो भावाबहिणीस देत नाही, योग्य माणसास देत नाही, असा केवळ स्वत:पुरते पाहणारा मनुष्य केवळ पापरूप होय.'

'अवघाचि संसार सुखाचा करीन ।

आनंदे भरीन तिन्ही लोक ।।

ही भारतीय संतांची घोषणा आहे. सर्वांना सुखी व समृद्ध करण्याचा झेंडा संतांनी खांद्यावर घेतला आहे. मजुरांना पशूप्रमाणे, गुलामाप्रमाणे वागवणारे दांभिक कारखानदार, शेतकऱ्यांना पिळणारे दांभिक सावकार, कुळांना गांजणारे खोत व जमीनदार आणि या पिळवणुकीला आशीर्वाद देणारे संत-महंत हे भारतीय संस्कृतीचे उपासक नाहीत. आज संस्कृतीच्या नावाखाली मोठमोठ्या गप्पा मारणारे लोक विषमता नि:शंक पाहात आहेत. त्यांना दु:ख नाही. श्रमहीन छळणाऱ्या श्रीमंतांना त्यांचे शत आशीर्वाद आहेत. त्यांना दु:ख नाही. हे श्रीमंत किती जणांना रडवीत आहेत, इकडे त्यांचे लक्ष नसते. 'भारतीय संस्कृती' 'भारतीय संस्कृती' म्हणून गाजावाजा करणारे लोक भारतीय संस्कृतीचा वध करीत आहेत. संतांना व ऋषींना

धुळीला मिळवीत आहेत. वेदान्त व उपनिषदे यांना मूठमाती देत आहेत. भारतीय संस्कृतीचा आत्मा साम्यवादीच ओळखू शकेल. ''दरिद्रान् भर कौन्तेय'' असा महाभारतात अर्थशास्त्राचा सिद्धांत सांगितला आहे. जो दरिद्री त्याचे भरण केले पाहिजे.

साने गुरुजींचे परखड निरीक्षण मानवतेच्या दृष्टिकोनातून आले आहे. भारतीय संस्कृतीही मानवतेभोवतीच फिरत रहाते. कितीही संक्रमणे आली किंवा अतिक्रमणे आली तरी विनोबा म्हणतात त्याप्रमाणे या संस्कृतीचा गाभा कधी बदलणार नाही.

येथे समाज म्हणजे आपणच संस्कृतीचा ऱ्हास करू शकतो, याचे विवेचन साने गुरुजी यांनी केले आहे.

याच पुस्तकात भारतीय संस्कृतीच्या उदात्ततेविषयी लिहिले आहे व ही संस्कृति एकट्यापुरते न पाहता सर्वांच्याच सुखासाठी प्रार्थना करते.

'सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः' व **'कृण्वन्तो विश्वमार्यं'** (सर्व विश्व सज्जनांचे होवो) अशी अपेक्षा करते.

ब्रिटिशांचा खोटा व बदनामीकारक प्रचार -

आत्म व सामाजिक परीक्षणानंतर बाह्य कारणांचा विचार करता ब्रिटिश अमदानीतील शासनकर्त्यांनी भारतीय संस्कृतीबाबत पद्धतशीर भारतीयांच्या मनात संभ्रम निर्माण करण्यास हातभार लावला व त्यात ते बरेच सफलही झाले. याचे सविस्तर वर्णन श्री. धर्मपाल यांनी अथक प्रयत्नांनी लिहिलेल्या ''Despoliation and defaming India'' या पुस्तकात केले आहे. धर्मपाल यांच्या मतानुसार ब्रिटिशांनी या देशाविरुद्ध एक धर्मयुद्ध पुकारले होते. या धर्मयुद्धात त्यांनी येथील शिक्षण, राज्यकारभार, संस्कृती इत्यादीशी निगडित असलेल्या संस्था पद्धतशीरपणे नष्ट केल्या व त्यांच्या जागी स्वतःच्या देशातील संस्था लादल्या. त्यावेळी जगात एक उन्नत असलेली भारतीय संस्कृती एका छोट्या देशाकडून किती भ्रष्ट होऊ शकते, हे दाखवून दिले. श्री. धर्मपाल यांनी असे निदर्शनास

आणून दिले आहे की, ज्यांना ब्रिटिशांनी जिंकले, त्यांना समूळ नष्ट केले नाही, तरी त्यांची संस्कृती नष्ट केल्याशिवाय ते कधीच राहिले नाहीत. भारतात त्यांना हे पूर्णपणे साध्य झाले नाही. याच पुस्तकात धर्मपाल निश्चयपूर्वक व आग्रहाचे प्रतिपादन करतात की, ब्रिटिशांनी भारतीयांमध्ये स्वत:बद्दल तिरस्कार निर्माण करण्यात आणि सांस्कृतिक मूल्यावर खोट्या प्रचाराचा मारा करून, जगाबरोबर येथील अभिजन वर्गाची मते कलुषित करण्यात व बुद्धिभेद करण्यात बरेच यश मिळवले. हे काम त्यांनी तीन लोकांकडून तीन तऱ्हांनी करून घेतले.

१) **विल्बर फोर्स** - हा ब्रिटिश संसदेचा सभासद. याने हिंदू जनता मागासलेली असून तिचा ख्रिश्चन झाल्याशिवाय उद्धार होणार नाही असे सांगून तेथील संसदेत, ख्रिस्तीधर्मप्रचारास कायद्याने मान्यता प्राप्त करून घेतली व धर्मप्रसार करण्यास उद्युक्त केले.

२) **जेम्स मिल** - हा ईस्ट इंडिया कंपनीचा नोकर. येथील लोक नैतिक व सामाजिक दृष्ट्या अति खालच्या थरावर असून इतरांची नक्कल करण्यात पटाईत आहेत. हिंदू लोक ढोंगी, लबाड, दगलबाज व अंधश्रद्ध आहेत, असा प्रचार करण्यात याचा पुढाकार होता.

३) **टी. बी. मेकॉले** हा भारतातील शिक्षणाची व्यवस्था लावणारा. याने वरील दोघांच्या तत्त्वावर अधिष्ठित अशी शिक्षण व्यवस्था असावी, ज्या योगे भारतीय लोकांची अनैतिकता, अंधश्रद्धा इत्यादीपासून सुटका होईल, या आविर्भावात शिक्षणप्रणाली आखण्याची परवानगी घेतली. पण याचा अंतस्थ हेतू वेगळाच होता. त्याने ब्रिटिश शासनास कळवले की, येथील स्थानिकांना चांगले इंग्रजी स्कॉलर करावे व त्यात मुख्य भाग येथील अभिजनांचा असावा. तो लिहितो,

"It is possible for us, with our limited means to attempt to educate the body of the people. We must to our best to form a class who may be interpreters between us and millions whom we govern, a class of persons, India in blood and colour

but English in tarte in opinions, on morals and in intellect." (PP 201-202)

वरील विचारांचा गोऱ्या साहेबांचा असा एक वर्ग तयार झाला व काही पिढ्या काही प्रमाणात टिकवण्यात ब्रिटिश सफल पण झाले.

अशा तऱ्हेने भारतीयांना त्यांच्या मूळ संस्कृतीपासून बाजूला सारण्याचा ब्रिटिशांनी प्रयत्न केला. तो काही अंशी सफलही झाला व आम्ही पाश्चात्य संस्कृतीधार्जिणे बनत गेलो. याचे प्रत्यंतर आजही येत असते.

वरील विवेचनावरून आंतर व बाह्य कारणांमुळे आम्हीच आमच्या अवनतीस कारणीभूत आहोत, असे वाटते.

अध्यात्मवाद हेच आजाराचे कारण ?

भारतीय संस्कृतीला अध्यात्मवादाचा व दैववादाचा रोग जडल्याचे निदान श्री. सुबोध यांनी त्यांच्या Culture can kill या पुस्तकात केले आहे.

भारतीय संस्कृतीचे मागासलेपण अध्यात्मामुळेच आहे हे विधान अज्ञानमूलक समजायचे का असमंजसपणाचे समजायचे, हे सामान्य माणसाच्या आकलनाबाहेरचे आहे असे वाटते. कारण हा असाध्य रोग भारतीय संस्कृतीस वेदकाळापासून लागला आहे. पूज्य विनोबांच्या मताप्रमाणे वेदकालाची कालगणना २० हजार वर्षांपूर्वीची आहे. कोणताही धर्म इतकी वर्षे टिकून राहात नसतो, असे तज्ज्ञ मानतात. पण संस्कृती टिकून राहू शकते. कारण भारतीय संस्कृतीचा आधार अध्यात्म आहे आणि हे अध्यात्म शाश्वत तत्त्वावर म्हणजेच वेदान्तांवर आधारित आहे. म्हणून हा असाध्य रोग निघून जाणे दुरापास्त आहे.

या बाबतीत विश्वविख्यात भारतीय शास्त्रज्ञ पद्मश्री श्री. डॉ. विजय भटकर काय म्हणतात, ते बघणं अधिक उपयुक्त ठरेल.

''जिथे विज्ञान संपते, तेथे अध्यात्माची सुरुवात होते असे म्हटले

जाते. याबाबत ते म्हणतात, बाहेरच्या जगताच्या ज्ञानाला विज्ञान असे म्हणतात. परंतु आपल्या आतील ज्ञानाशिवाय ते ज्ञान अपूर्णच राहते. आपल्या अस्तित्वामागची भौतिक कारणे विज्ञानातून मिळतील सुद्धा; पण त्या उत्तराने अनेकदा समाधान होत नाही. आईन स्टाईनसारख्या जग विख्यात वैज्ञानिकाने सुद्धा हे सत्य कबूल केले आहे. माणसाच्या 'जीन्स' संदर्भात सगळ्यात महत्त्वाचे संशोधन फ्रान्सिस कॉलिन्स यांनी केले आहे. कॉलिन्स हे प्रथमत: पूर्णपणे नास्तिक म्हणून ओळखले जात होते. परंतु हे संशोधन पूर्ण झाल्यावर म्हणजेच विज्ञानाच्या खोलात गेल्यावर त्यांनी 'द लँग्वेज ऑफ गॉड' नावाचे पुस्तक लिहिले. या पुस्तकात कॉलिन्सने विज्ञानाच्या मर्यादा, एक प्रथितयश आणि जागतिक कीर्ती लाभलेला शास्त्रज्ञ असून सुद्धा, प्रांजळपणे दाखवून दिल्या आहेत. तसेच निरीश्वर-वादाचाही त्याने वैज्ञानिक दृष्टीनेही खरपूस समाचार घेतला आहे. तो अत्यंत धाडसाने एका ठिकाणी वैज्ञानिकांना उद्देशून म्हणतो, 'देवावर श्रद्धा व्यक्त करायची, म्हणजे तुम्हांला वस्तुनिष्ठ भूमिकेतून भ्रामिक विश्वामध्ये जावे लागेल (a descent into irrationality) किंवा तर्काशी काडीमोड घ्यावा लागेल, असे तुम्हांला वाटत असेल, तर मी तुम्हांला निश्चितपणे सांगू इच्छितो की, जगातल्या सर्व विचारप्रणालींमध्ये निरीश्वरवाद ही सगळ्यात तर्कशून्य विचारप्रणाली आहे. (of all the possible world views, atheism in the least rational.)

त्यामुळे विज्ञान नामक सागराच्या तळाशी पोहोचलेल्या आणि महान असलेल्या व्यक्तींनी सुद्धा अध्यात्माची कास धरल्याचे अनेकदा सिद्ध झाले आहे. गणित, वैद्यकीय विज्ञान, फिजिक्समधील क्वाँटम मेकॅनिक्सचा खोलात जाऊन अभ्यास केल्यास हेच जाणवते. (Science at a very deeper level leads to only true spirituality) हे जसे विज्ञानाबद्दल खरे आहे, तसेच तत्त्वज्ञानाबद्दलही खरे आहे. कारण इ. जे. उर्विक या प्रसिद्ध ब्रिटिश बुद्धिमंताने 'दि मेसेज ऑफ प्लेटो' नावाचे

पुस्तक लिहिले. त्यात त्यांनी लिहिले आहे. उपनिषदांचा अभ्यास केल्याशिवाय तुम्हांला प्लेटो आणि सॉक्रेटिस कळणार नाहीत.

असेच पाश्चात्य शास्त्रज्ञ एर्विन श्रॉडिंगर याचे मत आहे. हा नवीन क्वॉटम मेकॅनिक्सचा जनक समजला जातो. त्याची 'श्रॉडिंगर सूत्रे' हे त्यांतील पाया समजले जातात. हा शास्त्रज्ञ वेदांती समजला जातो. त्याने संस्कृतमधून गीतेचा अभ्यास केला. त्याला अद्वैत वेदांताचा आणि क्वॉटम मेकॅनिक्सचा संबंध लक्षात आला आणि तो थक्क झाला 'तत्त्वमसि' किंवा 'तू तोच आहेस' ह्या एका वाक्यात त्याला विश्वाच्या नियमाची जाणीव झाली.

जेव्हा श्रॉडिंगर, हायझेनबर्ग, बोहर, विग्गर आईन स्टाईन सारखे पाश्चिमात्य विज्ञानाचे स्वरूप बदलून टाकणारे नोबेल पुरस्कार विजेते आधुनिक विज्ञानाचे जनक असणारे शास्त्रज्ञ, वेदांचा, उपनिषदांचा व भगवद्गीतेचा इतका मनापासून अभ्यास करतात, पण वेदांचा व आधुनिक विज्ञानाचा खराखुरा अभ्यास न करणारे बुद्धिप्रामाण्यवादी लोक अध्यात्मालाच एक असाध्य रोग म्हणतात, तेव्हा यातून अज्ञानच प्रगट होते.

आत्मतत्त्व व परमतत्त्व जाणून घेणे हे आध्यात्मिक व्यक्तीचे ध्येय असते हे तर खरेच आहे व त्यासाठी आध्यात्मिक शास्त्राचा अभ्यास व आचरण गरजेचे असते. वास्तविक अध्यात्मशास्त्रात ईश्वराधिष्ठितच असणे ही काही पूर्व अट नसते. म्हणूनच या शास्त्राची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, "जे शास्त्र माणसाला प्रापंचिक दुःखातून वर काढते आणि दुःख टाळून सात्त्विक आनंदाने कसे जगावे याचे गुपित सांगते, त्या शास्त्राचे नाव अध्यात्म आहे." ल. रा. जांभेकर. आणि हे सर्व वेदान्तातून साध्य होते.

वेदान्ताचा शब्दशः अर्थ आहे वेदांचा अंत म्हणजे वेदांचा शेवटचा भाग किंवा वेदांचे सार म्हणजे उपनिषदे. उपनिषदांत ज्ञान आणि भक्ती

आहे. नंतर भगवद्‌गीतेत कर्माबद्दल सविस्तर सांगितले आहे. त्यानंतर ध्यान आणि राजयोगही अन्य विद्यांच्या रूपाने आले आहेत. या सर्वांना वेदांत म्हणतात. आज भारतामध्ये अत्यंत प्रभावशाली असे अध्यात्मज्ञान वेदान्त म्हणून ओळखले जाते. आपण जर काळजीपूर्वक अभ्यास केला तर काही बाबतीत बौद्ध धर्म आणि जैन धर्मही वेदान्ताचे प्रतिपादन करतात. धर्म हा निरीश्वरवादी असण्याला भारतात कोणतीही आडकाठी नाही. निरीश्वरवाद याचा खरा अर्थ आहे, ईश्वर ह्या सृष्टीचा निर्माता आहे हे न मानणे. वेदान्तातील काही तपशील पाहिला तर ईश्वर हा सृष्टीचा निर्माता आहे, हे वेदान्ताला मान्य नाही. दिव्य स्वरूपातून हे विश्व निर्माण झाले. सारेच विश्व दिव्य आहे. म्हणून हे धर्म वेदान्ताचे अविभाज्य भाग होत. हाच विचार व तत्त्व प्रणाली (विश्वनिर्मितीबाबत) विज्ञानप्रतिपादित आहे.

सारांश –

वरील सर्व विचारप्रणाली व विवेचनाचा सारांश असा काढता येईल.

१) भारतीय संस्कृती अध्यात्मप्रधान असून देखील जड व चेतन किंवा प्रपंच व परमार्थ यांचा समतोल साधून जीवनाचे साफल्य मन:शांती व समाधान यातच आहे, असे सांगून त्यानुसार जीवन जगण्याची कला विकसित करते. पण इतिहासाचार्य राजवाडे यांच्या लेखाचे सूक्ष्म अवलोकन केले असता असे जाणवते की, जेव्हापासून भारतीय समाजाचा चातुर्वर्ण्य ढाचा कलीच्या प्रवेशाने विस्कळित झाला, तेव्हापासून सामाजिक प्रवृत्तीत बदल घडून समाज स्वार्थी दांभिक, लालसी, आळशी व परस्परांकडे कलुषित दृष्टीने बघण्यास प्रवृत्त झाला. तमोगुणाने भारून गेला. हीच वृत्ती परकीय आक्रमणास कारणीभूत ठरली.

इथे हे लक्षांत घेतले पाहिजे की, जेव्हा जेव्हा राज्य शासनाने मूळ संस्कृतीच्या उद्देशाला अनुसरून शासन केले व समाजाच्याच अभ्युदयाकडे लक्ष दिले, तेव्हा तेव्हा या संस्कृतीचे आदर्श दर्शन घडविले. तेव्हा सांस्कृतिक तत्त्वप्रणाली कशा तऱ्हेने समाज व शासन वापरते, त्यावरच

राष्ट्राच्या प्रगती किंवा परागतीचे भविष्य अवलंबून असते हे विसरून चालणार नाही. म्हणून संस्कृती आमच्या प्रगतीत आडकाठी आणते असे म्हणणे योग्य नसून आम्हीच परागतीस जबाबदार आहोत.

याचे प्रत्यंतर आज देखील आम्ही विद्याविभूषित म्हणविणारे स्वार्थी, दांभिक, आसक्तियुक्त प्रवृत्तीचे दर्शन घडवीत आहोत. नसता हा भ्रष्टाचाराचा डोंगर आपल्यासमोर उभा राहिला नसता.

२) भारतीय संस्कृतीत भक्तिमार्गाचा काही काळी अतिरेक झाला, हे खरे आहे पण त्याच भक्तिमार्गाने हिंदुधर्म व संस्कृती टिकवून ठेवली हे कसे विसरता येईल ? यामुळेच भारतीयांमध्ये झोपेच्या गोळ्यांचा खप सर्वांत कमी दिसतो व भारतात सुखी व समाधानाचे प्रमाण ६४% असल्याचे जागतिक अहवाल सांगतात.

३) आपण नेहमी पाश्चात्य ऐहिक सुखाशी तुलना करतो व आपण कमी प्रगत आहोत याची खंत बाळगतो. त्यांच्या सुखाच्या कल्पना ऐहिक आहेत व आपल्या सुखाच्या कल्पना आध्यात्मिक आहेत. आपण आंब्याचे झाड लावले तर त्याला पेरू येण्याची अपेक्षा कशी करायची ?

४) इतके असूनही भारतीय संस्कृतीतून निर्माण झालेले शास्त्रज्ञ इतरांपेक्षा कोणत्याही दृष्टीने कमी नाही हे भारताने दाखवून दिले आहे. फक्त यांना राज्य शासनाची व आर्थिक पाठबळाची गरज भागविणे आवश्यक असते. इथेच पाश्चात्यांत व आपल्यांत तफावत दिसून येते.

इथे हेही लक्षांत घेतले पाहिजे की, उपनिषदे वैज्ञानिक शास्त्रज्ञांचे काम करीत असत.

५) श्री. सुबोध यांच्या पुस्तकात उपस्थित केलेले प्रश्न रास्तच आहेत व सद्य:स्थितीचे दर्शन घडवितात. पण बहुतेकाचे मूळ शासनात आहे, असे वाटते. अंधश्रद्धा, रूढीपरंपरा या जरी संस्कृतीमुळे वृद्धिंगत झाल्या असे वाटत असले तरी त्या शासनाने कल्याणकारी राज्यासाठी मोडीत काढण्यास संस्कृतीने कधीच आडकाठी आणली नाही. मुळात अधिक

विचार करता कोणत्याही शासनकर्त्याला आपली जनता अधिक शहाणी व्हावी असे वाटत नसावे, असे दिसून येते. त्यासाठी शासनाची इच्छा शक्ती महत्त्वाची असते. ज्या शासनाने उद्धारांचा ध्यास घेतला, तेथे संस्कृती आडवी आल्याचे ज़ाणवत नाही.

६) लेखाच्या प्रारंभी श्री. सुबोध यांचे भारतीय संस्कृतीचे निरीक्षण व पाश्चात्य तत्त्वज्ञ डॉ. सोरोकिन यांचे तिकडील निरीक्षण दिले आहे. यावरून असे जाणवते की, आज दोन्हीकडे समाजात मन:शांती आढळून येत नाही आणि ती असल्याशिवाय विवेक येऊ शकणार नाही. यासाठी जीवनात आध्यात्मिक बैठक असणे आवश्यक असल्याचे अनुभवी सांगतात. म्हणजे ज्याला आम्ही आजार समजतो, तोच खरा उपाय आहे असे वाटते. हेच स्वामी विवेकानंदांच्या भाषणांतून आढळून येते.

८

आधुनिक आणि आधुनिकता

आज समाजाच्या दोन प्रमुख घटनांकडे लक्ष वेधले जाते. एक म्हणजे बव्हंशी व्यक्ती खिशात आयफोन घेऊन असतात व सतत कानाला तो लावला जातो. हे एक असे आधुनिक यंत्र आहे की, जे फक्त बोटाच्या स्पर्शाने सगळ्या जगाचे ज्ञानभांडार आपल्यापुढे ठेवू शकते व जगाच्या कोणत्याही कानाकोपऱ्याशी आपला संपर्क ठेवू शकते. दुसरी घटना आज समाजात वाढत चाललेल्या बलात्काराच्या, खून, मारामाऱ्या या घटना. या दोन्ही घटना अगदी टोकाच्या असल्याच्या जाणवतात. पण अगदी सूक्ष्म व सखोल विचार केला तर यांच्या मुळाशी 'आधुनिक' आणि 'आधुनिकता' असल्याचे कळून येईल, असे विचारवंतांचे मत असल्याचे जाणवते. म्हणून ही 'आधुनिक' कल्पना व 'आधुनिकता' काय आहे हे जाणून घेण्याचा हा प्रयत्न.

वास्तविक 'आधुनिक' व 'आधुनिकता' हे शब्द पाश्चात्य Modern आणि Modernity या शब्दांचे मराठी अर्थ आहेत. हा आधुनिकपणाचा वाद पाश्चात्य देशांकडूनच आपल्याकडे आला आहे. किंबहुना तो साऱ्या जगांत फैलावलेला आहे. ज्याचे काही चांगले आणि काही हानिकारक परिणाम दिसून येत आहेत. कारण हा आधुनिकपणा जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्शून जात असून त्यांत आमूलाग्र बदल घडवून आणत आहे.

हे बदल अंतरंगात व बाह्यांगात दिसून येतात. बाह्यांगातील बदल

म्हणजे कपडालत्ता, राहणीमान, दळणवळण आणि काही सांस्कृतिक परंपरा. यांत बदल झाल्यास समाजाचे फारसे नुकसान होणार नाही. पण जेव्हा अंतरंगात मूळ विचारप्रणालीवर व गुणवृत्तींवर आघात होतो, तेव्हा मानवतेवरच आघात होतो. त्याचे विश्लेषण करण्याचा एक प्रयत्न.

तसे बघितले तर समाजशास्त्राच्या दृष्टिकोनातून समाजाचे आधुनिकीकरण हा एक ठराविक उत्क्रांतीचा भाग असून तो एक सामाजिक उत्क्रांतिवाद समजला जातो. ज्यात मानवाच्या असंस्कृत किंवा रानटी अवस्थेकडून त्याच्या सुसंकृत अवस्थेकडे जाण्याची क्रिया घडत असते. यामुळे तो समाज सर्व दृष्टीने सशक्त, समृद्ध व उन्नत होतो.

आधुनिक युगाचा - विज्ञान युगाचा-उदय :

कॉन्स्टँटिनोपलचा पाडावाचा दिवस हा इतिहासातील एक फार मोठा दिवस समजला जातो. कारण याच दिवशी एका 'तमोयुगाचा अज्ञानांधकारक' युगाचा अंत झाला आणि मध्ययुग संपले. युरोपांत एक चेतना निर्माण झाली. नव्या जीवनाची आणि शक्तीची स्पंदने दृग्गोचर होऊ लागली. ह्यालाच सुप्रसिद्ध 'रिनॅसन्स' चा म्हणजेच युरोपच्या इतिहासातील विद्या आणि कला यांच्या पुनरुज्जीवनाचा प्रारंभ झाला असे समजले जाते. हे 'पुनरुज्जीवन' प्रथम इटलीत संचरले. या संचरण्यात तेथील प्रसिद्ध विचारवंत व विद्वान लिओनार्दो व्हिन्सी या गृहस्थांचा सर्वात मोठा भाग होता.

ग्रीसच्या पाडावानंतर तेथील विज्ञानी व विचारवंत मंडळी युरोपीय पाश्चात्य राज्यांत विखुरली गेली. त्यांपैकी इटलीतील हा लिओनार्दो महत्त्वाचा ठरला. त्यानेच आधुनिक भौतिक विज्ञानाला जन्म व चालना दिली.

ग्रीसच्या नानाविध ज्ञानशाखांमध्ये ज्ञानाची एक विशिष्ट शाखा होती. तिचे नांव 'Natural Philosophy' होते. म्हणजेच 'निसर्गाचे किंवा प्रकृतीचे ज्ञान.' आणि निसर्ग म्हणजे भारतीय विचार प्रणालीप्रमाणे पंच

महाभूतांचेच ज्ञान. यालाच आपण 'भौतिक ज्ञान' अथवा 'भौतिक विज्ञान'(Material Science) म्हणतो. या भौतिक विज्ञानाला प्रबल चालना तर मिळालीच, त्याबरोबर इतर ज्ञानशाखांचा विस्तार होऊन एक 'आधुनिक भौतिक विज्ञान' असे नामाभिधान तयार झाले. (हेच ते Modern Material Science) या ज्ञानाच्या शाखेने केवळ कालखंडाच्या दृष्टीने नव्हे, तर मनोवृत्तीनेदेखील आधुनिक (Modern) बनवून टाकले.

याच आधुनिक भौतिकशास्त्राच्या दोन बाजूंचे विचारवर्णन, श्री पिटरिम सोरोकीन, सुप्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ यांनी त्यांच्या 'Reconstruction of Humanity' या ग्रंथात अशा तऱ्हेने केले आहे. ते म्हणतात.

"Only through sense perception, through what we see, hear, smell, touch and so on, we apprehend reality ----- there is nothing in our mind that has previously been perceived as a were concentration of sense data ----- Logic viewed as a mere by product of sense experience, it at concentrated. the cognitive efforts of humanity on study of empirical world through observatinal experimental, statistical and Similar techniques, assisted by mathematical and syllogistic logic as a hand maid of sense perception."

''फक्त आपल्या इंद्रियांना येऊ शकणाऱ्या प्रत्ययाद्वारेच आपण जे पाहतो, ऐकतो, हुंगतो, स्पर्शतो आणि असेच जे काय करतो, त्याद्वारेच आपल्याला सत्याचे आकलन होणे शक्य असते. आपल्या मनामध्ये असे काही सुद्धा नाही की, जे आपण आधी आपल्या इंद्रियांद्वारे जाणलेले नाही. खुद्द मनाचीही कल्पना अशीच केली गेली की, ते म्हणजे इंद्रियांद्वारे आकळलेल्या वस्तुज्ञानाची केवळ एक मालिका, एक साखळी किंवा एक ऋणबद्ध परंपरा होय. --- तर्कजन्य वा अनुमानप्रमाणजन्य ज्ञान म्हणजे

इंद्रियानुभवाचीच निव्वळ एक दुय्यम, अवांतर निष्पत्ती होय. या दृष्टीनेच तर्काकडे पाहिले जाते ---- इंद्रियग्राह्य जड, भौतिक जगाचे अनुशीलन त्याने मानवाच्या ज्ञानसाधनेचे लक्ष्य मानले. निरीक्षण, परीक्षण, प्रत्यक्ष प्रयोग, आकडे शास्त्र आणि अशाच पद्धती यांच्या आधारे त्याने ज्ञानसाधना चालविली. गणितावर नि अनुमान प्रमाणावर उभारलेल्या तर्काला इंद्रियजन्य ज्ञानाचा हुजऱ्या लेखूनच त्याला ह्या ज्ञान साधनेत दिमतीस घेण्यात आले. ही विज्ञानाच्या अंतरंगाची अस्तिपक्षी Positive बाजू.

याच आधुनिक भौतिक विज्ञानाची दुसरी बाजू एक नास्तिपक्षी Negative आहे. हे त्यांच्याच शब्दात सांगावयाचे झाल्यास

"----- It denied any religious theological, or meta physical cognition of some super sensory reality (God, the soul, the ultimate reality ------ Salvation, immortality etc.) ------ it repudiated meta physics of non sensory type as an unscientific fabric of fantastic and meaningless words, divorced from any reality".

म्हणजे "(ईश्वर, आत्मा, अंतिम सत्य --- मुक्ति, अमरत्व इत्यादी) कुण्या एका अतींद्रिय सत्याच्या धार्मिक, आध्यात्मिक, तात्त्विक अशा अनुभवसिद्ध ज्ञानाचा त्याने सपशेल इन्कार केला. अतींद्रिय स्वरूपाच्या तत्त्वविद्येला त्याने हास्यास्पद, विचित्र आणि अर्थशून्य शब्दांचे नि सत्याशी संपूर्ण फारकत असलेले एक विज्ञान-विसंगत गबाळ लेखून तिचा अधिक्षेप केला."

तसे बघितले तर लिओनार्दोपूर्वी देखील साधारण बाराव्या शतकात याच विचाराचे प्रातिनिधिक वैज्ञानिक जसे रॉजर बेकन (१२१४-१२९४) काळात होऊन गेले. पण त्यांच्या मतावर आणि मनावर धर्माचा अगदी विचित्र पगडा होता. त्याच्या समकालीन वैज्ञानिकाप्रमाणेच भौतिक विज्ञानाचे ख्रिस्ती धर्माशी एकमत होईल व ख्रिस्ती धर्माचे सत्य ते प्रस्थापित करील अशी त्यांची धारणा होती. या वैज्ञानिकाच्या विरुद्ध लिओनार्दो या

तत्त्ववेत्त्याचे मत होते. त्याने कोणत्याही धर्माचा साचा अंगीकारला नाही. निसर्ग आणि नैसर्गिक नियम त्याचा ईश्वर होता. 'गणिती शास्त्रांपैकी एखादे वा यांच्यावर आधारलेले कोणतेही विज्ञान जिथे उपयोगात आणणे शक्य नाही, तिथे निश्चितपणा असत नाही,' असा त्याचा ठाम सिद्धान्त होता. 'कारण आणि कार्य यांचा अविच्छेद संबंध' हेच त्याच्या विचारसरणीचे सूत्र होते.

१५ व्या शतकांत उदयास आलेल्या या विचारप्रणालीने युरोप व जगाला 'नवी दृष्टी' 'आधुनिक वृत्ती' आणि 'आधुनिक उद्दिष्टे' साध्य करण्यासाठी 'आधुनिक पद्धती' दाखवून युरोपीय इतिहासांतील 'मध्य युगाच्या' काळोखातून 'आधुनिक युगात' आणून सोडले.

नंतरची ३-४ शतके सतत प्रगत नि वृद्धिंगत होत होत त्या 'भौतिक विज्ञानाने' स्वत:च जन्म दिलेल्या ह्या 'आधुनिक जगाला स्वत:च्या प्रभावाने' नुसते उन्नत आणि समृद्धच नव्हे तर, स्वत:च्या प्रभावाने स्वत:ची दृष्टी, वृत्ती, उद्दिष्टे नि पद्धती यांनुसार संपूर्ण 'इहलोकनिष्ठ (this worldy)' इंद्रिय केंद्री' (sensate) अर्थात भोगैकलक्षी असे पुरते 'जडवादी' (Materialist) करून टाकले.

सारांश, पंचेद्रियांना जे, जसे आणि जेवढे उपलब्ध होत असते, फक्त तेच, तसेच आणि तेवढेच सत्य होय. ही भोगलक्षी पंच इंद्रिये जिच्या अस्तित्वाची ग्वाही देत नाहीत, पुरावा देत नाहीत, ती सत्ता अस्तित्वात असणे शक्य नाही, ह्या ठाम सिद्धान्ताने तो पाया पुरता मजबूत केला. ह्या भौतिक सल्ल्यानुसार बुद्धिनिष्ठ बनून बुद्धीची कास धरून अनेक विभागांनी आधुनिक जीवनाची पराकाष्ठेची विलोभनीय टोलेजंग इमारत उभारली आणि या इमारतीच्या प्रवेश द्वारावर लावलेल्या फलकावर 'भोगार्थ-ऐहिक सुखोपभागार्थ' हे ब्रीदवाक्य कोरून टाकले.

हाच तो जडवाद किंवा Materialism आणि तो ही 'वैज्ञानिक जडवाद' (Scienticfic Materialism)

आधुनिक आणि आधुनिकता यांच्या काही व्याख्या :

आधुनिक शब्दच पाश्चात्य देशाकडून अधिक प्रमाणात वरील तात्त्विक विचारानुसारच मांडला गेल्यामुळे त्याच विचारानुसार पाश्चात्य विचारवंतांनी वेगवेगळ्या जीवनांतील क्षेत्रांच्या काही व्याख्या केल्या आहेत, त्या येथे उद्धृत करीत आहे.

I. Modernity typically refers to a post traditional, post medieval historical period and marked by the more from feudalism towards capitalism, industrialization, rationalization, the nation state and its constituent institutions and forms of surveillances. (Barkar 2005)

II. 'Modernist' denoted the renunciation of the recent past, tavouring a new beginning and he interpretation of historical origin - Delanty 2007.

III. Sociologically - In sociology a discipline that arose in direct response to the social problems of 'modernity' (Harris 2005) the term most generally refers to the social conditions, process and discourses consequences to the Age of Enlighment. In most basic terms, Anthony Gidden describe modernity as a short hand term of modern society or industrial civilisation portrayed on more detail, associates with

1) A certain set of attitude towards the world, the idea of the world, as open to transformations by human interventions.
2) A complex economic institutions specially industrial production and a market economy.
3) A certain range of political institution including nation-state and mass democracy. largly as a result of there characteristics, modernity in vastly more dynamic than previous type of

social order (Gidden 1998)

4) Of the available conceptual definitions in sociology modernity in "marked and defined by an obsession with the 'evidence' visual culture and personal visibility. (Leppert 2004)

वरील सर्व व्याख्यांचा मथितार्थ असा निघतो की, मध्ययुगीन कालखंडातून मानवतेची सुटका होऊन ती स्वत: स्वतंत्र बनली आहे. (Heidagar, yound and Hayems 2002) आधुनिकता ही मानवासंबंधी तार्किक विचार करायला लावते, नपक्षी जगण्याचा पारंपारिक विचार जो की, धर्मावर अवलंबून होता. थोडक्यात ही एक धर्माच्या बंधनातून सुटून वैज्ञानिक विचारधारेनुसार जीवन जगण्यास प्रवृत्त करते व माणसाला स्वत:च्या स्वतंत्र बुद्धीने जगण्यास शिकवते.

वरील सर्व व्याख्या या पाश्चात्य विचारसरणीनुसार आहेत. भारतीय संस्कृतीचा विचार करता व आपल्या जीवनपद्धतीचा अनुभव घेता आधुनिक व आधुनिकतेची अशी व्याख्या होईल.

''ही एक अशी विचारधारा जी गतकालातील काही संकल्पनांचा त्याग व नवीन आशादाई कल्पनांची सुरुवात, ज्यामध्ये वैज्ञानिक व मानवतावादी दृष्टिकोन अभिप्रेत असून, इतिहासातील काही संकल्पनांचा पुनर्विचार केला जातो.''

सर्वसाधारणपणे व्यवहारात 'आधुनिक' शब्द उच्चारला की, त्याला एक नकळत अहंकाराचा दर्प येतो आणि तो दर्शवितो तुम्ही किती मागास आणि 'बाबा आदमच्या' जमान्यातले आहात. पण त्यांना हे माहीत नसते की 'आधुनिक' हा शब्द आणि 'आधुनिक असणे' या संकल्पनेशी दोन महान मूल्ये जोडलेली आहेत. प्रथम म्हणजे आपले मन आणि दृष्टिकोन विज्ञाननिष्ठ असावेत. आधुनिक युग हे आधुनिक विज्ञान, आधुनिक दृष्टिकोन आणि आधुनिक वृत्ती यांचा परिपाक आहे. विज्ञानात पदवी

घेतलेले लोक अजूनही दृष्टिकोनाने विज्ञाननिष्ठ नाहीत. आपल्याला कशाची गरज असेल तर वैज्ञानिक दृष्टिकोनाची आणि सत्यान्वेषी मनाची.

आधुनिक विज्ञानात विस्ताराची दोन परिमाणे आहेत. एक आहे शुद्ध विज्ञान. सत्याचा शोध घेणे, निसर्गाविषयी प्रश्न विचारणे. त्यालाच म्हणतात प्रकाश प्रदान करणारे विज्ञान (Lucifera). मानवी मन सत्याचा शोध घेत आहे. एका पाठोपाठ एक सत्ये शोधून काढत आहे. ही विज्ञानाची अत्यंत सुंदर कल्पना आहे.

विज्ञानाची दुसरी बाजू म्हणजे फलस्वरूप असलेले विज्ञान (Fructifera) होय. ते तुम्हांला विज्ञानाद्वारे प्राप्त झालेले तंत्रज्ञान, उद्योग आणि विविध उपयुक्त साधनांच्या स्वरूपात प्रकट झालेले दिसते. विशेषत: आपल्या देशातील लोक या विज्ञानाच्या फलितालाच विज्ञान समजतात.

आपल्या देशाने आज जाणून घेतले पाहिजे की, विज्ञानाची सर्वोत्कृष्ट बाजू म्हणजे विज्ञाननिष्ठ मन, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि वैज्ञानिक वृत्ती जिच्यामुळे मनुष्य तीव्रतेने सत्याचे शोधन करतो. हे ज्ञानक्षुधेचे फलित आहे आणि ज्ञान हीच शक्ती आहे. यामुळेच प्रगती साधली जाते.

गेल्या कित्येक शतकात हे सत्य आपण विसरून गेलो होतो. आपला देश अज्ञान आणि अंधश्रद्धारूपी अंधकारात बुडून गेला होता.

'आधुनिक' या शब्दातील दुसरा घटक आणि संकल्पना म्हणजे मानवतावादी दृष्टिकोन होय. 'आधुनिक' या शब्दाचे साहचर्य विज्ञान आणि अखिल मानवतावाद या सुंदर कल्पनांशी निगडित आहे. मानवाचे पंथ, जात, लिंग यांच्या आधारे विभाजन न करता त्याच्याकडे एक माणूस म्हणून पाहणे, त्याचे सौख्य व कल्याण याचा उत्कटतेने विचार करणे, या संकल्पनेत अभिप्रेत आहेत.

विज्ञाननिष्ठ मनोवृत्ती आणि मानवतावादी प्रेरक शक्ती यांच्या संयोगामुळे मानवाची सर्वांगीण उन्नती साधता येते. तुमचा मानवतावाद हा विज्ञानाशिवाय असेल तर तो बहुतांशी भावनिक स्वरूपाचा असतो. तुमचे विज्ञान जर मानवतारहित असेल तर त्यामुळे समाजातील दुर्बल वर्गाची पिळवणूक होईल. आज आपल्याला मानवाचे पराकोटीचे हित साधण्यासाठी वैज्ञानिक ज्ञान आणि वैज्ञानिक कार्यक्षमता या दोन गोष्टींची सांगड घालावी लागेल. ह्यालाच स्वामी विवेकानंदांनी वेदान्त आणि आधुनिक विज्ञानाचा मिलाफ असे संबोधिले आहे.

अशा या 'मिलाफाचे' मूर्तिमंत उदाहरण म्हणजे स्वा. सावरकर होत. रूढार्थाने त्यांना आध्यात्मिक कोणी म्हणत नसेल, पण त्यांची वृत्ती व कृती ही आध्यात्मिकच होती, हेच त्यांच्या चारित्र्यावरून दिसून येते. त्यांचे बंधू बाबाराव सावरकर त्यांना महायोगीच म्हणत असत. गीतेच्या (५/१५) व योगसूत्रातील व्याख्यांनुसार चित्तवृत्तीचा निरोध या संकल्पनेनुसार सावरकरांना योगीच म्हणावे लागेल. समर्पित जीवन व त्याग याबाबत ज्ञानेश्वरांनी 'देहबळी देऊनि साधिले म्यां साधन' असे वर्णिले आहे. तसाच त्याग सावरकरांनी कृतीने दाखवून दिला. इतकेच नव्हे तर योगसाधनेचे विचार अगदी विज्ञाननिष्ठ आहेत व बंदीशाळेत मी कुंडलिनीचा उबारा अनुभवला आहे, असे ते म्हणतात. देश व देशबांधव हाच त्यांचा ईश्वर होता व मानवता हाच धर्म होता. त्याच्यासाठीच सर्वत्याग केला ही त्यांची वास्तव आध्यात्मिक कृतीच होय. याचबरोबर त्यांनी काही कालानुसार निरुपयोगी ठरलेल्या संकल्पनांचा त्याग करण्याचा उपदेश केला.

याचबरोबर सांप्रत जगामध्ये चाललेली स्पर्धा भौतिक सामर्थ्याची होय. नैतिक वा आध्यात्मिक सामर्थ्याची नव्हे. सामर्थ्याने वरचढ, त्यालाच जगात श्रेष्ठ म्हणतात. हे वास्तव ते अधोरेखित करतात. भौतिक विज्ञानाचा प्रखर पुरस्कार करतात.

अशा या विज्ञाननिष्ठ वृत्तीचे व आध्यात्मिक कृतीचे पूर्ण हयातभर पालन व आचरण करणारी गेल्या शतकातील व्यक्ती म्हणजे स्वा. वि. दा. सावरकर. त्यांच्या जीवनाचा, तत्त्वज्ञानाचा वाङ्मयाचा अभ्यास करणारे शेषराव मोरे यांच्या 'सावरकरांचा बुद्धिवाद आणि हिंदुत्ववाद' या ग्रंथाचा समारोप करताना ते लिहितात "सावरकरांची पारंपारिक अर्थाच्या म्हणजे धर्मग्रंथ, रूढी, परंपरा यांवर आधारलेल्या धर्मावर श्रद्धा नव्हती. त्यातील तत्त्वज्ञानाचा भाग काल्पनिक स्वरूपाचा आहे, विज्ञानाने सिद्ध केलेला नाही. म्हणून सत्य म्हणून विश्वास ठेवता येणार नाही, असे त्यांचे म्हणणे होते. परलोक, ही बाबही अशीच असल्यामुळे केवळ तो मिळवण्यासाठी कोणतेही व्रत, वैकल्य, कर्मकांड, नवस, प्रार्थना वगैरे करण्याची गरज नाही. मानवाची, राष्ट्राची सेवा केली तरी चालू शकते, असा त्यांचा उपदेश होता. आजची परिस्थिती लक्षात घेऊन व एकूण मानवी हिताचा विचार करून लोकांनीच आपला 'धर्म' ठरविला पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. यालाच ते विज्ञानधर्म, उपयुक्ततावाद, हिंदुधर्म, मनुष्यधर्म आजचा खरा धर्म अशी समान अर्थाची नावे देतात. याशिवाय 'आम्हांसी धर्म ठाउका नान्य' अशी घोषणा करतात. त्यांची ही प्रखर विज्ञानवादी व धर्माविषयीचीही भूमिका निःसंशय प्रखर बुद्धिवादी होती."

आधुनिकतेतील तिसरा घटक आहे पुनरुज्जीवन करण्याचा. पारतंत्र्यामुळे आणि इतर नैसर्गिक आपत्तींमुळे आम्हांला मूळ जीवनाला चालना देणारे स्त्रोत, सत्याचा शोध घेणारे तत्त्वज्ञान व जीवन सफल करणारी जीवनपद्धती याचा विसर पडला किंवा त्यावर बरीच मलीनता साचली गेली. ती झटकून तिचे पुनरुज्जीवन करून आणि त्याची सांगड आधुनिक भौतिक सुखाशी घालून जीवन समृद्ध करण्याचा प्रयत्न करणे गरजेचे वाटते. आमची अंतर्यामी बघण्याची सवय परत पुनरुज्जीवित करण्याची वेळ आली आहे असे वाटते.

आधुनिकतेचा भारतावर परिणाम :

आधुनिकता आणि आधुनिक भौतिकवाद जेव्हा पाश्चात्य देशांत उदयास आला आणि नंतर ३००-४०० वर्षांत उन्नत झाला, त्या काळात भारत हा पारतंत्र्यात खितपत पडला होता. जुलमी इस्लामी व नंतर इंग्रजी राजवटीखाली चिरडला जात होता. अपवादाने शिवाजीसारख्या राजांच्या कारकीर्दीत थोडी फार शांती व सुखाची झुळुक येऊन गेली. नसता आमची आध्यात्मिक व सामाजिक स्थिती बिकट होऊन मूळ संस्कृती विसरण्याची वेळ आली होती. संतांच्या व भक्तीच्या प्रबोधनाने ती थोडी फार तग धरून होती. स्वातंत्र्यपूर्व दीड एक शतक तर राष्ट्रपुरुषांचे व समाजधुरीणांचे आयुष्य स्वातंत्र्य कसे मिळवावे व भारत स्वतंत्र कसा करावा आणि त्यासाठी करावा लागणारा उठाव यातच खर्ची पडले. त्यात दारिद्र्य व अज्ञानमूलकतेमुळे निर्माण झालेल्या सामाजिक समस्या, ज्यात अंधश्रद्धा, जादूटोणा व धार्मिक कर्मकांड यांमुळे भौतिक प्रगती व त्यांतून मिळणाऱ्या सुखसोई यांची फारशी कल्पना भारतीयांना नव्हती. सर्वच बाबतीत अर्धवटपणाची समाजाची स्थिती होती.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्या भौतिक जडवादाचे सुख उमजायला लागले. असे हे एकदम दृष्टिपथात आलेले सुख दोन्ही हातांनी कसे ओरबाडता येईल ही मानसिकता झाली आणि त्यातून पराकोटीचा स्वार्थ, आत्महीनता आणि नैतिकतेचे अध:पतन होऊ लागले. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी अंगीकारलेली त्यागवृत्ती भोगवृत्तीत रूपांतरित झाली. याचा परिणाम आज असा दिसून येत आहे की, महात्मा गांधी, स्वातंत्र्यवीर सावरकर, नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आपापल्या मार्गाने ब्रिटिशांच्या 'घेण्याच्या राजकारणा' विरुद्ध लढा दिला, पण स्वातंत्र्य मिळाल्यावर भारतीय नेत्यांनीही आपल्याच लोकांशी 'घेण्याचे राजकारण' सुरू करावे, ही त्यांची अपेक्षा नव्हती. आणि हे केवळ राजकीय नेत्यांचे वैशिष्ट्य आहे असे नव्हे, तर उद्योगपती, कंत्राटदार, इतकेच काय तर शैक्षणिक संस्थांचे चालकही 'घेण्याचे'

अर्थकारण करत आहेत.

ज्या देशांत घेण्यापेक्षा देण्याचे महत्त्व कळते व बेरजेचे गणित मांडले जाते, त्याच देशात सर्व नागरिक समृद्धी, शांतता, समाधान, उपभोगतात. ज्या देशांत इतरांकडून ओरबाडून घेण्याची प्रवृत्ती असते, तिथे वजाबाकी होते. सर्वांचेच सुख-शांती-समाधान वजा होते. उरतो फक्त सांगाडा. त्या सांगाड्याला महागातले महाग कपडे चढवून उंची हॉटेलात जेवायला बसवले, तरी सांगाडा अखेर सांगाडाच असतो आणि नेमके हे चित्र आज आपल्या देशात दिसून येत आहे.

अशीच आधुनिकतेच्या नावाखाली, अविवेकी व विकृत मनोवृत्ती सामाजिक सण व उत्सवांबाबत दिसून येते. याचे ठळक उदाहरण म्हणजे गणेश उत्सव. सण व उत्सवाची सामाजिक गरज कोणीही अमान्य करीत नाही. लोकमान्य टिळकांनी परकीय सत्तेविरुद्ध चेतना व एकोपा उत्पन्न करण्यासाठी घरगुती गणेश उत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले. त्याचवेळी द्रष्टे सुधारक न्या. महादेव गोविंद रानडे यांनी त्यांना सांगितले होते. ''तुम्ही हे जे करताय, त्यात तुमचा हेतू उदात्त असला तरी त्यातून नको त्या सामाजिक समस्या उभ्या राहतील. त्यामुळे पुनर्विचार करा.'' आणि तेच आज दिसून येत आहे. स्वातंत्र्य व आधुनिकतेच्या नावाखाली अप्रत्यक्ष गुन्हेगारी, व्यसनाधीनता, वर्गणी वसूल करण्याच्या नावाखाली 'खंडणी' प्रकार, बीभत्स नाच व ध्वनिप्रदूषण दिसून येते.

अशी स्थिती येण्यास काय कारण असावे, याचे खोलात जाऊन चिंतन केल्यास असे आढळते की, मानवी स्वभावातील रज व तम गुणांनी प्रमाणापेक्षा अधिक उचल घेतली आहे. हे विधान जरा सनातन पद्धतीचा विचार वाटेल, पण वास्तवता असे दर्शविते की, भारतीय जीवन विशारदांच्या मते मानवी जीवनातील धडपड, संघर्ष व उत्कर्ष ही सर्व कार्ये ज्या चार प्रेरणांनी, ज्या चार हेतूंनी चाललेली असतात, त्याच प्रेरणांवर या जडवादाने घाला घातला. ते चार प्रेरणास्त्रोत म्हणजे

१) धर्म २) अर्थ ३) काम आणि ४) मोक्ष. त्यांत अधिक आघात झाला, तो 'मोक्ष' या संकल्पनेवर. ह्या अध्यात्मरूपी परम पुरुषार्थावर व्यक्तीच्या आणि समष्टीच्या सर्व क्षेत्रातील जीवनाचे ध्येय म्हणजेच धर्म, अर्थ व काम, या पुरुषार्थांचे 'साध्य' असावयास हवे मोक्ष. त्यातील 'मोक्ष' जाऊन केवळ 'भोग' हेच धर्म-अर्थ-काम यांचे 'साध्य' वा ध्येय झाले.

सर्व धर्मांच्या समग्र शास्त्रांनी, सर्व देशकालांतील समस्त अवतारी महापुरुषांनी उद्घोषिलेले पांढरे शुभ्र, शाश्वत, चिरंतन, आनंदस्वरूप, अतींद्रिय सत्य झिडकारले आणि क्षणिक, अनित्य असे दु:ख, प्रतिक्रियात्मक इंद्रियगोचर जग माणसाच्या सर्व प्रेरणांचे एकमेव लक्ष्य म्हणून आदरिले गेले, स्वीकारले गेले. धर्म-अर्थ-काम यांचे स्वरूप बदलताच, जीवनातील यथार्थ सत्य बाजूला सरताच, व्यक्ती, कुटुंब, समाज, देशाच्या धर्म, नीती-संस्कृती-सभ्यता, साहित्य, शिक्षण, कलाप्रभृति समस्त जीवनांची मूल्येच बदलून गेली आणि 'भोग' हेच सर्व पुरुषार्थांचे साध्य झाले.

आणि या ध्येयच्युतीमुळे एकूण एक सर्वच क्षेत्रांतील जीवनाला एक विचित्र रोगट 'गती' आली आहे. या 'गतीमुळे' 'प्रगतीचा' आभास निर्माण झाला आहे. जग तसे नेहमीच बदलत असते. पण आज ते बावचळल्यासारखे, बिथरल्यासारखे व गोंधळलेले असून कोणत्या दिशेने चालले आहे, ते समजेनासे झाले आहे आणि हे सर्व त्या 'जडवादाने' होत आहे व त्याचे 'अंतरंग' आहे 'आत्महीनता' Soullessness.

आधुनिक जडवाद हा आत्मा मानीत नाही व आपण एकमेकांशी त्या आत्मतत्त्वाने बांधील आहोत, हे समजत नाही. म्हणूनच स्वार्थ व इतरांबद्दल अनास्था दिसून येते.

म्हणूनच बृहदारण्यक उपनिषदात याज्ञवल्क्य ऋषी मैत्रेयीला मानव

जीवनातील एक मूलभूत, त्रिकालाबाधित, स्वानुभूत गूढ सत्य सांगतात.

ब्रह्म तं परादाद्यो अन्यत्रात्मनो ब्रह्म वेद, क्षत्रं तं परादाद्यो अन्यत्रात्मन: क्षत्रं वेद, लोका:तं परादुर्यो अन्यत्रात्मनो लोकान् वेद, देवा: तं परादुर्यो अन्यत्रात्मनो देवान् वेद, भूतानि तं परादुर्यो अन्यत्रात्मनो भूतानि वेद,सर्वं तं परादाद्यो अन्यत्रात्मन: सर्वं वेद, इदं ब्रह्म, इदं क्षत्रं, इमे लोका, इमे देवा, इमानि भूतानि, इदं सर्वं यद् अयं आत्मा । (मंत्र १२७ बृहदारण्यक.)

अर्थ - ब्राह्मणाला आत्म्यापासून जो निराळा पाहतो त्याला ब्राह्मण मानीत नाहीत. क्षत्रियाला आत्म्यापासून जो निराळा पाहतो, त्याला क्षत्रिय मानीत नाहीत. त्याचप्रमाणे लोक, देव, प्राणिमात्र इत्यादी सर्व आत्म्यापासून जो निराळे पाहतो त्याला कोणीही मानीत नाहीत. कारण ब्राह्मण, क्षत्रिय, लोक, देव, प्राणिमात्र इत्यादी सर्व आत्माच आहेत.

आधुनिक वैज्ञानिक जडवाद येथेच चूक करतो. ''हे सारे काही त्या एकमेवाद्वितीय, सर्वस्वरूप आत्म्यापासून भिन्न मानतो,'' म्हणजेच पंच इंद्रियांना त्यांना येणाऱ्या प्रत्ययांच्या अनुरोधाने कार्य करणाऱ्या तर्कबुद्धीला माणूस आणि जग जसे प्रतीत होतात तसेच आहेत असे तो समजतो तोच त्याचा पाया आहे. तेच त्याचे 'गृहीत' आहे व तोच त्याचा ठाम सिद्धान्त आहे.

ह्या 'वैज्ञानिक जडवादाचे' हे आत्महीनतेचे तत्त्व आमच्या 'पराभवाचे' व्यक्त रूप आहे. त्याची सर्वांच्या अनुभवास येणारी अभिव्यक्ती आहे - अतृप्ती आणि त्या अतृप्तीतून उद्‌भवणारी अशांती, अस्वस्थता आणि रज व तम गुणवृत्तींमधील वाढ व त्याचे पडसाद समाजातील हिंसक घटनांमधून प्रत्ययास येत आहेत.

अशा या आधुनिक विचारसरणीचे एकीकडे जीवन सुसह्य रुचिर करू पाहणारे तर दुसरीकडे जीवन आसक्त, विषारी व असह्य करणारे व

त्याचे अपरिहार्य परिणाम. अशा विचित्र परिस्थितीत आज समाज वावरत आहे.

आधुनिक भौतिक वादाची विचारसरणी -

ही 'आत्महीनता' दूर करण्याच्या दृष्टीने आधुनिक भौतिक शास्त्रातील नवीन विचारसरणी या कामी मदतीस येऊ शकते. हे आशादायक व आश्वासक चित्र निर्माण होत आहे. गेली शेकडो वर्षे पाश्चिमात्य संस्कृतीवर प्रभाव असलेल्या जुन्या दृष्टिकोनातून सध्याची पाश्चिमात्य समाजरचना निर्माण झाली आहे आणि जगातील इतर समाजांवरसुद्धा त्याचा परिणाम झाला आहे. ह्या दृष्टिकोनामुळे अनेक चुकीच्या कल्पना, नीतिमूल्ये निर्माण झाली आहेत. उदाहरणार्थ, हे विश्व म्हणजे एक यांत्रिक प्रणाली आहे. मानवी शरीर म्हणजे देखील एक यंत्र आहे. जीवन म्हणजे अस्तित्वासाठीच संघर्ष व प्रतिस्पर्धा आहे. आर्थिक व औद्योगिक सुधारणांमधून भौतिक प्रगती साधणे गरजेचे आहे आणि विशेष म्हणजे समाजात स्त्रीचे दुय्यम स्थान आहे, ही नैसर्गिक गोष्ट आहे.

वैज्ञानिक जडवादाचा विचार हा पारंपारिक भौतिक शास्त्राच्या विचारसरणीवर अवलंबून होता. पण गेल्या शतकातील दोन मूलभूत सिद्धान्तांची म्हणजे आधुनिक क्वांटम (पुंजीवाद) सिद्धांत व सापेक्षता सिद्धांत, यांनी भौतिक शास्त्राला नवी दिशा दिली आणि उपनिषदांतील तत्त्वज्ञानाचा तसेच पौर्वात्य तत्त्वज्ञानाचा विचार करण्यास भाग पाडले. Dr. Fritjoif Capra यांच्या The Tao of Physics या पुस्तकात भौतिक शास्त्र आणि अध्यात्म याविषयीचा विचार (अनुवाद by अविनाश ताडफळे) सविस्तर दिला आहे. त्यातील काही मुद्दे येथे देत आहे. जेणे करून पाश्चात्य शास्त्रज्ञांची विचारसरणी कशी बदलत आहे, याची कल्पना येते.

१) ज्या इंद्रियगोचर अनुभवावर हा जडवाद पाया म्हणून समजला

जातो, तो पक्का नसून ठिसूळ आहे, असे आधुनिक भौतिक शास्त्र म्हणते.

२) विज्ञानाची एक बाजू सत्यापर्यंत पोचण्याची ईर्षा बाळगते, ती उपनिषदातील 'ब्रह्म' या कल्पनेच्या जवळ येत असल्याचे जाणवते.

३) इंद्रियातील अनुभवास म्हणजे व्यक्तिनिष्ठ अनुभवास हे शास्त्र मान्यता देण्याच्या तयारीत आहे.

४) या विश्वातील प्रत्येक वस्तू ही एकमेकांशी संबंधित असून ती परस्परांवर अवलंबून आहे. या सर्व वस्तू त्या एका 'पूर्णाच्या' च भाग आहेत. म्हणजेच परमतत्त्व व आत्मतत्त्वाची कल्पना मूळ धरू पहात आहेत.

५) हायझनबर्गसारख्या शास्त्रज्ञाला असे जाणवले की, आपण स्वत:बद्दल विचार न करता विश्वाविषयी विचार करू शकत नाही. म्हणजे 'पिंडी ते ब्रह्मांडी' या आध्यात्मिक विचाराला दुजोरा मिळतो.

६) आधुनिक विचारधारा असे मानते की, विश्वातील रचना ही मूलभूत प्रक्रियेतून होते. पूर्वी असे मानले जायचे की रचना व बल अस्तित्वात आहेत व बलानुसार प्रक्रिया होते.

७) आधुनिक भौतिक शास्त्र विश्वाकडे एक यंत्र म्हणून न बघता, सजीव पूर्ण म्हणून बघते.

८) जुने शास्त्रीय ज्ञान हे निश्चित व अचूक असते. परंतु नवीन विचारसरणीत हे मान्य केले गेले आहे की, शास्त्रीय कल्पना व सिद्धांत हे ढोबळ असून त्यांच्या मर्यादा असतात. विज्ञान पूर्ण व निश्चित कधीच होऊ शकत नाही. लूईस पाश्चरने याचे सुंदर वर्णन केले आहे. तो म्हणतो ''सृष्टीच्या रहस्याबाबतच्या अधिकाधिक गूढ होत जाणाऱ्या प्रश्नांच्या मालिकेची तात्पुरती

उत्तरे मिळवीत विज्ञानाची प्रगती होते.''

वैज्ञानिक जडवादाच्या विचारसरणीवर उपाय काय ?

या साऱ्या भौतिकवादाच्या मुळाशी जो जडवाद आहे, याला 'वांझ' विरोध न करता व त्याचा विनाश करण्याचा आटापिटा न करता, त्याने जन्म दिलेल्या सर्वंकष, सर्वप्रसारी, सर्वव्यापी ही 'आधुनिकतेची टाकून देण्यासारखी' आत्महीनता प्रभावीपणे व दृढनिश्चयाने दूर करणे. आत्मविरोधी व अतींद्रिय सत्यविरोधी प्रतिक्रियाजनक त्याज्य भाग टाकून देऊन त्यातील ग्राह्य भाग साक्षेपी सावधपणे घेणे. यासाठी आधुनिक भौतिक शास्त्राची विचारसरणी पाश्चात्य देशांत फलद्रूप होण्याच्या दिशेने शास्त्रज्ञांना मदत करील असे वाटते.

कारण जर ही विचारसरणी आधुनिक जडवादी जीवनाचा पाया बनली, तर 'ईशावास्यं इदं सर्वम्' रूपी अभ्युदय-नि:श्रेयससाधिका, परमशुभंकरी, सम्यक् जीवननिष्ठा म्हणून अंगीकारण्यास मदत होईल आणि धर्म-अर्थ-काम मोक्ष हे चार पुरुषार्थ प्राप्त करण्याचा प्रयत्न होईल. प्रसिद्ध जर्मन विचारवंत शौपेन हॉअरांनी म्हटल्याप्रमाणे (उपनिषदासंबंधी) "The world is about to see a revolution in thought, more extensive and more powerful than that, which was witnessed by the Renaissance of Greek Literature" ग्रीक साहित्याच्या परम अभ्युदयाने जगाच्या विचारात जी प्रचंड क्रांती घडवून आणली, तिच्यापेक्षाही प्रबळ, व्यापक नि दूरगामी क्रांती जगात लवकरच घडून येणार आहे.'' असा या उपनिषद विचारांचा प्रभाव या जडवादी जीवनातून विस्तारेल. हीच नियतीची अनाकलनीय योजना असावी.

जग बदलत आहे. कारण शास्त्रज्ञांचा ओढा पौर्वात्य अध्यात्माकडे वाढत आहे.

येथे मला खास करून नमूद करावेसे वाटते की, भारतातील एक चिंतनशील विचारवंत आणि राजकारणाचे अभ्यासक व जाणकार श्री.

सुधेंद्र कुलकर्णी यांनी Indian Express (2.9.13) या अंकात गांधी जयंती निमित्त एक लेख लिहिला आहे. ते याच सुमारास The Courage of Hope Religious and Cultural Dialogue या विषयावरील होणाऱ्या जागतिक परिषदेस इटलीत गेले असता, त्यांचा अनुभव ते लिहीत आहेत. ते म्हणतात.

"I say a new thinking is in the air in Italy and else where in Europe because this Leading Minds are increasingly Beginning to see the vacuous nature of the Economic and Political systems controling the disastrous consequences of abandoning the Ethical and spiritual Traditions of Europe and the world. In the New Popes unconventional pronouncements, they are finding an amplification of their own desire to see religion in a fresh light not in the discredited old practice of one faith proclaiming its superiority and exclusivity, But a New Eagerness to Respect and to learn from all faiths."

याच लेखात त्यांनी ख्रिस्ती धर्माचे सर्वेसर्वा सध्याचे पोप यांचे जागतिक व खास करून सध्याच्या सिरिया येथील घडामोडींबद्दल आणि एकूणच पाश्चात्य देशांतील पैसा हाच परमेश्वर व जडवादी जीवन शैली बद्दलचे मत मांडले आहे. ते लिहितात.

"Let us all fight the money idol, against and unfair system wihtout ethics in which money rules everything. To project this idolatrous system we abandon, the weakest, elderly, those who have no where to sleep safeguarding humanity is the true teaching of Jesus Christ and Mahatma Gandhi, and Pope Francis is giving this impassioned voice to this philosophy."

जग बदलत आहे. कारण शास्त्रज्ञ व धर्मगुरूंचा ओढा जडवादाकडून अध्यात्माकडे वाढत आहे. अशा या जाणीवेमुळे असे वाटते शौपेनहॉवर यांची भविष्यवाणी खरी ठरू शकते. अर्थात त्याला काही शतके जावी

लागतील.

'शुद्ध' अध्यात्माच्या संदर्भात स्वामी विवेकानंदांनी त्याचे सार खालील 'चतु:सूत्री' त व्यक्त केले आहे.

1) Each soul is potentially devine.

2) The goal is to manifest this devine within, by controlling nature, External and internal.

3) Do this either by work or worship, or psychic Control, or Philosophy by one or more or all of there and be free.

4) This is the whole of religion, Doctrines, or dogmas or rituals or books or temples or forms are but secondary details.

म्हणजे

१) प्रत्येक जीव अव्यक्त ब्रह्म होय.

२) बाह्य आणि अंतर प्रकृतीला वशीभूत करून स्वत:चे हे अव्यक्त ब्रह्मस्वरूप व्यक्त करणेच जीवनाचे परम उद्दिष्ट होय.

३) कर्म, उपासना, मन:संयम वा ज्ञान यांपैकी कोणत्याही एकाचा वा एकापेक्षा अधिकाचा वा सर्वच उपायांचा अवलंब करून ते उद्दिष्ट साधा आणि मुक्त व्हा.

४) यांतच सगळा धर्म आला. मते, वाद, क्रियाकांड, अनुष्ठाने, शास्त्रे, मंदिरे, वा इतर बाह्य गोष्टी केवळ गौण तपशिलाच्या बाबी आहेत.

आज याच बहुमोल तत्त्वांचे पुनरुज्जीवन करण्याची वेळ आली आहे.

सारांश -

१) या सर्व विवेचनातून असे जाणवते की, आज व्यक्ती व समाज द्विधा मन:स्थितीत असून गोंधळून गेला आहे. त्याचा परिणाम त्याच्या विवेकावर होऊन तो संवेदनहीन झाला असून, टोकाची भूमिका घेण्याची वृत्ती त्याच्या जीवनशैलीत उतरली आहे.

२) अध्यात्माच्या विचारसरणीला अधिक वास्तवतेत उतरवून समाज स्वास्थ्यासाठी त्याचे पुनरुज्जीवन करणे उचित ठरेल.

तात्पर्य -

जर प्राप्त जीवन सफल करावयाचे असेल तर आधुनिकता आणि अध्यात्माचे योग्य पालन करावे लागेल. जेणे करून अति टोकाचा तमोगुण टाळला जाऊ शकेल.

भारतीय संस्कृतीने याला हजारो वर्षांपूर्वी मान्यता दिली आहे. म्हणूनच वसिष्ठ ऋषींनी आनंदी जीवनाचे रहस्य कशात आहे हे सांगताना प्रभू श्रीरामास असा उपदेश केला होता.

"तू मनाने सुटलेला, पण देहाने प्रपंचात गुंतलेला, मनात आत्मज्ञान जागे असलेला पण देहाने ज्ञान नसल्यासारखे वागणारा, मनाने एका आत्मवस्तूला सत्य मानणारा आणि देहाचे बहुरंगी जग सत्य मानणारा अशी प्रपंच परमार्थाची जोड घालून, रामा तू जीवनात विहार कर."

संदर्भ ग्रंथ -

१) वर्तमान जग आणि श्रीरामकृष्ण-विवेकानंद - लेखक स्वामी शिवतत्त्वानंद

२) भौतिक शास्त्र आणि अध्यात्म - अनुवाद अविनाश ताडफळे

३) सावरकरांचा बुद्धिवाद आणि हिंदुत्ववाद - लेखक शेषराव मोरे

४) आधुनिक मानवाला उपनिषदांचा संदेश - लेखक स्वामी शिवतत्वानंद

५) Modernity - wikipedia

९

नाथ संप्रदाय व भक्तिमार्ग

ज्येष्ठांच्या चर्चेमध्ये श्री ज्ञानेश्वर महाराज हे नाथ संप्रदायाचे असून भागवत धर्मातील भक्तिमार्गाचा त्यांनी हिरीरीने पुरस्कार कसा केला ? हा विषय होता. या प्रश्नावर समाधानकारक उत्तर मिळू शकले नाही. म्हणून ते जाणून घेण्याचा एक प्रयत्न.

महत्त्वाचे घटक :

१) तात्त्विक विचारानुसार नाथपंथीयांची विचारधारा तसेच भक्तिमार्गाचे तत्त्वज्ञान.

२) ज्ञानेश्वरांचे व्यक्तिमत्त्व, कुलपरंपरा व गुरुपरंपरा.

३) सामाजिक, राजकीय परिस्थिती आणि समाज मनाचा विचार.

नाथ संप्रदाय हा मुख्यत्वे शैववादी आणि निवृत्तिमार्गाचा व संन्यस्त वृत्तीचा पुरस्कार करणारा तर भक्तिमार्ग हा वैष्णवांचा प्रापंचिक व मूर्तिपूजेला प्राधान्य देऊन प्रवृत्तिमार्गाचा अवलंब करणारा. या दोन्हींची तात्त्विक चर्चा करण्याअगोदर भागवत धर्माची सर्वसमावेशक विचारप्रणाली बरेच काही सांगून जाते. याबाबत भागवत पुराण व भागवत धर्मावर भाष्य करताना श्री. शं. दा. पेंडसे यांनी त्यांच्या 'पौराणिक भागवतधर्म' या ग्रंथात असे म्हटले आहे.

''विष्णुपुराणाप्रमाणे भागवत पुराणातील तत्त्वज्ञान सगुण-निर्गुणाचे जीव-जगत-जगदीश्वराचे अद्वैत प्रतिपादन करणारे आणि द्वैताची भ्रामकता व मायिकता सांगणारे आहे. तथापि भागवताचे वैशिष्ट्य असे आहे की,

ते अद्वैताप्रमाणेच द्वैत्यांनाही अत्यंत प्रिय आहे. भक्तिमार्गी द्वैती संप्रदायाचा तो एक प्रमाणभूत ग्रंथ आहे. भक्तीचे श्रेष्ठत्व मान्य असणाऱ्या अद्वैती, द्वैती व विशिष्ट अद्वैती तात्त्विक संप्रदायाचा समावेश होईल, अशी त्याची रचना करण्याचा प्रयत्न केला आहे.

मनुष्याला जे कोणते तत्त्वज्ञान पटते, आवडते किंवा मानवते ते द्वैती किंवा अद्वैती कसेही असले तरी जोपर्यंत, तो वेदोपनिषदांना आणि त्यांनी प्रतिपादित निर्गुण वा सगुण सर्वव्यापक परब्रह्माला किंवा परमेश्वराला मानून त्याची भक्ती करतो आणि वेदोक्त चातुर्वर्ण्यप्राप्त कर्तव्य कर्मे निष्काम, निर्लोभी व प्रामाणिक वृत्तीने करून तो ब्रह्मार्पण किंवा ईश्वरार्पण करतो, तोपर्यंत तो, माणुसकीने वागणारा मनुष्य आपला आहे. मग त्याचे जाती, कुल, वर्ण कोणतेही असो.''

म्हणून नाथसंप्रदायाची विचार व तत्त्वप्रणाली काय होती, हे जाणून घेण्यापूर्वी ईश्वर ही संकल्पना काय आहे व त्याच्याकडे कोणत्या दृष्टिकोनातून बघितले असता शिवशक्तीचा विचार केला जातो, हे सांगणे, समजणे सोपे पडेल. यासाठी खालील गोष्टींचा विचार करावा लागेल.

१) तात्त्विक विचारानुसार भक्तियोग.

२) गुरुपरंपरा व त्यांचे अनुपालन

३) कुलपरंपरा

४) सामाजिक परिस्थिती व समाजमनाचा विचार.

ईश्वर-शिवशक्ती :

ज्या पंच महाभूतांनी व तीन गुणांनी हे विश्व अस्तित्वात आले व त्याच्या मुळाशी ब्रह्म हेच ते तत्त्व आहे असे उपनिषदे मानतात, त्याच तत्त्वांचा व गुणांचा अंश या विश्वातील मानवासहित प्रत्येक वस्तूत आहे, असे भारतीय अध्यात्म मानते. पंचमहाभूतांनी बनलेले शरीर म्हणजे देह, हे जड स्वरूपाचे व त्यातील आत्मा म्हणजेच चेतना असे मानले जाते. याच देहाने त्या ब्रह्माची जाणीव करून घ्यावी, ही मानवी जीवनाची

अत्युच्च अवस्था अशी भारतीय संस्कृती मानते. याच अवस्थेला विविध शब्दांनी वर्णिले आहे, त्याला मोक्ष, चिद्विलास व तेच पूर्ण ब्रह्म किंवा बुद्धाची शून्य स्थिती.

पण या व्यवहारी जगात असे दिसून येते की, जडतत्त्ववादी व इंद्रियसुखाच्या विचारसरणीमुळे समाज सुखोपभोगाकडे अधिक वळतो व जडवाद आसक्ती व स्वार्थाकडे नेताना दिसतो. अशा समाजाला नि:स्वार्थी व कर्तव्यदक्ष बनवणे, यासाठी अध्यात्माचाच एकमेव उपाय आहे, असे भारतीय विचारवंत मानतात.

याच विचारसरणीतून ब्रह्म-ईश्वर-शिवशक्ती ही संकल्पना पुढे आली व त्या ईशप्राप्तीसाठी शैव व वैष्णव विचारप्रणाली व त्यांतून निर्माण झालेले पंथ व संप्रदाय व त्यांच्या देवता यांचा जन्म झाला आणि त्यांना प्राप्त करून घेण्यासाठी उपासना पद्धती आचरणात आल्या व त्यांनुसार जीवनाचे अंतिम ध्येय प्राप्त व्हावे ही विचारसरणी पूर्णपणे या देशात रुजली.

यासाठी ईश्वराचा थोडा विचार.

ईश्वरासंबंधीच्या तत्त्वज्ञानाचा विचार करता त्यांत तीन गोष्टी अभिप्रेत असतात. त्या म्हणजे १) तत्त्व २) हित ३) पुरुषार्थ

१) तत्त्व म्हणजे सर्व वस्तूंना अंतर्यामी रूपाने धारण करणाऱ्या ब्रह्माचे वर्णन हे ते तत्त्व होय.

२) हित - त्या ब्रह्माचे ज्ञान होण्यासाठी आचरणाचे साधन ते हित होय.

३) पुरुषार्थ - ब्रह्माचे ज्ञान झाल्यावर येणारी मुक्तावस्था म्हणजे पुरुषार्थ.

ज्ञान हा आत्म्याचा गुण आहे. आणि हे ज्ञान आत्मा व देह यांत वावरते आणि ज्ञान हेच सत्य आहे म्हणजे ब्रह्म हेच अंतिम सत्य आहे. जसे द्रव्य व त्याचे गुण वेगळे राहू शकत नाहीत, तसेच आत्मा व जीव वेगळे राहू शकत नाहीत. या दोन्हींची मिळून एक विशिष्ट एकरूपता

येते. त्याचप्रमाणे हे विश्व ईश्वराचे असून ते ईश्वरानेच भरलेले आहे. हे विश्व उत्पन्न होण्यापूर्वी ते सूक्ष्म रूपाने ईश्वरात होते. ती ईश्वराची कारण अवस्था. मग जेव्हा विश्वरूपाने दिसू लागले. ती त्याची कार्यावस्था (परमाणू किंवा त्यापेक्षा असलेल्या अणूच्या उत्क्रांतीने या दृश्य विश्वाची निर्मिती झाली.) या दृष्टीने ईश्वर हे जगाचे उपादान म्हणजे material आहे किंवा एक product आहे. आणि त्याला निमित्त त्या ईश्वराचे कारण शरीर आहे. त्याला Efficient म्हटले जाते.

म्हणजे ईश्वर हा परम पुरुष असून व्यक्तिरूप आहे आणि त्याचे शरीर शुद्ध सत्त्वाचे आहे. हे ईश्वराचे व्यक्तिमत्त्व शुद्ध सत्त्वाने भरलेले आहे व ते जगापेक्षा म्हणजे प्रकृतीपेक्षा श्रेष्ठ आहे. हा ईश्वर वैकुंठात राहतो व त्याची जी क्रियाशक्ती जी लक्ष्मी तीच या विश्वाचा व्यापार चालवते. विश्वाचा पसारा हा त्या ईश्वराची लीलाच आहे.

अत्यंत सूक्ष्म असे सर्वव्यापी परमात्मस्वरूप एकदा मानल्यावर त्याच्या बाहेर काही असणे शक्य नाही. जगामध्ये जे जन्माला येते किंवा निर्माण होते ते सूक्ष्मातूनच येते. इतकेच नव्हे तर आकाराला आलेले व कालांतराने आकार मोडल्यावर पुन्हा सूक्ष्मात जाते. म्हणून हे जड विश्व व त्याचा आधार असलेले सूक्ष्म विश्व, दोन्हींनी परमात्मस्वरूपाचा लहानसा भाग व्यापला आहे. हे दोन्ही उत्पन्न होण्यास परमात्माच कारण असला पाहिजे. असे कारण बनण्यास निर्गुण परमात्मा स्वखुषीने व केवळ खेळ म्हणून स्वत:वर मर्यादा घालतो व सगुण बनतो. सगुण परमात्म्यामध्ये मूळ परमात्मस्वरूपाची शुद्ध अवस्था असतेच. पण त्याचबरोबर लीला म्हणून अनेक होण्याची शक्ती देखील असते. सगुण परमात्मा म्हणजेच ईश्वर.

उपनिषदांच्या भाषेत असे म्हणावे लागेल की, सद् वस्तूचे कमालीचे शुद्ध स्वरूप म्हणजे परब्रह्म किंवा निर्गुण ब्रह्म होय. आता जगाचे आदिकारण बनण्यासाठी निर्गुण ब्रह्माचे असे एक रूप असले पाहिजे की,

मानवी बुद्धीच्या दृष्टीने सर्वोच्च व सर्व समर्थ आहे. ते कारण म्हणजे सगुण ब्रह्म किंवा ईश्वर होय. आणि हाच मानवी बुद्धीला आकलन होणारी सत्, चित्, आनंद, सत्य, ज्ञान व अनंत ही सर्व श्रेष्ठ मूल्ये मूर्तिमंत धारण करणारी पूर्ण व्यक्ती म्हणजे ईश्वर होय.

या ईश्वराच्या ठिकाणी परमात्म्याचा निर्लेपपणा तर असतोच; पण जग उत्पन्न करण्याची अतर्क्य शक्ती असते. तिला माया म्हटले जाते. म्हणून ईश्वर शिवशक्ति रूप आहे. एकाच ईश्वराकडे परमात्मस्वरूपाच्या बाजूने पाहिल्यास तो शिवरूप दिसतो आणि जगाच्या बाजूने पाहिल्यास तो शक्तिरूप दिसतो. शिव आणि शक्ती हे शब्द दोन दिसले, तरी वस्तू एकच आहे.

म्हणून अध्यात्मामध्ये ईश्वराचे वर्णन करताना शिवशक्ती, राधाकृष्ण, लक्ष्मीनारायण इत्यादी अभेदाने राहणाऱ्या रूपाने करतात. शिवाचा अकर्तेपणा कायम राहून, तो साक्षीत्वाने विद्यमान असता अनंत ब्रम्हांडे रचण्याचा व मोडण्याचा खेळ करतो.

अशा या ईश्वराला प्रसन्न करून घेण्यासाठी शैव व वैष्णव या तात्त्विक पंथांचा उगम झाला व त्याचेच पुढे अनेक पंथांत व संप्रदायांत रूपांतर होत गेले. अशा या शैव मत प्रणालीचा एक पंथ म्हणजे नाथ पंथ.

नाथ संप्रदायाची तत्त्व व विचारप्रणाली :

गोरक्षनाथांच्या 'सिद्ध सिद्धान्त पद्धती' या ग्रंथाचा विचार करता या नाथपरंपरेत शिव शक्तीच्या सामरस्याची कल्पना काश्मिरी शैव मतातून आल्याचे सर्व मान्य करतात. दोन पदार्थांच्या सामरस्याने निर्माण झालेले या परंपरेतील अद्वैत शैव् मतावरच अधिष्ठित झाले असून त्यास 'ईश्वराद्वयवाद' किंवा 'शांभव्याद्वयवाद' असे म्हटले आहे. तात्पर्य औषनिषद वचनांनंतर उभारलेल्या व 'शिव सूत्रांच्या' आधारे प्रतिपादिलेल्या काश्मिरी शैव अव्दैताचाच नाथ संप्रदायाने स्वीकार केला.

"इंद्रियगोचर होणाऱ्या अनंत चेतना चेतन पदार्थांनी भरून गे... या विश्वाचा अविर्भाव होण्याच्या पूर्वकाली सत् नामक एकच एक अ... तत्त्व होते. या तत्त्वामध्ये शिव व शक्ती ह्यांचे सामरस्यात्मक अद्वैत त्या... समाविष्ट होऊन राहिले होते. त्याला चैतन्यात्मा असे म्हणतात. तो आ... स्वत: या मूळ अवस्थेत निर्विकार असून जगातील सर्व पदार्थांमध्ये अ... होऊन राहिला आहे. त्यालाच चैतन्य, पराशक्ती, परमेश्वर व परम... अशी नावे आहेत. अखिल विश्वाच्या रूपाने प्रादुर्भाव होण्यापूर्वी त्या... "विश्वोत्तीर्ण" अशी संज्ञा आहे. तोच विश्वाचे उन्मीलन आपल्या ... शक्तीने करतो. त्यावेळी अन्य उत्पादक द्रव्याची गरज नसते. हे ... म्हणजे त्याचीच क्रियात्मक शक्ती."

गोरक्षनाथांच्या मते 'आदिनाथ' म्हणजे 'शक्तियुक्त शिव' आ... हेच अंतिम सत्य आहे. शक्ती ही शिवाहून भिन्न नसून तत्स्वरूपी ... आहे. पिंडब्रह्मांडाचा आधार शिव जरी असला तरी शिवातील 'इ' ... म्हणजे शक्ती, तिच्या विना शिव हा केवळ 'शव' आहे.

शिवोऽपि शक्तिरहित: कर्तुं शक्तो न किंचन ।
स्वशक्त्या सहित: सोऽपि सर्वस्याभासको भवेत् ।।

स्वशक्तीने युक्त असा शिवच सर्व निर्माण करतो, असा सि... वरील श्लोकात आहे.

२) ज्या शिवशक्तीचे तात्त्विक विवेचन वर केले आहे. त्यानुसार ... पंथाची अशी विचारधारा आहे की, '**ब्रह्माण्डवर्ति यत्किंचित् ... पिण्डेऽप्यस्ति सर्वथा ।** जे काही ब्रह्मांडात आहे, ते सर्व पिंडात आ... या सिद्धान्ततत्त्वाला अनुसरून साकार - निराकार, सगुण-नि... यापलीकडील, द्वैताद्वैतविलक्षण, सर्वातील स्वसंवेद्यता अशा परमतत्त्... नाथपदाची - प्राप्ती करून घ्यायची असेल, तर साधकास पिंडज्ञा... आवश्यकता आहे. तसेच त्यांचा विश्वास आहे की, ब्रह्मांडाला व्या... राहिलेली ही शक्ती देहात कुंडलिनी रूपाने स्थित आहे. म्हणून ...

साधक पिंडालाच या शक्तीच्या उपासनेचे साधन मानून ही कुंडलिनी शक्ती जागृत करून शिवशक्तीच्या समरसतेची सहज समाधी अनुभवणे, हेच अंतिम उद्दिष्ट मानतात.

नाथपंथीयांच्या मते - जीवन्मुक्ती ही प्रथम सिद्ध देहात आणि नंतर दिव्य देहात मिळवायची असते. अशा प्रकारचा अमर किंवा परिपक्व देह प्राप्त करून घेताना साधकाला गुरूच्या मार्गदर्शनाखाली राहावे लागते. ही विशिष्ट प्रकारची योगप्रक्रियाच असते. तिलाच 'कार्यसिद्धी' म्हणतात. या योगाग्नीमुळे सप्तधातुमय पंचमहाभूतनिर्मित शरीर दग्ध होते आणि अशा रितीने परिपक्व झालेला देही मृत्यूला पार करून जातो.

परमपदाशी समरसीकरण साधणे म्हणजेच कुंडलिनी जागृत करून समाधिस्थितीप्रत पोचणे. वैद्यकीय भाषेत कुंडलिनी म्हणजे Nerve Plexuses जे शरीरात विशिष्ट ठिकाणी असतात, त्यांच्या उद्दीपित स्थितीमुळे शरीरांतर्गत बरेच रस निर्माण होतात, ज्यांचा परिणाम मेंदूवर होतो व मनाची एक विशिष्ट अवस्था जाणवते तीच समाधी होय. अशा कुंडलिनीची जागृती १) मंत्रयोग २) हठयोग ३) लययोग आणि ४) राज योग या चार उपायांनी केली जाते. हठयोगाद्वारे कुंडलिनी जागृत करून शरीराकडून तेच शरीर नाहीसे करणे म्हणजेच पदपिंडाची गाठ होय. यालाच ज्ञानेश्वर 'पिंडे पिंडाचा ग्रासू' असे म्हणतात.

पिंडे पिंडाचा ग्रासु । तो हा नाथ संकेतीचा दंशु ।
परि दाऊनि गेला उद्देशु । महाविष्णु ।।

योग साधनेच्या द्वारे पिंडाने पिंडाला खाऊन टाकणे, हे नाथ संप्रदायाचे मर्म आहे. मात्र हे मर्म महाविष्णूंनी म्हणजे भगवान श्रीकृष्णांनी उलगडून दाखविले आहे. तसेच कुंडलिनीचे वर्णन ज्ञानदेवांनी इतर ठिकाणी केले आहे. वरील ओवीतून ज्ञानदेवांनी नाथसंप्रदायाचे हृद्गत बोलून दाखविले आहे.

येथे एक संदर्भ असाही आहे की, काश्मिरी शैव परंपरा भगवान श्रीकृष्णांना शैव सांप्रदायिक व भगवद्गीतेला शैव ग्रंथ मानते. श्रीकृष्णांना शिवनामाचा उपदेश करून शैवी दीक्षा दिल्याची महाभारतातील घटना याला बळकटी देते, असे कांही तज्ज्ञांचे मत आहे. येथे असे जाणवते की, शैव परंपरा ही या नाथसंप्रदायापेक्षा बरीच भिन्न आहे. ज्ञानदेवांची उत्तर भारतीय शैव परंपरा ही शिवोपदिष्ट तर दक्षिणेतील शैव परंपरा ही शिवोपासक व शिवपूजक समजली आहे.

गोरक्षनाथ यांच्या नाथ संप्रदायांत गहिनीनाथापासून शिवभक्तीबरोबर विठ्ठलभक्ती करून भक्तांची परंपरा सुरू झाल्यासारखे दिसते. पण येथे हे ही लक्षात घेतले पाहिजे की, स्वत: ज्ञानदेव योगविद्येत पारंगत होते. कारण त्यांनी भक्तिमार्गाकडे सर्वांना वळवण्यापूर्वी त्यांनी नाथपंथीय योगाचा अभ्यास केला होता. यामुळेच त्यांना योगविद्येतील क्लेश इत्यादींची पूर्ण कल्पना होती व त्या विद्येसाठी सामान्य माणूस कसा अयोग्य आहे हे जाणून भक्तिमार्गाचे प्रतिपादन केले.

येथे हे पण नमूद केले पाहिजे की, वैष्णवांचा भक्तिमार्ग दक्षिणेत दुसऱ्या शतकापासून उदयास येत होता. या वैष्णव पंथास भक्तीच्या दृष्टिकोनातून शैव तत्त्वज्ञानाचे फारसे वावडे नसावे. कारण विठ्ठलभक्तीतील पंढरपूरच्या विठ्ठलमूर्तीच्या मस्तकावर महादेवाची पिंड असल्याचे दिसून येते. म्हणून शैव व वैष्णव यांच्या तत्त्वज्ञानाचा भक्तिमार्गात मिलाप झाल्याचे दिसून येते.

सारांशाने असे म्हणता येईल की, शैव पंथाच्या तत्त्वप्रणालीनुसार ज्ञान हे योगमार्गेच मिळवता येते व त्यासाठी निवृत्ती आवश्यक आहे. पण शांभवी नाथपंथीयांनी त्यात भक्तीची जोड दिली आणि ती गुरुपरंपरा अंमलात आणणारे ज्ञानेश्वर यांनी गीतेच्या आधारे ज्ञानप्राप्ती ही कर्म व भक्तिद्वारे होऊ शकते, हे तत्त्व आचरण्याचा उपदेश केला व निवृत्ति मार्गाकडून समाजाला वळवून प्रपंच व परमार्थ साधण्यास उद्युक्त केले.

म्हणजे ते अमृतानुभवात म्हणून गेले आहेत की,

तसे भोग्य आणि भोक्ता ।
दृश्य आणि द्रष्टा ।
हे अफूट अद्वैता ।
मध्ये सरल ।। (अमृतानुभव ९:७)

किंवा

आता देवाला देवे ।
देवातून भजावे । (अमृतानुभव ९:४१)

असे म्हणून अंतिम अवस्थेत भक्ती, भक्त आणि देव हे निराळे राहात नाहीत असे ते सांगतात. शेवटी ज्ञान आणि कर्म दोन्हीही भक्तीत अंतर्भूत आहेत, ही कल्पना ते स्पष्ट करतात.

कोण्या एका अकृत्रिम ।
अशा भक्तीचे हे मर्म ।
योग, ज्ञान यांना विश्राम ।
स्थानच आहे ।। (अमृतानुभव ९:२१)

त्यांच्या भक्तीत ज्ञान आहे व ज्ञानात अकृत्रिम भक्ती आहे. कर्म आणि ज्ञान दोन्ही भक्तीत अंतर्भूत असलेल्या तंत्राची भूमिका ज्ञानोबा मांडतात.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी अद्वैत भक्तीच्या ४ अवस्था कल्पिल्या आहेत.

१) पहिल्या अवस्थेत भक्त दास्यभाव स्वीकारतो व अहंकाराचे विसर्जन करतो.

२) दुसऱ्या अवस्थेत तो परमेश्वराला माता पिता स्वीकारून आपल्या निष्ठा त्याला अर्पण करतो.

३) तिसरी अवस्था जीवाला परमेश्वराचा अंश आहे असे मानतो.

४) चौथ्या अवस्थेत भक्ताचा भेदात्मक भासाचा निरास होतो.

जीव, जगत आणि जगदीश्वर हा भेद जाऊन फक्त सत् चित्

आनंदरूपी परमात्माच तेवढा शिल्लक राहतो. अद्वैताप्रमाणे विश्वात्मक परमात्मा विश्वातील होऊन जातो. काश्मिरी शिवाद्वयाची आणि नाथ पंथीयांची हीच तात्त्विक भूमिका आहे. नाथपंथीय भक्तीला महत्त्व देत नाहीत. ईश्वराद्वयवादी देतात. हा अद्वैत साक्षात्कार भक्तिमयच असतो हाच चिद्‌विलास. ज्ञानेश्वरांची भक्ती या स्वरूपाची होती. काश्मिरी शैव पंथातील अभिनवगुप्तांनी हेच तत्त्वज्ञान सांगितले आहे. नाथपंथीयांनी ते भक्ती सोडून स्वीकारले आहे. ज्ञानेश्वर हे अभिनव गुप्तांच्या पावलावर पाऊल टाकून जातात.

गुरुपरंपरा -

श्री ज्ञानेश्वरांनी भक्तिमार्गाचा लळा समाजाला लावण्यास गुरुपरंपरा व त्यांच्या घराण्यांत असलेली विठ्ठल भक्ती ही बरीच कारणीभूत आहे.

भारतीय संस्कृतीमध्ये गुरूंस अनन्य साधारण महत्त्व आहे. खास करून वेदात, योगात, तंत्र आणि भक्तिमार्गात गुरू हा 'ईश्वरा' समान मानला जातो. गुरूमुळेच शिष्यास अविद्येच्या अंधारातून ज्ञानाच्या प्रकाशाने दर्शन होते, असे मानले जाते.

नाथ संप्रदायात कुंडलिनी जागृती ही महत्त्वाची क्रिया समजली जाते. षट्‌चक्रदर्शन ही तांत्रिक अवघड क्रिया आहे. अधिकारी पुरुष म्हणजे गुरू हेच मार्गदर्शन करू शकतात व साधकास सिद्धी प्राप्त होऊ शकते. अशा कुंडलिनीच्या जागृतीमुळे जेव्हा सिद्धी प्राप्त होते, त्यालाच 'शक्तिपात' म्हटले जाते. या पंथात गुरू हा मानवी स्वरूपातील ईश्वरच समजला जातो. अनधिकारी गुरू स्वत:चे व साधकाचे नुकसान करू शकतो. म्हणून अधिकारी गुरू मिळणे महत्त्वाचे असते.

गुरूचे उपनिषद काळापासून महत्त्व आहे व तसेच गुरुभक्ती व गुरु आज्ञा ही देखील तितकीच महत्वाची आहे. उपनिषदामध्ये गुरूमुळे - शिष्याची १) ज्ञानरक्षा २) दु:खरक्षा ३) सुखआविर्भाव ४) समृद्धी व सर्वसंवर्धन प्राप्त होते असे म्हटले आहे. ज्ञानदेवांची गुरुपरंपरा खूप मोठी

आहे व त्याचे वर्णन त्यांनी ज्ञानेश्वरीमध्ये स्वत:च केले आहे. ते म्हणतात,

ना आदि गुरु शंकरा । लागोनि शिष्य परंपरा
बोधाचा हा संसारा । जाला जो आमुतें ।। १८ : १७५८

आदिगुरू भगवान शंकरापासून शिष्य परंपरेने आलेला बोधाचा हा वारसा आम्हांला लाभला आहे. तसेच आपल्या दार्शनिक विचारप्रणालीचे परिपोषण ज्या नाथपरंपरेच्या गुरुबोधावर झाले, त्यासंबंधी ते म्हणतात,

आदिनाथ गुरु सकळ सिद्धांचा । मत्स्येंद्र, तयाचा मुख्य शिष्य ।
मत्स्येंद्राने बोध गोरक्षासी केला । गोरक्ष ओळला गयनी प्रती ।
गयनी प्रसादे निवृत्ति दातार । ज्ञानदेवा सार चोजविले ।।

काश्मिरी शैव पंथाचे तत्त्वज्ञान ज्ञानदेवांना त्यांचे गुरु निवृत्तिनाथांकडून मिळाले व निवृत्तिनाथांना हे तत्त्वज्ञान गहिनीनाथांकडून मिळाले. हे निवृत्तिनाथांच्या एका अभंगातून जाणवते.

निवृत्ती पुरता गुरु विवरण । गयनीची खूण आगम रूपे ।

आगम परंपरेने मुद्रांकित झालेला सविस्तर गुरुबोध गयनीनाथांनी निवृत्तिनाथांना दिला.

निवृत्ति नाथांचा संप्रदाय हा 'शांभवी' संप्रदाय. शंकरांपासून त्यांची नाथसंप्रदायाची परंपरा मानली गेलेली आहे म्हणजे शिवसंप्रदायी पण त्यांना भागवत धर्मीय गीता ग्रंथाविषयी जिज्ञासा कशी उत्पन्न झाली, याचा खुलासा ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत पुढील प्रमाणे केला आहे.

तेणें कळिकळितु भूता । आला देखोनि निरुता ।
ते आज्ञा श्रीनिवृत्तिनाथा । दिधली ऐसी ।।
ना आदि गुरु शंकरा । लागोनि शिष्य परंपरा ।
बोधाचा हा संसारा । जाला जो आमुतें ।
तो हा तूं घेऊनि आघवा । कळीं गिळितयां जीवां ।।
सर्व प्रकारीं धांवा । करी पां वेगीं ।। १८/१७,५७, ५८,५९,६०

अर्थ - त्या गहिनीनाथांनी कलिकाळ भूतमात्राला ग्रासीत आहे, हे

पाहून श्री निवृत्तिनाथांना आज्ञा केली की, आदिशंकरापासून परंपरेने आलेला, शिष्य परंपरेला रहस्यबोध करण्याचा जो हा संप्रदाय आमच्यापर्यंत आला आहे, तो संप्रदाय तू स्वीकारून, या कलीने गिळले जात असलेल्या सर्व जीवांच्या बचावाकरता वेगाने धावत जा.

ही जी आज्ञा निवृत्तिनाथांना गहिनीनाथाकडून मिळाली, ती त्यांनी त्यांचे शिष्य ज्ञानदेव यांच्याकडून अंमलात आणली.

येथे हेही जाणवते की नाथपंथामध्ये गुरू, गुरुभक्तीला जितके महत्त्व आहे तितकेच गुरुआज्ञापालनास आहे. त्याचे प्रत्यक्ष उदाहरण ज्ञानदेवांनी निवृत्तिनाथांची आज्ञा मानून भक्तिमार्गाचे समाजास प्रबोधन केले.

ज्ञानदेवांची कुलपरंपरा -

ज्ञानदेव हे कुलपरंपरेने वैष्णव होते आणि गुरुपरंपरेने शैव होते. संत नामदेवांनी त्यांचे चरित्र अभंगबद्ध करताना, त्यांच्या पूर्वजांचाही उल्लेख केला आहे. गोविंदपंत आणि निराई या ज्ञानदेवांच्या आजोबा आजींना गहिनीनाथांचा अनुग्रह होता. **गोविंदा विश्रांती गहिनीनाथ । --- निराईस प्रेम गहिनीनाथीं ।** नामदेवांच्या अभंगातून असे दाखले मिळतात. गहिनीनाथांनी गोविंदपंत निराईंना जो विठ्ठलनामाचा मंत्रोपदेश दिला, त्यांत भगवान शिवांनी उमेला जो बोध केला, त्याचेच सार साठवले होते, असा निर्देश नामदेवांनी केला आहे. ज्ञानदेवांच्या वडिलांचे नांव ‘विठ्ठल’ ठेवण्यास गहिनीनाथांचीच आज्ञा होती. विठ्ठलपंतांचे लग्न होताना ‘कुलदेव स्मरण म्हणती सावधान । उभयतांचे मन पांडुरंगी ॥ (नामदेव गाथा) असे कुलदैवताचे स्मरण करत होते असा उल्लेख आहे. शिवाय विवाहानंतर प्रथेप्रमाणे उभयतांनी पंढरपूरला जाऊन पांडुरंग दर्शन घेतले.

पितृघराण्यातील चालत आलेली विठ्ठलभक्ती होतीच आणि हाच कृपाभक्तीचा वारसा स्वभावात होताच. त्यामुळे ते गीता प्रवचनाला भक्तिभावाने प्रवृत्त झाले. त्यांच्या दृष्टीने शैव व वैष्णव हे पंथ बाह्यात्कारी

भिन्न असले तरी अंतरी एकच होते.

ज्या नाथपंथात ज्ञानेश्वर व त्यांची भावंडे सामील झाली होती, तो खरोखरी वैष्णव पंथच होय. या पंथाचे दैवत महाविष्णू व आद्यप्रवर्तक श्रीशंकर. योगाभ्यास हे या पंथाचे एक विशिष्ट लक्षण ज्ञानदेवांनी सांगितले आहे आणि त्यांच्या ज्ञानदेवीच्या प्रवचनाला श्रोतृवर्गात बरीच नाथपंथी योगाभ्यासी मंडळी असल्याने गीतेच्या ६ व्या अध्यायात योगसाधनेच्या प्रवृत्तीच्या मुळाशी निवृत्तीचेच तत्त्व आहे, असे त्यांनी प्रतिपादले आहे.

तेथ प्रवृत्ति तरूच्या बुडीं। दिसती निवृत्तिफळांचिया कोडी।
जिये मार्गींचा कापडी। महेशू आझुनी ॥ १५३॥
पैल योगि वृंदें वहिलीं। आडवीं आकाशीं निघालीं।
कीं तेथ अनुभवा पाउलीं। धोरणू पडिला ॥ १५४॥

ज्ञाने. अ.६ वा

ज्ञानेश्वरांचे व्यक्तिमत्त्व -

भारतीय समाज हा ज्ञानेश्वरांना एक अवतारी पुरुष मानतो. त्याची अशी धारणा आहे की, त्यांचे भूतलावरील अवतरण हे खास विशिष्ट कामासाठीच झाले होते व ते कार्य पूर्ण होताच त्यांनी स्वत: होऊन संजीवन समाधी घेऊन त्याची प्रचीती समाजाला करून दिली.

तरीपण त्यांचे व्यक्तिमत्त्व त्यांच्या ज्ञानेश्वरी या ग्रंथातून दिसून येते. वाल्ट व्हिटमन या कवीने म्हटले आहे की, आपण जेव्हा एखाद्या ग्रंथाला स्पर्श करतो, तेव्हा ग्रंथलेखकाच्या व्यक्तिमत्त्वालाच आपण स्पर्श करीत असतो. निर्मिती आणि निर्माता एका अर्थाने अभिन्न असतात. यावरून त्यांची भूमिका चतुर्विध दिसून येते. ते स्वत: स्थितप्रज्ञ योगी होते, आत्मानुभवी संत होते, क्रांतदर्शी तत्त्वज्ञ होते आणि यांचे अभिजात साहित्य असून एक उत्तम समाजमनाचे आकलन असणारे समाज-मानसोपचार तज्ज्ञ होते. त्या काळातील समाजाला त्याच्या गोंधळलेल्या मानसिकतेतून प्रचलित व्यवस्थेच्या अगदी दुसऱ्या टोकाला समाजाच्या

अभ्युदयासाठी नेणारे आधुनिक शास्त्रानुसार ते एक समाजशास्त्रज्ञ म्हणावे लागतील. कारण परंपरेचा विध्वंस करणाऱ्या नव्या दर्शनाकडे सामान्य माणसे सहजासहजी वळत नाहीत, याचे क्रांतदर्शी भान ज्ञानेश्वरांकडे होते. स्वत:ला अवैदिक म्हणविणाऱ्या जैन व लिंगायत या समाजाची जनमानसातून पुढे जी पिछेहाट झाली, ती पाहता ज्ञानेश्वरांची भूमिका योग्यच ठरते. भारतीय समाजमनाची कल्पना असलेले ज्ञानेश्वर यांनी अवैदिक संप्रदायातील काही हितकारक प्रवृत्ती आत्मसात केल्या. उदाहरणार्थ, लोकभाषेचा वापर, लोकसंग्रह, गुरुभक्ती, सगुण भक्ती. पण त्यावर वैदिकतेचे शिक्कामोर्तब केले.

पैं अहितापासौन काढिती। हित देऊनि वाढविती।
नाहीं श्रुतिपरौती। माउली जगा ।।

असा निर्वाळा देऊन ते वैदिक परंपरेशी जोडून घेतात. पण ते वेदांचे शब्दप्रामाण्य आंधळेपणाने स्वीकारत नाहीत. वेदापेक्षा गीता श्रेष्ठ आहे, असे ते स्पष्ट सांगतात. वेद म्हणजे परमेश्वराचे झोपेत घोरणे आहे, तर गीता जागेपणातील उद्गार आहेत, असे ते सांगतात.

नाथपंथातील दिनचर्या व ब्रह्मचर्याचे पालन करून संन्यस्त वृत्तीने जीवन जगावे, ही तत्त्वप्रणाली सर्व सामान्याला आचरणे शक्य नाही आणि ती जीवनधारणेच्या विरोधात आहे. त्यामुळे ते संन्यासमार्गाला बाजूला सारून नैष्कर्म्य म्हणजे निष्क्रियता नव्हे, हे स्पष्टपणे सांगून स्वधर्माची कास धरण्यास प्रवृत्त करतात.

• 'आधी केले मग सांगितले' या समर्थांच्या उक्तीप्रमाणे त्यांनी त्यांच्या स्वधर्मानुसार व ज्ञानप्राप्ती झाल्यावर समाजाची नाळ तोडावी याचा विचारच कधी केला नाही. उलट अशा व्यक्तींनी समाजाला मार्गदर्शन करावे, म्हणून ज्ञानेश्वरीत ते म्हणतात.

आम्ही पूर्ण काम होऊनि। जरी आत्मस्थिती राहूनी।
तरी प्रजा हे कैसेनि। निस्तरेल ।।

मी जर पूर्णकाम, निरिच्छ होऊन माझ्या आत्मानंदात राहिलो, तर प्रजा तरेल कशी ? अशी समाजाची चिंता लागून होती म्हणूनच त्यांनी समाजाला भक्तिमार्गाकडे वळवून (काळाच्या गरजेप्रमाणे) योग्य मार्गदर्शन केले. याबाबत प्रा. के. वि. बेलसरे यांनी असे नमूद केले आहे की, जेव्हा ज्ञानेश्वर महाराज आणि भावंडे पैठणला शुद्धिपत्र आणायला गेली, तेव्हा त्यांचा व निवृत्तिनाथांचा संवाद झाला, निवृत्तिनाथ म्हणाले. 'ज्ञानोबा, आपल्याला काय करायचे शुद्धिपत्र ? आपण 'ब्रह्मानंदात जंगलात राहू. कशाला ही नसती उठाठेव.' त्यावर ज्ञानराज म्हणाले, 'दादा, आपण असे वागलो नाही तर लोक कसे तरतील ?' त्यांनी सर्वांपुढे असा आदर्श घालून दिला.

येथे हेही लक्षात घेतले पाहिजे की, ज्ञानेश्वरांनी व्यक्तिगत हालअपेष्टा, अवहेलना यांचा उल्लेख न करता फक्त समाजाचा व समाजमनाचाच विचार केला. कारण ते स्वत:साठी नव्हतेच.

त्याचप्रमाणे ज्ञानेश्वरांनी कोणत्याही एका संप्रदायाचा अभिमान बाळगला नाही. नाथपंथातील योगमार्ग आचरणात खडतर. योगसामर्थ्याने भारून गेलेल्या मध्ययुगासारख्या काळात त्यांनी शिव व विष्णू यांच्या ऐक्याची कल्पना मांडली: एकदा का सिद्ध पुरुष संप्रदाय स्थापनेच्या मोहात सापडला की, त्याच्या ठिकाणी संकुचितपणा, मिथ्याभिमान व दुराग्रह निर्माण होतो. महाराष्ट्राच्या धर्मजीवनात त्यांनी आपला सवता सुभा निर्माण केला नाही. विविध प्रवृत्तिपर लोक त्यांच्या छत्राखाली आले आणि नैष्कर्म्य व निवृत्तीकडून प्रवृत्तिमार्गी प्रपंचाकडे व कर्माधिष्ठित जीवनाकडे समाजाला प्रवृत्त केले. त्यामुळेच भक्तिमार्गी वारकरी संप्रदायाचा पाया घातला गेला व पक्का झाला.

ज्ञानेश्वरकालीन सामाजिक परिस्थिती -

ज्ञानेश्वरांचा काळ हा मध्ययुगीन काळ समजला जातो. १० ते ११ वे शतक हे सामाजिक, धार्मिक व राजकीय दृष्टीने महत्त्वाचे समजले

जाते. तज्ज्ञांच्या मते प्रत्येक युगाबरोबर काही तत्त्वे, विचार व मूल्ये प्रस्थापित होतात व तो त्या युगाचा धर्म होऊन जातो आणि जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन ठरून जातो. वेदान्तयुगात विवेकनिष्ठा, ज्ञानसाधना इत्यादी मूल्यांची जपणूक झाली आणि विवेक, तर्क याने ज्ञानाच्या कक्षा रुंदावून शास्त्रे निर्माण करणे इत्यादी गोष्टी घडत गेल्या. अर्वाचीन काळाचा विचार करता पाश्चात्यांच्या भारतातील आगमनाने स्वातंत्र्य, समता, बंधुता व लोकशाही या विचाराने समाजजीवन ढवळून निघाले. त्यादृष्टीने मध्ययुगीन काळाचा वेगळा असा ठसा समाजावर उमटला नाही किंवा एक विशिष्ट विचारधारा पक्की झाली नाही, असे तज्ज्ञांचे मत आहे. पण प्रत्येक क्षेत्रात बदल जाणवत गेले, हे मात्र खरे. कारण इस्लामी आक्रमण जे बरेच विध्वसंक होते, ज्यामुळे भारताच्या सांस्कृतिक जीवनाला चांगलेच हादरे बसत होते. त्याचबरोबर भारताच्या दक्षिणेकडे सूफी साधूंच्या रूपाने इस्लामी धर्मप्रचाराचे प्रभावी कार्य चालू होते, असे जाणवते.

याच काळात तांत्रिक साधनेला महत्त्व प्राप्त होऊन समाज तिकडे आकृष्ट झाला. या साधनेचा प्रभाव तसा फार काळ टिकला नसला तरी सामाजिक जीवनाला वाममार्गाला लावण्यात त्याला बरेच यश मिळाले, असे म्हणावे लागेल. बौद्ध धर्मातील तांत्रिक पुढे हिंदू धर्मातील शैव, कापालिक आणि शाक्त पंथात प्रविष्ट झाले. जैन धर्मानेही तांत्रिकता स्वीकारली होती. योगमार्गाला अनन्य साधारण महत्त्व आले. परंतु तो तांत्रिकांच्या कचाट्यात सापडल्यामुळे त्याला अवनती प्राप्त झाली. कारण या तांत्रिक पद्धतीमध्ये स्त्री हे अत्यावश्यक साधन मानून समरसीभावाचा आनंद लुटणे हे या साधनेचे ध्येय झाले. आपल्यातच शिवशक्ती आहेत, त्या तत्त्वप्रणालीला धरून वज्रयान, सहजयान, शैव व शाक्त पंथांत शिवाराधनेच्या, आणि शक्ती उपासनेच्या नावाखाली घृणास्पद आचार अवलंबिले जात होते. कामवासनेचे दमन केल्यास चित्तक्षोभ होतो, अशा परिस्थितीत साधना कशी होणार आणि म्हणून स्त्रीसेवनादी उपभोगांना

प्रतिष्ठा प्राप्त झाली, ज्यामुळे व्यभिचार फोफावला.

अशा या तांत्रिक साधनेला वेदविरोधी बळ मिळत होते. वैदिक परंपरेतील पारमार्थिक साधनेला ज्या गोष्टी निषिध्द आणि त्याज्य वाटत होत्या त्या तांत्रिक साधनेत आवश्यक व प्रतिष्ठित समजल्या जाऊ लागल्या. बौद्धासारखा धर्मही, जो करुणेच्या विशाल जाणीवेने विरक्त होऊन मानवाला निर्वाणाचा मार्ग दाखवत होता, तोदेखील चीनकडून आयात झालेल्या मार्गाला बळी पडला व कालांतराने वज्रयानादीच्या चमत्कारिक विकृत तत्त्वज्ञानात आणि साधनापद्धतीत परिणत झाला.

याच काळातील दुसरे एक वैशिष्ट्य योगमार्गाचे होते. भारतीय साधनेतील योगपरंपरा ही वेदकाळात जाऊन भिडते. सांख्य तत्त्वज्ञानातील योगप्राधान्य हे सर्वांना ठाऊक होतेच. पण ते व पातंजल योग दर्शन शास्त्र हे आचरणात दुर्गम बनले. त्यामुळे क्रियाप्रधान योगमार्ग लोकांनी निवडला. तथापि त्याचे विशुद्ध स्वरूप बाजूला राहून त्याला विकृत आचरणाच्या भयावह भ्रष्ट समाजजीवनाचे स्वरूप प्राप्त झाले.

तत्कालीन भारतीय हिंदू समाजाचे अवलोकन करता असे जाणवते की, स्मृत्यादी धर्मग्रंथांना अनुसरून जीवनाचे नियमन करणारा एक वर्ग, तर दुसरा धर्मशास्त्रांना व वर्णाश्रम व्यवस्थेला न मानणारा दुसरा वर्ग, यज्ञ यागादीवर व क्रियांवर विश्वास नसल्यामुळे त्याला विरोध करणारा व 'अकाल संन्यासाचा' स्वीकार करणारा योगी लोकांचा वर्ग फार प्राचीन काळापासून भारतात होताच. तसेच नाथपंथाचे वेगवेगळे प्रवाह अस्तित्वात होतेच. या सर्व नाथपंथीय प्रवाहांना त्यांच्यातील क्लिष्टता व वाममार्ग बाजूला सारून एका समान पातळीवर आणण्याचे महत्त्वाचे कार्य नाथपंथीय गोरक्षनाथांनी केले आणि तेच त्या शिष्य परंपरेतील ज्ञानेश्वराच्या कार्याचा पायाभूत आधार ठरले, असे तज्ज्ञ मंडळींचे मत आहे. या काळातील राजकीय व परकीय आक्रमणांचा व त्यांच्या विध्वंसक वृत्तीचा आणि धर्मांतराच्या धोरणामुळे त्यांत आर्थिक दरिद्रतेची पडणारी भर, यांमुळे

समाज एका विचित्र संभ्रमावस्थेत दिसून येतो. समाज स्वधर्मच विसरला. याचे इतिहासाचार्य राजवाडे यांनी त्यांच्या लेखात सखोल विवेचन व त्यामुळे हिंदुधर्माचे अध:पतन व समाजाची लाचारी कोणत्या थरापर्यंत जाऊ शकते हे दाखवून दिले आहे.

अशा परिस्थितीत समाजाला एका दृढ विश्वासाने समाजाच्या गोंधळलेल्या मनाला भक्तिमार्गाने संतुलन साधून, स्वधर्माची जाणीव देऊन जीवन सुसह्य करण्यास श्री. ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाच्या रूपांत योग्य मार्ग दाखवण्याचे महान कार्य केले. जो समाज स्वधर्मच विसरून गेला होता, त्याला त्याची आठवण करून दिली आणि नाथ संप्रदाय व त्यांचा योगमार्ग याचे पूर्ण समर्थन करून आत्मकेंद्रित होण्यापेक्षा काळाचा रोख ओळखून समाजाचे अधिक नुकसान होऊ नये, म्हणून समाजास भक्तिमार्गाकडे वळवले व समाजाच्या होणाऱ्या अधिक ऱ्हासास खीळ बसवली. कमीत कमी या काळांत तरी आध्यात्मिकांना ते आत्मकेंद्रित असतात, हा आक्षेप घेता येणार नाही.

ज्ञानमार्गाला पर्याय म्हणून जरी कर्ममार्ग पुढे आला असला, तरी त्यातील कर्मकांडाला फाटा देऊन स्वधर्माचे आचरण अगदी सोप्या पद्धतीने करण्यास समाजास उद्युक्त केले व त्यांचा महिमा त्यांनी ज्ञानेश्वरीत असा सांगितला. ते म्हणतात,

तुम्ही व्रत नियमु न करावे । शरीराते न पीडावें ।
दूरीं केंहीं न वचावें । तीर्थासी गा ।। ८९ ।।
योगादिकें साधनें । साकांक्ष आराधनें ।
मंत्रयंत्र विधानें । झणीं करा ।। ९० ।।
देवतांतरा न भजावें । हें सर्वथा कांहीं न करावें
तुम्हीं स्वधर्मयज्ञीं यजावें । अनायासें ।। ९१ ।।
देखा स्वधर्मातें भजाल । तरी कामधेनू हा होईल ।
मग प्रजा हो न संडील । तुमतें कदा ।। ९४ ।।

या स्वधर्मपूजा पूजितां । देवतागणां समस्तां
योगक्षेमु निश्चिता । करिती तुमचा ।। ९६ ।।

(ज्ञाने अ. ३ रा)

अर्थ - तुम्हांस वृत्त नियमांच्या भरीस पडावयास नको, तपश्चरणाने शरीर दंड सोसावयास नको किंवा दूरदूरच्या तीर्थयात्राही करावयाला नकोत ।। ८९ ।।

योगादि मोक्षाचे उपाय, नाना प्रकारच्या कामिक उपासना आणि मंत्रयंत्राचे प्रयोग, यांच्या नादी मुळीच लागू नका ।। ९० ।।

नाना देवतांचे भजनही तुम्ही मुळीच करू नका. केवळ स्वधर्माचरणाचा अनायासाने घडणारा यज्ञ मात्र करीत जा ।। ९१ ।।

अहो मानव हो, जर तुम्ही या स्वधर्माचे भक्तीने सेवन कराल, तर तो कामधेनूप्रमाणे तुमच्या सर्व इच्छा तृप्त करील आणि मग हा तुम्हांला कधीही निराधार सोडणार नाही. ।। ९४ ।।

या स्वधर्माचरणरूपी पूजेने तुम्ही देवतांना पुजाल, तेव्हा त्या देवता तुमचा योगक्षेम निश्चयाने चालवितील. तुम्हांला कोणत्याही प्रकारची वाण भासू देणार नाहीत. ।। ९६ ।।

वरील सर्व विवेचनावरून असे जाणवते की,

१) समाजमनाची क्षमता व त्यांचा कल आणि कोणताही समाज चमत्कारास प्रतिसाद देतो, या मानसिकतेचा उपयोग नाथ संप्रदायातील सिद्धसिद्धान्तातील काही सिद्धींचा चमत्कार समाजास भक्तिमार्गाकडे वळवण्यास उपयोगी पडला.

२) ज्ञानेश्वरांची सामाजिक जाणीव व ज्ञान आणि त्यांची नेतृत्व करण्याची क्षमता.

३) त्या काळातील समाज परिवर्तनाची गरज व त्यासाठी पूर्व तयारी म्हणून दुसऱ्या शतकापासून दक्षिणेतील होत असलेल्या भक्तिमार्गाची प्रक्रिया व शाक्त पंथाचा तिटकारा आल्याचा

समाजाचा अनुभव यांमुळे दोन्हींचा परिणाम म्हणून समाजाला भक्तिमार्गाकडे वळवण्यास ज्ञानेश्वरांनी तो प्रभावी केला.

४) सर्व कर्मकांडाला तिलांजली व 'एक मस्तक व दोन हस्तक आणि देव भावाचा भुकेला' ही भक्तिमार्गाची सोपी वाटणारी प्रथा वारकरी संप्रदायाने प्रमाण मानली.

५) श्रमिक वर्गातील संत मंडळी ही सर्वसमावेशक ठरली व हाच भक्तिमार्ग ज्ञानेदव ते तुकाराम या काळात प्रभावी ठरला.

सारांशाने असे म्हणता येईल की श्री. ज्ञानदेव महाराजांना समाजाला भक्तिमार्गाकडे वळवण्यास तात्त्विक, गुरुपारंपारिक व कुलपारंपारिक विचारप्रणालीपेक्षा सामाजिक परिस्थिती अधिक महत्त्वाची वाटली. म्हणून नाथपंथीय असून देखील त्यांनी भक्तिमार्गाला प्राधान्य देऊन त्यांचा पुरस्कार केला.

संदर्भ ग्रंथ

१)	अध्यात्मदर्शन	लेखक प्रा. के. वि. बेलसरे
२)	सार्थ श्री ज्ञानेश्वरी	लेखक बा. अ. भिडे
३)	पाच भक्तिसंप्रदाय	लेखक रा. रा. गोसावी
४)	ग्रंथश्रेष्ठ ज्ञानदेवी	संपादक श्री. नि. ना. रेळेकर, श्री. ल. रा. नसिराबादकर
५)	पौराणिक भागवतधर्म	लेखक श्री. शं. दा. पेंडसे
६)	मध्ययुगीन धर्मसंकल्पनाचा विकास, योग आणि भक्ति	लेखक डॉ. सुधाकर देशमुख
७)	ज्ञानेश्वरी (प्रा. के. वि. बेलसरे यांची निरूपणे)	संकलक श्री. के. बेलसरे

१०

समर्थांचा महाराष्ट्र धर्म

ज्येष्ठांच्या चर्चेमध्ये महाराष्ट्रधर्म हा विषय निघाला. समर्थांच्या महाराष्ट्र धर्माबद्दल 'मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा' यापेक्षा अधिक माहिती समजू शकली नाही, म्हणून समर्थांचा महाराष्ट्र धर्म जाणून घेण्याचा एक प्रयत्न.

इतिहासाचा धांडोळा घेता असे आढळून येते की, महाराष्ट्र धर्माचा उल्लेख गुरुचरित्रात ५० व्या अध्यायात आला आहे. श्री कृष्णाजी नागेश्वर चिटणीस यांनी त्यांच्या या ग्रंथात असे नमूद केले आहे की, बिदरचा बहामनी राजा अलाउद्दीन दुसरा (इ.स. १४३५ ते १४५८) हा दत्त अवतार श्री नरसिंह सरस्वती यांचा भक्त झाला. त्यामुळे ब्राह्मण वर्गावर व हिंदूंवर जे अत्याचार होत होते, ते बंद झाले, म्हणून त्यांनी आनंदी होऊन खालील ओव्यांत त्याचे वर्णन केले आहे.

विप्रकुल समस्त देख । संतोषें करिती अति कौतुक ।
राजा झाला विप्रसेवक । आतां बरवें राज्यासी ।
ऐसा हा राव असतां । महाराष्ट्र धर्मी वर्तता ।
आपला द्वेष तत्त्वतां । न करील कीं जाणता ।

गुरुचरित्र ५० अ.

लेखकाचे असे म्हणणे आहे की, हिंदु धर्मातील आध्यात्मिक, नैतिक व वैदिक तत्त्वांना अनुसरून व त्यांच्या संदर्भात वापरलेला हा महाराष्ट्र धर्म शब्द आहे. येथे लेखकाने हा शब्द महाराष्ट्रासाठीच लागू

समाजाचा अनुभव यांमुळे दोन्हींचा परिणाम म्हणून समाजाला भक्तिमार्गाकडे वळवण्यास ज्ञानेश्वरांनी तो प्रभावी केला.

४) सर्व कर्मकांडाला तिलांजली व 'एक मस्तक व दोन हस्तक आणि देव भावाचा भुकेला' ही भक्तिमार्गाची सोपी वाटणारी प्रथा वारकरी संप्रदायाने प्रमाण मानली.

५) श्रमिक वर्गातील संत मंडळी ही सर्वसमावेशक ठरली व हाच भक्तिमार्ग ज्ञानेदव ते तुकाराम या काळात प्रभावी ठरला.

सारांशाने असे म्हणता येईल की श्री. ज्ञानदेव महाराजांना समाजाला भक्तिमार्गाकडे वळवण्यास तात्त्विक, गुरुपारंपारिक व कुलपारंपारिक विचारप्रणालीपेक्षा सामाजिक परिस्थिती अधिक महत्त्वाची वाटली. म्हणून नाथपंथीय असून देखील त्यांनी भक्तिमार्गाला प्राधान्य देऊन त्यांचा पुरस्कार केला.

संदर्भ ग्रंथ

१)	अध्यात्मदर्शन	लेखक प्रा. के. वि. बेलसरे
२)	सार्थ श्री ज्ञानेश्वरी	लेखक बा. अ. भिडे
३)	पाच भक्तिसंप्रदाय	लेखक रा. रा. गोसावी
४)	ग्रंथश्रेष्ठ ज्ञानदेवी	संपादक श्री. नि. ना. रेळेकर, श्री. ल. रा. नसिराबादकर
५)	पौराणिक भागवतधर्म	लेखक श्री. शं. दा. पेंडसे
६)	मध्ययुगीन धर्मसंकल्पनाचा विकास, योग आणि भक्ति	लेखक डॉ. सुधाकर देशमुख
७)	ज्ञानेश्वरी (प्रा. के. वि. बेलसरे यांची निरूपणे)	संकलक श्री. के. बेलसरे

आहे का ? याबाबत शंका उपस्थित केली आहे. हा शब्द समर्थांच्या अगोदर १०० वर्षे अगोदर आला आहे व समर्थांच्या महाराष्ट्र धर्माचा अर्थ थोडा वेगळा आढळतो.

समर्थांचा मुख्य ग्रंथ दासबोध. या ग्रंथात महाराष्ट्र धर्माचा उल्लेख नाही. त्यात रामदासी तत्त्वज्ञान आहे. पण समर्थांनी 'क्षात्र धर्म' म्हणून वेगळा सांगितला आहे. त्याची कथा अशी आहे. समर्थ व शिवरायांची जेव्हा भेट झाली तेव्हा शिवरायांनी त्यांच्या सांनिध्यात राहून सेवा करण्याची इच्छा प्रकट गेली. तेव्हा समर्थांनी उत्तर दिले. 'तुम्ही क्षत्रिय आहात. राज्याचे रक्षण करून प्रजापालन करणे हा तुमचा धर्म आहे. पृथ्वी म्लेंच्छमय झाली आहे. तिचे निवारण तुमचे हातून व्हावे. अशी रघुपतीची इच्छा आहे. ते पुढे म्हणाले,

''बहुत दिवसांचे हें बंड । म्लेंच्छ माजले उदंड ।
त्यांचे करूनी दुखंड । राज्य करावे''

यानंतर समर्थांनी शिवरायांना राजधर्म व क्षात्रधर्म सांगितला. समर्थांच्या महाराष्ट्र धर्माचे सविस्तर विवेचन इतिहासाचार्य राजवाडे यांनी त्यांच्या 'समर्थांचा महाराष्ट्र धर्म' यात केले आहे. समर्थ रामदासांनी 'महाराष्ट्र धर्मा' बद्दल व त्यांच्या दासबोध ग्रंथ लिहिण्याअगोदर १२ वर्षे भारतभर भ्रमण केले आणि सामाजिक, राजकीय व आर्थिक परिस्थितीचे अवलोकन, चिंतन व मनन केले आणि समाजोन्नतीसाठी काय अधिक करता येईल याचा विचार केला. त्या वेळच्या सामाजिक व राजकीय परिस्थितीचे सविस्तर वर्णन इतिहासाचार्य राजवाडे यांनी त्यांच्या 'निवडक लेख' यातील 'महाराष्ट्रातील शिवकालीन समाजरचना' या लेखात नमूद केले आहे. तीच परिस्थिती समर्थांनी अनुभवली. राजसंस्था परधर्मी म्लेंच्छांच्या हातात गेली होती. नीती, धर्म, यांचा पूर्ण उच्छेद झाला होता. हिंदू समाज अत्यंत विस्कळित झाला होता. अत्याचार, दारिद्र्य आचार व विचारांचा नाश झाल्याची स्थिती होती. समाजाचे मनोबल पूर्ण

खचून गेले होते. सर्व समाज पराभूत वृत्तीत जगत होता. अशी अनन्वित व विस्कळित स्थिती पाहून समर्थांनी नाशकास श. १५५४ म्हणजे इ. स. १६३२ मध्ये नीती, धर्म व राज्य स्थापून परमार्थाचा मार्ग लोकांना दाखवण्याचा निश्चय केला. त्या निश्चयाचे फळ म्हणजे 'दासबोध'. याच ग्रंथात अस्तंगत झालेल्या नीती, धर्म व राज्य या कशासाठी आहेत, याचे निरूपण आहे. या निरूपणासाठी, सर्व भारतभर फिरून महाराष्ट्रच त्यांना परिपक्व असल्याचे जाणवले. येथील क्षात्र तेजाचे त्यांचे आकलन व त्यांची अचूक निवड कशी होती, हे जाणवते आणि त्यांनी येथेच 'महाराष्ट्र धर्म' स्थापन करण्याचा निश्चय केला.

या 'महाराष्ट्र धर्माचे' वर्णन श्री. राजवाडे यांनी खालील प्रकारे केले आहे. पूर्वकालीन संतांच्या व रामदासांच्या मार्गातील भेद स्पष्ट करून राजवाडे म्हणतात,

महाराष्ट्रातील संतांचा सत्याग्रह मुसलमानांच्या पुढे लुळा पडला, हे इतिहासातील हजारो दाखल्यांनी स्पष्ट झालेले होते. हा स्पष्टपणा समर्थांच्या लक्षात उत्कटतेने उतरला. त्यांनी पूर्व संतांचे हे सत्याग्रहाचे कुसुमास्त्र निर्माल्यवत लेखले. आणि धर्मद्रोह, न्यायद्रोह व देशद्रोह करणाऱ्यांचा सशस्त्र प्रतिकार करण्याचा व करविण्याचा विडा उचलला. हाच रामदासांचा 'महाराष्ट्र धर्म' होय. ज्ञानेश्वरांपासून एकनाथांपर्यंत चालत आलेल्या नि:शस्त्र व सात्विक भक्तिमार्गाला रामदासांनी सशस्त्र प्रतिकाराची जोड दिली. भक्ती उपासनेला शक्ती उपासनेची साथ देऊन बलोपासनेचा प्रसार समाजात रूढ केला.

राजवाडे यांच्या मताप्रमाणे हा 'महाराष्ट्र धर्म' त्या काळातला 'महाविचार' होता. तो त्या कालीचा 'कालात्मा' होता. या युगाचा 'युगात्मा' Spirit of Age होता. शिवाजी महाराजांच्या चरित्राची ती गुरुकिल्ली होती. शिवाजीपासून दुसऱ्या बाजीरावापर्यंत (इ. स. १६४६ ते १७९५ पर्यंत) या दीडशे वर्षांतील मराठ्यांचे ते प्राणभूत सूत्र होते,

असे राजवाड्यांनी लिहून ठेवले आहे. याच ‘महाराष्ट्र धर्मातील’ ‘महा’ हा अवयव काढला तर उरलेला सर्व देशास लागू पडणारा ‘राष्ट्रधर्म’ होईल. कारण परमार्थप्रवण नीती, धर्म व राज्य या संकल्पना सर्व भारताला सारख्याच लागू पडतात.

श्री. राजवाडे यांच्या ‘रामदास’ या लेखातील विस्तृत विवेचनापासून महाराष्ट्र धर्माचे वर्णन खालीलप्रमाणे करावे लागेल.

समर्थांचा महाराष्ट्र धर्म प्रचलित असलेल्या भागवत धर्मातील निवृत्ती व भक्तिमार्गाबरोबर प्रवृत्ती, शक्ती व युक्तिमार्गाची जोड देऊन महाराष्ट्रातील कोमेजून गेलेल्या क्षात्र तेजात चैतन्य निर्माण करण्यासाठी एका विशिष्ट जीवनप्रणालीचा उपदेश केला. ज्यात हिंदू धर्म + धर्म स्थापना + गोब्राह्मण प्रतिपाल + स्वराज्य स्थापना + संघटना आणि त्याचे नेतृत्व करणारा युगपुरुष, यालाच समर्थांच्रा ‘महाराष्ट्र धर्म’ म्हणावे लागेल. महाराष्ट्राबाहेरील सहिष्णू हिंदु धर्माचे महाराष्ट्रात जयिष्णू धर्मात रूपांतर करावे, हाच समर्थांचा निश्चय होता.

तज्ज्ञांच्या मते महाराष्ट्र धर्म हे भगवद्गीतेतील कर्मयोगाचेच नाव आहे.

महाराष्ट्र धर्माचा उद्देश -

समर्थांच्या या धर्माच्या उद्दिष्टांचा विचार करता काही ठळक गोष्टी जाणवतात.

१) अन्याय व परकीय आक्रमणाविरुद्ध समाज जागृत करून, समाजातील सुप्त असलेला त्वेष चेतवणे.

२) स्वराज्य, स्वधर्म आणि नीती तत्त्वांची स्थापना करून हरिकथा निरूपण, नेमस्त राजकारण, यांची अंमलबजावणी करणे.

३) भक्तिउपासनेबरोबर शक्ती व युक्तीची जोड व बलोपासना. या युक्तीमध्ये अखंड सावधानता, दक्षता, साक्षेप व चातुर्य यांचा समावेश.

४) हिंदुधर्माचे द्वेषरहित पण त्वेषयुक्त संघटन.
५) प्रपंच साधून परमार्थ करता येतो, याची शिकवण.
६) या स्वराज्याचे नेतृत्व करणारा राजा याची नियुक्ती व राजा कसा असावा याचा उपदेश.

वरील उद्दिष्टातील नीतिस्थापना, धर्मस्थापना व राज्यस्थापना यांचा विचार करताना समर्थांची प्रपंच, लौकिक व परमार्थाची सांगड घालण्याचा हेतू आहे असे जाणवते. कारण यातील संस्थांच्या स्थापनाने समाज मुक्त होतो म्हणजे स्वतंत्र होतो व परमार्थाचा भोक्ता होतो. या तीन उपायांची साधकाने स्थापना केली पाहिजे. त्यामुळे साधक व सिद्ध या दोघांनाही तितकाच फायदा होतो. तसेच व्यक्ती व समाज यांना हे तत्त्व लागू आहे.

यातील नीतीची स्थापना अगोदर केली पाहिजे. नीतीचे काम मलिन वृत्ती विमल होऊन, मनुष्य सुधारण्याच्या मार्गाला लागतो. सत्त्व, रज व तम हे मायेचे गुण, यांपैकी ग्राह्य कोणते व त्याज्य कोणते, हे सद्गुरूच्या मार्गदर्शनाने कळते आणि व्यक्ती नीतिमान होते.

धर्मस्थापना हे परमार्थप्राप्तीचे दुसरे साधन असे समर्थ मानतात. धर्म म्हणजे परमेश्वराची उपासना किंवा भक्ती. समर्थांनी नवविधा भक्तीचा पुरस्कार केला. भक्तीसाठी परमेश्वराची उपासना करणे व जीवात्मा आणि परमात्मा यांच्यातील भेद नष्ट करून एकरूप होणे, हेच उपासनेचे काम. समर्थांचे म्हणणे उपासना म्हणजेच ज्ञान. विविध देवतांची किंवा त्यांच्या प्रतिमांची उपासना लोक करतात, पण या सर्व अनिर्वाच्य वस्तू एकच आहेत, हे उपासनेत विसरता कामा नये, असे त्यांचे सांगणे आहे. स्वधर्म, कुलधर्म, वर्णाश्रम धर्म असे सर्व धर्म भक्तिमार्गात येतात, असे समर्थांचे प्रतिपादन आहे. राजवाड्यांच्या विश्लेषणानुसार हे सर्व धर्म हिंदू समाज टिकवून ठेवण्यात व यवनांच्या जुलूम जबरदस्तीच्या काळात यशस्वी ठरले. म्हणून धर्मस्थापनेचा उद्देश एक स्वतंत्र होण्याचे साधन आहे असे सांगितले आहे.

या सर्व धर्मातील स्वधर्म अधिक महत्त्वाचा वाटतो. गीतेत सांगितल्याप्रमाणे स्वधर्म म्हणजे उचित वेळी उचित कार्य करणे. यवनांच्या आक्रमणास परतून लावण्यासाठी, अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी व समाजाच्या भल्यासाठी याच स्वधर्माची गरज होती. अशा धर्माची स्थापना करणारे पुरुष हे ईश्वरी अवतारच असे समर्थ मानतात.

राज्यस्थापनेचा उद्देश नीती व धर्मस्थापने मुळे समाजास मिळालेले स्वातंत्र्य अथवा मुक्ती यांची अंशतः प्राप्ती होते. पण ती पूर्ण होण्यासाठी जे अडथळे येऊ शकतात, यांत अनीतिमान व्यक्ती किंवा समाजच असतो. त्यांचा बंदोबस्त व मुमुक्षूंना संरक्षण मिळण्याच्या दृष्टीने समाजात, सलोखा, शांतता राहण्याच्या दृष्टीने आपले राज्य असणे ही महाराष्ट्र धर्मामागची समर्थांची इच्छा होती.

यावरून हे जाणवते की, या धर्माला १) आध्यात्मिक २) सामाजिक व ३) राजकीय आशय होता. समर्थ रामदासांच्या रामदासी तत्त्वज्ञानाचा विचार करताना त्यांची १) हरिकथा निरूपण २) राजकारण ३) सावधपणा व ४) साक्षेप या चतु:सूत्रीवर ते आधारित असल्याचे ज़ाणवते. खालील रामदासांच्या प्रसिद्ध ओवीत ते आढळते.

मुख्य ते हरिकथा निरूपण । दुसरे ते राजकारण ।
तिसरे ते सावधपण । सर्व विषयीं

या धर्माचा आध्यात्मिक आशय

बहुतेक सर्व तज्ज्ञांचे मत महाराष्ट्र धर्म हा एकनाथांच्या भागवत धर्माचीच प्रतिकृती आहे व हा धर्म गीतेतील कर्मयोगाचे पुनरुज्जीवन केल्याचे म्हटले आहे. महाराष्ट्र धर्माचा उल्लेख समर्थांच्या संपूर्ण तत्त्वज्ञानाने भरलेल्या दासबोधामध्ये जाणवत नाही. पण त्यांनी शिवाजी महाराजांसाठी लिहिलेल्या 'क्षात्र धर्मासाठी' लिहिलेल्या ओव्यांमधून आढळून येतो.

पू. विनोबा यांच्या मताप्रमाणे कोणताही धर्म हा श्रद्धा, त्याग, सत्य व प्रेम यांवरच आधारित असतो. त्याप्रमाणे भागवत धर्माची श्रद्धा

अद्वैत तत्त्वज्ञानावर आहे व त्याचाच विस्ताराने परामर्श समर्थांनी दासबोधात घेतला आहेच. पण समर्थ त्याही पुढे एक पाऊल जातात. ज्या पुरुषाला दिव्य जीवन लाभते, त्याने आपणहून सामान्य जनसमुदायात उतरावे आणि बहुजन समाजाला दिव्य जीवन भोगण्यास हळूहळू शिकवून पात्र करावे असा समर्थांचा आग्रह आहे. प्रपंच व परमार्थ दोन्हींचे वास्तव जाणून त्याचा याच जीवनात कसा उपयोग करावा, हेच दासबोधातून दाखवून दिले आहे. त्यांची अशी धारणा होती की, प्रपंचात राहून परमार्थ करणाऱ्या माणसाच्या सहवासाने अनेक सामान्य माणसांचे जीवन वरच्या पातळीवर जाते. हाच त्यांचा अनुभव म्हणून प्रारब्धाने प्राप्त झालेल्या प्रपंचाच्या मर्यादा न सोडता परमार्थाची साधना करावी असे दासबोधामध्ये प्रतिपादिले आहे. व्यक्तिजीवन व समूहजीवन यांचा सुरेख संगम साधणारा श्री समर्थांसारखा थोर महात्मा क्वचितच दृष्टीस पडतो. असेच श्री. अरविंदांनी त्यांच्या अतिमानस योगात म्हटले आहे. महाराष्ट्र धर्म मूळ गीतेतील कर्मयोगावर आधारित असल्याने तो समर्थांनी नवा धर्म म्हणून पुढे आणला नाही. कर्मयोगाचे तत्त्वज्ञान पूर्वीपासून या भूमीत चालत आलेले होते. परंतु यवनांच्या आक्रमणामुळे नीचतम सामाजिक स्थितीमुळे ते स्मृतीतून गेल्यासारखे झाले होते. त्यालाच समर्थांनी परत प्रस्थापित केले. All sciences have been lost and found again अशी एक म्हण आहे. त्याप्रमाणे त्या उज्ज्वल व सत्य ज्ञानावर जी राख साठली होती, ती दूर केली, त्याबरोबर तो पवित्र अग्नी परत पेटता झाला. समर्थांच्याच वचनाप्रमाणे 'वन्ही तो चेतवावा रे। चेतवीतांचि चेततो। तो कर्म योग ज्यामध्ये स्वधर्माची व स्वकर्माची महती व कर्तव्याची जाणीव आहे तो अधिक तेजाने धडाडू लागला.

समर्थांच्या काळातील निवृत्तिमार्ग व भक्तिमार्गात गुंतून पडणाऱ्या समाजाला प्रवृत्तिमार्गाची आठवण करून दिली व गीतेतील श्रीकृष्णांनी अर्जुनास केलेल्या उपदेशाची म्हणजे

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।
तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चय: ।। ३७ ।।

गी. अ. २

मेलास तर स्वर्ग मिळवशील, जिंकलास तर पृथ्वी भोगशील, म्हणून ऊठ, अर्जुना युद्धासाठी निश्चय कर.

याच धर्तीवर महाराष्ट्रातील क्षात्र समाजाला व शिवाजी महाराजांना उपदेश केला. त्यांनी लिहिले.

जयास वाटे जिवाचे भये । त्याने क्षात्र धर्म करू नये ।
कांही तरी करून पोट उपाये । पोट भरावे ।।
विन्मुख, मरणी नर्क होतो । वाचून येता मोठी फजिती ।
इहलोक परलोक जाती । पहाना का ।।
मारितां मारितां मरावे । तेणे गतीस पावावें ।
फिरोन येतां भोगावें । महद्भाग्य ।।
मराठा तितुका मेळवावा । आपुला महाराष्ट्र धर्म वाढवावा ।
ये विषयीं न करितां तकवा । पूर्वज हासती ।।

महाराष्ट्र धर्मातील याच आध्यात्मिक तत्त्वप्रणाली मुळे समर्थांनी क्षात्र धर्माची महाराष्ट्राबद्दलची अस्मिता जागी करून स्वधर्म व स्वकर्मास प्रोत्साहित व उद्दिष्ट करून शिवाजी महाराजांच्या स्वराज्यस्थापनेस सक्रिय उपदेशून हातभार लावला व स्वत:स समाधानी मानले.

येथे राजवाडे यांनी केलेले कर्मयोगाचे विश्लेषण अधिक उपयुक्त ठरेल. श्री. राजवाडे यांच्या मते 'कर्मयोगाचेच' दुसरे नाव 'महाराष्ट्र धर्म' आहे. Mankind needs more often to be reminded than informed माणसाला नव्या गोष्टी सांगण्यापेक्षा जुन्या गोष्टींची आठवण करून देणे अधिक गरजेचे असते असे जॉन्सन यांनी म्हटले आहे. असे सांगून राजवाडे म्हणतात, जसे ज्याचे तत्त्वज्ञान तसा त्यांचा प्रपंच या आपल्या सिद्धांताचे विवेचन करताना गीतेतला 'कर्मयोग' हा बुद्ध धर्मातल्या

'संन्यास' व 'भूतदया' या तत्त्वज्ञानाची प्रतिक्रिया आहे, असे राजवाड्यांनी म्हटले आहे व या कर्मयोगालाच 'महाराष्ट्र धर्म' संबोधिले आहे.

'बुद्धाच्या तत्त्वज्ञानात भूतदया व निर्वाण हे दोन मुख्य सिद्धांत आहेत. त्याचे पर्यवसान संन्यास व दौर्बल्य या दोन रूपांनी समाजात प्रतिबिंबित झाले. दुष्टांवरही दया करण्याचा निश्चय झाला व मरणोत्तर शून्यप्राप्ती होणार, अशी जेथे खात्री झाली, तेथे शक, यवन, किरातादी रानटी परंतु बुबुक्षु लोकांनी ज्ञानसंपन्न लोकांवर राज्य करावे व संस्कृत व निरिच्छ लोकांनी भिक्षू व श्रमण बनून समाजाच्या प्रपंचाचा चुथडा करावा हे ओघानेच येते.'

बौद्धांच्या या संन्यासवादाविरुद्ध झालेली प्रतिक्रिया म्हणजे भगवद्गीतेतील प्रवृत्तिवादाचा पुरस्कार करणारा कर्मयोग मार्ग होय. त्या कर्मयोगाचा महाराष्ट्रातील लोकांवर कोणता परिणाम झाला, हे सांगताना राजवाडे म्हणतात.

'भगवद्गीतेत बुद्धभिक्षूप्रमाणे कर्माचा न्यास करणे, म्हणजे संन्यास नव्हे व क्लैब्याचा अवलंब करून रानटी शत्रूंचा पगडा बसविणे म्हणजे भूतदया उर्फ शांती नव्हे असा सिद्धांत केलेला आहे. या सिद्धांताचे प्रतिबिंब तत्कालीन आर्य समाजावर पडून शक यवनादि म्लेंच्छ राजांना आर्यांनी हाकून दिले व शातवाहनादी राज्यांची स्थापना भरतखंडात झाली. शात-वाहनाच्या सहाव्या शतकांत भारतात प्रवास करणारा व्हानसांग लिहितो. If anyone insults them, they will risk their lives to wipeout that insult. कृष्णाने अर्जुनाला सांगितलेले तत्त्वज्ञान येथे बरेच प्रतिबिंबित झालेले उत्कृष्ट दृष्टीस पडते. यालाच 'महाराष्ट्र धर्म' म्हणतात. यावरून दिसून येईल की, रामायण आणि महाभारतात प्रतिपादन केलेला आणि अन्यायाचा, अन्याय करणाऱ्याचे निर्दालन करून सात्विक प्रतिशोध घेण्याचा, रामकृष्ण आणि परशुराम यांच्या जीवनात व्यक्त झालेला जातिवंत क्षत्रियांचा तेजस्वी क्षत्रियधर्म हे महाराष्ट्रधर्माचे व्यवच्छेदक लक्षण

आहे.

याच आशयाचे प्रतिबिंब महाराष्ट्र धर्मात दिसून येते. हाच महत्त्वाचा विचार रामदासी तत्त्वज्ञानातून दिसून येतो. यासंबंधी वर्णन करताना श्री. श्री. म. माटे यांनी असे म्हटले आहे.

''रामदास स्वामींनीं जग मिथ्या आहे याचा अर्थ जग विघटनक्षम आहे असा केला आहे. विघटनक्षम आहे म्हणून मिथ्या आहे. पण आहे या स्थितीत ते खरेच आहे. आणि म्हणून प्रापंचिकांनी आपले प्रपंच मर्दपणाने करावयास हवेत आणि प्रपंचाला लागणारी यत्नशीलता चातुर्य, धोरण, घावडाव इत्यादी सौम्य व प्रखर गुण प्रापंचिकांनी वाढीस लावले पाहिजेत असा आग्रह समर्थांनी त्यांच्या दासबोध ग्रंथातून केला आहे.''

महाराष्ट्र धर्माचा सामाजिक आशय

ज्या महाराष्ट्र धर्माचा विचार मांडला त्याचे मूळ समर्थांच्या १२ वर्षांच्या भ्रमंतीनंतर त्यांनी अनुभवलेली व उघड्या डोळ्यांनी पाहिलेली त्या काळची समाजाची स्थिती यवनांचे राज्य, महाराष्ट्रातील जनतेची दयनीय स्थिती, त्यांच्या मनातील गोंधळ, लाचारी, यांमुळे जी पराभूत वृत्ती तयार झाली, त्याचे उच्चाटन कसे करावे, हाच एकमेव उद्देश समर्थांसारख्या समाजोन्नतीचा ध्यास घेतलेल्या संतांपुढे होता.

त्यावेळच्या सामाजिक स्थितीचे वर्णन त्यांचे बंधू रामी रामदास यांनी खालील ओव्यांमध्ये केले आहे, ते समर्थांनी प्रत्यक्ष पाहिले होते. रामी रामदास लिहितात.

अन्य तीव्र शासन यवनी । अब्रम्हण्य जाली कितेक अवनी ।
वर्ण चतुष्ट नारीनर । सर्व धर्मपराङ्मुख ।। १ ।।
क्षत्रिय वैश्य स्वधर्मभ्रष्ट । शूद्र झाले सेवानष्ट ।
किती हेचि बोलावे स्पष्ट । सीण वाटे वाचेसी ।। २ ।।
दुष्ट सेवा दुष्टप्रतिग्रह । दुराचार दुराग्रह
गोब्राह्मणा अतिनिग्रह । तेथें कैंचा प्रतिपाळ ।। ३ ।।

मच्छ मांसाशने जीविका । होईल सर्व ब्राह्मणादिका
असो सर्वधर्म लोपे लोका । अल्पायुत्व अपमृत्यु ॥ ४ ॥

अशा या सांस्कृतिक, धार्मिक व सामाजिक अराजकातून समाजाला तारण्यासाठी संतांनी भक्तिमार्गाचे प्रवर्तन केले. ते बऱ्याच अंशी सफल झाले. म्हणून संतांवर टीका करणारे व त्यांना 'संताडे' म्हणणारे राजवाडे म्हणाले, जर भरत खंडात व महाराष्ट्रात त्या काळी भक्तिमार्ग नसता, तर अफगाणिस्थान, इराण वगैरे देशांतल्याप्रमाणे या देशातील सर्व प्रजा एकवर्णी मुसलमान झाली असती व आर्य संस्कृती, आर्य सारस्वत, आर्य समाज, आर्य चातुर्वर्ण्य, आर्यशील या जगतातून समूळ उच्छिन्न झाले असते. तरीपण संतांच्या शिकवणुकीतून अतिविशाल व स्वत्वाचा संन्यास करविणारे अतिसहिष्णू मानवता धर्माचे व विश्वकुटुंबवादाचे तत्त्वज्ञान राष्ट्राच्या प्रपंचाला वर नसून दारुण शाप आहे असे म्हटले पाहिजे. हीच परिस्थिती समर्थांच्या अवलोकनातून त्यांना आढळली व ते मनस्वी कष्टी झाल्याचे जाणवते.

प्रपंच व्यापक अर्थ -

२) प्रापंचिक अवहेलना - त्यांना आढळून आलेला समाज हा संतांच्या आग्रही निवृत्तिमार्गाचा परिणाम सामान्यांच्या प्रपंचावर दिसून आला. एक तर परकीय सत्ता व दुसरे आर्थिक दुर्बलता या कचाट्यात समाज सापडला व पूर्ण गोंधळून गेला. पोटासाठी लाचारी पत्करू लागला. संतांनी त्यावेळी आत्मशुद्धी करण्याचे व मन:शांती देण्याचे सामर्थ्य दिले हे खरे, पण प्रपंचाची अवहेलना झाली हे नाकारता येत नाही.

प्रपंचाच्या अवहेलनेमुळे किती लोकांनी प्रपंच सोडला ? हा जरी प्रश्न असला तरी त्यामुळे लोकांचे प्रपंचातून चित्त उडाले. असे द्विधा चित्त झालेले लोक पराक्रमाच्या कोटी करतील आणि शत्रूच्या अंगावर धावून जातील, ही अपेक्षा खोटी असते. याची जाणीव समर्थांना भ्रमंतीमध्ये जाणवली. म्हणूनच त्यांनी अगोदर 'प्रपंच करावा नेटका' हा उपदेश

केला.

३) **हिंदू व मुसलमान यांच्या तत्त्वज्ञानातील संघर्ष** - भारत भ्रमणांत समर्थांना दिसून आलेला व त्यांच्या सूक्ष्म अवलोकनातून न सुटलेला असा दोन धर्मांतील व हिंदू व मुसलमान समाजांतील संघर्ष. समर्थांच्या वेळी मुसलमानांचे या देशांत आगमन होऊन पाचशे वर्षे झाली होती. इतकेच नव्हे तर दिल्लीपासून ते विजापूर पर्यंत त्यांचा अंमल होता. या मूठभर मुसलमानांपुढे पिढ्यान पिढ्या या भूमीत स्थाईक झालेल्या बहुसंख्य हिंदूंना हार खावी लागली होती. या दोन्ही समाजातील संघर्षाची कारणे अजब व न ऐकलेली असली तरी समर्थांना ती चांगली उमगली होती व स्वधर्माचे स्वराज्य स्थापल्याशिवाय तरी ती कमी होऊ शकणारी नव्हती. कारण समर्थांच्यानंतर पाच शतके राहूनही तांदळातल्या खड्याप्रमाणे हया दोन धर्मांच्या समाजाचे सामरस्य झालेले नव्हते. यदुनाथ सरकार यांनी आपल्या ग्रंथात या दोन समाजांचे स्वरूप स्पष्ट करून दाखविले आहे. त्यांच्या प्रतिपादनाचा सारांश असा की, या दोन समाजांचे ऐक्य शतके झाली तरी शक्य नाही, कारण जीवन व जीवनाचे ध्येय या बाबतीत दोघांत दोन ध्रुवांचे अंतर होते. सर्वसामान्य हिंदू हा संन्यास, उदासीन, परलोकप्रवण असतो. मोक्ष त्याचे सर्वश्रेष्ठ ध्येय. वैयक्तिक साधना व भक्ती, एकांतातले तपाचरण या मार्गांनी त्याला ते साध्य करायचे असते. याउलट इस्लामचा तो मर्द शिपाई नसेल, तर तो काहीच नाही असे त्याला शिकवले जाते. त्याची प्रार्थना सामुदायिक असली पाहिजे. पाखंडाच्या निर्मूलनासाठी व धर्मप्रचारासाठी जिहाद करण्याचे कष्ट घेऊन त्याने आपल्या श्रद्धेची प्रचीती दिली पाहिजे.

हा दोन समाजातील जीवनाच्या सत्य विरोधाभासावर समर्थांनी आपल्या सामाजिक व राष्ट्रीय दृष्टीतूनच समाजाला मार्गदर्शन केले. म्हणून आमच्यातील संन्यस्त वृत्तीला प्रवृत्तिवादाकडे वळवण्याचा समर्थांचा प्रयत्न राहिला.

समाजातील सुप्त गुणांचा शोध, समाजमनाचा कल अपेक्षित ध्येयाकडे कसा वळवता येईल, याचे निरीक्षण हे समर्थांच्या दूरदृष्टीची व नेतृत्वगुणाची साक्ष देतात. त्यांच्या निरीक्षणात महाराष्ट्रातील क्षात्र समाजाचे गुण इतर भारतातील क्षात्रसमाजापेक्षा थोडे वेगळे असून ते जर त्वेषाने वर उफाळून आले, तर ती सामाजिक क्रांती होईल, याची त्यांना खात्री होती व त्याप्रमाणे समाजातील असंघटितपणा जबाबदार असल्याचे पटल्याने त्यानुसार त्यांनी संघटनाकौशल्य वापरून सर्व क्षात्रसमाजास एकत्र आणले व 'मराठा तितुका मेळवावा व महाराष्ट्र धर्म वाढवावा' हा उपदेश केला.

महाराष्ट्र धर्मातील राजकारणाचा आशय -

समर्थांनी राजकारण केले किंवा नाही यावर बरेच वाद झाल्याचे समर्थांवर लिहिलेल्या साहित्यातून जाणवते. वास्तविक प्रत्येक शतकांत राजकारणाच्या तऱ्हा बदलत असल्याचे जाणवते. त्यानुसार समर्थांनी व्यक्तिशः राज्यकारभारात दखल दिल्याचे आढळून येत नाही किंवा आताच्या पद्धतीनुसार आमचेही काही प्रतिनिधी शासनात असू द्या, अशी मागणी कधी केली नाही. तरीपण समर्थांनी समाजासाठी व सुशासनाच्या दृष्टीने राजकारण केले असेच म्हणावे लागेल. याचे चपखल वर्णन श्री. म. माटे यांनी त्यांच्या 'संत, पंत आणि तंत' या पुस्तकात केले आहे. ते म्हणतात.

''रामदासांनी राजकारण केले किंवा नाही याला माझे हे उत्तर आहे. रामदासांनी लोकांना प्रपंचाची सनद दिली. त्यांनी व्यवहार विवरून सांगितला आणि प्रपंचविज्ञान रचले हेच त्यांचे राजकारण होय. राजकारण करणे म्हणजे 'शिवाजीला मदत केलेली असणे, लोकांची संघटना केलेली असणे, गुप्तपणाने कामे करण्याची शिकवण दिलेली असणं असा अर्थ जे धरतात, त्यांचे समाधान होईल इतका पुरावा उपलब्ध आहेच. म्हणजे त्या अर्थाचे रामदासांनी राजकारण केलेच पण त्याच्याही मागे जाऊन राजकारणाची जननी जी 'प्रवृत्ती' तिचेच पुनरुत्थान त्यांच्या हस्ते झाले.

राजकारण प्रवृत्तिवादातून उद्‌भवते, पण तो वाद संतांनी व तत्वज्ञानी लोकांनी निवृत्तीवादाच्या ओसाड आणि निश्चल वैराण भूमीकडे पिटाळला होता. ज्या दूरच्या सीमेपर्यंत तो गेला होता, त्या सीमेपासून परत आणण्याचे काम रामदासांना करणे भाग होते, म्हणून राजकारणाची उत्थानभूमी जी प्रपंचबुद्धी तीच उच्छिन्न होण्याच्या वाटेला लागली असता तिला पुन्हा नवजीवन देणे हे राजकारणच होऊन बसले होते. रामदासांना हेच करावे लागले आणि त्यांचे वैभव हे की, प्रवृत्तिवादाचे आरंभस्थान पुन्हा चाळवून जागृत करून त्यांनी प्रपंचावर आलेला हीनत्वाचा आरोप तर उडवून लावलाच, पण 'तामस तामस' म्हणून हिणविलेल्या तेव्हांच्या प्रत्यक्ष राजकारणातसुद्धा हात घातला.

प्रवृत्तीस पाहिजे राजकारण । निवृत्तीसी पाहिजे विवरण ।
जेथे अखंड श्रवण मनन । धन्य तो काळ ।

येथे एक गोष्ट नमूद केली पाहिजे की, समर्थांसाठी लागणारी सामाजिक परिस्थिती व तात्त्विक विवेचन एकनाथ महाराजांनी करून ठेवले होते. ते इतके की, तज्ज्ञ म्हणतात, एकनाथ म्हणजे समर्थांचे पूर्वावतार. श्री.राजवाडे यांनी एकनाथांचे वर्णन करताना म्हटले आहे की, नाथांच्या आयुष्यात त्यांनी केलेल्या विनवण्या, सत्याग्रह, निश:स्त्र प्रतिकार व सशस्त्र प्रतिकार या धर्मरक्षणाच्या चारही पायऱ्या दिसून येतात. साऱ्या देशावर धर्मनाशाचे संकट आले असता, त्याचा व्यक्तिगत हृदयपरिवर्तनाचा अनुभव बाजूला ठेवून त्यांच्या 'भावार्थ रामायण' या अखेरच्या ग्रंथात सशस्त्र प्रतिकार करण्याचा पुरस्कार केला. ते म्हणाले.

देवद्रोही देवकंटक । भूतद्रोही जीवघातक ।
धर्मद्रोही दु:खदायक । यांसी आवश्यक मारावे ।।

त्याच बरोबर रामावताराचे प्रयोजन त्यांनी सांगितले

निजधर्माचे संरक्षण । करावया साधूंचे पाळण
मारावया दुष्टजन । रघुनंदन अवतरला ।।

गं. बा. सरदार म्हणतात, 'भावार्थ रामायणात त्यांनी पुन्हा पुन्हा रामावताराचे प्रयोजन निवेदन केले आहे. रावणाच्या बंदिखान्यातून देवादिकांना मुक्त करून धर्माची स्थापना करावयाची व साधु संतांना अभयदान द्यावयाचे हीच कोदंडधारी रघुनाथाची महत्त्वाकांक्षा होती.

सशस्त्र प्रतिकाराचे एकनाथांचे सूत्र रामदासांनी पुढे चालविले. या बाबत रा. चिं. ढेरे म्हणतात, ''पिंडगत भिन्नता आणि स्थळकाळाची सापेक्षता सोडली तर नाथांचे संस्कार समर्थांवर फार मोठ्या प्रमाणावर झाले होते असे दिसल्याशिवाय राहणार नाही. एकनाथांची भावार्थ रामायणातील रामचरित्रामागची भूमिका समर्थांनी पुरस्कारली आहे. देवांच्या बेड्या तोडणारा आणि रामराज्याची गुढी उभविणारा एकनाथांचा रामच समर्थांच्या हृदयांत ठाण मांडून राहिला होता.''

जशास तसे नीती

महाराष्ट्र धर्माची ही नीतिप्रणाली म्हणजे प्रत्यक्ष कृतिशीलता व हेच या धर्माचे खरे मर्म आहे. समर्थांच्या भ्रमणकालीन अवलोकनाने हे पक्के हेरले होते की, यवनांचा पाडाव करावयाचा असेल, तर एक युद्धनीती असायला हवी. या नीतीला देखील भगवद्गीतेचा आधार आहे. कारण श्रीकृष्णानेच धर्मयुद्धात, ये यथा मां, प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम् । म्हणजे माझ्याशी जसे वागतात, त्यांच्याशी मी तसा वागतो. याच धर्तीवर समर्थांनी उपदेश केला, 'जैशास तैसा भेटे, तेव्हा मजालसी थाटे.'

इथे समर्थांच्या भ्रमणातील एक अनुभव सांगावासा वाटतो, जो आधुनिक शिखांच्या इतिहासात ठळकपणे नमूद करण्यात आला आहे. गुरू गोविंद यांची श्रीनगरच्या गढवालच्या जंगलात समर्थांशी भेट झाली. त्याचे वर्णन इंग्रजीत खालीलप्रमाणे लिहिले आहे. याला हनुमंत स्वामींच्या बखरीचा आधार घेतला आहे.

Ramdas expressed his surprise at a successor saintly Guru Nanak living in princely style and allowing himself to be

addressed as Sachcha Patshah. Guru Hargobinds aid 'internally a hermit and externally a prince'. Arms are to protect the poor and destroy the tyrant. Baba Nanak had not renounced the world, but had only renounced maya, i.e. illusion and ego.' "yeh hamare man bhavati hai" (this appeals to my mind), said Ramdas. this encounter between Guru Hargobind and Samarth Ramdas is prominently mentioned in modern Sikh historiography.

यासाठी समर्थांना रूढ असलेली तत्त्व प्रणाली सोडून समाजाचे भरण पोषण कसे करावयाचे, याचे अवलोकन व कृती कशी करायची, हे सांगावे, म्हणून त्यांनी

जयाचिया ठायी । वैषम्याची वार्ता नाही ।
रिपुमित्रा दोन्ही । सरिया पाडू ।।

अशा उदात्त समत्व बुद्धीचा रामदासांनी निरोप घेतला. तसेच राजकारण हे भोळ्या लोकांचे काम नव्हे, याची उमज त्यांना चांगल्या तऱ्हेने झाल्याने त्यांनी सांगितले.

ही धूर्तपणाची कामे । राजकारण करावे नेमे ।
ढिलेपणाचे संभ्रमे । जावो नये ।।

२) दुसरे एक वास्तव त्यांच्या नजरेतून सुटले नाही. धर्मरक्षणाच्या लढ्यासाठी राजवाड्यांनी 'झुंज' हा शब्दप्रयोग केला आहे. यासाठी सैन्य 'पोटावर चालते' 'Army marches on belly' याची जाण समर्थांना होती. कारण त्यांना जाणवले होते की, महाराष्ट्रातील शिपायांचे मुख्य दुखणे हे 'पोटाचे' होते. धनी मेल्यावर हे शिपाई पोटाला काही मिळण्यासाठी दुसरीकडे पळत असत. धर्मरक्षणासाठी आधी त्याना प्रपंचासाठी उपयुक्त केले व राजाला अन्नधान्याची मुबलकता उपलब्ध करून देण्याचा उपदेश केला आणि शिपायांमध्ये एक विश्वास निर्माण करून त्यांना एका उंचीवर नेले.

बहुत लोक मिळवावे । एक विचारें भरावे ।

कष्ट करोनी घसरावे । म्लेंच्छवरी ।।

शक्ती आणि युक्ती

महाराष्ट्र धर्माने शक्ती व युक्तीला अग्रक्रमाने प्राधान्य दिले. कारण राज्य मिळवणे व टिकवणे हे शक्तीशिवाय शक्य नाही. तसेच त्याला चातुर्याची जोड असावी हे त्यांचे धोरण होते. ते म्हणतात, पक्षी ज्याप्रमाणे दोन पंखांवर उडतो, त्याप्रमाणे राज्य हेही सामर्थ्य (Army) आणि राजनीतीचे चातुर्य (Diplomacy) या दोन आधारांवर चालते. या चातुर्यालाच समर्थ युक्ती म्हणतात व यात अखंड १) सावधानता, २) दक्षता ३) साक्षेप ४) चातुर्य यांचा समावेश आहे. शक्ती जरी जोपासली तरी ती विरळ होऊन चालत नाही किंवा शक्ती विखुरलेली चालत नाही. हे त्यांनी जाणले होते. त्याना हे पक्के माहीत होते की, येथील क्षात्र समाजात अमाप शौर्य दडलेले आहे. पण स्वार्थापोटी ते इतके विखुरले आहेत की, त्यांना एकत्र आणल्याशिवाय राष्ट्रनिर्मिती होऊ शकणार नाही. म्हणून त्यांनी १३०० मठांची स्थापना करून विस्कळित समाज संघटित केला. तसेच ११ मारुतींची स्थापना करून बलोपासनेस उत्तेजन दिले. संघटनेचा पुरस्कार करताना सामान्य व्यक्तीच्या जीवनालाही प्रतिष्ठा मिळवून दिली. मनुष्य कुठल्याही थरातला असला, तरी त्याचे मन राखले पाहिजे, ही त्यांची शिकवण होती. म्हणून त्यांनी भजनाची व्याख्याच अशी केली.

भेटे कोणी एक नर ।
धेड महार चांभार ।
त्याचे राखावे अंतर ।
या नाव भजन ।

राज्याचे केवल प्राण असलेल्या या शक्तीचा व युक्तीचा प्रपंच करताना रामदास म्हणतात.

सार संसार शक्तीने । शक्तीने शक्ती भोगिजे ।

शक्त तो सर्वही भोगी । शक्तीविणा दरिद्रता ।।
शक्तीने मिळती राज्ये । युक्तीने यत्न होत असे
शक्ती युक्ती जये ठायी । तेथे श्रीमंत धावती ।।
युक्ती ते जाण कळा । शक्तीसी तुळणा नसे
अचुक चुकेना कोठे । त्याची राज्ये समस्त ही ।।
युक्तीने चालती सेना । युक्तीने युक्ती वाढवी ।
संकटी आपणा रक्षो । रक्षी सेना परो परी ।।
असो हे बोलणे जाले । युक्तीविणा कामा नये ।
युक्तीला पाहिजे शक्ती । तस्मात् शक्ती प्रमाण हे ।।

राजकारणात जशास तसे किंवा शाठ्यनीती असून चालत नाही. त्या मुत्सद्दीपणाला तरवारीची व युक्तीला शक्तीची जोड हवी. त्याशिवाय त्या सर्वांची, थोर उद्देशासाठी योजना केली तरच त्यांना ध्येयवादाची पदवी प्राप्त होते. समर्थांचे सर्वांत जे महान कार्य आहे, त्यात त्यांनी समत्वबुद्धीच्या ऐवजी मुत्सद्दीपणाचा आणि प्रसंग पाहून तारतम्याने चालणाऱ्या शाठ्य नीतीचा की जशास तसे राजकारणाचा आणि क्षात्रधर्माचाही उपदेश केला. ज्या क्षात्रधर्माचे प्रवचन केले, ज्यामुळे त्याकाळी कलाटणी देणारे तत्त्वज्ञान व्यक्त झाले आहे. तो क्षात्रधर्म खालील प्रमाणे समर्थांनी ओवीबद्ध केला आहे आणि सर्वांना आवाहन केले की,

मराठा तितुका मेळवावा । आपुला महाराष्ट्र धर्म वाढवावा ।
येविषयी न करिता तकवा । पूर्वज हासती ।।

(संपूर्ण क्षात्र धर्माच्या ओव्यांचे शेवटी परिशिष्ट जोडले आहे.)

राजा कसा असावा.

समर्थ हे समाजाच्या उन्नतीस प्राधान्य देऊनच संसाराच्या पैलथडीस पोचले असता व 'परब्रह्मी विराली' अशी त्यांची त्यावेळी स्थिती असता, परमार्थाचे परमोच्च शिखर गाठले असता, रामदासांनी लोकांना परमार्थाऐवजी, निवृत्ती ऐवजी, प्रपंचाचा व प्रवृत्तीचा उपदेश करण्याचा

निर्णय घेतला. हे धैर्य असामान्य होते. त्यामुळेच त्यांनी महाराष्ट्र धर्माची स्वतंत्र कल्पना मांडली आणि ती शिवरायांकडून पूर्ण झाल्यावर त्यांनी धन्यता मानली.

समर्थांनी समाजाच्या उद्धरणाचे तीन मार्ग सांगितले.

१) नीतिस्थापना २) धर्मस्थापना आणि ३) राज्यस्थापना हे तीन मार्ग, त्याचबरोबर १) हरिकथा निरूपण २) नेमस्त राजकारण ३) वर्तायाचे लक्षण याचा ऊहापोह दासबोधात केला.

स्वराज्याशिवाय धर्म नाही, स्वधर्माशिवाय प्रपंच नाही तर परमार्थ तरी कसा प्राप्त होणार? स्वराज्य व स्वधर्म यांचा अन्योन्य संबंध असल्यामुळे रामदासांच्या महाराष्ट्र धर्मात स्वराज्याचे महत्त्व अधिक होते. पण केवळ स्वराज्य असून किंवा स्वधर्मी असून उपयोग नव्हता, तर ह्या स्वराज्यातील स्वधर्मी राजा 'राजा प्रकृतिरंजनात्' या कालिदासाच्या सूचनेप्रमाणे रक्षण आणि पालन करणारा तर असलाच पाहिजे. पण लाच खाणारे चोरटे कारभारी आणि राज्य बुडविणारे अमर्याद फितवेखोर यांचा संहार करणारा, राज्याची तंत्रे सांभाळणारा, दक्ष, सावध, अष्टपैलू, हरहुन्नरी असणे आवश्यक हाते.

म्हणून समर्थांनी राजकारण आणि राजकारणी पुरुष यांच्याबद्दल सांगताना म्हटले आहे.

फिलयानी बुडती राज्ये । खबरदारी असेचना ।
युक्ति ना शक्तिता वेगो । लोकरानी असेलना ।
बेदादी बंकैद सेना । कारबारीच चोरटे ।
धण्याची राखणे राजी । कदाकाळी घडेच ना ।
चोरटी होटटी तुंदे । नासकी लाच इच्छितो ।
लोंडिचे दूर घालवावे । मारावे राजकारण ।
सेवका आवरा नेणे । तो राजा मूर्ख जाणिजे ।
मूर्खांचे राज्य राहेना । कोणाचे कोण ऐकतो ।

लोकासी राखणें राजी । तें राज्य प्रबळ वळे ।

असा सावधानतेचा उपदेश समर्थांनी राजासाठी केला.

वरील महाराष्ट्र धर्माच्या विवेचनावरून समर्थांना सामाजिक व राजकीय बदल घडवून आणण्यात यश आले. त्याची हयातीतच त्यांना फळे दिसली आणि शेवटी समर्थांच्या या महाराष्ट्र धर्माचे ईप्सित पूर्ण करू शकणारा भगवान श्रीकृष्णाने उपदेशिलेल्या जयिष्णू कर्मयोगाचे आचरण करणारा शिवाजीसारखा नवजवान आणि प्रपंचशूर कर्मयोगी भेटल्यामुळे त्यांच्या अंत:करणाला जे आनंदाचे भरते आले, त्याचे उत्स्फूर्त उद्‌गार व आविष्कार त्यांच्या या ऐतिहासिक पत्रात प्रकट झाले -

निश्चयाचा महामेरु । बहूत जनांसी आधारू ।
अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ।।१।।
परोपकाराचिया राशी । अखंड घडती जयासी ।
तयाचे गुण महत्त्वासी । तुळणा कैंची ।। २ ।।
नरपति हयपति गजपति । गडपति भूपति जळपति ।
पुरंदर आणि छत्रपति । शक्ति पृष्ठभागी ।।३।।
यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।
पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ।। ४ ।।

* * *

परिशिष्ट 'अ' - **राजधर्म**

आधी मनुष्य ओळखावे । योग्य पाहून काम सांगावे ।
निकामी तरी ठेवावे । येकीकडे ।।
पाहोन समजोन कार्य करणे । तेणे कदापि न ये उणे ।
कायकर्त्याच्या गुणे । कार्यभाग होतो ।।
कार्यकर्ता प्रयत्नी जाड । काही येक असला हेकाड ।
तर समर्थपणे पाठवाड । केली पाहिजे ।।

अमर्याद फितवेखोर । यांचा करावा संव्हार ।
शोधिला पाहिजे विचार । यथातथ्य ।।
मनुष्य राजी राखणे। हीचि भाग्याची लक्षणे।
कठिणपणे दुरी धरणे। काही येक ।।
समयी मनुष्य कामा येते । तयाकारणे सोशिजे ते ।
न्याय सांडिता मग ते । सहजचि खोटे ।।
न्याय सीमा उल्लंघु नये । उल्लंघिता होतो अपाये ।
न्याय नसतां उपाय । होईल कैंचा ।।
उपाधीस जो कंटाळला । तो भाग्यापासून चेवला ।
समयी धीर सांडिला । तोही खोटा ।।
संकटी कंटाळो नये । करावे अत्यंत उपाये ।
तरी मग पाहता काये । उणे आहे ।।
धुरेने युद्धासी जाणे । अशी नव्हेत की राजकारणे ।
धुराच करोनि सोडणे । कित्येक लोक ।।
उदंड मुंडे असावी । सर्वही येक न करावी ।
वेगळाली कामे घ्यावी । सावधपणे ।।
मोहरा पेटला अभिमाना । मग तो जिवास पाहेना ।।
मोहरे मिळवूनि नाना । वरी चपेटे करी ।।
देखोनि व्याघ्राचा चपेटा । मेंढरे पळती बारा वाटा।
मस्त जो तो रेडा मोठा । काय करावा ।।
रायांनी करावे राजधर्म । क्षत्री करावे क्षात्रधर्म ।
ब्राह्मणी करावे धर्म । नाना प्रकारे ।
तुरंग शस्त्र आणि स्वार । पहिला पाहावा विचार ।
निवटू जाता थोर थोर । शत्रू पळती ।।

* * *

परिशिष्ट 'ब' - **क्षात्र धर्म -**

जयास वाटे जिवाचे भये । त्याने क्षात्रधर्म करू नये ।
काही तरी करूनि उपाये । पोट भरावे ॥
विन्मुख मरणी नर्क होती । वाचून येता मोठी फजिती ।
इहलोक परलोक जाती । पहाना का ॥
मारिता मारिता मरावे । तेणे गतीस पावावे ।
फिरोन येता भोगावे । महद् भाग्य ॥
जैसा भांड्याचा गलोला । निर्भय भारामध्ये पडला ।
तैसा क्षत्रीं रिचविला । परसैन्यामध्ये ॥
ऐसे अवघेचि उठता । परदळाची कोण चिंता ॥
हरणे लोळवी चित्ता । देखत जैसा ॥
देवमात्र उच्छेदिला । जित्यापरीस मृत्यू भला ।
आपुला स्वधर्म बुडविला । ऐसे समजावे ॥
मराठा तितुका मेळवावा । आपुला महाराष्ट्र धर्म वाढवावा ।
ये विषयी न करितां तकवा । पूर्वज हासती ॥
भले कुळवंत म्हणावे । तेही वेगी हजीर व्हावे ।
हजीर न होता कष्टावे । लागेल पुढे ॥
एक जाती दोन जाती पावला । तो कैसा म्हणावा भला ॥
तुम्हा सकळांस कोप आला । तरी क्षमा केली पाहिजे ॥
देवद्रोही तितुके कुत्ते । मारुनि घालावे परते ।
देवदास पावती फत्ते । यदर्थी संशयो नाही ॥
देव मस्तकी धरावा । अवघा हलकल्लोळ करावा ।
मुलुख बडवा का बुडवावा । धर्म संस्थापनेसाठी ॥
विवेक विचार सावधपणे । दीर्घ प्रयत्न केलाचि करणे ।
तुळजावराचेनि गुणे । रामें रावण मारिला ॥

* * *

कुवत.

याचाच व्यवहारात अर्थ असा निघतो की, ही एक मानवाची प्रवृत्ती अथवा स्वभाववैशिष्ट्य आहे, ज्यात तो दुसऱ्याशी सर्व तऱ्हेने एकरूपता साधतो. अशा वृत्तीला आपल्याकडे बऱ्याच शब्दांनी संबोधिले आहे. जसे आत्मीयता, ममत्व, आपलेपणा, सौहार्दता, जिव्हाळा, कळकळ, प्रेम, सख्य, समानुभूती, तदनुभूती किंवा भावनारोपण इत्यादी. मला असे वाटते Empathy या शब्दासाठी आत्मीयता अथवा ममत्व हा शब्द अधिक व्यवहारी व योग्य वाटतो. म्हणून आत्मीयतेबद्दल काही विचार.

२) आत्मीयता -

या शब्दातून दोन आत्म्यातील एकरूपतेचे दर्शन होते. म्हणजे व्यवहारांत दोन व्यक्तींमधील एकात्मतेचा भाव दिसून येतो. दोन व्यक्तींमध्ये दुजाभाव असला तर माझेपणाची भावना असणार नाही आणि माझेपण असल्याशिवाय ममता किंवा ममत्व उत्पन्न होणार नाही. म्हणजे आत्मीयता किंवा Empathy असणार नाही. म्हणून व्यवहारांत दिसून येणारे प्रेम, आपुलकी किंवा कळकळ यासाठी आत्मीयतेची भावना आवश्यक आहे. हाच भाव मानवी स्वभावाचे वैशिष्ट्य असून त्यातूनच त्याचे व्यक्तिमत्त्व समजून येते.

भारतीय सनातन विचारसरणी मानवासहित निसर्गातील सर्व पदार्थांत परमतत्त्वाचा एक अंश आत्मतत्त्वरूपांत अस्तित्वात असतो व तो सर्वांठायी एकच आहे असे मानते. पण व्यवहारांत माणूस म्हणून सर्व माणसे सारखी असली तरी प्रत्येक माणूस आपापल्या परीने निराळा असतो. पण दृश्य सृष्टीची रचना अशी आहे की, प्रत्येक विशेषाच्या मागे सामान्य असते. तेव्हा माणसाच्या निराळेपणामागे असणारे सामान्य कोणते, याचा शोध प्राचीन काळापासून विचारवंत करीत आहेत. भारतामध्ये आचार्य कपिलांनी असा सिद्धांत मांडला की, जे जे आकारात येते, ते त्रिगुणांनी बनलेले असते. हा सिद्धांत भारतीय तत्त्वज्ञानाने ग्राह्य धरला. माणूस देखील सत्त्व,

रज आणि तम गुणांनी बनलेला आहे. प्रकाश, ज्ञान, शांति, समाधान, नि:स्वार्थी प्रेम, आत्मीयता असे गुण सत्त्व गुणांत येतात. प्रत्येक माणूस या तीन गुणांतील एकाच्या वरचढामुळे ओळखला जातो. जसे सत्वगुणी, रजोगुणी आणि तमोगुणी. सामान्य माणूस या त्रिगुणाच्या साम्राज्यातच वावरत असतो.

आत्मीयतेचा विचार सत्त्वगुणातच केला जातो. त्याचे वर्णन समर्थांनी असे केले आहे.

परपीडेचे वाहे दु:ख । पर संतोषाचे सुख । वैराग्य देखोन हरिख ।
परभूषणे भूषण । परदूषणे दूषण । परदु:खे सिण जाण ।
मानी तो सत्वगुण ।।

अर्थ - दुसऱ्याला दु:ख झाले की, ज्याला दु:ख होते, दुसऱ्याला संतोष झाला की, ज्याला सुख वाटते, वैराग्य पाहून ज्याला आनंद होतो तो सत्व गुण, जो दुसऱ्याचे भूषण ते आपले भूषण व दूषण ते आपले दूषण मानतो, दुसऱ्याच्या दु:खाने जो कष्टी होतो, तो सत्त्वगुण असे आत्मीयतेचे (आधुनिक व्याख्येनुसार) वर्णन केले आहे.

याच संदर्भात ईशावास्योपनिषदातील ६ वा मंत्र हेच सांगतो,

यस्तु सर्वाणि भूतानि
आत्मन्येवानुपश्यति ।
सर्वभूतेषु चात्मानं ।
ततो न विजुगुप्सते ।। ६ ।। ई. उ.

अर्थ - जो सर्वभूतांना आत्म्यात पाहतो आणि सर्व भूतांमध्ये आत्मा पाहतो, तो कोणाचाही द्वेष करीत नाही (न विजुगुप्सते) म्हणजे एकात्मता साधतो आणि आत्मभाव निर्माण होतो. याचा अर्थ असा होतो की, व्यवहारात आत्मा अणि अनात्मा यांच्या मिश्रणाने जगाची निर्मिती झाली असल्यामुळे व्यक्तीमध्ये किंवा वस्तूमध्ये दोष असणारच. अपुरेपणा किंवा कमीपणा भासणारच व तो अपेक्षित आहे. माझ्यात जे आत्मतत्त्व आहे,

ते सर्व प्राणिमात्रांत आहे याची जाणीव झाली की, सर्व भेदाचे पडदे गळून पडतात आणि आपण सगळे एक आहोत ही भावना तयार होते. हीच ती आत्मीयता. मग त्याचे सुख वा दु:ख माझेच आहे असे वाटते. मग द्वेषाचे कारणच उरत नाही. आणि दोष काढले तर दोष काढणाऱ्या माणसांत कल्याण बुद्धीचीच भावना असते. जशी आई आपल्या मुलास किंवा गुरुजी आपल्या शिष्यास दोष दाखवून देतात. हीच भारतीयांची पूर्वापार चालत असलेली संस्कृती आणि यांतून आत्मीयतेचे पुरेपूर दर्शन होते.

याचे उत्तम उदाहरण म्हणून पंढरीच्या वारीकडे बघता येईल. त्या दीड दोन महिन्यांत पंढरीला येणाऱ्या वारकऱ्यांत उच्च-नीचतेची श्रीमंत-गरीब ही भावना जाऊन आपण एक आहोत ही भावना असते. प्रत्येक वारकरी सर्व भेदाभेद विसरून एकमेकांचे पादस्पर्श करून व उराउरी भेट घेऊन ती व्यक्त करीत असतो.

३) आत्मीयतेचा शास्त्रीय विचार -

आत्मीयता त्रिगुणात्मक असल्याने ती जीवात्म्याबरोबर उपजतच असते. ही भावनेशी संबंधित असल्याने ती मनाशी निगडित असते. मानवी मन आध्यात्मिक विचारसरणीप्रमाणे अंत:करण चतुष्टयाचा एक भाग आहे. या अंत:करणचतुष्टयात मन, बुद्धी, चित्त व अहंकार या घटकांचा समावेश असतो. मानवी अंत:करण शुद्ध स्वरूपात असते. परंतु जीवात्म्याच्या वासनेमुळे त्या व्यक्तीतील स्वभावात बदल घडून येतात, किंबहुना मानवी जन्मच वासनेमुळे होतो. म्हणूनच 'जन्म घेणे लागे वासने संगे' ही विचारसरणी भारतीय संस्कृतीत गृहीत धरली आहे.

शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार करता, आत्मीयता अथवा ममत्व Empathy हे मानवाच्या जनुकातच असते. आत्मीयतेतील प्रेमभावना ही Oxytocin या संप्रेरकामुळे येते. आणि याचे जनुक 'G' असून त्याच्या अस्तित्वामुळेच मेंदूतील रासायनिक पदार्थ निर्माण होतो. ज्यामुळे

आत्मीयता, त्याग आणि विश्वासाची भावना निर्माण होते. जनुकशास्त्र असेही सांगते की 'G' जनुक हे सजीवासाठी एक मूलभूत गरज भागवते. परंतु ते असेही सांगते की, मानवी मेंदू व शरीर अनेक जनुकांनी तयार झालेला असतो व ते सर्व एकमेकांशी संबंधित असतात. म्हणून भावनेची क्रिया हे जनुक ठाऊक होऊन देखील खूप गुंतागुंतीची आहे. त्याचबरोबर व्यक्तिगत आचरण व सामाजिक वातावरण यांचा प्रभाव या जनुकावर पडत असतो. याचाच अर्थ असा होतो की, जर 'G' जनुकाचे दोन प्रकार असले तर माणूस लगेच साधू बनत नसतो. पण हे नक्की की, या जनुकाच्या अस्तित्वामुळे त्या व्यक्तीच्या स्वभावाची दिशा कळू शकते.

मेंदूवरील आधुनिक संशोधनाने असे दाखवून दिले आहे की, माणसाच्या मेंदूमध्ये Mirror neurons किंवा Empathy neuron (आत्मीयतेचा पेशीसमूह) असून यांचे कार्य दुसऱ्या माणसाच्या भावना या माझ्याच आहेत असे समजून वागण्यास मदत करतात. ज्यामुळे सहजीवनाची भावना उत्पन्न होते. या पेशीसमूहाची क्षमता जाणीवपूर्वक प्रयत्नाने वाढवता येते. उदा. संस्कार, शिक्षण इत्यादी. या शास्त्रीय निरीक्षणानुसार भारतीय विचार प्रणालीच्या त्रिगुणात्मक स्वभावाच्या सिद्धांताला पुष्टीच मिळते, असे वाटते.

मानवी मेंदूचा विकास होताना काही सामाजिक आणि अनुभवाच्या घटना त्याला अपेक्षित आकार देत असतात. मेंदू शरीराच्या इतर अवयवाच्या वाढीच्या विश्वासावर वाढत असतो. उदा. गर्भ हा शून्य गुरुत्वाकर्षणात वाढू शकत नाही. आपल्या शरीरातील पेशी या गुरुत्वाकर्षणामुळे विकसित होतात व वाढतात. त्यांना गुरुत्वाकर्षणाचा ओढा योग्य दिशेने मिळणे आवश्यक असते. तसेच बाळाचा मेंदू अनेक जन्मांचा किंवा कुटुंबाचा असतो.

शास्त्र असेही सांगते की, जनुकच फक्त एका पिढीतून दुसऱ्या

पिढीत जात नाहीत तर ज्ञान आणि तांत्रिकता पण पुढील पिढीत जात असते. मेंदूमध्ये इतकी क्षमता आहे की, बाजूच्या सामाजिक व स्वत:च्या शारीरिक वातावरणामुळे त्यांची पुनर्रचना होऊ शकते.

मानसशास्त्राचा साधारण असा संकेत आहे की, जेव्हा समाज मानवी जीवनाचा आदर करतो व कमीत कमी 'ते' न समजता 'आम्ही' समजतो, तेव्हा समाज उन्नत होतो.

४) आत्मीयता आणि धर्म -

''तुम्ही नैतिक असण्यासाठी धर्माची गरज नाही. जर तुम्ही योग्य अयोग्य ठरवू शकत नाही, तर तुमच्यात आत्मीयतेची कमी आहे, धर्माची नाही.''

ईश्वराने मनुष्याला एका निराळ्याच साच्यात घालून बनविले आहे. त्याने माणसाच्या हृदयात सद्भावना ठेवली आहे. आत्मीयता आणि अनुकंपा ठेवली आहे. माणूस कोणाचे दु:ख सहन करू शकत नाही. जो पर्यंत तो दुसऱ्याचे दु:ख निवारण करत नाही, तोपर्यंत त्यांच्या मनाला समाधान मिळत नाही.

मन माणसाला प्रेरणा देण्याचे काम करीत असते. मन केवळ व्यक्तीचेच असते असे नाही, तर समाजाचेही एक सामूहिक मन असते. ते सामूहिक मन सतत बदलत असते.

आज जगात दोन प्रकारच्या संस्था फार शक्तिशाली झाल्या आहेत. एक धर्मसंस्था व दुसरी शासनसंस्था दोन्ही संस्था लोकसेवेच्या हेतूने उभ्या केल्या गेल्या. दोन्हींची गरज भासली म्हणून त्यांची निर्मिती झाली. परंतु या दोन्ही संस्था समाजासाठी समस्या बनल्या आहेत. आज जगाची काय स्थिती आहे ? ख्रिश्चन, इस्लाम, हिंदू आणि बौद्ध व इतर अनेक धर्म आहेत हे सगळेच धर्म अहिंसा, शांती, प्रेम वगैरे तत्त्वांना मानणारे आहेत. तरीही जगात शांती स्थापन करण्याच्या कामावर कोणाचाही प्रभाव दिसून येत नाही. या सगळ्या धर्मवाल्यांनी आपापल्या संस्था

बनवल्या. धर्मसंस्थांची सगळी जबाबदारी धर्मसंस्थांच्या पुरोहितांवर आहे, असेच लोकांनी मानले आहे. धर्माला आम्ही या लोकांच्या ताब्यात दिले आणि त्यांनी धर्माला या संस्थांच्या तुरुंगात ठेवले.

आज आम्ही ज्यांना धर्म म्हणतो ते वास्तविक धर्म नाहीत, तर पंथच आहेत. खरा धर्म प्रत्यक्ष अनुभवाचा असतो. तहानेल्या माणसाला पाणी पाजले तर त्याला आनंद होईलच, पण त्याने तुमच्या ही हृदयाला आनंद होईल. हा खरा अनुभवाचा धर्म, असे पूज्य विनोबा मानतात.

वास्तविक ज्या धर्माची स्थापना ऐक्य निर्माण करण्याकरिता झाली त्या धर्मांनीच भेदभाव निर्माण केले. प्रत्येकजण आपला निराळा गट करून बसला आहे आणि भेदभाव निर्माण करण्यात मदत करीत आहे.

ईश्वराने मानव निर्माण केला म्हणून मानवतेकरता मिळून मिसळून राहणे हाच खरा धर्म आहे. मानवामध्ये फूट पडू न देणे हाच खरा धर्म आहे. सगळ्या कायद्यांच्या वर सर्वोत्तम कायदा आहे हृदयाचा कायदा. तो प्रेमाचा कायदा आहे.

पूज्य विनोबा धर्माचे चार चरण सांगतात आणि यावरच खऱ्या धर्माची उभारणी होते असे प्रतिपादतात. श्रद्धा, सत्य, त्याग आणि प्रेम हे चार चरण. यातील प्रेम म्हणजेच ममत्व किंवा आत्मीयता. याला दया पण म्हणतात. काही वेळा आम्ही दया, प्रेम करतो, पण त्याला धर्म केला नाही. म्हणजे त्याचे कर्तव्यात रूपांतर केले नाही, तर त्याला पैशाशी जोडले. घरात प्रेम असते, पण बाजारात गेले की ते संपते. तेथे फसवा-फसवीचा व्यवहार सुरू होतो. आत्मीयता संपून जाते.

धर्माच्या संदर्भात 'हितवाद' या नियत कालिकाचे संपादक सखाराम गणेश देऊस्कर विवेकानंदांना भेटायला आले. चर्चा झाली. धर्माबाबत विवेकानंदांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली व म्हणाले "महाशय, जोवर या

देशांत एक कुत्रा सुद्धा अन्नाशिवाय उपाशी असेल, तोवर त्याची चिंता वाहणे व त्याची तरतूद करणे हाच तुमचा आणि माझा धर्म आहे. बाकीचा सर्व धर्मविचार चुकीचा आणि खोटा आहे.'' हीच ती आत्मीयता. जी मानवतेचा पाया समजली जाते. म्हणून विवेकानंद म्हणत ''माणूस घडवतो, माणसाला माणूसपण देतो तो धर्म.''

येथे कोणी असेही म्हणू शकेल की, बघा, विज्ञानाने आजचा माणूस घडवला आहे. त्याला सर्व सुखांची सोय उपलब्ध करून दिली आहे. शेवटी माणसाला सुखच हवे असते ना, त्याला विज्ञानाने भरभरून दिले आहे.

पण विवेकानंदांनी धर्म व विज्ञान यांचे साम्य दाखवताना असे म्हटले आहे. ''जगातील सर्व माणसांचे मंगल करण्यासाठी जन्माला आलेल्या आणि ते अंगभूत सामर्थ्य जवळ असलेल्या सर्व धर्मांनीच मानव जातीचे सर्वांत मोठे नुकसान केले आहे.'' आणि विज्ञान नेमके हेच करतेय आणि हेच करणार हे जाणवले होते. धर्म आणि विज्ञान यांच्यात असलेले अमर्याद सामर्थ्य आणि त्यांच्या अमर्याद मर्यादा विवेकानंद ओळखून होते. धर्मामुळे कर्मकांड आणि अंधश्रद्धा दूर व्हावयास हव्यात आणि विज्ञान तंत्रज्ञान यांमुळे चंगळवादाला लक्ष्मण रेषा हवी.

असे धर्ममार्तंड आणि विज्ञाननिष्ठांना मानवतेच्या धर्मापासून दूर नेणाऱ्या मंडळींना विवेकानंदांनी परखडपणे बजावले होते. विवेकानंदांचे असेही प्रतिपादन होते की, आजचा धर्म, हा विज्ञान आणि धर्म यांच्या समन्वयातून बनलेला असेल आणि तो स्थितिप्रिय नसेल तर तो गतिप्रिय असेल. काळाच्या ओघात त्याला सुद्धा बदलावे लागेल असे सांगितले आहे.

५) आत्मीयता आणि अध्यात्म -

आत्मीयता हा सकारात्मक विचाराचा व आचाराचा एक गुण. सकारात्मक विचार हा सत्वगुणाचा भाग असून तो आध्यात्मिक वृत्तीत

आहे. ही आध्यात्मिक वृत्ती माणसाला आपल्या आंत डोकावयाला प्रवृत्त करते. आत्म्याची प्राप्ती करणे हा अध्यात्माचा उद्देश खराच आहे, तसा तो अनेक मार्गांनी प्राप्त करता येतो. पण व्यवहारी जीवनात वावरताना आत्मप्राप्तीच्या माणसाची ओळख त्याच्या सामाजिक वर्तनातूनच होते. त्याच्या सकारात्मक विचारातूनच होते.

स्वामी विवेकानंदानी ब्रह्म आणि वेदान्त यांचा निष्कर्ष सांगताना म्हटले आहे की, प्रत्येक मानवातील ही आंतरिक दिव्यता हेच मूलभूत सत्य आहे. प्रत्येक जीव अव्यक्त ब्रह्म आहे आणि आंतर प्रकृतीला वशीभूत करून स्वत:चे हे अव्यक्त ब्रह्मस्वरूप व्यक्त करणेच जीवाचे परम उद्दिष्ट होय. कर्म, उपासना, मन:संयम वा ज्ञान यांपैकी एक वा अनेक मार्गांचा अवलंब करून ते उद्दिष्ट साधा व मुक्त व्हा.

अध्यात्म असेही सांगते की, याच देहात; याच जन्मी आपण आपल्या चारित्र्याची आणि आपल्या व्यक्तिमत्वाची पक्की उभारणी करू शकतो. ही उभारणी ज्ञानमय आणि करुणामय असेल. हे मन निर्भय असेल स्थिर असेल. चांगले व वाईट असे कोणतेही मूल्यात्मक दिशा निर्देशन बाह्य भौतिक ऊर्जा स्त्रोतात असू शकत नाही. चांगुलपणा वा वाईटपणा हा निव्वळ त्या निसर्गात नसतो. तो असतो मनुष्यात. अध्यात्म प्रत्येक व्यक्तीमध्ये सुप्त असलेल्या ऊर्जास्त्रोताचा शोध घेण्यास शिकवते.

आज सर्वदूर पसरलेली गुन्हेगारी आणि उपचारिता अनुभवास येते. हा गुन्हेगारीचा प्रश्न बौद्धिक ऊर्जेद्वारे सुटणार नाही. कारण मोठमोठे गुन्हेगार बुद्धिमान असतात. त्यांच्या बुद्धिमत्तेला लगाम घालणे इष्ट असते. दुसऱ्याचाही विचार त्या बुद्धीने करावा म्हणजे त्यात आत्मीयता असावी. आणि जोपर्यंत माणूस स्वत:मध्ये अनंतत्व पाहणार नाही आणि जनुक परंपरेतून मुक्त होणार नाही, तोपर्यंत तो काही करू शकणार नाही.

जीवनाच्या आणि कार्यकौशल्याच्या (Skills) सर्वच क्षेत्रात माणसाची वाढही त्याच्या बौद्धिक पातळीवर झाली पाहिजे. त्याचा आध्यात्मिक विकास झाला पाहिजे म्हणजे त्याला शांती लाभेल आणि तो इतरांना शांती प्राप्त करून देईल.

या संदर्भात Bertrand Russel बर्ट्रांड रस्सेल हे अज्ञेयवादी असून, दुसऱ्या महायुद्धाची परिस्थिती पाहून त्यांनी Impact of science on society या त्यांच्या पुस्तकात लिहून ठेवले आहे की 'ज्ञानाबरोबर माणसाचे शहाणपणही वाढले नाही, तर ज्ञानाची वाढ ही केवळ दुःखाची वाढ ठरेल.

परमतत्त्वाच्या जाणीवेची अध्यात्मात अपेक्षा व ध्येय असते, तसेच व्यवहारात ऐहिक जीवनात व्यक्तीच्या जाणीवेशी एकरूप होणे, हेदेखील त्या परमतत्त्वाशी एकता साधणे होऊ शकते. उ. प. विद्यालंकार, गाडगे महाराज, बाबा आमटे यांनी हे साधले.

आत्मीयता अथवा ममता ही फक्त आध्यात्मिक लोकांतच किंवा ईश्वरवादी यांच्यातच असू शकते, ही एक कल्पना समाजात रूढ आहे. पण तसे व्यवहारात दिसत नाही. समाजात तीन प्रकारचे लोक असतात.

ईश्वरवादी आणि आध्यात्मिक २) निरीश्वरवादी पण आध्यात्मिक ३) अज्ञेयवादी म्हणजे ईश्वर आहे किंवा नाही हे माहिती नाही. पण आलेले जीवन चांगल्या प्रकारे जगण्याची इच्छा बाळगणारे. निरीश्वरवादी देखील आध्यात्मिक असू शकतात. पण त्यांनी हे मानले पाहजे की, हे जग ओघाने निर्माण झाले नाही. याच्या पाठीमागे कोणीतरी नियंता आहे, जो सर्व क्रमाने हे चालवतो. मृत्यूनंतर आपण येथून काही घेऊन जात नाही. तेव्हा आपण पूर्वी काय झाले किंवा पुढे काय होणार याची काळजी कशाला करावी किंवा वर्तमानाची तरी का करावी ? जेव्हा तो या सर्व गोष्टींपासून अलिप्त विचारसरणीचा होतो, तेव्हा तो आध्यात्मिकच समजला

जातो. तिसरा प्रकार अज्ञेयवाद्यांचा. ते त्यांच्या कुवतीप्रमाणे कर्म करीत राहतात आणि आयुष्यात रस घेत असतात व ते स्वत:लाच बजावत असतात की, त्यांची सर्व ताकद आयुष्यांत चांगल्याच्या पाठीमागे उभी करावी (Positive Psychology) आणि अशा जाणीवेने जो कोणी वागतो तो विचलित होत नाही.

सबब वरील तिन्ही प्रकारचे लोक आत्मीयता बाळगू शकतात आणि त्यांच्या जीवनांचे नैतिक अधिष्ठान प्रगल्भ करू शकतात.

आत्मा सर्व सजीवांमध्ये एक असला तरी जो जीवात्मा म्हणजे आपण आहोत, त्याचे विनोबांनी तीन प्रकार सांगितले आहेत.

१) पापात्मा - हा आत्मा अनंत वासनांनी वेढलेला असतो.

२) पूतात्मा - जेव्हा वासनांचा पूर्ण नाश होतो तेव्हा तो मुक्त होतो व पूतात्मा बनतो.

३) परमात्मा - तो जेव्हा शुद्ध होतो व व्यापक बनतो, तेव्हा तो परमात्मा बनतो. म्हणजेच तुकोबांनी म्हटल्याप्रमाणे

गिळूनी सांडिले कलिवर ।

भवभ्रमाचा आकार ॥ अशी स्थिती येते

विनोबा असेही सांगतात की, जो पर्यंत आपण आपल्यांत डोकावत नाही, तो पर्यंत आपण आत्मस्वरूप होणार नाही. जेव्हा आत्मस्वरूप होतो तेव्हा असे जाणवते की, आपण सारे एक आहोत. वेगळे वेगळे दिसत असलो तरी आपण सर्व एकच पदार्थ आहोत. अशी वृत्ती जेव्हा येते, तेव्हा खऱ्या अर्थाने आमच्यात आत्मीयतेची जाणीव झाली असे समजावे लागेल. तेव्हा ती खऱ्या अर्थाने Empathy समजली जाईल.

या आत्मीयतेमुळेच भारतीय संस्कृतीमध्ये सर्वांच्या हिताचा विचार केला आहे आणि ही प्रार्थना केली आहे.

सर्वेऽत्र सुखिन: सन्तु ।

सर्वे सन्तु निरामया: ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु ।
मा कश्चित् दु:खमाप्नुयात् ॥

६) आत्मीयता आणि नैतिकता व सभ्यता

नीती ही सभ्यतेचा पाया समजली जाते, असे महात्मा गांधी 'हिंदी स्वराज्य' या पुस्तकातील एका लेखात म्हणतात आणि नीतीसाठी आत्मीयता आवश्यक आहे असे आधुनिक मानसशास्त्र समजते. याच लेखात महात्मा गांधी म्हणतात, नीतीच्या नावावर अनीती शिकवली जाते. नीती वरवरच्या गोष्टीत असू शकत नाही. शरीराचे सुख कशात आहे व ते कसे मिळेल हेच आजची सभ्यता शोधीत असते. तेच देण्याची धडपड करीत असते. पण ते सुख सुद्धा मिळू शकत नाही.

भारतीय विचारसरणी असे मानते की, सभ्यता म्हणजे मनुष्याला कर्तव्याचा मार्ग दाखवणारी वागणुकीची पद्धत. कर्तव्य बजावणे म्हणजे नीतीचे पालन करणे. नीतीचे पालन करणे म्हणजे आपल्या मन-इंद्रियाला ताब्यात ठेवणे. असे केल्याने आपण स्वत:ला ओळखतो. हीच सभ्यता किंवा सुधारणा. म्हणजे या सभ्यतेच्या किंवा सुधारणेच्या मुळाशी आत्मीयता असणे आवश्यक असते. त्याशिवाय आपण दुसऱ्या व्यक्तीच्या जाणीवेत शिरू शकत नाही आणि आत्मीयता असण्यासाठी शुद्ध अंत:करणाची गरज असते.

७) आत्मीयता आणि सहानुभूती -

बऱ्याच वेळा, रोजच्या व्यवहारात आत्मीयता आणि सहानुभूती हे शब्द समान अर्थाने वापरले जातात. किंबहुना लोकांचा समज दोन्ही एकच आहेत. पण तसे नसून दोन्हींचा अर्थ आणि उद्देश यांमध्ये फरक आहे. ढोबळ मानाने सहानुभूतीमध्ये एखाद्या व्यक्तीच्या दु:खाबद्दल हळहळ व्यक्त केली जाते तर आत्मीयता असलेल्या व्यक्तीला त्याबाबत एक प्रकारची कळकळ असते.

नं.	सहानुभूती	आत्मीयता
१	सहानुभूतीमध्ये दुसऱ्याच्या मानसिक दु:खात वैचारिकरित्या सहभागी होण्यावर भर दिला जातो.	आत्मीयतेमध्ये बोलणाऱ्याच्या दु:ख किंवा सुखाच्या मानसिक अवस्थेत तितक्याच तीव्रतेचा सहभाग असतो.
२	समोरच्या व्यक्तीच्या भावनामधील काही गोष्टीशीच सहमती असते.	येथे भावनेशी असहमत असण्याचा प्रश्नच येत नाही. माणूस सर्व तऱ्हेने एकरूप होतो.
३	समोरच्या व्यक्तीला पटणाऱ्या भावनेशीच याची सहानुभूती असते	समोरच्या पूर्ण अंतरंगात तो प्रवेश करतो.
४	एवढी व्यापकता दिसून येत नाही.	येथे दुसऱ्यात सर्वार्थाने व्यापक सहभाग असून कृतिशीलतेवर भर आणि रस असतो.
५	यांत सर्व निर्णय बुद्धीच्या स्तरावर घेतले जातात.	यांत सुहृदयाच्या अनुषंगाने भावनेची समरसता दिसून येते.
६	बुद्धीने व विवेकाने निर्णय घेतल्याने अवगुणावर पांघरूण घालण्याचा प्रश्न येत नाही.	अधिक प्रेमापोटी अवगुणाचे समर्थन किंवा त्यावर पांघरुण घालण्याची वृत्ती असते.

८) आत्मीयतेला (Empathy) एवढे महत्त्व का ?

आज पाश्चात्य तत्त्वज्ञ, समाजशास्त्रज्ञ आणि सामाजिक उद्योजक (Social Entrepreneur) आत्मीयतेवर एवढा भर का देत आहेत ? आणि हा विषय मूल्याधिष्ठित जीवनशैलीचा भाग समजून त्यांचा शालेय अभ्यासक्रमात समावेश करावा, याचा आग्रह धरत आहेत. याचे कारण काय असावे हा विचार करायला लावणारा प्रश्न आहे. तसे बघितले तर ही बाब भारतीय संस्कृतीच्या नजरेतून बघता आपल्यास सुखावणारी व समाजहिताचीच आहे. विचार करता असे जाणवते की, 'रेनोसेन्स' नंतर

आणि यांत्रिक क्रांतीनंतर व विज्ञानाच्या प्रगत शास्त्रानुसार मिळत गेलेल्या ऐहिक सुखसोई ज्यामुळे माणसाच्या स्वातंत्र्याच्या कल्पनेत बदल झाला, धर्माचे मानेवरील जू जरा बाजूला झाले आणि स्वातंत्र्याची जागा स्वैराचाराने घेतली आणि जीवनाला एक वेगळी दिशा मिळाली. त्याचे दृश्य परिणाम विचारवंतांना आत्मचिंतन करायला लावणारे ठरले. म्हणून पिटर सारोकीन सारख्या विचारवंताने त्याच्या The crisis of our Age या पुस्तकात असे नमूद केले आहे. We are in the mind of an enormous conflagration buming everything into ashes — Even expanding misery spreads in glommy shadow over larger and larger areas. The fortunes happiness and ceniports of untold millions have idasppeared peace. Security and safty have vanished ----- A great tormodo sweeps over the whole of mankind." इतकेच नव्हे तर ख्रिस्ती धर्माचे सर्वेसर्वा पोप फ्राँसिस यानी 'पैसा हाच परमेश्वर' व जडवादी जीवनशैलीबद्दल आपले परखड मत मांडले आहे, ते म्हणतात, "Let us fight the money idol and unfair system without ethics in which money rules everything' अशा या जीवनशैलीचा परिणाम स्वार्थ, आत्मकेंद्रित वृत्ती आणि याचबरोबर एक नकारात्मक मानसिकता तयार झाली. ज्यात स्वार्थ व लालसा उपजत असून स्वहित व स्वार्थ आणि ऐहिक सुख हेच माणसाचे मुख्य ध्येय आहे. यासाठी समाज आसक्त झाला. परिणामी तो आत्मीयताहीन बनत गेला.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात पाश्चात्य तत्त्वज्ञानाने जीवनाचा दृष्टिकोन बदलल्याचे जाणवते. जसे, आत्महीन व आत्मकेंद्रित जागा You are, therefore I am या विचारसरणीने घेतली. म्हणजे 'तू आहेस म्हणून मी आहे' म्हणजेच भारतीय विचारप्रणालीनुसार आपण दोघे एकमेकांसाठी आहोत आणि एकच आहोत ही भावना समाजमनात दृढ करण्याचा प्रयत्न झाला. त्यानुसार हा विषय शालेय अभ्यासात समाविष्ट

करण्यात आला. शिक्षण तज्ज्ञांच्या हे लक्षांत आले की, आत्मीयता जर विद्यार्थ्यांत रुजली तर हिंसाचारास आळा बसू शकतो. म्हणून इंग्लंडसारख्या राष्ट्राने

१) Social and Emotional Learning (SEL) या नावाखाली शालेय अभ्यासक्रमांत आत्मीयता हा विषय समाविष्ट केला आणि हितकारक विचाराची लोकप्रियता वाढवण्याचे ठरवले.

२) तज्ज्ञांच्या हेही लक्षात आले की, भावनेशी निगडित असलेली कौशल्ये (Skills) आत्मीयतेच्या वृद्धीमुळे व्यावसायिक व आर्थिक विकासास मदत करू शकतात. विशेषत: गोलमन सारख्या तज्ज्ञाने असे दाखवून दिले की, 'आत्मीयतेचा उद्देश लोकांतील संबंधाचा सकारात्मक विचार हा त्यांना स्वत्वाची जाणीव आणि इतरांचा सकारात्मक विचार करण्यास मदत करतो. यामुळे हिंसक प्रवृत्तीस आळा बसू शकतो.

३) इंग्लंडमधील शासनाने आत्मीयतेकडे अधिक लक्ष देण्याचे कारण, १९९० पासून Richard Layard आणि इतर तज्ज्ञांनी असे प्रतिपादले की, लोक जर आनंदी राहू लागले, तर आपण संकुचित हिताचा विचार न करता व्यक्ती व समाजाच्या अधिक हिताचा करावा असे त्यांना वाटते. हा सकारात्मक मानसिकतेचा विचार अमेरिकन मानसशास्त्रज्ञ Martin Seligan यांच्या निष्कर्षाशी मिळता जुळता आहे. या निष्कर्षात त्यानी असे दाखवून दिले आहे. की, 'आनंदी' आणि 'हितकारकता' हाच जीवनाचा उद्देश आहे. यासाठी मूल्याधिष्ठित शिक्षणावर भर देण्यात यावा. Richard Layard यांनी असे ही दाखवून दिले आहे की, आमच्यात उपजत असलेली आत्मीयतेची भावना आम्ही जाणीवपूर्वक वाढवणे गरजेचे आहे.

४) आत्मीयतेची आर्थिक बाजू देखील आहे. जसे काही कामाच्या ठिकाणी (Work place) आत्मीयता ही भावनिक व स्पर्धात्मक

बाबतीत वरचढ ठरते. Damiel Goleman यांनी त्यांच्या Working with emotional intelligence या पुस्तकात 'आत्मीयता ही सर्व स्पर्धात्मक चढाओढी व कुशलतेचा पाया आहे' असे म्हटले आहे.

५) अर्थशास्त्र आणि आत्मीयता - आत्मीयतेपासून अर्थशास्त्र देखील सुटू शकले नाही. सरळपणे असे समजले जायचे की, अर्थकारणातला माणूस किंवा व्यावसायिक हा तर्काधिष्ठित असतो. पण नोबेल पारितोषिक विजेत्या अमर्त्यसेन यांनी १९७० च्या दशकात या सिद्धांताला आव्हान दिले आणि 'Rational Economic man as close to being a social morain' म्हणजे तर्काधिष्ठित व्यावसायिक हा अपरिपक्व बुद्धीचा माणूस असतो. आता व्यक्ती ही स्वत:च्या हितापेक्षा समूहाचे कल्याण व्हावे या भावनेने काम करतात. आत्मीयतेने तर्काधिष्ठिततेची पूर्ण जागा घेतली नसली तरी ती यासाठी बऱ्याच अंशी कारणीभूत असते.

६) विशिष्ट तज्ज्ञांनी आत्मीयतेबद्दल आपले असे निष्कर्ष नोंदवले आहेत.

अ) Finnish या मानसशास्त्रज्ञाने आत्मीयता मानवतेचा मार्ग दाखवते असे म्हटले आहे.

ब) Affie Kohan हा अमेरिकन शिक्षण तज्ज्ञ म्हणतो की आत्मीयतेचे शाळेतील शिक्षण समाजाभिमुख वागणूक दर्शविते.

क) Empathy Research - Martin Hoftman याच्या मते आत्मीयता हा नैतिकतेचा पाया आहे.

९) **आत्मीयतेची संस्कृती Empathic Civilisation**

ऊर्जा आणि पर्यावरण यांच्या संदर्भात डिसेंबर २००९ साली कोपनहेगन येथे जागतिक १९२ देशांच्या तज्ज्ञांची एक परिषद आयोजित

करण्यात आली होती. या परिषदेमध्ये जागतिक वाढत चाललेले तपमान, पर्यावरणातील वाढते CO_2 चे प्रमाण व प्रदूषण आणि यामुळे पृथ्वी ही संहाराकडे झुकत चाललेली आहे, यावर विचारविनिमय झाला. ठोस निर्णय व उपाय निघू शकला नाही. पण सर्वांचे एका बाबीवर एकमत झाले की, मूळ प्रश्न खूप खोलवरचा आहे. आणि यात २०० वर्षापूर्वी त्या वेळेच्या विचारवंतांनी रुजवलेल्या कल्पनांचा भाग आहे.

मध्ययुगीन काळात ख्रिस्ती धर्माची अशी एक कल्पना होती की, मानवाची अधोगती ही त्याच्या पापामुळे व दुर्गुणांमुळे होते व त्याला दुसऱ्या जगात न्याय मिळतो. या विचाराला John Locke, Adam Smith इत्यादी विचारवंतांनी खोटे ठरवीत माणूस हा १) तार्किक २) अलिप्त ३) स्वायत्त ४) लोभी आणि आसक्त असून ५) उपयुक्ततावादी आहे. आणि तो या जगात ऐहिक सुख भोगण्यासाठीच आला आहे. (येथे चार्वाकाच्या तत्त्वज्ञानाशी साम्य आढळते.) या विचारप्रणालीमुळे माणूस भोगवाद आणि ऐहिक सुखाकडे वळला. त्यामुळे स्थावर मालमत्ता जमवण्याकडे त्याचा कल राहिला. एकोणीस आणि विसाव्या शतकातील यांत्रिकी क्रांतीनंतर आलेल्या आर्थिक मंदीमुळे आर्थिक व सामाजिक संतुलन बिघडले. या ऐहिक विचारसरणीचे कोपेनहेगन येथे जमलेल्या विचारवंतांना भय वाटून मानव जातीवर आणि पृथ्वी ग्रहावर अनिष्ट परिणाम होतील याची साधार चिंता वाटू लागली.

यामुळे समाजशास्त्रज्ञांनी मानवाच्या उत्क्रांतीचा पुनर्विचार, पुन:परीक्षण आत्मीयतेच्या भिंगातून करण्याचा प्रयत्न केला. त्यांत त्यांना असा एक धागा सापडला की, ज्यात मानवाची उत्क्रांती ही निसर्गावर मानवी शक्तीने मात करणे एवढीच नसून, आत्मीयतेने मानवी संबंध दृढ करणे ही आहे आणि आज जर कशाची गरज आहे तर जागतिक आत्मीयता जागृत करण्याची. ज्या योगे आर्थिक विस्कटलेली घडी आणि प्रदूषणामुळे होणारा पर्यावरणाचा ऱ्हास यांना आळा बसू शकेल.

या सूत्राला धरूनच एक विचारवंत श्री Sermy Rifkon यांनी Empathic civilisation Rethiking Human Nature in the Biosphoıe Era नावाचे पुस्तक लिहून आत्मीयतेचा सर्वच क्षेत्रात कसा फायदा मिळू शकेल याचे शास्त्रीय विवेचन केले आहे.

१०) आत्मीयतेचा सकारात्मक विचार

मागील विवेचनावरून असे आढळून येईल की, आत्मीयता ही धर्म, अध्यात्म आणि नैतिकतेच्या वृद्धीसाठी पायाभूत स्वरूपाची आहे. भारतीय विचारप्रणाली या प्रकारची असल्याने कोणत्याही गोष्टीकडून ती लाभाची अपेक्षा ठेवीत नसते. परंतु अनाहूत फायदे होऊन जातात. तसेच विवेकाचा वापर झाला नाही, तर काही मनाविरुद्ध गोष्टी घडून मानसिक त्रास सहन करावा लागतो, असे आत्मीयतेबाबत होऊ शकते.

१) आत्मीयता म्हणजे आपल्या सभ्यतेच्या आणि नैतिकतेच्या सीमा वाढवणे नसून, आधुनिक मानसशास्त्राप्रमाणे आपल्या जीवनाचा स्तर उंचावत ठेवणे. नुसती भावना जाणून न घेता त्यावर आपली कृती कशी असते यावर त्याचे मूल्यांकन होत असते.

२) माणसे जोडते. जेव्हा आपण एखाद्या व्यक्तीशी आत्मीयतेने वागतो तेव्हा त्याला एकटे वाटत नाही. तो उलट तसाच प्रतिसाद देऊन सहकाराची भावना वाढवतो.

३) आजारी व्यक्तीत दिसून येणारी सुधारणा - आधुनिक वैद्यकशास्त्र उपाय योजना करताना सर्वंकष औषधोपचार 'Holistic Treatment' या नावाखाली उपचार करत असते व असा विषय वैद्यकीय शिक्षणात समाविष्ट करण्यात आला आहे. अशा उपचार पद्धतीत आत्मीयतेला प्राधान्य दिले जाते. तसेच भेटीस येणाऱ्या व्यक्तीकडून तीच अपेक्षा ठेवली जाते. यातून असे दिसून आले आहे की, आजारी व्यक्तीची

रोगास प्रतिकार करण्याची शक्ती वाढून मानसिक बलप्राप्ती होते, जेणे करून आजारीपण लवकर आटोक्यात येते.

४) आत्मीयता विश्वास वाढवते. प्रथम कोणी आत्मीयता दाखवली तर त्याकडे साशंकतेने बघितले जाते. त्याचा काही स्वार्थ असेल ही भावना तयार होते. जेव्हा निरपेक्षपणाची खात्री होते, तेव्हा विश्वास वाढवण्यात मदत होते व त्याचा अव्हेर करणे कठीण जाते.

५) अगदी व्यापारी दृष्टिकोनातून विचार केल्यास आत्मीयता ही एखाद्याची बिन भांडवली गुंतवणूक ठरू शकते. किंबहुना याच उद्देशाने व्यावसायिकतेत आजकाल आत्मीयतेला महत्त्व देण्यात येत आहे.

६) विद्यार्थ्यांच्या संहारक प्रवृत्तीमध्ये आत्मीयतेमुळे दिसून येणारी सुधारणा ही समाजमनाची बदलाची जाणीव करून देते.

७) अनेकजिनसी सामाजिक रचना ही आत्मीयता वाढवते.

११) आत्मीयतेचे स्वास्थ्यावर परिणाम

तज्ज्ञांच्या मते आत्मीयतेमुळे एकमेकांतील तणाव कमी होतो व आनंदी जीवन जगण्यास मदत होते. किंबहुना आत्मीयता आनंदी जीवनाचा केंद्रबिंदू आहे. मानसरोग तज्ज्ञ JONETHEN HAIDT याचे एक गृहीतक (Hypolhesis) आहे. तो म्हणतो.

If you want to predict How happy some one is or how long he will live, you should find out about his social relationships. Having strong social relationship strengthens the immune system, extends the life more than does quiting smoking spreads recovery from surgery and reduces risk of depression and anxiety disorders. And it is not just that "We all need somebody to lean on "become work on giving support shows

that caring for others is often more benificial than receiving help.

२) आत्मीयता प्रतिकार शक्ती वाढवण्यास (Immune System) व आयुर्मान वाढवण्यास मदत करते.

३) आत्मीयता ही भावनिक सुरक्षितता वाढवते. उदा. लहान मुलांच्याकडे आत्मीयतेने बघितले नाही तर त्यांची असुरक्षितता वाढते व अभ्यासावर मन केंद्रित होणार नाही. शिवाय मार पडण्याचा तणाव त्यांना जाणवतो.

४) अशी संस्कृती जी गहन नाते संबंधाला महत्त्व देते, खोटी प्रतिष्ठा, असमानता व चढाओढीपेक्षा सहकारावर भर देते, अशा संस्कृतीत फक्त मानसिक स्वास्थ्य किंवा आनंद न मिळता शारीरिक तंदुरुस्ती अनुभवास येते.

मानवातील विसंगती आणि विरोधाभास कधी कधी या गोष्टी पूर्ण होऊ देत नाहीत. पण आत्मीयतेने यावर मात करता येते, असे मानसशास्त्रज्ञ सांगतात.

१२) आत्मीयतेमुळे जाणवणारी मर्यादा

आत्मीयता हा सकारात्मकतेचा दृष्टिकोन आहे हे जरी खरे असले तरी व्यवहारात त्याचे पश्चात्तापदग्ध अनुभव येऊन त्याच्या मर्यादा जाणवायला लागतात. कारण व्यवहारात सगळेच स्थितप्रज्ञ या अवस्थेला पोहोचलेले नसतात.

१) आत्मीयता एकतर्फी होण्याची बरीच शक्यता आहे. कारण त्या आत्मीयतेत समोरच्याकडून नकारात्मक प्रतिसाद देखील मिळू शकतो. अशावेळी आत्मीयतेने वागणाऱ्याची मानसिक कुचंबणा होण्याची शक्यता असते.

२) आत्मीयतेमुळे माणूस दोषांवर पांघरूण घालण्याचा प्रयत्न करतो अथवा त्याला दोष वाटतच नाहीत किंवा समजले

तरी त्याचे संपादन केले जाते. अशा वेळी भावनेला प्राधान्य देऊन विवेकाचा विसर पडतो.

३) व्यवहारात आत्मीयतेने वागण्यावर मर्यादा पडतात. उदाहरणार्थ, एकाद्या दारू पिणाऱ्या व्यक्तीबद्दल किती ममत्व दाखवायचे, असा प्रश्न पडतो. आपण आत्मीयतेपोटी-सहानुभूतीपायी अशा मंडळींना मदत करतो, पण नंतर पश्चात्तापाची पाळी येते.

४) अध्यात्माच्या दृष्टिकोनातून देखील देहासंबंधीची 'मी व माझेपण' भावना हे बंधनच होऊन जाते किंवा यातून अहंकार निर्माण होतो. खरे कारण देहासंबंधीचे अज्ञान आहे.

५) व्यवहारांत असे दिसून येते की, व्यक्तीस आर्थिक स्वातंत्र्य व स्वावलंबन आले की, कोणाच्या आत्मीयतेची गरज वाटत नाही. कारण सेवाक्षेत्र विस्तारित झाल्याने इतरावर अवलंबून राहण्याची गरज वाटेनाशी झाली आहे. पण त्याने मन:शांती मिळत नाही. कठीण प्रसंगी आत्मीयताच समाधान करू शकते, असे अनुभवास येते.

१३) सारांश

वरील सर्व विवेचनावरून असे जाणवते की,

१) आत्मीयतेच्या संदर्भात भारतीय विचारवंतांनी सखोल चिंतन केले होते. त्याचा पडताळा आज आधुनिक मानसशास्त्र, सामाजिक विचारवंत घेत आहेत व ऋषीमुनींचे मानवी स्वभावाचे विश्लेषण योग्य असल्याचे दिसून येते.

२) आसक्तीमुळे निर्माण होणारी आत्महीनतेची प्रवृत्ती आणि त्यामुळे मानवजातीचे नुकसान याची जगातील विचारवंतांना झालेली जाणीव ही पाश्चात्य देशांना भारतीय जीवनपद्धतीबद्दल अधिक आस्था निर्माण करू शकते.

३) आत्मीयतेचा Empalty जागतिक स्तरावर होणारा विचार व त्याचा होत असलेला प्रचार हा विश्वबंधुत्वाची कल्पना साकार करण्यासाठी आशादायी ठरू शकतो.

१४) तात्पर्य -

आत्मीयता परस्परावलंबी समाजाच्या पोषणासाठी व त्यांच्या संगोपनासाठी आवश्यक असून ती समाजाची सुदृढता, उत्पादकता, ज्ञान आणि निर्मितिक्षमता वाढवण्यास मदत करते. याउलट ममत्वहीनता ही सामाजिक विसंगती, अमानवी आणि रानटी कृत्याला उत्तेजन देते.

१२

विद्या आणि अविद्या

विद्या आणि अविद्या यांच्या संदर्भात ईशावास्योपनिषदात जो विचार आला आहे, तो जाणून घेण्याचा एक प्रयत्न. हा विषय या उपनिषदातील ९, १० व ११ या मंत्रात आला आहे.

अन्धं तमः प्रविशन्ति
ये अविद्यामुपासते ।
ततो भूय इव ते तमो
य उ विद्यायां रताः ॥ ९ ॥

अर्थ - जे अविद्येत म्हणजे अज्ञानात किंवा नेणिवेत गढून गेले ते गाढ अंधारात शिरले. (पण) जे केवळ विद्येत म्हणजे ज्ञानात किंवा जाणिवेत रमले, ते जणू काही त्याहीपेक्षा गाढ अंधारात शिरले म्हणा ना.

अन्यदेवाहुर्विद्यया
अन्यदाहुरविद्यया ।
इति शुश्रुम धीराणां
ये नस्तद् विचचक्षिरे ॥ १० ॥

अर्थ - ते आत्मतत्त्व जाणीवेहून वेगळेच म्हटले आहे आणि नेणीवेहून वेगळेच म्हटले आहे. ज्यांनी आम्हांला दर्शन घडविले आहे, (विचचक्षिरे) त्या ज्ञानी पुरुषांकडून (धीराणाम्) आम्ही हे ऐकले आहे.

विद्यां चाविद्यां च
यस्तद् वेदोभयं सह।
अविद्यया मृत्युं तीर्त्वा
विद्ययाऽमृतमश्नुते ॥ ११ ॥

अर्थ - विद्या आणि अविद्या या दोन्हींसह जे त्या आत्मतत्त्वाला 'तद्' जाणतात (वेद), ते अविद्येने मृत्यूला जिंकून विद्येने अमृताचे तीर गाठतात.

उपनिषदांची वैश्विकता हा एक महत्त्वाचा गुण आहे आणि मनुष्याची पूर्णता उपनिषदाचा प्रतिपाद्य विषय आहे. मानवी जीवनाच्या सर्व पैलूंचे अन्वयार्थ उपनिषदांनी मांडले. ज्यात पृथ्वी, स्वर्ग, मनुष्य आणि ईश्वर भौतिक व आध्यात्मिक विचार इत्यादींचा समावेश आहे. परिपूर्णतेचे जे विचार किंवा सिद्धांत मांडले त्याला अनुसरून उपनिषदांनी मांडणी केली आहे. तज्ज्ञांच्या मते उपनिषदांतील मंत्रांवरच गीतेमध्ये ते विचार अधिक पूर्णत्वाने प्रकटले आहेत.

वरील ९, १०, ११ या मंत्रांत ऋषींनी विद्या आणि अविद्या यांचे विवेचन केले आहे. तसेच कर्म आणि उपासना व पूजा याचबरोबर योग आणि ईशचिंतन यांतील द्वैताचा निरास करणारी विधाने आहेत. या सर्व बाबी भौतिक व आध्यात्मिक जगताशी निगडित आहेत. म्हणून आधुनिक विज्ञानयुगात यांची नि:संदिग्धता असणे आवश्यक वाटते. कारण ऐहिक जीवन जगताना दोन्ही एकमेकांस पूरक असून त्यातूनच मानवी जीवनाची परिपूर्णता साधू शकते. तसेच यांचा समाज व राष्ट्रावर होणारा परिणाम तितकाच महत्त्वाचा ठरतो. म्हणून मला या तीन मंत्रांचे महत्त्व व्यावहारिक दृष्ट्या अधिक विचार करणारे वाटते.

ईशावास्योपनिषदात पहिल्या तीन मंत्रांतून जीवनाचे एक दर्शन घडवले आहे. ज्यांत ईश्वरनिष्ठा व त्याचे अस्तित्व ---- त्यागी वृत्ती हे जीवनाचे ध्येय ----- त्याच बरोबर कर्तव्य व कर्माचे जीवनातील

अधिष्ठान आणि कर्म करण्याची पद्धती ---- आणि त्यानुसार आयुष्यात मिळणारे फळ यांचा विचार केला आहे.

या उपनिषदातील ४ ते ८ या मंत्रांमध्ये आत्म्याचे, आत्मज्ञान्यांचे व ईश्वरभक्तांचे वर्णन आहे. या मंत्रातील तत्त्वांचा विचार केला तर, यांत अज्ञानाने आत्मा झाकलेला आहे. आत्मतत्त्व सर्वांहून सूक्ष्म आहे. वैगुण्य या दृष्टीने जगाचे दोष पाहू नयेत आणि मानवी जीवनातील दु:खाचे मूळ ही आसक्ती आहे. अध्यात्माच्या साक्षात्कारातून जग कसे दिसते हे वर्णन आहे. हा सगळा विचार हे सांगतो की, विविधतेमागे किंवा भिन्नत्वामागे सर्वत्र एक शाश्वत तत्त्व आहे.

वरील ९ ते ११ या मंत्रात अंतिम ध्येय व जीवनाची परिपूर्णता गाठण्यासाठीच्या प्रवासात विद्या आणि अविद्या हे दोन थांबे कसे आहेत याचे अवलोकन व चिंतन केले आहे. त्यांचा विचार करण्याचा एक प्रयत्न.

९ वा मंत्र सांगतो की अविद्यावाले अंधारात असतात तर विद्यावाले अधिक गाढ अंधारात असतात.

१० वा मंत्र-विद्या व अविद्या यांचे स्वतंत्र वेगळे परिणाम होतात.

११ वा मंत्र-विद्या व अविद्येचा अवलंब करावा. अविद्येने मृत्यू पार करता येतो, तर विद्येने अमृतत्व मिळते.

या तिन्ही मंत्रांतून कदाचित परस्पर विरोध वाटण्यासारखा आहे. पण खोलात विचार केल्यास व व्यवहारी दृष्टीने बघितल्यास यातील तथ्य समजून येइल व मानवी स्वभाववैशिष्ट्याचे किती उत्तम अवलोकन आहे हे जाणवेल आणि अशा व्यक्तींचा समाजावर व समाजाचा अशा व्यक्तींवर कसा परिणाम दिसून येतो हे जाणवेल.

विद्या व अविद्या यांचे उपनिषदीय अर्थ

विद्या - हा शब्द विद् या धातूपासून बनला असून याचा अर्थ ज्ञान असा होतो. शब्दकोशीय अर्थ ज्ञान, शास्त्र किंवा शिक्षण. अध्यात्मामध्ये

हा शब्द आत्मविद्या म्हणजे शाश्वत, अमृत तत्त्वाचे ज्ञान. तसेच हा शब्द जाणीवेशी निगडीत आहे व त्या परमतत्त्वाची जाणीव म्हणजे ज्ञान. म्हणून उपनिषदांत ज्ञान म्हणजे आत्मज्ञान किंवा ब्रह्मज्ञान.

१) विद्या म्हणजे उपासना असा देखील अर्थ उपनिषदांत घेतला आहे.

२) भौतिक ज्ञानास विज्ञान किंवा प्रपंच ज्ञान याने संबोधिले जाते.

अविद्या - अविद्येचाशब्द कोशीय अर्थ अज्ञान (Ignorance) अथवा माया (Illussion) असा आहे.

उपनिषदामध्ये अविद्येला विविध अर्थ प्राप्त आहेत.

अविद्या = अ + विद्या म्हणजे ज्ञान नसलेला म्हणजे आत्म्याचे ज्ञान नसलेला किंवा नेणीवेत असलेला.

१) आध्यात्मिक व्याख्येनुसार विश्वामध्ये सर्वव्यापीपणाने कार्य करणारी माया निरनिराळ्या व्यक्तींमध्ये प्रगट होते. तेव्हा तिला अविद्या म्हणतात, इंग्रजीत Illusion हा शब्द योजिला आहे.

२) यामध्ये आत्मस्वरूपाचा विसर पडून देह म्हणजेच मी ही भावना दृढ असते आणि इंद्रियांच्या द्वारेच मला आनंद मिळेल याच ठाम कल्पनेने तो जन्मभर जगत असतो. याचे व्यवहारी जीवनातील दृश्यरूप म्हणजे पैसा, सत्ता, खाणे पिणे, चैन करणे व त्यासाठीच सारी धडपड करणे.

३) ज्याच्यामध्ये जे नाही ते आहे असा भ्रम होणे हा अविद्येचा प्रभाव असतो.

४) खरे पाहता अविद्या काही मानवी जीवाचा मूळ स्वभाव नाही. प्रत्येक माणूस जीवनामध्ये विविध प्रकारची दु:खे भोगतो, पण त्याला त्यांची सवय होत नाही. कारण मुळात तो दु:खशून्य आहे. आनंद हाच त्याचा मूळ स्वभाव असून अविद्येचे त्यावर आवरण आहे असे उपनिषदे मानतात.

५) व्यवहारात किंवा जगात खोटे ठरवणारे प्रसंग येऊनही तो कधी शहाणा होत नाही, त्यापासून बोध घेत नाही. त्यामुळे त्याच्या चिंता व

भय कधी संपत नाही.

६) अविद्या म्हणजे कर्म असा ही अर्थ तज्ज्ञांनी घेतला आहे. समर्पण भावनेने केलले कर्म असा अर्थ गीतेत आला आहे.

७) अविद्या म्हणजे अनात्म, परिवर्तनीय विश्वाचे ज्ञान, मर्त्याचे ज्ञान किंवा भौतिक ज्ञान असेही समजले जाते.

८) अविद्या म्हणजे कर्मकांड. ज्यात त्याच्या मूळ तत्त्वाचा त्रिसर पडलेला असतो. वास्तविक प्रत्येक कर्मकांडाच्या मुळाशी उपनिषदाचा बीजमंत्र असतोच आणि त्याचाच विसर पडून कर्मकांडातून सात्त्विक वृत्ती निर्माण होण्याऐवजी रजो व तमो गुणांची वाढ होऊन, अविद्याप्रधान माणूस बनतो व तमोगुणाचे व्यवहारांत प्रदर्शन करतो. हे कर्मकांड वासनेपोटी केले जाते. (Rituals without knowing its philosophy) असाही एक अर्थ घेतला जातो.

९) अविद्येच्या प्रभावाचे वर्णन विविध शब्दांनी उपनिषदांत केले गेले आहे. जसे १) आवरण २) डोळे झाकणारा पडदा ३) ग्रंथी ४) असत् ५) तमस् ६) अमृत ७) जाळे ८) भास ९) वाचारंभण १०) विकार ११) ईश्वरशक्ती

येथे हेही लक्षांत घेणे जरुरीचे आहे की, अविद्या म्हणजे अनात्म्याचे किंवा परिवर्तनशील जगताचे ज्ञान व विद्या म्हणजे आत्म्याचे ज्ञान हे दोन्ही वेगळे नसून ते एकच आहेत. म्हणून छांदोग्य उपनिषद सांगते **"आत्मैवेदं सर्वं"** छां ७.२५.२

अविद्याप्रधान व्यक्ती किंवा अज्ञानी व्यक्तीचा समाजावर परिणाम :

वरील ९, १० व ११ मंत्रातून बुद्धीचे कार्य सांगितले आहे. परमेश्वराने मनुष्याच्या हातांत बुद्धी हे एक असे मोठे शस्त्र दिले आहे. त्याचा उपयोग आपण जशी उन्नती करून घेऊ तशी अवनती ही करून घेऊ शकतो. ९ वा मंत्र आमच्यातील उणीव, दोष व दुर्गुण यांची जाणीव करून देत

आहे. बुद्धी अंधाराने 'अज्ञानाने' झाकाळली गेल्याने डोळसपणे वागणे होत नाही. त्याचा परिणाम आत्मविकास, व्यक्तिविकास त्याच बरोबर समाज व राष्ट्राच्या विकासावर कसा होतो, याचा विचार करायला लावतो. म्हणून या मंत्रांत आध्यात्मिक आशयाबरोबर सामाजिक पदर दडलेला आहे. उपनिषदाच्या प्रतिपाद्य विषयांत मानवाच्या पूर्ण विकासात समाज व राष्ट्राचा संदर्भ येणे क्रमप्राप्त होते. म्हणून या मंत्राकडे आत्मविकासाबरोबर समाजविकासाच्या दृष्टीने या अज्ञानी दोषाचे कसे निवारण करता येईल हे बघणे सयुक्तिक ठरेल असे वाटते.

समाजामध्ये तीन प्रकारचे लोक आढळून येतात. १) ईश्वरवादी २) निरीश्वरवादी ३) अज्ञेयवादी आणि हे सर्व प्रकृतीच्या नियमांनुसार प्रशासित असतात व सत्त्व, रज आणि तम वृत्तीनुसार आपल्या स्वभाव वैशिष्ट्यांची ओळख करून देतात.

अविद्येने प्रेरित किंवा अज्ञानी लोकांची स्वभाववैशिष्ट्ये अविद्या या सदरात दिली आहेतच. व्यवहारात वागताना ईश्वरनिष्ठ व्यक्ती ईश्वर प्राप्तीसाठी जेव्हा कर्मकांडाला महत्त्व देते, तेव्हा त्याच्या रज व तम वृत्तीचे प्रदर्शन होते आणि तो मूळ तत्त्वापासून फारकत घेतो, तेव्हा तो अंधारातच जगतो, असे हा मंत्र सांगतो.

निरीश्वरवादी, अज्ञेयवादी यांचे व्यवहारातील वर्तन, बुद्धीवर काजळी आल्यासारखे जेव्हा विवेकहीन होते, तेव्हा त्यांची आयुष्याकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी लोप पावते. स्वार्थ वृत्ती उफाळून येऊन तो दिशाहीन भरकटत जातो. तो भय आणि चिंता यांच्या सावटाखाली जगतो. अज्ञान आणि अविवेकी वृत्ती, लोभ आणि मोह यांमुळे तो कर्तव्यच्युत होतो.

अशा वृत्तीच्या व्यक्ती समाजात जेव्हा अधिक होतात तेव्हा सामाजिक स्वास्थ्य बिघडण्यास मदत होते. समाजविकासास खीळ बसल्याचे जाणवते. तसेच याचा परिणाम राष्ट्रीय पातळीवर देखील दिसून येतो.

अशा या अंधारातून बाहेर येण्यासाठी गीतेने अगदी सोपा उपाय सांगितला आहे. तो म्हणजे आपण केलेले सर्व कर्म ईश्वरार्पण करून आपण मोकळे व्हावे.

भारतीय विचारवंतांनी अशा अंधारात बुडलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी ज्ञानी मंडळींनी पुढे यावे व यांना प्रकाश दाखवावा, असेच आवाहन खालील श्लोकातून केले आहे.

तत्त्वज्ञास्तु विद्वांसो ब्राह्मणा: स्वतपोबलैः ।
अंधकारमपाकुर्युर्लोकस्याज्ञानसम्भवम् ॥

अर्थ - तत्त्वज्ञान समजणारे आणि जाणणारे विद्वान ब्राह्मण (ब्रह्म जाणणारे) आपल्या तपाने प्राप्त केलेल्या आध्यात्मिक शक्तिद्वारा जगातील अज्ञानरूपी अंधकार नष्ट करण्याचा प्रयत्न करोत.

अशा प्रकारचे आवाहन ज्ञानेश्वरांनी देखील केले आहे. ते म्हणतात,

आम्ही पूर्णकाम होऊनी । जरी आत्मस्थिती राहुनी ।
तरी प्रजा हे कैसेनि । निस्तरेल ॥

विद्यारत व्यक्ती

या मंत्रातून विद्येमध्ये रत असलेल्याच्या स्वभाववैशिष्ट्याचे वर्णन केले आहे. येथे हे ध्यानांत घेतले पाहिजे की, व्यवहारात अशा व्यक्तीचा प्रभाव स्वत:बरोबर समाजावर होत असतो. त्याचबरोबर समाजाचा देखील अशा व्यक्तींवर प्रभाव पडत असतो. म्हणून या मंत्राचे महत्त्व सांप्रत काळी महत्त्वाचे वाटते.

उपनिषदीय विचारात सांप्रदायिक, संकुचित अंधश्रद्धेला वाव देणारे असे काही नाही. मानवाचा विकास, त्याची प्रगती, त्याच्या उन्नतीची श्रेष्ठतम उंची हाच विचारांचा गाभा आहे आणि उन्नत समाजास तोच हवा आहे.

तज्ज्ञांनी आधुनिक लोकांची दोन गटात विभागणी केली आहे.

पहिले केवळ आधुनिक यांत्रिक सुख सोईची उपकरणे वापरणारे आणि दुसरे वेदांताच्या शब्दांच्या खोल अर्थाला प्राधान्य देणारे. ज्याचे विज्ञान चैतन्यवादावर पोषण झाले आहे. ज्याची जाणीव सावध सतर्क आहे आणि जो सत्याच्या शोधपथावर आहे. ज्याच्या जवळ येशूने म्हटल्याप्रमाणे दार ठोठावून शोधण्याची शक्ती आहे, असे हे दुसऱ्या प्रकारचे लोक. हे लोक 'आंतरिक ज्ञाना' साठी उपासना मार्गाने किंवा अंतर्मुख जीवनाचे अनुसरण करतात. ते कशाचाही नाही, तर सर्वव्यापी सत्यतत्त्वाचा शोध घेत ध्यान-साधना करतात. समाज अशा पुरुषांच्या मार्गदर्शनाची अपेक्षा करीत असतो.

असे साधक त्यांच्या अतिरेकी व तयारीच्या अभावी ध्यानक्रियेतील नकारात्मक भागाचा अतिरेक करतात. स्वत:च्या अहंकारामुळे स्वत:ला इतरांपेक्षा श्रेष्ठ समजतात. त्यामुळे ते मूळ उद्देशापासून दूरच राहतात. म्हणून ते अंधारातच राहतात असे हा मंत्र सांगत आहे.

वसिष्ठांनी अहंकाराची प्रतवारी तीन प्रकारे केली आहे. १) तुच्छ, २) शुभ व ३) परम असे हे तीन प्रकार

१) **तुच्छ अहंकार** - हातपाय वगैरे अवयवांनी युक्त असलेला देह एवढाच 'अहम्' असा निश्चय. हा सर्वसामान्य लोकांच्या ठिकाणी असलेला 'तुच्छ' अहंकार.

२) **शुभ अहंकार** - सर्व स्थूल, जड वस्तूंहून पूर्ण वेगळा, केसाच्या टोकाच्या शंभरावा भाग इतका अति सूक्ष्म असा ज्ञानरूप चिन्मात्र असा जीव म्हणजे मी ही जाणीव होणे हा दुसऱ्या प्रकारचा 'शुभ' अहंकार. ही अवस्था भावनात्मक सुख मिळवण्याची असून समाजासाठी कार्य करण्याचे ध्येय असते. अशा साधकास सत्पुरुष देखील म्हटले जाते. देहापेक्षा मी वेगळा आहे, ही जीवाची मूळस्थिती जाणणे हे मोक्षपथावरील एक महत्त्वाचे पाऊल समजले जाते. अशा साधकांचा परमात्म्यापेक्षा मी वेगळा आहे हा भास अस्तित्वात असतो. म्हणून अजून 'द्वैत' शिल्लक राहते. हे 'शुभ'

अहंकाराचे वैशिष्ट्य आहे.

३) **परम अहंकार** - सर्व चराचर विश्व मी आहे. शाश्वत असलेला परमात्मा देखील माझ्या पेक्षा निराळा नाही. मी परमात्मस्वरूप आहे. जग आणि जगदीश दोन्ही मद्रूपच असल्याने अहम् खेरीज काहीच नाही. हा अनुभव 'परम' अहंकारात मोडतो. द्वैत जाऊन अद्वैत साधले जाते. हाच सर्वश्रेष्ठ अहंकार समजला जातो. अशा साधकाचे परमार्थ हेच कार्य. यांना आत्मिक समाधान असून देवत्व प्राप्त झाल्याचे जाणवते.

व्यवहारामध्ये अशा आत्मज्ञान्याचे वर्णन श्रीशंकराचार्यांनी असे केले आहे.

निर्धनोऽपि सदा तुष्टोऽप्यसहायी महाबल: ।
नित्यतृप्तोप्य भुञ्जानोप्यसम: समदर्शन: ॥

अर्थ - संपत्ती नसली तरी सदैव तृप्त असलेला, कोणाचे सहाय्य नसताही अपार शक्तिसंपन्न, इंद्रियसुखाचा भोग घेत नसूनही सदा संतुष्ट, ज्याची तुलना कोणाशीच होऊ शकत नाही, पण जो सर्वांठायी समभाव ठेवतो अशा माणसाला आत्मज्ञान झाले, असे समजावे.

व्यवहारी जगतामध्ये पहिल्या दोन प्रकारच्या 'अहंकाराचे' साधक अधिक उपलब्ध असून ते आध्यात्मिक अथवा धार्मिक संस्थांचे प्रभावीपणे नेतृत्व करताना व मार्गदर्शन करताना दिसतात. पूर्ण अहंकार न गेल्याने ते अगदीच अंधारात नसले तरी पण अंधारात असतात, असे या मंत्रातून जाणवते. व्यवहारात याचा लाभ असे लोक घेत असतात. वास्तविक श्री शंकराचार्यांनी वर्णिलेले आत्मज्ञानी पुरुष वा स्त्री प्रत्येक गावांत असतात पण त्यांच्याजवळ Marketing Skill नसल्याने समाज त्यांच्याकडे आकृष्ट होत नाही. अगदी 'परम अहंकाराने' विद्या प्राप्त झालेल्या व्यक्ती सर्व साधारणपणे समाजापासून दूर राहणे किंवा वनांत राहणे पसंत करतात.

येथे आणखी एक समाजमनाची वृत्ती दिसून येते. समाज अशा अंधारात असणाऱ्या व्यक्तींना देवत्व बहाल करतो. अशा व्यक्तीच्या

आवाक्याबाहेरील विषयांवरील उपदेश देखील प्रमाण मानतो व त्यांच्या संपूर्ण आहारी जातो. त्याची प्रसिद्धी होते. समाजच त्याच्याभोवती एक खोटे आध्यात्मिक अहंकाराचे (False Ego) वलय तयार करतो. त्यामुळे या व्यक्ती अधिक आध्यात्मिक अहंकाराने ग्रासल्या जातात व आपल्या अर्धवट ज्ञानाने ते समाजास देखील अंधारात लोटतात.

याची प्रचीती समाजात पसरवले जाणारे कर्मकांडाचे महत्त्व, अंधश्रद्धा व धार्मिक अहंकारात दिसून येते. व्यक्तीवर प्रभावीपणे मोहिनी घालून त्यांचा आत्मविश्वास घालवला जातो व त्यांना त्यांच्यावर विसंबून राहण्यास प्रवृत्त केले जाते. त्यांच्या दुर्बल मानसिकतेचा फायदा घेतला जातो व त्यांच्या प्रत्यक्षानुभूतीचे, चिंतन व मनन करण्याच्या शक्तीचे खच्चीकरण केले जाते.

या बाबतीत येथे स्वामी विवेकानंदांचा अत्यंत आदराने उल्लेख करून त्यांच्या सारभूत तत्त्वज्ञानाचा सारांश देणे उचित ठरेल. स्वामींनी १० एप्रिल १९०० रोजी सॅनफ्रान्सिस्को येथील भाषणात असे सांगितले, ''मनुष्यस्वभाव असा आहे की, त्यांना तुम्ही सांगितलेले जेवढे कमी समजेल, गोंधळात टाकेल त्या प्रमाणात ते तुम्हांला मोठे समजतात. प्रत्येक देशांत या पद्धतीने लोकांना फसवणारे लोक सदासर्वदा असतात.

ही समस्या भारतात गंभीर झालेली आहे. ती समाजाच्या अवनतीची, अध:पाताची आणि अत्याचाराची चिन्हे आहेत. आपण थांबू या. सर्व पुस्तके जाळू या आणि स्वत: विचार करू या. मी जे बोलतो, त्यावर तुमच्यापैकी जर कोणी निव्वळ विश्वास ठेवील, तर मला वाईट वाटेल. स्वत:विचार करण्याची शक्ती मी तुमच्यांत जागृत करू शकलो, तर मला आनंद होईल. माझी इच्छा स्त्रीपुरुषांशी बोलण्याची आहे, मेंढरांशी नाही. स्त्रीपुरुष म्हणजे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असलेली माणसे असा माझा अर्थ आहे. स्वत:च्या आंतरमनात प्रत्यक्ष अनुभूती प्राप्त करून घेण्यातच

सगळा धर्म आहे. जेव्हा मी 'माणूस घडविणारा धर्म' म्हणतो, तेव्हा मला हे सारे अभिप्रेत आहे.''

स्वामी विवेकानंदांनी असेही नमूद केले आहे की, एखाद्या व्यक्तीचा थोडा सुद्धा आत्मिक विकास झालेला नसताना तिचे बौद्धिक सामर्थ्य मात्र प्रचंड असू शकते. पण अध्यात्म शास्त्राच्या बाबतीत मात्र ज्या व्यक्तीची चित्तशुद्धी झालेली नाही, त्या व्यक्तीच्या ठिकाणी आध्यात्मिक ज्ञानाचा प्रकाश विलसत असेल असे अगदी अशक्य होय. अशा व्यक्ती काय उपदेश करणार ? चित्तशुद्धी हेच आध्यात्मिक सत्य आहे.

स्वामी विवेकानंदांनी ११५ वर्षांपूर्वी केलेले सत्य व परखड अवलोकन व विश्लेषण आजही तंतोतंत लागू आहे. हे रोज अनुभवास येणाऱ्या घटनांवरून जाणवते.

याचा परिणाम असा दिसतो की, एकदा समाजाने 'साधुत्व' बहाल केले की, ते आध्यात्मिक, धार्मिक संस्था काढण्यास उद्युक्त होतात. संस्था आली की, ती चालवण्यासाठी मनुष्यबळ व आर्थिक व्यवहाराची गरज भासते. मार्केटिंग चालू होते. जशी संस्था वाढत जाईल, तसा गैरव्यवहारास प्रारंभ होतो. मूळ उपनिषदातील आध्यात्मिक तत्त्वज्ञान बाजूला पडून व्यक्तिस्तोम माजवण्यात या संस्थांना यश येते. समाजाच्या किंवा व्यक्तीच्या क्रियाशीलतेवर नकारात्मक परिणाम होऊन आत्महीनतेच्या दिशेने वाटचाल सुरू होते. परमार्थाच्या नावाखाली ऐहिक सुखाचा प्रसार केल्याचे चित्र दिसून येते.

फलप्राप्ती

दहावा मंत्र अविद्या व विद्या यांच्या फलप्राप्तीकडे लक्ष वेधतो. उपनिषदांत व गीतेत जे कर्मफलसिद्धांताचे तत्त्व आहे, त्यानुसार व्यक्तीला फलप्राप्ती होते.

अविद्या ही ऐहिक जीवनाची कार्यपद्धती. यांत कर्म, कर्मकांड, व्रत वैकल्य, तीर्थ यात्रा, मंदिरे बांधणे इत्यादी लोकोपयोगी व परोपकारी

कार्यांचा समावेश होतो. उपनिषदे जरी कर्मकांडाला गौण समजत असली तरी ती परोपकारी कार्यानुसार फलप्राप्ती होते हे मान्य करतात. पण त्याचबरोबर हेही सांगतात की, अशा कर्माचे फळ मर्यादित असते. अविद्येचे लोक इतर श्रेष्ठ कर्मांकडे लक्ष देण्यास तयार नसतात आणि आपलाच मार्ग खरा समजतात. मुंडकोपनिषदांत अशा लोकांचे खालील प्रमाणे वर्णन केले आहे.

इष्टापूर्तं मन्यमाना वरिष्ठं नान्यच्छ्रेयो वेदयन्ते प्रमूढाः ।
नाकस्य पृष्ठे ते सुकृतेऽनुभूत्वेमं लोकं हीनतरं वा विशन्ति ।।

अर्थ - इष्ट (यज्ञयागादी) आणि पूर्त (विहिरी खोदणे, सरोवरे, मंदिरे बांधणे) कर्मे हीच श्रेष्ठ आहेत असे मानणारे महामूर्ख लोक याहून श्रेयस्कर दुसरे काही नाही, असे मानतात. आपल्या सुकृतांच्या फळांचा स्वर्गामध्ये उपभोग घेतल्यावर ते या मनुष्यलोकी अथवा त्याहून हीन योनीत प्रवेश करतात.

२) विद्याप्रधान साधकांना / व्यक्तींना मिळणारे फळ म्हणजे देव लोकांत प्रवेश.

हा मंत्र सांगतो की, ते आत्मतत्त्व जाणीवेहून वेगळेच आहे आणि नेणीवेहूनही वेगळेच म्हटले आहे आणि हे आम्ही त्या ज्ञानी पुरुषांकडून ऐकले आहे.

ही वेगवेगळ्या फळांची कल्पना बुद्धिवादी व पाश्चिमात्य विद्वानांना मान्य होणे अशक्यच. विद्या आणि अविद्या यांच्या फळांचा विचार करताना सामान्यत: माहीत असलेल्या शब्दांनुसार अर्थ घ्यायचा नसतो. उपनिषद तत्त्वज्ञानात एखाद्या सत्पुरुषाने किंवा साधूने मांडलेली कल्पना तत्त्वज्ञान म्हणून स्वीकारली जात नाही. ती कल्पना तेव्हाच स्वीकारली जाते, जेव्हा ती काळाच्या अणि साधूंच्या आत्मलक्षी अनुभूतीच्या कसोटीस उतरते.

अशा तऱ्हेने हिंदु धर्म ही काही एकट्या दुकट्या प्रेषिताची निर्मिती

नव्हे, तर साक्षात्कारी महात्म्यांच्या अनुभूती घेतलेल्या शुद्ध अंत:करणातून आलेल्या विद्वद् उक्ती आहेत आणि त्यांना शिष्यवर्गाच्या पिढ्यानी पुढे अधिक उजाळा दिलेला असतो. ते सत्य तपासून घेतले जाते आणि जीवन परिसावर घासून योग्य असल्याचे आढळले तरच ते सत्य आर्यभक्तांनी स्वीकारलेले असते.

म्हणून बुद्धिमान पुरुषांकडून आम्ही ऐकलेली ती वेगवेगळी फळे काय आहेत तीच या मंत्रातून सांगितली आहेत.

या उपनिषदाच्या ११ व्या मंत्राचा संदेश पूर्ण प्राप्तीचा व जीवन साफल्याचा आहे. विद्या आणि अविद्या या दोन्हींना जो एकदम जाणतो म्हणजे भौतिक ज्ञानाद्वारे व कर्ममार्गाने वागून आत्मप्राप्ती करतो, तो सहजपणे मृत्यूला सामोरा जातो आणि अमरत्व प्राप्त करून घेतो.

या मंत्राचे तत्त्व जर काही सांगत असेल, तर विज्ञानाने प्रपंच यशस्वी होतो आणि आत्मज्ञानाने जीवन साफल्याचे समाधान मिळते. म्हणून दोन्ही एकमेकांस पूरक आहेत, विरोधी नाहीत.

हे ईश उपनिषद पूर्णपणे जाणते की, अध्यात्मसाधनेचा विपुल प्रसाद मिळवायचा असेल तर आणि उदार चारित्र्य आणि समृद्ध व्यक्तिमत्त्व मिळवायचे असेल तर विद्या आणि अविद्या यांची जोपासना करणे आवश्यक आहे.

पण व्यवहारात असे समजले जाते की, देव व ऐहिक जीवन वेगळे असून परस्परविरुद्ध आहे व त्याचे फळ देखील वेगळे आहे. स्वामी विवेकानंदांनी अशा समजाबाबत १८९६ साली लंडन येथील ईश उपनिषदावर दिलेल्या व्याख्यानात स्पष्टपणे बजावले आहे की हे दोन्ही एकमेकांस पूरक आहेत. ते म्हणाले,

‘‘सत्य न जाणताच जो माणूस या जगाच्या भ्रामक विलासामध्ये मग्न होतो त्याचा पाय घसरला आहे. मानवजीवनाच्या उद्दिष्टाला तो मुकला आहे. त्याला जीवनात खरा पुरुषार्थ कधी लाभावयाचा नाही. या

उलट जो मनुष्य जगाला शिव्याशाप देऊन जंगलात जातो, स्वत:च्या शरीराला दंड देत राहतो, ते सुकवून सुकवून स्वत:ला मारून टाकतो, स्वत:चे हृदय म्हणजे एक शुष्क, एक रखरखीत वाळवंट करून टाकतो, सर्व भावनांचा नि:पात करून टाकतो आणि कठोर, शुष्क, नीरस बनून जातो, तोही वाट चुकलेला आहे असे समजावे. तेही खऱ्या उद्दिष्टाला मुकले आहेत. (ग्रंथावळी खंड ३ रा.)''

मानवी ज्ञानाच्या दोन पायऱ्या आहेत. एक अविद्या म्हणजे विज्ञान भौतिकज्ञान. या जीवनात जगण्यासाठी देहाला काही सोयी आवश्यक असतात. त्या हे भौतिक ज्ञान पुरवते. आजकाल आधुनिक विज्ञान अधिकच पुरवते. त्यामुळे जीवनातील दु:ख हलके होऊ शकते. आजार व इतर व्याधींवर इलाज होऊन शरीरपीडा दूर होऊ शकतात. पण पूर्ण समाधान मिळत नाही. सर्व ऐहिक सुख मिळूनही माणूस अशांत राहतो. अतृप्त राहतो. त्यामुळे अनेक गैरमार्गांचा अवलंब करतो. ही अशांतता व अतृप्ती दूर करण्यासाठी माणसाला आत्मज्ञान अमणे आवश्यक आहे असे हा मंत्र सांगतो. कारण आत्मज्ञानामुळे माणसाला कळून चुकते की, जीव आणि आत्मा दोन्ही वेगळे आहेत. हा जीव परिवर्तनीय आहे. मृत्यू हा अशाश्वत असून जीवाच्या परिवर्तनाच्या प्रक्रियेतील तो एक टप्पा आहे. तेव्हा त्याचे भय कशासाठी ? ही भावना एकदा तयार झाली की, या ऐहिक जीवनातून मृत्यूला सामोरे जाण्यास माणूस घाबरत नाही. तो मृत्यू सहज तरून जातो.

आता प्रश्न असा येतो की, अविद्येने जगून विद्या कशी प्राप्त करायची ? वेदान्ताने आत्मज्ञानाबरोबर आणखी एक ध्येय आपल्यासमोर ठेवले आहे. ते म्हणजे विकास. विकास कल्पनेच्या प्रकाशात श्रम आणि रंजन (मेहनत आणि करमणूक) हे दोन्ही सर्जक आणि नवे शिकवणारे आहेत. 'त्येन त्यक्तेन भुंजीथा:' । त्याग करून उपभोग घ्या, असे हे उपनिषद सांगते. यावरच जीवनाचे साफल्य आहे. गीतेने सांगितलेले निष्काम

समर्पित कर्म (अविद्या) एखाद्याला अविरत चिंतनासाठी उद्युक्त करते आणि त्या चिंतनाद्वारे आत्मतत्त्वाच्या प्रत्यक्ष आकलनात जेव्हा विद्येची परिपूर्णता होते तेव्हा ती परिपूर्ण एक, त्यानंतर त्याच्या जाणीवेची आणि आध्यात्मिक अनुभवाची एक पवित्र परिपूर्ती या नात्याने त्या कर्माचा अंगीकार होतो. बुद्ध, ख्रिस्त, विवेकानंद यांच्या महान कार्यातून ही जीवनप्रणाली दिसून येते आणि महात्म्यांच्या कार्यातून जीवनाचा आनंद, जगण्यातील सौंदर्य आणि समाजमूल्ये चेतविली जातात.

समाजाचे पुनरुज्जीवन होते. हीच ती विद्येची प्राप्ती. अशा आत्मज्ञानाच्या प्राप्तीने मृत्यू पार करून अमरत्व म्हणजे जीवन्मुक्ती मिळते हाच या मंत्राचा संदेश आहे.

वास्तविक विद्या आणि अविद्या हा भेद मानवाने केला आहे. हे दोन्ही एकच आहेत. 'सर्वं खलु इदं ब्रह्म' हे सर्वच ब्रह्म आहे. (छा. ३.१४.१)

सारांश - या तिन्ही मंत्रांचे महत्त्व सांप्रत काळी फार आहे. तसे हे मंत्र सर्व युगांत मानवाच्या विकासासाठीच आहेत. पण आज त्याची तीव्रता अधिक जाणवते. कारण आज मानवी समाजाची परिस्थिती काय आहे ? हुकूमशाही राजवटीत माणूस, माणूस म्हणून मोकळेपणे जगू शकत नाही आणि लोकशाहीत, मुक्त समाजव्यवस्था, जागतिक उदारीकरणाने राष्ट्रवादासारखी, कालबाह्य होत चाललेली कल्पना, जीवघेणी स्पर्धा आणि त्यातून येणारी मानसिक अशांतता आणि आर्थिक शोषण यांमुळेही तेच होत आहे. ही परिस्थिती भयावह आहे. एकटे विज्ञान किंवा एकटा धर्म यातून मार्ग काढू शकणार नाही. विज्ञान व अध्यात्म यांची सांगड घातल्यानेच मानवी विकास होऊ शकेल.

असाच उपदेश वसिष्ठ ऋषींनी श्री प्रभू रामचंद्रास केला होता आणि त्यामुळे त्याचे त्यांनी पालन करून आपल्या समोर आदर्श जीवनाचे उदाहरण ठेवले. तो उपदेश असा होता.

अंतस्त्यागी बहि:संगो, अंतर्बोधो बहिर्जड: ।

अंतरेको बहिर्नाना लोके विहर राघव ।।

अर्थ - "हे रामा, तू मनाने प्रपंचातून सुटलेला, पण देहाने प्रपंचात गुंतलेला, मनात आत्मज्ञान जागे असलेला पण देहाने ज्ञान नसल्यासारखे वागणारा, मनाने एक वस्तूला सत्य मानणारा, पण बाहेर अनेक वस्तू पाहाणारा अशी प्रपंच-परमार्थाची जोड घालून, रामा, तू जीवनात विहार कर."

१३

अणुरणीयां थोकडा

एके दिवशी माझे सी. पी. आर मधील सहकारी व मित्र व आता वैद्यकीय सल्लागार डॉ. अजय केणी यांनी संत तुकारामांच्या खालील अभंगाचा अर्थ विचारला. पहिल्या ओळीतील 'तुका आकाशाएवढा' एवढेच माहिती होते. पूर्ण अभंग वाचल्यावर त्यांतील गर्भित अर्थाची कल्पना आली. पण अभंगातील प्रत्येक ओळीचा व शब्दाचा अर्थ उमजेना जरा खोलांत जाऊन अर्थ लावण्याचा प्रयत्न केला, तो खालीलप्रमाणे लावला. त्याचे विवेचन करण्याचा माझा हा प्रयत्न. तो अभंग खालीलप्रमाणे आहे.

अणुरणीयां थोकडा । तुका आकाशा एवढा ।
गिळुनि सांडिले कलिवर । भवभ्रमाचा आकार ।
सांडिली त्रिपुटी । दीप उजळला घटी ।
तुका म्हणे आता । उरलो उपकारापुरता ।।

तुकाराम गाथा

अर्थ -

१) मी (तुकाराम) अणुरेणूपेक्षाहि लहान असून आकाशाएवढा मोठा आहे.

२) मी भ्रमजन्य देहादी, प्रपंच आकार नाहीसा केला.

३) ज्ञेय - ज्ञाता - ज्ञान इत्यादी त्रिपुटीचा निरास करून, आत्मस्वरूप बोधरूपी दीप देहाच्या ठिकाणी प्रकाशित केला.

४) तुकाराम महाराज म्हणतात, आता मी अवशिष्ट प्रारब्धाच्या येगाने लोकांवर उपकार करण्याकरिता उरलो आहे.

हा संत तुकारामांचा अतिशय लोकप्रिय अभंग आणि सर्वांच्या मुखांत असणारा. कमीत कमी या अभंगाची पहिली ओळ तरी पाठ असते. या सर्व अभंगात गूढता वाटत असली, तरी त्याची महती साधक व समाजास अनन्य साधारण असल्याचे जाणवते. कारण या अभंगातून तुकोबांनी आत्मतत्त्वाची व्याख्या, साधकाच्या (त्यांच्या स्वत:च्या) साधनेने झालेली अपेक्षित फलप्राप्ती म्हणजे आत्मज्ञान आणि या ज्ञानोत्तर जीवनातील कार्य याचे इतके वास्तव वर्णन केले आहे की, ज्यामुळे कोणत्याही साधकांस त्याच्या ऐहिक व आध्यात्मिक जीवनांत मार्गदर्शक ठरावे.

अणुरणीयां थोकडा । तुका आकाशा एवढा

या अभंगाच्या पहिल्याच ओळीतून तुकोबांनी स्वानुभूतीनुसार आत्म्याची म्हणजे आत्मतत्त्वाची व्याख्याच केली की, जो आत्मा सूक्ष्माहून सूक्ष्म असून तो आकाशाएवढा मोठा आहे व तो त्यांच्यातच वसत आहे. ही व्याख्या कठोपनिषदात आत्म्याच्या वर्णनाशी जुळणारीच आहे. कठोपनिषदातील तो मंत्र असा

अणोरणीयान् महतो महीयान्
आत्मास्य जन्तोर्निहितो गुहायाम् ।
तमक्रतु: पश्यति वीतशोको
धातुप्रसादान्महिमानमात्मन: ।। २० ।।

भावार्थ - सूक्ष्मापेक्षाही सूक्ष्मतर, स्थूलापेक्षाही स्थूल आत्मा प्रत्येक प्राणिमात्राच्या हृदयगुहेत स्थित असतो. निष्काम पुरुष त्याचा (आत्म्याचा) महिमा जाणतो आणि शोकरहित होतो.

अभंगाच्या या ओळीतून तुकोबांना हेच सांगावयाचे आहे की, सत्यतत्त्वाचे वर्णन लहानापेक्षा लहान आणि मोठ्यापेक्षा मोठे असे दोन्ही

तऱ्हेने होते. याचा अर्थ असा की, शुद्ध 'चैतन्य तत्त्व' हे 'शाश्वत तत्त्व' 'सर्वव्यापी सारतत्त्व' आहे. आणि कल्पना करता येईल इतक्या अत्यंत सूक्ष्म अवकाशांतही हेच महान दिव्यतत्त्व व्यापूनं असते आणि सर्व प्राणिमात्रांच्या हृदयात ते स्थित असते. म्हणूनच ते म्हणतात, जे जे भेटे भूत, तेते जाणावा भगवंत. यामुळेच भूतदया हेच त्यांच्या जीवनाचे मुख्य सूत्र होते आणि तेच त्यांनी ज्ञानोत्तर जीवनातदेखील अमलात आणले.

अशाच प्रकारचे आत्म्याचे वर्णन मुंडकोपनिषदात केले आहे. यात ऋषी म्हणतात. आत्मा सर्वज्ञ आहे. जो सगळीकडे आहे. ज्याचा महिमा भूलोकी आहे. तो हा आत्मा दिव्य ब्रह्मपुरात हृदयाचा आश्रय करून अन्नमय शरीरात राहतो. तो आनंदरूप व अमृत असून असा जो विलसतो, त्याला धीमान् लोक विशेष ज्ञानाने म्हणजे ब्रह्मज्ञानाने पूर्णपणे पाहतात. हाच स्वानुभव तुकोबांनी सांगितला आहे. 'आधी केले, मग सांगितले' या समर्थांच्या उक्तीप्रमाणे तुकोबांनी आधी स्वानुभवले व मगच समाजास उपदेश केला. वास्तविक उपनिषदांतले तत्त्वज्ञान ते स्वत: जगतच होते. शिवाय त्यांच्या अध्ययनातून ज्यामध्ये ज्ञानेश्वरांपासून सर्व संतांचा समावेश होताच, पण त्याचबरोबर वेदांचा व वेदांताचा अभ्यास पण होता. शिवाय त्यांनी गीतेच्या श्लोकांचा अभंगात भावार्थ सांगणारी मंत्रगीता लिहिली होती. म्हणूनच दांभिकपणावर कोरडे ओढणारे तुकाराम वेदांबाबत देखील ढोंगी वेदांती, त्यांचा कोरडेपणा उघड करू शकतात. ते ठामपणे म्हणतात.

वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा। येरांनी वाहावा भार माथां ॥ १ ॥
खादल्याची गोडी देखिल्यासी नाहीं । भारधन वाही मजुरीचे ॥ २ ॥
उत्पत्ति पाळण संहाराचे निज । जेणे नेले बीज त्याचे हातीं ॥ ३ ॥
तुका म्हणजे आम्हां सांपडले मूळ। आपणचि फळ आले हाता ॥ ४ ॥

१५४९ तुकाराम गाथा

अर्थ - वेदांचे खरे रहस्य आम्हांला ठाऊक आहे. बाकीचे वैदिक (वेदपठण करणारे) भारवाहक आहेत. प्रत्यक्ष खाण्याच्या रुचीचा अनुभव पाहणारास नाही. धनाने भरलेला हंडा घेऊन जाणाऱ्या मजुरास आतील धनाचा लाभ नाही. जगाच्या उत्पत्ति, स्थिति लयाला कारण असलेला पांडुरंग ज्याने आत्मत्वाने हस्तगत केला, त्यालाच वेदांचा तात्पर्यार्थ कळतो. उत्पत्ति, पालन व संहाररूपाचे बीज ज्याने नेले, त्याच्याच हाती आहे. तुकाराम महाराज म्हणतात, आमच्या हातांत सर्वांचे मूळ (पांडुरंग) लागल्यामुळे आपल्याआपण फळही हाती आले आहे.

गिळुनि सांडिले कलिवर । भवभ्रमाचा आकार

अभंगातील या ओळींचा भावार्थ, देह म्हणजे मी ही संकुचित भावना गेली आणि भव म्हणजे जन्ममरणाची परंपरा आत्म्याविषयीच्या अज्ञानाने उत्पन्न झालेली भ्रामक कल्पना आहे, हे लक्षात आले व संसाराचे भय गेले.

येथे तुकोबांनी गिळुनि सांडिले कलिवर म्हटले. याला खूप मोठा आशय आहे, असे मला वाटते आणि यामुळेच आत्मप्राप्ती झाली, असे वाटते. येथे कोणी कोणाला गिळले की, ज्यामुळे हा देह बाजूला पडला. येथे परमतत्त्वात जेव्हा हे आत्मतत्त्व तुकोबांच्या साधनेने एकरूप झाले, म्हणजेच त्यांना असे सुचवायचे आहे की त्या परमतत्त्वानेच गिळंकृत केले किंवा आत्मतत्त्व त्या परमतत्त्वाच्या पोटात गेले. मी म्हणजे आत्मा त्यात मिसळून गेलो, ही ती भक्तीच्या साधनेची अंतिम अवस्था व हेच ते अंतिम ध्येय असाच ज्ञानेश्वरांनी त्यांच्या 'अधिक देखणे तरी' या रचनेत त्यांचा स्वानुभव सांगितला आहे. त्यांत ते म्हणतात.

देह बळी देऊनी साधिलें म्यां साधनीं
तेणे समाधान मज जोडलें वो माये ।। २ ।।

फरक एवढाच की ज्ञानदेवांनी योगमार्गे देहाचा लय त्या परमतत्त्वात केला तर तुकोबांनी भक्तिमार्गाने ते साध्य केले. यामुळे त्यांची देहाची

आसक्ती व संकुचित भावना गेली आणि एकरूप झाल्याने तो भ्रमही दूर झाला. त्यांचा हा आत्मस्वरूपाचा अनुभव योगमार्गातील 'पिंडाने पिंडास ग्रासिले' या माउलीच्या तत्त्वानुसारच वर्तविला आहे.

येथे तुकाराम व ज्ञानेश्वरांच्या आत्मसाक्षात्कार व आत्मज्ञानाचे वर्णन सारखेच जाणवते किंवा सर्व खऱ्या अर्थाने समजल्या जाणाऱ्या संतांचे असावे, असे वाटते.

येथे लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे आत्मसाक्षात्कार झाला म्हणजे तो आत्मज्ञानी झाला असे नव्हे. कारण आत्मज्ञानी संताचा अहंकार केव्हाच गळून पडलेला असतो, पण आत्मसाक्षात्कारी संतांना अजून त्यांच्या आत्मसाक्षात्काराचा अहंकार किंवा अभिमान असतो. आजकालच्या साक्षात्कारी व सिद्ध पुरुषांमध्ये हा प्रकर्षाने जाणवतो. म्हणूनच नामदेवासारख्या संताला मुक्ताबाई म्हणाली, 'याला साक्षात्कार झाला असला तरी आत्मज्ञान झालेले नाही' त्यांना गोरोबांकडे परीक्षा देण्यासाठी पाठवले होते. 'अजून मडके कच्चे आहे' असा अभिप्राय त्यांनी दिला. त्यानंतर नामदेवांचा अहंकार गेला व आत्मज्ञान झाले.

म्हणून या व्यवहारी जगात जो ईश्वरभक्त नाही, पण त्यांच्या आचरणाने तो पूर्णपणे अहंकारमुक्त आहे, अशी व्यक्ती आध्यात्मिकच समजली जाते. अशांना मोक्षप्राप्ती होऊ शकते. म्हणून वसिष्ठ म्हणतात,

न मोक्षो नभस: पृष्ठे न पाताले न भूतले ।
न देशो नास्ति वा कालो तथा वा नेतरा स्थिति: ।
अहं भ्रांतिर्हि बंधाय मोक्षो ज्ञानेन तत्क्षय: ।।

अर्थ - मोक्ष काही आकाशात नाही. पाताळात नाही किंवा भूतलावर नाही. मोक्ष नावाचे एकादे स्थल नाही, काळ नाही किंवा दुसरी कोणती स्थिती नाही. अहंतेचा भ्रम हा बंधनकारक असतो. ज्ञानाने होणारा त्याचा क्षय हाच मोक्ष.

सांडिली त्रिपुटी । दीप उजळला घटीं ।।

या अभंगात तिसऱ्या ओळीमध्ये तुकोबा त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवाचे वर्णन करीत आहेत. ध्येय, ध्याता, ध्यान या तिघांना मिळून त्रिपुटी म्हटले जाते आणि या तिन्ही गोष्टी एकरूप झाल्याशिवाय अंतिम ध्येय साध्य होत नाही किंवा अनुभव येत नाही. व्यवहारात देखील असाच अनुभव येतो. जसे कर्ता, कर्म, कार्य हे तिन्ही एकजिनसी झाल्याशिवाय कार्यसिद्धी अनुभवास येत नाही. साधनेमध्ये ध्येय, ध्याता, ध्यान यांच्या एकजिनसीपणामुळे तुकोबा म्हणतात, ईश्वरापेक्षा जीव मोठा नसल्यामुळेही भेदात्मक त्रिपुटीच गेली आणि त्यांच्या हृदयामध्ये परमात्मज्योतीचा दीप उजळला आणि प्रकाशाचा साक्षात्कार झाला. ही अवस्था अनुभवाची आहे. वास्तविक ही अतींद्रिय अवस्था असून तिचे शब्दांत वर्णन करता येत नाही किंवा शब्द अपुरे पडतात.

अशा त्रिपुटीचे सार्थ वर्णन ज्ञानेश्वरांनी अमृतानुभवामध्ये असे केले आहे.

तैसे अनुभाव्य अनुभाविक । इहीं दोन्ही अनुभूतिक ।
ते गेलिया कैंचे एक । एकासिचि ॥ ६१ ॥
अनुभवो हा ठाववरी । आपुलीची अवसरी
तेथे अक्षरांची हारी । वाईल काई ॥ ६२ ॥

ज्ञानदेव म्हणतात की, अनुभवाचा एक विषय असतो आणि तो अनुभव घेणारा दुसरा असतो. या दोघांना सामावून घेणारी अनुभूती असते. ही तिघेही परस्परांशी संबंधित व एकमेकांवर अवलंबून असतात. यातील एक जरी दुवा निखळला तरी उरलेले दोन्ही गळून पडतात. अनुभव, अनुभव घेणारा, आणि अनुभूती हे तिन्ही मिळून त्रिपुटी होते. हे तीनही मिळून एकरस होतात, एकजीव होतात आणि तेव्हाच अनुभव घेणारा अनुभाव्याचा अनुभव घेऊ शकतो. यांतील कोणीही गळून उपयोगाचे नाही म्हणजे अनुभूतीचे अस्तित्व हे अनुभवविषय आणि अनुभव घेणारा यांच्या अस्तित्वावर पूर्णपणे अवलंबून आहे.

पुढच्या श्लोकात ज्ञानेश्वर म्हणतात, हा विशिष्ट अनुभव मी अनुभवला आहे. हा माझा अनुभव आहे. हा विचार केव्हा प्रकट होतो तर अनुभवाचा तो विशिष्ट विषय आणि तो विषय अनुभवणारा मी एक स्वरूप होऊन जातो तेव्हा. म्हणजे अनुभवाचा विषय ज्ञान पातळीवर येण्यासाठी, ते झालेले ज्ञान शब्द पातळीवर येण्यासाठी अनुभवणारा अस्तित्वात असायला लागतो आणि तो एकटा असून चालत नाही तर तो अनुभवाचा विषय त्याला स्वत:ला अनुभवायला लागतो. ज्ञानदेव म्हणतात की, एकटा अनुभव हा कधीच ज्ञानाचा विषय होऊ शकत नाही. तर हा अनुभवस्वरूपांत नांदत असतो. तो ज्ञानविषयात कदापिही नांदत नसतो. त्यामुळे त्याला अक्षराचा संग कसा काय लाभणार ?

जे स्वरूपात नांदते, त्यांना अक्षरातून कसे काय व्यक्त करणार ? ज्ञानविषयच फक्त शब्दातून व्यक्त करता येतो. परमात्मा हा स्वरूपात नांदतो. ज्ञानविषयात नांदत नाही. त्यामुळे परमात्म्याचा अनुभव अनुभवल्याशिवाय तो शब्दांतून कदापिही व्यक्त होत नाही. अनुभव अनुभवल्याशिवाय कधीही प्रकट होत नाही. प्रत्यक्ष अनुभवाला आकार नाही. तो निराकार आहे. नि:शब्द आहे आणि म्हणूनच तो शांत आहे.

अशी त्रिपुटी जर साधली गेली नाही, तर काय होते याचे वर्णन देखील तुकोबा एके ठिकाणी करतात. ते म्हणतात,

शिकल्या बोलाचे सांगतील वाद । अनुभव भेद नाही कोणा ॥ १॥
पंडित हे ज्ञानी करतील कथा । न मिळती अर्था निजसुखा ॥ २ ॥
तुका म्हणे जैसी लाचासाठी ग्वाही । देतील हे ठावी नाहीं वस्तु ॥ ३॥

१५४ तुकाराम गाथा

अर्थ - शिकलेले शास्त्रीय शब्दांचा अनुवाद करतात, परंतु शास्त्रात सांगितल्याप्रमाणे त्यांच्यामध्ये अनुभव नसतो. ज्ञानी पंडित कथा करतील (ब्रह्मनिरूपण करतील) पण निरूपणाचा अर्थ जे सुखरूप ब्रह्म, त्याच्याशी ते जीवाने मिळत नाहीत. तुकाराम महाराज म्हणतात, लाचलुचपत घेऊन

खरी स्थिती ठाऊक नसताना खोटी साक्ष द्यावी, त्याचप्रमाणे अशा अनुभवशून्यांचा हा प्रकार समजावा.

तुका म्हणे आता । उरलो उपकारापुरता

या अभंगाच्या शेवटच्या ओळीमध्ये परमात्मप्राप्तीची ज्योत उजळल्यानंतर आता मी फक्त उपकारापुरता शिल्लक आहे, असे म्हणतात. कारण आता काया, वाचा व मन सर्व ईश्वराला अर्पण केले आहे.

वास्तविक तुकोबांनी आयुष्यभर समाजावर उपकारच केले. त्यांची समाजाबद्दलची तळमळ ही त्यांची सामाजिक बांधिलकीच दर्शविते. इतरांच्या सुखानेच ते सुखी होत असत. आपला देह कष्टवून परोपकाराचे कार्य यावज्जीव अखंड चालवत असत. हेच संतांच्या ज्ञानोत्तर कर्मयोगाचे उत्कृष्ट उदाहरण स्वत: तुकोबाच आहेत.

तुकोबा एके ठिकाणी म्हणतात.

उपकारासाठी केले हे उपाय । काय चाड आम्हां ।। १ ।।
बुडती हे जन न देखवे डोळां । येतो कळवळा म्हणउनि ।। २ ।।
तुका म्हणे माझे देखतील डोळे । भोग देते वेळे येईल कळों ।। ३ ।।

अर्थ - परमार्थाचे उपाय जे आम्ही सांगितले, ते केवळ दुसऱ्यावर उपकार होण्याकरिता, नाही तर या वाचून आम्हांला काय गरज होती? जन संसारामध्ये बुडत आहेत हे आमच्याने पहावेना, म्हणून त्यांचा कळवळा आमच्या हृदयात येऊ लागला. तुकाराम महाराज म्हणतात, ह्या पातकी संसारी जीवाला कृतकर्माचे फळ भोगण्याच्या वेळेस आम्ही सांगितलेल्या गोष्टी कळून येतील. त्या वेळेस आमचेच डोळे पाहतील.

आता त्यांनी प्रारब्धाने मिळालेले उर्वरित आयुष्य ईश्वरी इच्छेनेच व्यतीत करावयाचे ठरवलेले आहे. उपकार करायची त्यांची तयारी आहेच, पण तो त्याच्या मर्जीने. तो परमेश्वर जसा ठेवील तसे राहण्याचे त्यांनी ठरवले. त्याच्या आज्ञेची वाट पाहात बसले. म्हणून ते म्हणतात,

प्रेम सूत्र दोरी । नेतो तिकडे जातो हरी ।
मने सहित वाचा काया । अवघे दिले पंढरी राया ।
सत्ता सकळ तया हाती । माझी कीव काकुळती ।
तुका म्हणे ठेवी तैसे । आम्ही राहो त्याचे इच्छे ।

३९८ तुकाराम गाथा

अर्थ - हरीविषयी असणारे भक्ताचे जे प्रेम तोच भगवंताला बांधलेला दोरा आहे. या दोऱ्याने जिकडे भक्त हरीला ओढून नेईल तिकडे तो जातो. भक्तांनी देवाला मनासह वर्तमान काया आणि वाचा ही अर्पण केली आहेत. सर्व सत्ता देवाच्या हाती आहे, त्या ठिकाणी मी कीव काकुळती येतो. तुकाराम महाराज म्हणतात, तो जसा ठेवील, तसे आम्ही राहू. सर्वसाधारणपणे आत्मसाक्षात्कार झाला की हे महात्मे एकांतवासात जातात. थोडक्यात समाजजीवनापासून निवृत्त होतात. येथे लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे ज्ञानदेवांनी म्हटल्याप्रमाणे अशा सत्पुरुषांनी निवृत्त न होता परत समाजास मार्गदर्शन करावे. तुकोबांनी तसेच केले, पण त्यांनी ईश्वरी इच्छेवर ठेवले. ज्ञानेश्वर म्हणतात.

आम्ही पूर्ण काम होऊनी । जरी आत्मस्थिती राहूनी ।
तरी प्रजा हे कैसेनि । निस्तरेल ॥ ६६ ॥
इही आमची वास पहावी । मग वर्तती परी जाणावी ।
ते लोकस्थिती आघवी । नासिली होईल ॥ ६७ ॥
म्हणोनी समर्थु जो एथे । आणि लावी सर्वज्ञते ।
तेणे सविशेषें कर्मातें । त्यजावें ना ॥ ६८ ॥

ज्ञानेश्वरी अध्याय ३ रा

अर्थ - आम्ही पूर्णत्वाला पोचून जर आत्मस्थितीत राहिलो, तर या प्रजेचा निभाव कसा लागेल.

यांनी आमची राह पहावी आणि मग तीवरून सदाचरणाची पद्धती जाणावी, अशी जी आजमितीस समाजसंस्थेची घडी आहे, ती सर्वच

बिघडून जाईल. म्हणून ज्या सामर्थ्यवान पुरुषाने या जगात सर्वज्ञपणाचे पीक गोळा केले आहे, त्याने तर कर्माचा त्याग विशेष करून करू नये.

सारांशाने, या अभंगाबाबत असे वाटते की, तुकोबांनी साधकावस्थेत जी साधना आणि वाचन केले, त्यांच्या बुद्धीला पटलेल्या गोष्टीची साक्षात अनुभूती पाहिजे होती, ती त्यांना मिळाली. नामदेवासारखेच ते आर्त भक्त होते. नंतर ते ज्ञानी भक्त झाले. पण त्यापूर्वी भक्तिमार्ग सोपा वाटणाऱ्यांना हा मार्ग वाटतो तितका सोपा नाही. याचा इशारा '**भक्ती तो कठिण । शुळावरील पोळी । निवडे तो बळी विरळा शूर ।**' या अभंगाद्वारे करून दिला होता.

ईश्वराच्या कृपेने त्यांच्या सर्व व्यापकतेचे ज्ञान होऊन त्यांना ब्रह्मप्राप्ती झाली आणि जीवनात संपूर्ण परिवर्तन व्हावे, ही इच्छा पूर्ण झाल्याचे जाणवते. त्याचेच वर्णन या अभंगातून जाणवते.

अशा या महान संतांच्या जीवनगाथेचे यथार्थ व समर्थपणे अवलोकन करून देणारे. 'साक्षात्कारी संत तुकाराम' या ग्रंथाचे लेखक डॉ. शं. दा. पेंडसे यांनी त्या ग्रंथाच्या शेवटी जे भाष्य केले, ते उद्धृत करण्याचा मला मोह आवरत नाही. तुकारामांनी भगवंताला प्रार्थना केली, तिचेच स्मरण करून लेखकाने तीच प्रार्थना तुकोबांना केली आहे. ते म्हणतात.

'महाराज, ईश्वरी साक्षात्कारानंतर, धर्मरक्षणाकरिता आपण वैकुंठाहून येथे आल्याची जाणीव झाल्यापासून एका क्षणाचीही विश्रांती न घेता आणि स्वत:च्या शरीराकडे व संसाराकडे लक्ष न देता आपण स्वधर्मरक्षणाचे कार्य आमरण चालविले, म्हणून आम्हांला स्वराज्य दिसले. आपण ज्ञानदेवांची योग्यता संपादन करून भागवत धर्म मंदिराचे कळस झाला. असे आपले स्मरण महाराष्ट्र आजपर्यंत करत आला. यापुढेही आपला व आपल्या उपदेशाचा विसर आम्हांला पडू देऊ

नका.’

हेंचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ।
गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ।
न लगे मुक्ति धन संपदा । संतसंग देई सदा ।
तुका म्हणे गर्भवासी । सुखे घालावे आम्हासी ।।

३२०६ ।। तुकाराम गाथा

१४

अधिक देखणे तरी (एक विश्लेषणाचा प्रयत्न)

अधिक देखणे तरी निरंजन पाहणे ।
योगिराज विनवणे मना आलें वो माये ॥ १ ॥

देहबळी देऊनी साधिले म्यां साधनी
तेणे समाधान मज जोडलें वो माये ॥ २ ॥

अनंगपण फिटलें मायाछंदा साठविले
सकळ देखिलें आत्मस्वरुप वो माये ॥ ३ ॥

चंदन जेवीं भरला अश्वत्थ फुलला
तैसा म्यां देखिला निराकार वो माये ॥ ४ ॥

पुरे पुरे आतां प्रपंच पाहणे
निजानंदीं राहणे स्वरुपीं वो माये ॥ ५ ॥

ऐसा ज्ञानसागरू रखुमादेविवरु
विठ्ठल निर्धारू म्यां देखिला वो माये ॥ ६ ॥

अधिक देखणे तरी निरंजन पाहणे ।
योगिराज विनवणे मना आलें वो माये ॥ १ ॥

अर्थ - येथे ज्ञानेश्वर त्यांच्या गुरूला विनंती करीत आहेत की आता जीवनात अधिक पाहण्याचे आहे ते फक्त निरंजन म्हणजे शिवाचे

पूर्णत्व. कारण साधनेने आत्म प्राप्ती झालेली आहे, ती टिकवून पूर्णत्वाकडे जावयाचे आहे.

ज्ञानेश्वर हे मुळात नाथपंथीय. अमृतानुभवात ते 'नमः पूर्णाय शंभवे' अशा शब्दांत म्हणजे पूर्णरूप शंभूला माझे वंदन असो असे म्हणतात. म्हणजेच उत्पत्ती, स्थिती आणि लय - या विश्वाच्या मुळाशी जो शिव आहे, त्याच्याकडेच जाण्याची आतुरता यांना लागून आहे, असे जाणवते.

नाथ संप्रदायात गुरुभक्तीला अनन्य साधारण महत्त्व आहे. शिव शक्तीचे मूर्त स्वरूप म्हणजे सद्गुरु. त्या गुरूलाच म्हणजे निवृत्तिनाथांना सांगत आहेत की, मला केलेली आज्ञा, जीत समाजाला भक्तिमार्गाकडे वळवायचे, गीतेचे प्राकृतात भाषांतर करावयाचे इत्यादी कामे आता पूर्ण झाली आहेत. तरी मला पूर्णत्वाकडे जाण्याची आज्ञा असावी.

देहबळी देऊनी साधिले म्यां साधनी
तेणे समाधान मज जोडलें वो माये ॥ २ ॥

अर्थ - साधनेच्या रूपांत देहाचे समर्पण केले आहे, त्यामुळे समाधान जोडले आहे.

या ओवीमध्ये ज्ञानदेव त्यांच्या साधनेची क्रिया सांगत आहेत. त्यांची साधना एक योगसाधनेची व दुसरी भक्तिमार्गाची होती. देह त्यागला, म्हणजे ऐहिक सुखाचा त्याग करून व योगसाधनेने मी त्या परमतत्त्वाशी जोडला गेलो आहे. नाथपंथीयांच्या मते जीवन्मुक्ती ही प्रथम देहात आणि नंतर दिव्य देहात मिळवायची असते. ही एक प्रकारची योगप्रक्रिया असते व ती गुरूकरवी करून घ्यावयाची असते. तिलाच 'कायासिद्धी' म्हणतात. ही योगसाधना कुंडलिनी जागृत करून केली जाते. (यांत मंत्र योग, हठयोग, लययोग आणि राजयोग येतात) अशा योगसाधनेस ज्ञानेश्वर 'पिंडे पिंडाचा ग्रासू' असे म्हणतात. हेच नाथ पंथीयांचे मर्म आहे व तेच महाविष्णूंनी म्हणजे श्रीकृष्णांनी उलगडून दाखवले आहे. दुसऱ्या प्रकारच्या साधनेत सर्वसामान्यांसाठी तेच ध्येय साध्य करण्यासाठी भक्तिमार्ग

सांगितला आहे.

कोणत्या तरी एका साधनेने या देहाचे ईश्वरचरणी समर्पण करून त्याच्याशी योग जोडण्याचा उद्देश असतो.

अनंगपण फिटले मायाछंदा साठविले

सकल देखिले आत्मस्वरूप वो माये ॥ ३ ॥

अर्थ – या ओळींमध्ये माउली साधनेची फलप्राप्ती सांगत आहेत. ते म्हणतात, माझ्यातील वासनांचा क्षय झाला आहे. या मायावी जगातील भ्रमाचा व अपूर्णतेचा नाश झाला आहे व माझ्या अंगी माया म्हणजे ईश्वराने निर्माण केलेली शक्ती साठवली गेली आहे. त्या शक्तीमुळेच मी आत्मस्वरूप पाहिले आहे व त्या दैवी शक्तीने मी संतुष्ट झालो आहे. येथे माया म्हणजे ईश्वरीशक्ती व छंदा म्हणजे संतुष्ट होणे असा अर्थ अभिप्रेत आहे.

याच ईश्वरी शक्तीच्या जोरावर त्यांनी भिंत चालवून दाखवली किंवा रेड्याच्या मुखावाटे वेद वदवून दाखवले होते व समाजाच्या भ्रमनिरासासाठी या सिद्धींचा उपयोग केला होता.

या ओळीमध्ये योगमार्गाने मिळणारे फल याचे वर्णन केले आहे.

चंदन जेवी भरला अश्वत्थ फुलला ।

तैसा म्यां देखिला निराकार वो माये ॥ ४ ॥

अर्थ - या ओळींमध्ये ज्ञानदेवांनी भक्तिमार्गातून मिळालेल्या साध्याचे वर्णन केले असून विष्णूचे म्हणजे त्या विराट पुरुषाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अश्वत्थाचे फुलण्याचे वर्णन करून निर्गुण निराकार असे ब्रह्म याचे दर्शन झाल्याचे सांगितले आहे.

भारतीय संस्कृतीमध्ये अश्वत्थ वृक्षाला अनन्य साधारण महत्त्व आहे. या वृक्षाची पूजा केल्याचा उल्लेख मोहेंजोदडोच्या उत्खननांत सापडल्याचा (इ. स. पूर्वी ३७००) इतिहास सांगतो. याच वृक्षामध्ये भगवान विष्णूचे वास्तव्य असल्याची भारतीयांची श्रद्धा आहे, म्हणून

याला देववृक्षदेखील म्हटले जाते.

शंकराचार्य तर या वृक्षास संपूर्ण विश्वाचे प्रतीक मानतात. त्यांच्या मते अश्वत्थ असे निर्देशित करतो की, जे आज आहे ते उद्या नसणार म्हणजे हे जग असे आहे.

वास्तविक या वृक्षाला फुलांचा बहर कधी येतो, हे कोणी बघितले नाही. पण साधनेने त्यांना हा वृक्ष बहरल्याचे आणि त्यामुळे त्यांचे अंग सुगंधित झाल्याचे सांगितले आहे. अशी स्थिती ब्रह्माचे दर्शन झाल्यासच येऊ शकते, असे आध्यात्मिक तज्ज्ञ सांगतात. खरे पाहता ही व्यक्तिगत अनुभूती आहे आणि अशा अनुभूती ओळखण्याची काही लक्षणे असतात. १) त्यांच्यातील विलसित असणारे एक प्रकारचे तेज व त्या भोवती असणारे तेजोवलय २) त्यांच्यापासून येणारा सुगंध आणि ३) त्यांच्या स्पर्शाने होणारी एक विशिष्ट जाणीव व संवेदना.

असा आत्मानुभूतीनंतर येणारा सुगंध माझे मित्र डॉ. रमाकांत देशपांडे (मुंबई) यांनी अनुभवल्याचे सांगितले. त्याचे असे झाले. त्यांना श्री. प्रा. के. वि. बेलसरे यांच्या सहवासांत त्यांचे साधक व वैद्यकीय सल्लागार म्हूणन १६ - १७ वर्षे राहण्याचा योग आला. काहीवेळा त्यांच्या प्रवचनानंतर त्यांना आलेल्या आत्मानुभूतीच्या अनुभवानंतर एक सुगंध दरवळण्याची जाणीव डॉ. देशपांडे यांना होत असे.

पुरे पुरे आता प्रपंच पाहणे ।
निजानंदी राहणे स्वरूपीं वो माये ॥ ५ ॥

अर्थ - या ओवीमध्ये ज्ञानदेव या मायावी संसारातून मुक्तीची अपेक्षा करीत आहेत व प्राप्त झालेल्या आत्मानंदातच राहण्याची इच्छा प्रकट करीत आहेत आणि शेवटी त्या पूर्णत्वाकडे जाण्याची अनुज्ञा मागत आहेत.

ऐसा ज्ञानसागरू रखुमादेविवरु ।
विठ्ठल निर्धारु म्यां देखिला वो माये ॥ ६ ॥

अर्थ - या शेवटच्या ओवीमध्ये ज्ञानदेव हे वर निर्गुण रूपातील अनुभवलेल्याचेच वर्णन विठ्ठल रखुमाई यांच्या दर्शनाने होत असल्याचे सांगत आहेत. या प्रचंड ज्ञानसागरात यांच्या दर्शनानेच मला मुक्ती मिळाल्याचे जाणवते.

वरच्या ओव्यातील वर्णन अतिउच्च आध्यात्मिक पातळी गाठलेल्या साधकांचे होऊ शकते, तर शेवटच्या ओळीतील वर्णन सामान्यातील असून जेथे परमेश्वर मानवी आकार घेऊन शिवशक्तीच्या म्हणजेच विठ्ठल रखुमाईच्या सगुण रूपांत भजला जातो. हेच ज्ञानेश्वरांनी वाढवलेल्या वारकरी पंथाचे दैवत आहे.

सारांशाने या रचनेमध्ये ज्ञानदेवांनी आत्मस्वरूपाची प्रचीती त्याचबरोबर ब्रह्मप्राप्तीची अनुभूती वर्णिली असून, निर्गुणाबरोबर सगुणाचे वर्णन करून आता यापुढे त्या शिवतत्त्वाबरोबर म्हणजे पूर्णत्वाबरोबर राहावे ही अपेक्षा बाळगून त्यांचे गुरू निवृत्तिनाथ यांना या ऐहिक विश्वातून मुक्त होण्याविषयीची अनुमती मागितली आहे. तसेच याच रचनेमध्ये शैव व वैष्णव पंथाची एकरूपता दाखवून सगुणाच्या भक्तीचा व ईश्वररूपी शिवशक्तीचा आनंद घेतल्याचे प्रतिपादले आहे.